

# ।। श्रीगजानन अनुभव ।।

(श्री गजानन महाराजांविषयी भक्तांना आलेले अनुभव)

शब्दांकन–जयंत वेलणकर

*प्रस्तावना :- येथे माझे मोठेपण, काहीच नाही विबुध हो!*

जय गजानन! जवळपास सदतीस वर्ष वाणिज्य विषयाचा अध्यापक म्हणून काम केल्यानंतर २०१३ च्या डिसेंबर महिन्यात मी निवृत्त झालो. निवृत्तिनंतर काय ? या प्रश्नाच्या उत्तरार्थ मी समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराजांच्या समोर बसलो आणि त्यांना दोन गोष्टींसाठी विनवणी केली. ‘‘मला तुमच्या सेवेत रूजू करून घ्या आणि माझी लेखणी तुमच्या कार्यासाठी उपयोगात येऊ द्या’’ महाराजांनी या दोन्हीही आघाड्यांवर फारच सुंदर योजना आखून त्यासाठी मला कार्यास लावलं आणि माझी काहीही योग्यता नसतांना माझ्याकडून हे कार्य करवून घेतलं, ‘तेव्हा येथे माझे मोठेपण काहीच नाही विबुध हो!’ हे कृपया समजून घ्या.

पहिले १ जानेवारी, २०१५ रोजी गुरुवार आणि एकादशी या शुभमुहूर्तावर समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराजांनी उपासनेचा शुभारंभ करून घेऊन पुढे त्याचा छान विस्तारही करवून घेतला आणि करून घेत आहेत. या पुस्तकात शेवटी उपासनेविषयी सविस्तर लिहीले आहे. भक्तांनी तो भाग अवश्य समजून घ्यावा.

दुसरं म्हणजे लेखणीविषयी महाराजांना म्हटलं, तुमच्या विषयी विविध प्रकारे अनेकांनी लिहीलं आहे, मी नेमकं काय करावं ते कळत नाही पण पूर्ण विश्वास आहे की तुम्ही काहीतरी चांगलंच घडवून आणाल आणि कल्पनाही केली नव्हती इतक्या चांगल्या रितीने महाराजांनी प्रथम व्हॉट्सअ□पच्या माध्यमातून आणि नंतर पुस्तकाच्या रूपाने भक्तांना आलेले अनुभव लिहीण्याची प्रेरणा दिली.

या ग्रंथातील सर्व अनुभव प्रथम सोशल मिडीयावर प्रसिद्ध झाले आहेत. सर्वप्रथम बोलण्याच्या ओघात ऐकलेला एक अनुभव लिहून भक्तांना गजानन महाराजांविषयी असलेल्या अनुभवांचे स्वागत आहे असं आवाहन करण्यात आलं. अनुभव पाठवितांना तो, प्रामाणिक असावा, त्यातील तपशील सत्य असावा, तो अनुभव हृदयस्पर्शी असावा, हे सुचविण्यात आलं. भक्ताने प्रथम तो अनुभव सांगावा, नंतर तो लिहून पाठवावा, त्यानंतर त्याचं शब्दांकन झालं की तो संबंधिताला वाचून दाखवून नंतरच तो मोबाईलवर टाईप करायला घ्यावा आणि साधारणतः दर गुरूवारी तो प्रसिद्ध व्हावा, असा क्रम होता. याला महाराजांच्या भक्तांनी महाराष्ट्रच नव्हे तर बाहेरही उत्तम प्रतिसाद दिला हे उघडच आहे. महाराजांच्या कृपेने भक्त दर गुरूवारी अनुभवाची आतुरतेने वाट पाहू लागले आणि भक्तांची ही संख्या महाराजांनी हजारोंच्या घरात नेली यातच सर्व आलं.

ग्रंथ निर्मितीच्या कामात अनेकांचा हातभार लागला, अर्थात महाराजांच्या प्रेरणेनेच हे सर्व असल्याने आपुलकीने सगळ्यांनी हे केले आहे. तरीही ज्यांनी अनुभव कथन केले त्यांचा आणि हे अनुभव कॉम्प्युटरला सेव्ह करून प्रिंटरकडे ते इ मेल करणारे श्री पराग बिडवे (डोंबिवली) आणि श्री शशिकांत बोरडकर (गडचांदूर) यांचा उल्लेख इथे आवश्यक ठरतो. राधिका लोहिया, अंबाजोगाई हिने मुखपृष्ठासाठी दिलेली सेवा येथे उल्लेखनीय आहे.

श्री गजानन महाराजांविषयी श्रद्धा आणि भक्ती वाढीस लागावी, या भावनेने प्रेरित होऊन केलेले हे काम जास्तीत जास्त भक्तांच्या हाती पोहोचविण्याचं कार्य आम्हा सर्व गजानन महाराज भक्तांना करावयाचं आहे. गजानन महाराजांच्या आशिर्वादाने ‘॥ श्री गजानन अनुभव ॥’ घराघरातून वाचल्या जाऊन वाचकांनी महाराजांच्या भक्तिमार्गात अधिक कार्यरत व्हावं आणि महाराजांनी सर्वांचं कल्याण करावं हेच त्यांच्याजवळ मागणं! श्री गजानन ! जय गजानन! श्री गजानन ! जय गजानन!

जयंत वेलणकर , ६९, माधवनगर, नागपूर – ४४००१०, मोबाईल नं. ९४२२१०८०६९

जय गजानन! श्री गजानन विजय ग्रंथाच्या सहाव्या अध्यायात श्री गजानन महाराज बंकटलालच्या शेतात कणसे खाण्यासाठी जातात आणि तिथे मधमाशांचं पोळं खाली झालेल्या धुरामुळे फुटून असंख्य माशा महाराजांच्या अंगावर येऊन बसतात. त्यांना चावतात, तेव्हा बंकटलाल चिंतित होतो, ते पाहून महाराज त्याला म्हणतात, सच्चिदानंद स्वरूपाला जाणल्यामुळे मला मधमाशांची बाधा होणार नाही. नंतर महाराज माशांना उडून जाण्याची सूचना करतात व माशा निघून जातात.

साधारण पंचवीस एक वर्षापूर्वीची गोष्ट असावी. आमचे एक स्नेही श्री बाळ थत्ते सांगत होते, अकोला येथील एका सहनिवासात जोशी म्हणून एक कुटूंब रहात होतं. आजी, आजोबा, मुलगा, सून, नातवंड असं छान एकत्र कुटूंब. पहिल्या मजल्यावर त्यांचं राहणं होतं, एकदा त्यांच्याकडे घराच्या बाल्कनीत मधमाशांनी पोळं तयार केलं, पुढे मधमाशांचा त्रास इतका वाढला की बाल्कनीत माशा घोंगावू लागल्या आणि त्यांना त्या जागेचा वापर बंद करावा लागला. बाल्कनीत जाण्याचं दार बंद केलं पण हा काही त्यावर उपाय नव्हता, मग त्यांनी पोळं काढणाऱ्या लोकांचा शोध सुरू केला पण पोळं काढणारे लोक मिळेनात. मोठ्या मुश्कीलीने शेवटी मिळाले तर खूप पैसे मागितले, शिवाय मध आम्ही नेऊ असेही म्हणाले ते मान्य केले आणि खूप काळजी घेऊन ती जागा साफ केली पण तो आनंद काहीच दिवस टिकला. थोड्याच दिवसांनंतर त्याच जागेवर पुन्हा आणखीनच मोठं पोळं तयार होऊन जागेचा वापर पुन्हा बंद करावा लागला. आता खूप शोध घेऊनही माणसं मिळेनाशी झाली. शेजारी चर्चेला विषय झाला. माशा घरात केव्हाही शिरतील, असं सतत मनावर दडपण येऊन मोठ्यांना स्वतःबरोबर लहानांची काळजी सतावू लागली.

घरी मुलांची आजी होती. तिला नातवंडांची काळजी सतावित होती. आजी गजानन महाराजांची भक्त, आजीला सहाव्या अध्यायातील ओव्या आठवू लागल्या माशी तरी तोच झाला। तोच आहे माझा पुतळा॥ आजीनं मनापासून महाराजांचं स्मरण केलं आणि एक दिवस आजीने हिंमत बांधली. सकाळी आरतीचे तबक तयार केले आणि ती बाल्कनीत जाऊ लागली मुलांनी विचारलं, अग आई तू हे काय करते आहेस? आजी म्हणाली मला जाऊ दे मुलांनी विनविले, हवं तर तू जा पण निदान तबक तरी नेऊ नकोस माशा अंगावर येतील पण आजीचा निर्धार पक्का होता ती म्हणाली मी आणि महाराज काय ते पाहून घेऊ. हट्टाने आजीने बाल्कनीत प्रवेश केला, दार लोटून घेतले कांही मिनिटे शांततेत आणि दडपणाखाली गेली आणि थोड्या वेळात आजीने आत येऊन दार पुन्हा लावून घेतलं. घरातील सर्व थोड्या वेळात आपल्या कामात मग्न झालेत.

दिवस सरला संध्याकाळ झाली डोअरबेल वाजली म्हणून दार उघडले तर बाजूच्या बिल्डींगमधले काका दारात हजर. ते विचारू लागले. माशांना घालविण्याठी पुन्हा पैसे दिलेत का? त्यांच्या या प्रश्नाने सगळे आश्चर्यचकीत होऊन विचारू लागले माशा गेल्या? त्यावर काका म्हणाले. अहो मला दिसल्या नाहीत म्हणून तर मी आलोय दार उघडून बघितलं तर माशा खंरच निघून गेल्या होत्या. सर्व आजीला विचारु लागले. आजी तू काय जादू केलीस? आजीचे डोळे भरून आले. आजी म्हणाली ही माझ्या गजानन महाराजांची किमया बरं! मी त्यांना कळवळून प्रार्थना केली आणि आरती ओवाळून सहाव्या अध्यायातील प्रसंग आठवा आणि आमच्यावर कृपा करा. अशी मनोभावे विनवणी केली. आजीचे पुढील शब्द आजीला आलेल्या हुंदक्यात विरून गेले.

गजानन महाराजां विषयीचा हा अनुभव एकदा गप्पांच्या ओघात काकांनी आम्हाला सांगितला आणि तो ऐकून मी आमच्या आईच्या आठवणीत हरवून गेले. आमची आई गजानन महाराजांची भक्त. तिच्यामुळेच आम्हा भावंडांना महाराजांचं प्रेम लागलं. महाराजांविषयीची भक्ती आणि श्रद्धा तिच्यात ओतप्रोत भरली होती. सातत्याने श्री गजानान विजय ग्रंथाचें पारायण आणि महाराजांचं स्मरण, हा तिचा परिपाठ तिने शेवटपर्यंत टिकविला. असं आता आम्ही म्हणू शकतो कारण आता ती आपल्यात नाही.

जाण्यापूर्वी वर्षभर तिच्या तब्येतीची कुरबूर सुरू होती पण ती जाईल अशी काही तब्येत खराब नव्हती. २०१७ च्या मार्च महिन्यात तिची तब्येत थोडी नाजूक झाली. ८ मार्चला माझी बहीण मला म्हणाली. मी शेगावला जाऊन येऊ कां? म्हटलं, अगं जा शेगावलाच जाते आहे नं, महाराजांना सांगून जा ते काळजी घेतील आणि त्यानुसार ती शेगावला रवाना झाली. ती तिकडे गेली आणि इकडे आईची तब्येत अचानक खूपच बिघडली, इतकी की तिचा अंतकाळ जवळ आल्याची चाहूल आम्हा सर्वांना जाणवली. तसं आईने काही दिवसांपूर्वीच घोषीत केलं होतं की प्रकट दिनानंतर मी जाणार. खरोखरच फेब्रुवारीत प्रकट दिन साजरा करून ही आईची प्रयाणाची तयारी आहे, हे आम्हा भावंडांच्या लक्षात आलं. आईला अक्षरशः घरघर सुरू झाली. तिच्या जीवाची घालमेल होत होती. आमच्या लक्षात आलं की कशाततरी तिचा जीव अडकला आहे. तिची अवस्था आम्हाला पाहवेना. आम्ही तिच्या कानात कशात काही इच्छा गुंतली असावी असं गृहीत धरून काही बोलणं सुरू केलं, देवाला प्रार्थना करू लागलो. तिला सोडवा, असं महाराजांना म्हणून झालं, पण प्राण जात नव्हता.

९ मार्च २०१७, गुरूपुष्यामृत योग! त्या गुरूवारी बहीण शेगावहून परत आली, आईची तगमग पाहून तिचे डोळे पाणवले. तिने पिशवीतून शेगावचा प्रसाद आणि तीर्थ बाहेर काढून तिच्या तोंडात तीर्थाचे दोन थेंब टाकले, आपला हात तिच्या छातीवर ठेवून 'गण गण गणात बोते' म्हटलं आणि आई शांत झाली, सगळी तगमग क्षणात संपली, ती महाराजांच्या स्मरणात तीर्थासाठी थांबली होती. तीर्थ प्रभावे तिला सद्गति प्राप्त होणारच होती, आम्ही भावंडांनी तिच्या पुढील प्रवासासाठी महाराजांना हात जोडले आणि माझ्या मुखातून आईच्या भक्तीचा आदर करणारे शब्द बाहेर पडले. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. रश्मी राजीव भालेराव, नागपूर. – ८९५६८६७२१०.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

*२ – गजानन महाराजांची लीला अपरंपार – उषा दत्तात्रेय बडकस, नागपूर.*

जय गजानन! आज माझं वय ८५ वर्षांपेक्षा जास्त आहे. अगदी तरुण वयापासून मी श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण करीत आले आहे. गजानन महाराजांची लीला अपरंपार आहे. हे ऐकत आले आहे. वाचत आले आहे. एवढंच काय त्याचा अनुभव देखील अनेक वेळा घेतला आहे. पण माणसाचं मन असं आहे की प्रत्येक वेळी ते साशंक झाल्याशिवाय राहत नाही. गजानन महाराज करतील ते चांगल्यासाठीच, हे माहित असूनही मध्यंतरी मला आलेल्या एका अनुभवानी मला हलवून टाकलं.

झालं असं की, माझा मोठा मुलगा अभय याला गजानन महाराजांचं अतिशय वेड होतं. इतकं की घराच्या बाहेर जाताना दारात उभं राहून अनंत कोटी ब्रह्मांड नायक हा जयघोष केल्याशिवाय बाहेर पडायचं नाही हा त्याचा नेम होता, पण दैवयोग काही वेगळाच होता. अभयची तब्येत बिघडत जाऊन एक दिवस त्याला गजानन महाराजांनी त्यांच्या जवळ बोलावून घेतलं. तो गजानन महाराजांचा भक्त, जाऊ नये अशा वयात गेला, त्याच्या स्मृतीत गजानन महाराजांचं काही करावं असं माझ्या मनात आलं.

आमच्या वस्तीत एक हनुमान मंदिर आहे. मला वाटू लागलं की या मंदिरात जर गजानन महाराजांच्या मूर्तीची स्थापना झाली तर वस्तीतील गजानन महाराज भक्तांना निश्चितच आनंद होईल, मंदिरात तशी जागाही आहे. या कल्पनेने माझ्या मनाचा भार थोडा कमी झाला. मी तसं स्वप्न मनात रंगवू लागले. त्यातच मार्च २०१६ मधे आम्हाला शेगांवला जाण्याचा योग आला. आम्ही तवेरा गाडी करून शेगांव दर्शनासाठी गेलो आणि अनायसेच मोठी गाडी नेल्यामुळे आणि शेगांवहून गजानन महाराज येणार या भावनेनी येताना तिथून मंदिरात शोभून दिसेल अशी सुंदर संगमरवराची महाराजांची मूर्ती घेऊन आलो. दुसऱ्या दिवशी मंदिराच्या विश्वस्तांशी बोलून मूर्ती स्थापन करण्याची कल्पना त्यांच्या समोर मांडली. स्थापनेचा खर्च, कामाचा खर्च, सर्व महाराजांच्या कृपेने आम्ही करू शकतो हे देखील बोलून झालं. ते म्हणाले, आम्ही विचार करून तुम्हाला कळवतो आणि दोन दिवसांनी त्यांनी मला कळवलं आम्ही मंदिरात गजानन महाराजांच्या मूर्तीची स्थापना करणार नाही! आम्हाला ही मूर्ती नको.!

माझ्या सर्व उत्साहावर पाणी फिरलं, चेहरा एकदम उतरला, त्यांना दहादा वेगवेगळ्या पद्धतीने म्हणून पाहिलं पण त्यांनी म्हटलं, तुम्हाला मूर्ती बसवायची तर मंदिराच्या बाहेर एका कोपऱ्यात बसवा पण मंदिरात हे शक्य नाही आणि त्या नंतर सुरू झाले माझ्या कसोटीचे क्षण. आजूबाजूच्या परिसरात चौकशी करून झाली परंतु कुठे काही सकारात्मक चिन्ह दिसण्याचे नाव नाही आणि माझ्या मनावरील दडपण वाढू लागलं, दिवस तर कुणाशी बोलण्यात निघून जायचा पण रात्र झाली की ती पॅकबंद अवस्थेतील मूर्ती समोर पाहून रडू यायला लागयचं. एकच प्रश्न मी विचारू लागले, महाराज माझं काही चुकलं का? तुमची इच्छा काय आहे? वेड्यासारखं रात्री त्यांच्याशी बोलायचं आणि दिवसभर त्या अनुषंगाने आल्यागेल्याशी चर्चा करायची. दिवसागणिक मनावर दडपण वाढत होतं, महाराजांची काय योजना आहे कळत नव्हतं. तशात एक महिना पूर्ण झाला. १३ मार्च ते १२ एप्रिल, २०१६ आणि १२ एप्रिलच्या रात्री मनात एक विचार आला, आपल्या वस्तीत वेलणकर रहातात. त्यांच्या घरी मागे गजानन विजय ग्रंथ पारायण कार्यक्रम झाला होता. त्यांना मूर्तीविषयी विचारून पहावे आणि मग ती रात्र संपली आणि १३ एप्रिलच्या दुपारी माझ्या सुनेची मोठी बहीण आहे बल्लाळ म्हणून, तिचे मिस्टर आमच्या घरी आले. त्यांच्या कानावर मी ती गोष्ट घातली. त्यावर ते म्हणाले, अहो मावशी, मी त्यांना ओळखतो, त्यांच्याकडे दर एकादशीला गजानन महाराजांची उपासना होत असते. आपण त्यांना अवश्य विचारू. जर त्यांच्याकडे ही मूर्ती राहील तर महाराजांच्या कृपेने सर्वच प्रश्न सुटतील. आणि मग काय? महाराजांच्या कृपेने तसंच झालं आणि माझ्या लक्षात आलं की महाराजांनी गेल्या महिनाभर मला रडवलं, माझी परीक्षा पाहिली, पण आज घडून गेलेल्या गोष्टींचा मी विचार करते तेव्हा लक्षात येतं की आपल्याला समजत नाही पण महाराजांची लीला खरंच अगाध आहे! काय झालं या काळात? काय योजना होती महाराजांची? महाराजांची योजना होती.

महाराजांनी आधीच ठरवले होते की आपण कुठे आणि केव्हा प्रस्थान ठेवणार. महाराजांनी तिथे प्रस्थान ठेवलं ती तारीख १४ एप्रिल २०१६, वार गुरुवार, योग गुरूपुष्यामृत. (आणि महाराज तो मुहूर्त साधण्यासाठी स्वतः नाही का बंदिस्त अवस्थेत राहीले?) दर एकादशीला मूर्ती समोर उपासना आणि नामस्मरण होतं. गुरूपुष्यामृत योगावर मूर्ती समोर पारायणाचा कार्यक्रम झाला. मागील चातुर्मासात महाराजांच्या मूर्तीच्या साक्षीने 'गण गण गणात बोते' चा ६ कोटीपेक्षा जास्त जप झाला. यंदा तर महाराजांनी तो सव्वा तेरा कोटी करून घेतला. महाराजांच्या साक्षीने विद्याताई पडवळ, यांच्या गजानन विजय मुखोद्गत पारायण कार्यक्रमाला पाचशे लोकांची उपस्थिती राहून भव्य कार्यक्रम झाला. मला त्यात, अन्नदानाचा आनंद घेता आला. या सर्व पार्श्वभूमीवर आता पुन्हा लक्षात येतं की, महाराजांनी माझी परीक्षा पाहिली खरी,पण खरं सांगायचं तर माझाच विश्वास कमी पडला. महाराज करतात ते चांगल्यासाठीच, ही खूणगाठ आता जरी मी मनात बांधू शकले तरी मिळवलं. त्यामुळे दासगणूंच्या शब्दात सांगायचं तर मी एवढेच म्हणेन. ऐसे गजानन कृपेचे महिमान आहे थोर साचे । ते साकल्ये वर्णण्याचे मसी नाही सामर्थ्य ॥ बाकी काय! श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्रीमती. उषा दत्तात्रेय बडकस, नागपूर
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

*३ – गजानन महाराजांनी दिली संतत्वाची प्रचिती – श्री. रमेश काशिनाथ जोशी, परभणी.*

जय गजानन! संत परम कृपाळु असतात. जगाची वागण्याची रीत कशीही असली तरी संत कृपादृष्टीनेच पाहतात, याचा अनुभव गजानन महाराजांनी मला दिला. लहानपणापासून माझा देवावर विश्वास नव्हताच, असं जरी म्हणता येणार नाही तरी, मी देवाला कधीही नमस्कार करायचो नाही असं म्हणायला हरकत नाही. फार काय मी परभणी गावात ज्या त्रिमुर्तीनगर भागात राहतो तिथे शेजारीच म्हणजे अगदी घराला लागुनच गजानन महाराजांचे मंदिर आहे, तिथे देखील मी कधी गेलो नाही. वास्तविक १९८९ ला माझ्या शेजारीच श्रीमान लंगर सरांनी संत गजानन महाराज मंदिराचे बांधकाम सुरू केले. मला सरांनी वारंवार विनंती केली की बांधकामासाठी पाणी लागेल तुम्ही पाणी द्या पण मी सरळ टाळले. १९९० पासून मंदिरात विविध कार्यक्रम सुरू झालेत, माझं राहणं शेजारीच. लंगर सर मला ऋषिपंचमी आणि प्रकट दिनाची पत्रिका द्यायचे,पण कधीही कार्यक्रमाला तर नाहीच नाही पण प्रसाद घेण्यासाठीही मंदिरात गेलो नाही. असा मी रमेश काशिनाथ जोशी.

फॉरेस्ट डिपार्टमेन्टमधे बरेच वर्ष नोकरी झाल्यानंतर मी निवृत्त झालो. माझं लहानपण जळगाव जिल्ह्यांत गेलं. साधारणपणे मी चौथ्या वर्गात असताना आईने मला प्रथमच शेगांवला नेले. त्यावेळी मंदिर अतिशय लहान होते. आजूबाजूला कौलारू धर्मशाळा होत्या. त्यावेळी बालसुलभ मनानी मी महाराजांना जो काही नमस्कार केला तो माझ्या तर स्मरणात नाही राहिला पण कदाचित त्यांच्याजवळ मात्र त्याची नोंद झाली असावी. मला दोन मुलं आहेत. इ. स २००४ मधे माझ्या मोठ्या मुलाचं, राहूलचं लग्न झालं. त्यानंतर स्वाभाविकपणे आम्ही गोड चाहूलीची वाट पाहू लागलो,परंतु तशी काही चिन्ह दिसेनात, म्हणून आम्ही डॉक्टरांचे मत घेतले. डॉक्टरांनी विपरित मत दिल्यामुळे आमच्या मनावर दडपण वाढलं. मग अनेक डॉक्टरांकडे गेलो आणि सर्व प्रकारच्या टेस्ट केल्या. परंतु टेस्टट्यूब बेबी या तंत्रज्ञानाचा वापर केला तरी देखील मूल होणार नाही, असा निष्कर्ष त्यांनी काढला आणि आमचा सर्व परिवार अत्यंत निराश झाला.

माणसावर कठीण प्रसंग आला की त्याला देव आठवतो. या सर्व घडामोडीत मधल्या काळात मी आणि माझ्या परिवारानी मुक्ताईनगर येथील शालिनी अंबा आई यांचा गुरूमंत्र घेतला. त्या मुळच्या गजानन महाराज भक्त आहेत, त्यांनी शेगांवच्या पायी वाऱ्या केल्या आहेत. गजानन महाराजांची भक्ति हाच त्यांचा मूळ आधार आहे. मी महाराजांपासून दूर होतो, परंतु लहानपणी, आईने माझे नाव शेगांवला नोंदवल्यामुळे मी त्यांच्या दृष्टीक्षेपातच होतो. महाराजांची कृपादृष्टी असली की ते आपल्या नकळत योग्य मार्गानी संत दासगणूंनी गजानन अष्टकात म्हटल्या प्रमाणे ‘आलास जगी लावण्या परतुनी सुवाटे जन’ या ओळीचा प्रत्यय दिल्याशिवाय राहत नाहीत. आमच्या गुरूमाऊलींनी सूनबाईच्या कानात कानमंत्र दिला, त्या नुसार रोज रात्री ३.३० वाजता अंघोळ करायची, या वेळी आकाशात शुक्राचे दर्शन घ्यायचे व एका पायावर उभे राहून श्री गजानन महाराजांच्या लहान पोथीची १०८ पारायणं करायची, आणि १९ पोर्णिमेला मुक्ताईनगर येथील रेणुकादेवी अथवा माहूरच्या देवीचे दर्शन घ्यायचे असे सांगितले. यानुसार सूनबाईने पारायण सुरू केले व मी दर पौर्णिमेला मुक्ताईनगर ला जाणे सुरू केले. सर्व कुटुंबाचे मन एकाच गोष्टीकडे केन्द्रीत झाले होते. मनात प्रत्येक जण महाराजांना प्रार्थनाही करीत होता आणि. सूनबाईचा १०८ पारायणाचा दिवस उजाडला. त्याच दिवशी तिने प्रकृती विषयक तक्रार केल्याने तिला दवाखान्यात न्यावे लागले, सोनोग्राफी करावी लागली आणि, रिपोर्ट पॉझिटीव्ह आला. २४-११-२००८ ला मला नातू झाला. त्या दिवशी माझे डोळे आनंदाने भरून आले, कदाचित अष्टसात्विक भाव वगैरे काय म्हणतात ते दाटून आले असतील. मनात गुरूमाऊलीला नमस्कार केला आणि त्या माध्यमातून गजानन महाराजांनी संतत्वाची प्रचिती देऊन मला जवळ केलं म्हणून मनोमन त्यांच्या चरणी लीन झालो.

आता वयाची पासष्ट वर्ष पूर्ण झालीत. वयाच्या पन्नास पंचावन्न पर्यंत देवळात न जाणारा मी आता मात्र दिवसाचा बराचसा वेळ तिथे बसलेला असतो. तेव्हा प्रसादालाही न जाणारा मी आता मात्र महाराजांच्या उत्सवाच्या प्रसादासाठी लोकांना अगदी अंतःकरणापासून आमंत्रण देत असतो आणि आमंत्रणाचा मान ठेवून जेव्हा ते येतात तेव्हा मंदिराच्या दारातच हात जोडून त्यांना म्हणत असतो, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. रमेश काशिनाथ जोशी, परभणी. – ९८८१३९६५३७.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## ४ – पादुकांचा प्रसाद पावला – सौ. उषा भास्कर दीक्षित, नागपूर.

जय गजानन! आज माझं वय सत्तरीच्या घरात आलं. माझे मिस्टर रेल्वेत नोकरीला होते, त्यामुळे लग्नानंतर बदलीच्या निमित्ताने आम्ही वेगवेगळ्या ठिकाणी फिरलो आणि पुढे नागपूरला स्थायिक झालो. मुलामुलींची लग्न झालीत, हे निवृत्त झाले. आमच्या कुटुंबात देवाधर्माचं करणे, मोठ्यांना मान देणे ही रीत नेहमीचीच. त्याच परिपाठात एकदा माझ्या मुंबईच्या भाचे जावयांनी अमरावती जवळील झिरी येथील एकमुखी दत्ताला अभिषेक करण्याचा आणि त्या निमित्ताने तिथे सर्व नातेवाईकांना एकत्र बोलावण्याचा कार्यक्रम आखला. अर्थातच आम्हालाही त्याने आमंत्रण दिले. पण मला मात्र तिथे जाणं जमणार नव्हतं, त्याला कारणही तसंच होतं.

इ. स २००७ च्या सुमारास घडलेली ही गोष्ट आहे. आम्ही नाशिकला किर्तीकडे म्हणजे आमच्या मुलीकडे गेलो होतो. माझी मोठी मुलगीही नाशिकला किर्तीच्या घरासमोरच रहायची, तिच्याकडे एक जर्मन शेफर्ड जातीचा मोठा कुत्रा होता. तो आम्हाला ओळखत होता, एक दिवस आम्ही मोठ्या मुली कडे गेलो. आम्ही तिच्याकडे पोहोचलो आणि प्रेमानी तो यांच्या अंगावर झेपावला. पण त्या धक्क्याने यांचा तोल जाऊन हे मागे पडले, यांच्या डोक्याला मार बसला, आणि त्या सर्वाचा परिणाम होऊन यांना पॅरेलेसिसचा अटॅक आला आणि हे अंथरुणाला खिळले. उपचार सुरू झाले, डॉक्टर सर्वतोपरी प्रयत्न करीत होते, पण प्रगती अगदी संथ होती. बरेच दिवस लोटले। आता हे जेमतेम वॉकरच्या सहाय्याने एखाद, दुसरं पाऊल टाकू शकत होते, त्यांच्याकडे लक्ष देणे माझे कर्तव्य होते. हे लहानपणापासून गजानन महाराजांचे भक्त, नित्य नियमाने गजानन विजय ग्रंथाचे वाचन, त्यांचाच विचार! आणि त्याचा परिपाक म्हणून असेल त्यांनी महाराजांवर एक स्तोत्र केलं. त्याच्या शेकडो प्रती छापून आम्ही वाटल्या. पण हे सगळं असलं तरी दैवयोग कुणाला चुकला आहे?

कार्यक्रमाचा दिवस उजाडला, आज दत्त दर्शनाचा योग आपल्या नशिबात नाही याची सल मनात होती, तशातच मी देवपूजेला बसले, ‘माझी देव पूजा पाय तुझे गुरू राया!’ म्हणत दत्तात्रयाला वंदन केलं. देवा दत्तात्रया आशीर्वाद असू द्या अशी प्रार्थना केली आणि गजानन महाराजांच्या फोटोकडे पाहू लागली. वास्तविक आपण रोज पूजा करतो पण प्रांजळपणे कबूल करायचं तर प्रत्येक वेळी आपलं मन पूजेत असतंच असं नाही पण त्या दिवशी कुणास ठाऊक अशी मनाची तंद्री लागली की काय सांगू डोळे भरून आले भावना दाटून आल्या आणि मी सहजपणे बोलून गेले.

गजानन महाराज तुम्ही यांना चालण्याची शक्ती द्या. मी तुमच्या पादुका देवघरात ठेवून त्यांना अभिषेक करीन. मनाच्या त्याच अवस्थेत पूजा पूर्ण झाली,डोळे पुसले आणि आरती करून आम्ही दोघांनी साखरेचा नेवैद्य घेतला. तो दिवस महाराजांच्या नामस्मरणात सरत आला आणि फोनची घंटी खणाणली. फोनवर पलीकडून माझा नागपूरचा भाचा बोलत होता,जो झिरीला कार्यक्रमा साठी गेला होता. तो मला सांगत होता, मामी तुझ्यासाठी शेगांवहून पादुका आल्या आहेत, माझा क्षणभर माझ्याच कानावर विश्वास बसेना. मी विचारले, काय म्हणालास? तो सांगू लागला, अगं जिजाजींनी ठरविलं की झिरीच्या दत्तात्रेयाचा आशीर्वाद घेऊन काही ज्येष्ठ लोकांना शेगांवला ज्या चांदीच्या पादुका मिळतात त्या प्रसादरूपाने द्यायच्या. तुझ्यासाठी द्यायला त्या पादुका त्यांनी मला दिल्या आहेत. उद्या मी प्रसाद आणि पादुका घेऊन येतो. दुसर्या दिवशी मी पादुकांना अभिषेक करीत होते, तेव्हा आनंदाने ऊर भरून येत होतं आणि आनंदाश्रूंनी डोळे. गजानन महाराजांनी चोवीस तासाच्या आत पादुका समोर हजर केल्या होत्या आणि जणू ते म्हणत होते, कर बाई कर, होऊन जाऊ दे अभिषेक, सर्व ठीक होईल. त्यानंतर यांची प्रकृती झपाट्याने सुधारत गेली. त्यांना चालणंही शक्य झालं आणि बोलणंही शक्य झालं. आम्हाला दत्तात्रेयांचा आशीर्वादही प्राप्त झाला आणि गजानन महाराजांच्या पादुकाही चालून आल्यात आणि गजानन विजय ग्रंथातील शब्द आठवले. देव तेची असती संत, आणि संत तेची देव साक्षात. आणि लक्षात आलं गुरुतत्व एकच आहे. गरज असते ती आपण तळमळीने प्रार्थना करण्याची आणि त्यांना मनापासून हाक मारण्याची! अधिक काय सांगू? एवढंच म्हणते श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. उषा भास्कर दीक्षित, नागपूर. – ०७१२-२२३२०४५.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## ५ – पारायण दुबईला, नैवेद्य मुंबईला, नमस्कार पोहोचतो शेगांवला – श्री. शैलेश वावीकर, मुंबई.

जय गजानन! मी शैलेश! चार पांच वर्षांपूर्वीची ही गोष्ट! त्या दिवशी मी माझ्याच तंद्रीत रस्त्यावर फिरत होतो. खरं सांगायचं तर त्या काळात मी लोकांना असं बरेच वेळा माझ्या तंद्रीत फिरताना आढळायचो. माणसावर जेव्हा प्रचंड मानसिक दडपण असतं, तेव्हा तो त्याची समस्या तर विसरत नाही पण त्या समस्येमुळे स्वतःला मात्र विसरतो. तसा विचार करता माझ्या समोरील समस्या ही एका अर्थाने 'मीच ओढवून घेतलेली' असं त्या समस्येचं वर्णन करता येईल. मला अगदी अल्प पगाराची नोकरी होती. तसं पाहता एकट्याकरीता तो पैसा ठीक होता. पण त्यामुळेच मला भविष्याचा अंदाज करता आला नाही आणि तारुण्यावर स्वार झालेल्या मला, मुंबईच्या ज्या भागात आम्ही राहायचो तेथील नेहल, मला पत्नी म्हणून योग्य वाटली. तिलाही मी नवरा म्हणून योग्य वाटलो आणि आमचं लग्न झालं. मुलगी झाली आणि मला वास्तवाचं भान आलं. माझ्या पगारात संसाराचा गाडा रेटणं कठीण आहे, आपण काही तरी करणं क्रमप्राप्त आहे. दुसरी नोकरी शोधायलाच हवी याची तीव्रतेनी जाणीव झाली आणि दुष्काळात तेरावा महिना माझी ती नोकरी सुटली. आता तर दुसरी नोकरी मिळवायलाच हवी. मी अगदी युद्ध पातळीवर त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केलेत पण कुठेही यश आले नाही, तशात कुणी तरी मला सुचविले की आपल्या इकडे नोकरी शोधण्यापेक्षा तू दुबईला का नाही नोकरी शोधत? मग मी वेड्यासारखा त्यामागे लागलो. पांचपन्नास ठिकाणी अर्ज टाकलेत, रिझ्यूम पाठविले पण कुठेच जमले नाही. अगदी हातातोंडाशी घास यायचा आणि निसटून जायचा. मग मी पण जिद्दीला पेटलो आणि विझिटिंग व्हिसा घेऊन एक महिना चक्क दुबईत जाऊन राहिलो. वणवण फिरलो पण नकार घंटा ऐकून पूर्णपणे हताश झालो, तुटून गेलो आणि हात हालवत मुंबईला परतलो. जीवन जगणं कठीण वाटू लागलं, मनात नको ते विचार घर करू लागले, अशा या मनाच्या अवस्थेत मी रस्त्यावर चालत असता, मला मागून माझ्या एका मित्राने आवाज दिला. रस्त्याच्या कडेला असलेल्या बाकावर आम्ही बसलो.

मित्राने खांद्यावर हात ठेवला आणि तो बोलू लागला. शैलेश गेल्या काही दिवसांपासून मी तुला एक गोष्ट सांगण्याचा विचार करतो आहे. तू गजानन महाराजांविषयी काही ऐकले आहे का? विदर्भातील शेगांव येथील समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज! त्यांच्यावर संत कवी दासगणू महाराजांनी श्री गजानन विजय नावाचा ग्रंथ लिहीला आहे. महाराजांची महती सांगणारी ती पोथी अतिशय रसाळ आणि गजानन भक्तांची प्रिय आहे. मी तुला नम्रपणे सांगतो, ती पोथी तू संकल्पासह मनापासून वाच. गजानन महाराजांना मार्ग दाखविण्याची प्रार्थना कर आणि बघ काय होतंय ते. मी त्यावर त्याला म्हणालो, अरे बाबा मी प्रयत्न तर करतोच आहे नं? आणि कुठले ते विदर्भातील शेगांवचे गजानन महाराज? मी राहतो या मुंबई शहरात! आणि मला नोकरी हवी दुबईला, काय होणार आहे? कसं जुळणार हे सूत्र? माझे प्रश्न ऐकून मित्र म्हणाला, बघ बाबा, मला आतून वाटलं म्हणून मी प्रामाणिकपणे बोललो. आता बाकी महाराजांची इच्छा! दूर चालत जाणाऱ्या मित्राकडे मी पाठमोरा पहात राहिलो पण मनात त्याचं बोलणं कुठे तरी खोलवर रूजलं. रात्र बेचैनीत घालवल्यानंतर दुसरे दिवशी सकाळीच मित्राच्याच सहाय्याने गजानन विजय ग्रंथाची प्रत प्राप्त केली आणि महाराजांचा फोटोही! मित्राने सांगितल्याप्रमाणे महाराजांच्या चरणाला पोथी लावून मनापासून संकल्प केला आणि तीन दिवसांचं पोथीचं पारायण दृढ निश्चयाने पूर्ण केलं. या घटनेला काहीच दिवस लोटले असतील आणि महाराज मला पावले. दुबईला एका कंपनीत ३८ लोकांमधून माझं सिलेक्शन होऊन मला नोकरी लागली. मी नोकरीवर रुजूही झालो,पण.

नोकरीला प्रारंभ झाल्यावर असं लक्षात आलं की, १० ते १२ तासाची रोज ड्यूटी आणि महिन्यातून फक्त एक सुट्टी! अतिशय कष्टाचा जॉब. तशात मी तिथे सव्वा वर्ष पूर्ण केले. कंटाळून गेलो आणि मला पुन्हा आठवण झाली. गजानन विजय ग्रंथाची, गजानन महाराजांची! मी ग्रंथ सोबत नेला होताच, मग काय पुन्हा महाराजांना प्रार्थना केली. नोकरीतील बदलासाठी आर्जव केले आणि संकल्पासह पुन्हा तीन दिवसांचं पारायण भक्तीभावाने पूर्ण केले. काहीच दिवसानंतरची गोष्ट असेल,संध्याकाळी मी आणि माझा कलीग ऑफिसात माझ्या नोकरीविषयी बोलत होतो. एक अनोळखी पोक्त गृहस्थ त्यांच्या काही कामानी तिथे आले होते. त्यांना मी या आधी तिथे कधीही पाहिले नव्हते. त्या दिवशी ड्युटी संपल्यावर ते मला बाहेर भेटले, त्यांनी मला विचारलं. नौकरी ढूंढ रहे हो? दुबईमेही अच्छी नौकरी चाहीये? मी म्हटलं, हां! त्यांनी मला एक पत्ता दिला आणि म्हणाले कल इस पते पर चले जाना!

आता पुढे काही बोलण्याची गरज आहे? मी जुनी नोकरी सोडून भारतात परतलो आणि आता दुबईलाच पण नवीन ठिकाणी रुजू झालो आहे मात्र आता एक फरक असा झाला आहे की जेव्हा वेळ मिळेल तेव्हा मी दुबई ला पारायण करतो. पारायण पूर्ण होतं त्या दिवशी मुंबईला कळवून तिथे महाराजांना पिठलं भाकरीचा नैवेद्य अर्पण होतो. दुबई – मुंबई – शेगाव. एका सूत्रात महाराजांनी छान बसवून दिलं आहे. त्यामुळे माझ्या शंकेवर मीच ओशाळतो. आणि दुबई मुंबई या दोन्ही ठिकाणाहून नमस्कार मात्र शेगांवच्या दिशेने होतो, आणि हो प्रत्येक वाचनाच्या वेळी. बंडूतात्याला महाराजांनी केलेला उपदेश स्मरणात घेतो, अरे हताश कधी होऊ नये, प्रयत्न करण्यास चुकू नये, सोबतच त्या प्रयत्नांना एका मंत्राची जोड देतो तो मंत्र म्हणजे अर्थातच श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. शैलेश वावीकर, मुंबई. – +९७१५५५०९२५८२.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

६ – येथे जो धरील अविश्वास, तो बुडेल निःसंशय – स्वाती जकाते (देशमुख), वर्धा.

जय गजानन! साधारणपणे प्रत्येकच मुलामुलीचं आपल्या भावी आयुष्याविषयी,सुखी संसाराविषयी एक स्वप्न असतं. तसं ते माझंही होतं. मी एका संस्कारशील कुटुंबात लहानाची मोठी झाले. माझे वडील, एक श्रद्धाळू आणि सात्विक वृत्तीचा माणूस. गजानन महाराजांवर श्रद्धा. गजानन विजय ग्रंथाचे नियमित वाचन, आणि नेमाने महाराजांचे दर्शन आणि हे सर्व लहानपणापासून पहात आल्यामुळे सहाजिकच गजानन महाराजच माझं दैवत! दि. १६ नोव्हेंबर १९९३ रोजी वयाच्या २४ व्या वर्षी माझं लग्न रीतसर ठरलं आणि झालं. मी देशमुखांच्या घरची सून झाले. लग्न काय झालं,वास्तविक सुरू झाला माझ्या आयुष्यातील अत्यंत खडतर काळ. लहानपणापासून लाडात वाढलेली मी आणि अचानक सगळं काही बदललं. मिस्टरांची वागणूक काहीशी चमत्कारिक आणि गूढ वाटत होती. पण वाटलं, असतो एखादा स्वभाव, होईल पुढे ठीक.

नोव्हेंबर महिन्यात लग्न म्हणजे पहिला सण संक्रांतीचा. आई वडील घरी रीतसर, आमंत्रण द्यायला आले. मिस्टरांनी आमंत्रण स्वीकारले. मी आई बरोबर घरी गेले. दुसरे दिवशी घरी, आईने सर्व तयारी केली. पानं मांडली, रांगोळ्या घातल्या आणि वाट पाहता पाहता आता येतील नंतर येतील करत संध्याकाळ झाली. कुणीही फिरकलं नाही. काय झालं असेल कळायला मार्ग नाही, तेव्हा आता सारखी फोनची सोय नव्हती, तर्कवितर्क झालेत. संध्याकाळी वडिलांनी मला घरी सोडलं, मिस्टरांनी अगदी तुटकपणे वडिलांना बाहेरच्या बाहेर 'या तुम्ही!' म्हणून निरोप दिला आणि धाडकन दरवाजा बंद झाला आणि सुरू झाली माझी नजरकैद!

थोडा वेळ अस्वस्थ शांततेत गेल्यावर मी सासूबाईंना विचारले (सासरे नव्हतेच सगळं राज्य मिस्टरांचं होतं) हे काय तुम्ही आलाच नाहीत कुणी? मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मात्र दिले मिस्टरांनी. हो, हो, नाही आलो, मला नाही आवडत तुझा तो देवा धर्माचं करणारा बाप! त्यावर मी म्हटलं, अहो असं काय म्हणता, काल तर तुम्ही आमंत्रण घेतलं? त्या सरशी जास्त बोलायचं कारण नाही, असं म्हणून खाडकन माझ्या गालावर थप्पड बसली आणि वरून जोरात एक धक्का. मी पलंगावर कोसळले आणि जोरात कळवळले, आई गं! गजानन महाराज वाचवा मला! गजानन महाराजांचं नाव जसं कानावर गेलं तसा कमरेचा पट्टा काढून सपकन माझ्या डाव्या मांडीपासून गुडघ्यापर्यंत भागावर मारला आणि जोरात उच्चारलेले वाक्य माझ्या कानावर आदळले, खबरदार, जर त्या नंग्या पीराचं नाव घेतलं तर. अंगावर कपडा नाही आणि म्हणे महाराज? या पुढे ते गजानन महाराज वगैरे प्रकरण बंद. मला विचारल्याशिवाय बाहेर जायचं नाही आणि महाराजांच्या मंदिरात तर नाहीच नाही. त्यानंतर सुरू झाला भीषण अत्याचार. हातात एक पैसा मिळणार नाही, बाहेर जाताना मिस्टरांच्या सोबतच बाहेर जायचं. मानसिक आणि शारीरिक छळ ! काळ नाही वेळ नाही दारू प्यायची आणि वाट्टेल तसा अत्याचार. आईला देखील गुंडाळून ठेवलं. एखाद्या आईच्या तोंडून मुलासाठी वाक्य निघावं की हा मरेल तेव्हाच मला वाटतं मला शांती मिळेल! यापेक्षा दुर्दैव ते कोणतं? कुठे पळून जाण्याची सोय तर नव्हतीच पण वरून होत असलेल्या अत्याचाराचा परिणाम शरीरावर व्हायचा तो होणारच. मला १२ ऑगस्ट १९९४ ला पहिली मुलगी स्वप्ना झाली आणि १४ मे १९९८ ला दुसरी मुलगी स्वागता झाली आणि काही अन्य करण्याच्या विचारांना स्वल्पविराम मिळाला. हाती शिल्लक राहिला एकच मार्ग गजानन महाराजांची निर्गुण(?) भक्ती. कारण फोटो नव्हताच, डोळ्यासमोर सगुण रूप आणायचं आणि आतल्या आत रडत महाराजांना म्हणायचं, महाराज जानकीराम सोनार तुम्हाला वाटेल तसं बोलला त्याची तुम्ही नोंद घेतली नं? नारायण आसराजीला तुम्ही शिक्षा केली नं? मग का परीक्षा पाहता आहात? मग मला कुठेतरी संकेत मिळायचा, की हे भोग भोगल्याशिवाय सुटका नाही. योग्य वेळ येईल पण काही काळ सहन करावेच लागेल. मग मी म्हणायची माझे भोग मी समजू शकते पण तुम्हाला दिलेल्या शिव्या, तुमच्या साठी वापरलेले अपशब्द, ऐकण्याची मला का शिक्षा? मग एक मन म्हणायचं थांब थोडी थांब पापाचा घडा भरायचा असेल आणि मग शरीर आणि मन अत्याचार सहन करण्यासाठी उसनं अवसान बांधून तयार व्हायचं.

वास्तविक घराच्या मागेच त्रिमूर्ती नगरला भगवती लॉन्ससमोर गजानन महाराजांचं मंदिर होतं. इतकं जवळ की आरती, घंटा, स्पष्ट ऐकू यायची. पण महाराजांनी मला जवळ करण्याचा योग येत नव्हता. काळ हळूहळू समोर सरकत होता, मोठी मुलगी शाळेत जाऊ लागली होती, तिला समज येत होती. अत्याचारातून जन्माला आलेला जीव अत्याचाराच्या विरूद्ध उभे होण्यासाठी, माझ्या जीवाला जीव देण्यास सज्ज होत होता. बाप दारूच्या नशेत तर्र असेल तर मला मुलीला शाळेत सोडण्यासाठी बाहेर पडता येत होतं. इ. स २००४ चा तो काळ होता. फोनची संख्या वाढीस लागली होती. गावातच असलेल्या मोठ्या बहीणीशी कधी संपर्क साधण्याची संधीही मिळू लागली होती. माझ्या दोन्हीही बहीणी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभं राहण्याचं आश्वासन वारंवार देत होत्या.

मला आठवतं, १४ फेब्रुवारी २००४ चा तो महाराजांचा प्रकटदिन होता. मंदिराच्या कळसाकडे पहात मी गॅलरीत उभी होते. मनात म्हणत होते महाराज तुमचा प्रसाद तर माझ्या नशिबात दिसत नाही पण मला निदान आशीर्वाद तरी द्या! त्या दिवशी महाराजांच्या मनात काही वेगळीच योजना असावी, मला घरातून मिस्टरांनी आवाज दिला आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. मला हुकूम करण्यात आला. जा तुझ्या त्या महाराजांचा प्रसाद घेऊन ये! मी घाईघाईने मंदिरात गेले. दर्शन घेऊन प्रसाद घेऊन आले. माझ्या हातून प्रसाद हिसकावून घेतला आणि त्यांनी एकट्यानेच सर्व प्रसाद खाल्ला. आम्ही पहातच राहिलो. पुन्हा मला आदेश झाला. जा पुन्हा प्रसाद घेऊन ये. मी पुन्हा प्रसाद आणण्यासाठी गेले, प्रसाद घेऊन घरी आले तर मिस्टर दारू पित बसलेले. माझ्या हातून प्रसाद हिसकावून एक घास आमच्या हातावर ठेवला आणि पुन्हा सर्व प्रसाद खाऊन वर दारू ढोसून वाटेल तशी बडबड सुरू झाली. मग मात्र माझ्या तळपायाची आग मस्तकात गेली. मी प्रसाद हातात घेऊन जोरात ओरडले. गजानन महाराजांच्या प्रसादाचा असा अपमान करणारा नवरा मला नको, येथे जो धरील अविश्वास तो बुडेल निःसंशय. ज्यानी महाराजांचा असा अपमान केला त्याला शिक्षा झाल्याशिवाय राहणार नाही. त्या संध्याकाळी महाराजांजवळ खूप रडले, म्हटलं एकतर अनाथालयाचा रस्ता धरते नाहीतर अंबाझरी तलावात दोन्ही मुलींसह जीव देते. पण नंतर मनात विचार आला आपलं एक ठीक पण मुलींचा काय दोष? त्यांना जगण्याची ताकद देणे गरजेचे आहे. मग सासूबाईंना विश्वासात घेतले आणि मोठ्या बहीणीशी संपर्क साधला. बहीणीनी सल्ला दिला अंगावरील कपड्यानिशी तिघीही माझ्याकडे या, बाकी पुढे पाहू आणि एक दिवस संधी चालून आली. नवरा काही कामानी घराबाहेर गेला. मी आणि माझ्या मोठ्या मुलीनी घाई घाईने इकडे तिकडे शोध घेऊन घरातून पैसे गोळा केले, मोठ्या मुश्किलीने ४० रुपये चिल्लर जमली. ऑटोनी बहीणीकडे जायला ६० ते ७० रुपये लागणार, बहीणी कडे जाऊन पैसे देणं शक्य होतं पण मला शक्यतो गेल्या गेल्या तिथे हात पसरणे प्रशस्त वाटत

नव्हते. आम्ही तिघी घाईघाईने खाली उतरलो, मंदिरासमोर आलो महाराजांना म्हटलं, तुम्ही जाणता ४० रुपयेच मिळाले आहेत. आता मी निघते आमचं सर्व आता तुमच्या हाती आहे. मुली म्हणायला लागल्या. आई वेळ करू नको, बाबा आले तर आपण पुन्हा अडकलो. तोच समोरून एक ऑटो आला. त्याला रामनगरचा पत्ता सांगितला, विचारलं किती रूपये घेणार? तो म्हणाला, फार जास्त नाही घेत ४० रूपये देऊन टाका. जय गजानन महाराज म्हणून आम्ही आत बसलो आणि माझा प्रवास सुरू झाला, नवऱ्याच्या विरुद्ध दिशेनी. महाराजांच्या आशीर्वादाने माझा प्रवास आणि महाराजांचा रोष पत्करून त्याचा प्रवास.

त्या घरात महाराजांना रोज शिव्या दिल्या जात,पण मी रोज रात्री त्याबद्दल त्यांची माफीही मागायची. मी घर सोडलं आणि घराचे वासे फिरले. काही महिन्यांनी बाजूच्या लोकांकडून कळलं, त्याच्या डोक्यावर परिणाम झाला, फ्लॅट मधील लोकांशी भांडण झालं, त्यांनी पोलिसात तक्रार केली. पोलिस पकडायला आले तेव्हा भ्रमिष्ट अवस्थेत अंगावरील कपडे त्यानी काढून टाकले होते, एकानी त्याच्या अंगावर लुंगी फेकली तीही नाकारली. त्याच अवस्थेत पोलिस ठाण्यात घेऊन गेले, तिथे त्याला पोलिसांनी बेदम चोप दिला.

अंगावर कापड नसूनही माझ्या महाराजांना महाराज का म्हणतात, याचं उत्तर मला देता येणार नाही पण गुर्मीत येऊन स्वतःला राजा समजणाऱ्याला वेळ येताच महाराजांनी पार नंग करून सोडलं आणि इतकी वर्षे माझ्या अंगावर ओढलेल्या फटक्यांचा हिशेब पोलिसांकडून पूर्ण केला. पुढे त्याच भ्रमिष्ट अवस्थेत कधी तो लोकांना दिसला पण पुढे दिसेनासा झाला. आणि सरकारी नियमानुसार योग्य काळ मध्ये गेल्यावर त्याला मृत घोषित केल्या गेलं! आता या गोष्टीला खूप वर्षे झालीत. महाराज माझ्याकडून यथाशक्ती त्यांची भक्ती करून घेताहेत. माझी मोठी मुलगी सीए होऊ घातली आहे. लहान हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स पूर्ण करते आहे. प्रत्येकच जीवन एक स्वतंत्र कादंबरीचा विषय असतो, तसंच माझंही जीवन आहे. आज संधी मिळाली म्हणून एक छोटा भाग तुमच्या समोर उलगडून दाखविला. काही चुकलं असेल तर मोठ्या मनानी मला माफ करा आणि महाराजांच्या चरणी दृढ विश्वास असू द्या. महाराज सर्व चांगलंच करतील. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

स्वाती जकाते (देशमुख), वर्धा. – ९७६४९७२७७९.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! गजानन महाराज विषयक हे अनुभव जे वाचत आहेत त्या सर्वांना नमस्कार. आपण मागील 'इथे जो धरील अविश्वास तो बुडेल नि:संशय' या शीर्षकाखाली लिहीलेला स्वातीचा शारिरीक-मानसिक कैदेतून सुटकेचा अनुभव वाचला असेल, मीही वाचला आणि माझ्या जुन्या स्मृती जागृत झाल्या. नको असलेल्या त्या आठवणी उफाळून वर आल्या आणि एक बहीण म्हणून मला असं वाटलं की या कहाणीचा अजून थोडा भाग मी तुम्हाला सांगावा. इ. स १९९३ ला आमच्या लहान बहिणीचं लग्न झालं आणि नवऱ्याच्या विक्षिप्त वागणुकीमुळे, संशयी स्वभावामुळे ती काही दिवसांतच आमच्यासाठी अज्ञातवासात गेली. आमच्या नातेवाईकांना आणि परिचितांना देखील तिच्याशी संबंध ठेवणं दुरापास्त झालं. प्रचंड मानसिक दडपणाखाली ती तिकडे होती आणि आम्ही इकडे हतबल झालो होतो.

२००४ च्या एप्रिल महिन्यात एक दिवस दुपारी मी माझ्या ऑफिसात असताना फोनची घंटी खणाणली आणि मला साहेबांनी बोलावलं, रिसिव्हर माझ्या हातात देत मला म्हणाले, स्वातीचा फोन आहे. क्षणभर माझ्या कानावर माझाच विश्वास बसेना, मी नखशिखांत शहारले. किती तरी वर्षानंतर बहीणीचा आवाज कानावर पडत होता. रडत रडत पलीकडून बहीण म्हणत होती, ताई दादांकडून(आम्ही वडिलांना दादा म्हणतो) दोन लाख रुपये मला मिळतील का गं? सुरवातीला असे बरेच पैसे वडिलांनी दिले होते पण परिस्थिती काही सुधारली नव्हती, आताही सुधारणार नव्हतीच. तिच्या खोल गेलेल्या आवाजावरून मला परिस्थितीची जाणीव झाली, काही मिनिट समजावणीचा सूर लावल्यावर मला कुठून बळ आलं माहीत नाही. गजानन महाराजांचं नाव घेतलं आणि तिला निक्षून सांगितलं की चार दिवसाच्या आत तू अंगावरील कपड्यानिशी मुलींसह माझ्या घरी यायचं, मात्र तिला हेही सांगायला विसरले नाही की मधील दिवसांत न जमलं तर केवळ एक फोन करून हॅलो करायचं. ती मी तू जिवंत असण्याची खूण समजेन आणि फोन ठेवला. एक दिवस, दुसरा दिवस, तिसरा दिवस. तिचा फोन आला मात्र चौथ्या दिवशी फोन आला नाही आणि त्या दिवशी ऑफिसात अस्वस्थ बसली असताना अचानक मुलाचा फोन आला. आई मावशी घरी आली आहे. मी साहेबांची परवानगी घेऊन घाईने घरी निघाले. खूप वर्षांनी बहीण भेटणार होती. मिस्टरांना कळवलं, वर्ध्याच्या बहीणीकडे कळविण्याची सोय केली. दादा ऑफिसात होते, त्यांना निरोप पाठवला आणि घरी पोहोचले, बहीणीकडे पाहून एकदम भडभडून आलं. तिला ओळखूच शकत नव्हती. खोल गेलेले डोळे, कृष झालेलं शरीर, केव्हाही उन्मळून पडेल असं ते झाड होतं. तिच्या मुलींना तर पहिल्यांदाच पहात होते. शून्यात हरवलेली नजर आणि दयनीय परिस्थिती. तिघींना प्रथम आतल्या खोलीत सुरक्षित केलं कारण नवरा केव्हाही येऊ शकत होता. त्यामुळे तसं करणं क्रमप्राप्त होते. आता मी वडिलांची वाट पाहू लागले पण बराच वेळ झाला तरी ते आले नाहीत. कुठे असतील? मग अचानक जाणवलं, गजानन महाराजांच्या मंदिरात पहा तिथे असतील. आमचा अंदाज बरोबर होता. त्यांनी गजानन महाराजांना पेढ्याचा नैवेद्य दाखविला होता. आम्ही त्यांना म्हटलं, अहो हे काय तुमची मुलगी परत आली आहे आणि हे पेढे? त्यावर ते म्हणाले, हो माझी मुलगी जिवंत परत आली म्हणून हे पेढे! तुम्ही माझ्याशी फार बोलत नव्हतात पण माझं मन सांगत होतं, माझी मुलगी प्रचंड संकटात आहे. जाऊ द्या इथे माझा त्राता कोण गजानना तुजवाचून? तो माझ्या आणि गजानन महाराजांच्या मधला विषय आहे.

दादांचे शब्द अक्षरशः खरे होते. कारण पुढे एकेका गोष्टीचा उलगडा होत गेला. पहिले काही दिवस तर प्रचंड दडपणात गेलेत. कोर्ट कचेऱ्या झाल्या, उरला सुरला मानसिक त्रास झाला आणि मग हळूहळू जे कळत गेलं ते सगळं अक्षरशः हादरवून सोडणारं होतं. सर्वप्रथम प्रश्न होता मुलींचा! लहान तर बोलतच नव्हती, भिती वाटत होती ही बोलू शकेल की नाही? घरी आली तेव्हा तिचे दोन पेपर बाकी होते, मग मी आणि माझी दुसरी बहीण तिला शाळेत घेऊन गेलो कि शाळेत मॅडमनी आम्ही कोण म्हणून चौकशी केली व म्हणाल्या, अहो ही रोज डब्यात समोसा आणायची कधी खाण्यायोग्य कधी शिळा. बरेचदा मी माझ्या डब्यातून दोन घास खाऊ घालायची. आम्ही विचार केला घरात जर दोन दोन दिवस अन्न शिजत नसेल, घरातील बाई काही करण्याच्या अवस्थेत नसेल तर कोण काय करणार? खरंच सगळं विचित्र होतं. मुलींनी आईला संपूर्ण दिवस अंगावर ओले कपडे, खोलीतील पलंग ओला अशा अवस्थेत एकदा नाही अनेकदा पाहिलं. क्रूरकर्माच तो. त्याच्यात ना नवरा होता ना बाप होता. बायकोला देवाधर्माचं वेड आहे नं? मग एखाद्या मंदिराच्या परिसरात नेऊन दारू जबरदस्तीनी तोंडात ओतून मग आई सुस्त पडली आहे आणि लहान लहान मुली बाजूला आहेत या गोष्टीचा आसुरी आनंद घ्यायचा. देवाधर्माचा द्वेष तर इतका पराकोटीचा होता की घरातील देव मोडीत विकून टाकले. हे करीत असताना घरी एक पितळेची घंटा होती त्यावर नागाचं सुंदर डिझाईन होतं. त्याकडे पाहिले मात्र आणि जाणीव झाली आपल्या सासऱ्याचं नाव नागेश आहे. ते सात्त्विक आहेत, देवा धर्माचं करतात, झालं आतला राक्षस जागा झाला. एका मोठ्या हातोड्यानी ती सुंदर वस्तू विद्रूप करून टाकली. मनात विचार आला की त्या लाचार माणसाला पैसे मागताना तो सासरा ठीक होता. एखादा माणूस घाबरला की अधिकच गलितगात्र होतो. अशा घाबरलेल्या आईला वरून मारझोड होताना पाहून कोणतं मूल भेदरणार नाही. पण त्याहीपेक्षा क्रौर्याची सीमा तेव्हा झाली जेव्हा प्रत्यक्ष बाप त्या लहान जीवाला गॅलरीतून खाली फेकायला तयार झाला, नव्हे जवळ जवळ सोडलंच पण आई - आजीची विनवणी आणि मनात गजानन महाराजांचा धावा मुलीला तारायला समर्थ ठरला.

आता या पार्श्वभूमीवर सर्व घडी नीट बसविणे आवश्यक होते आणि आम्ही उभयतांनी ठरविलं सर्व गजानन महाराजांच्या चरणी सोपवायचं. आमच्या ऑफिसमधील साहेब या सर्व गोष्टींकडे सुरवातीपासून लक्ष ठेवून होते. त्यांनी आम्हाला सुचविलं मानसोपचार तज्ञाकडे जा. हे शांतपणे म्हणाले गजानन महाराज करतील सगळं ठीक. ठीक झालं की जाऊन येऊ शेगांवला. त्यावर साहेब म्हणाले, जब देखो शेगांव. गजानन महाराज. बोलते रहते हो, क्या हैं ऐसा वहापर ? तो विषय तिथे संपला. पुढे यांनी शांतपणे महाराजांसमोर बसून संकल्प सोडला आणि गजानन विजय ग्रंथाचा एक एक अध्याय रोज वाचायचा आणि तिघींनी अंगारा लावायचा असा क्रम सुरू झाला. मुलींना प्रथमच असं भक्तीमय वातावरण जवळून अनुभवण्याचा योग येत होता. त्यांच्या मनात घर करून असलेली भिती हळू हळू कमी होत गेली. वेळ लागला, पण यथावकाश सगळं बदललं. ज्या घरात गजानन महाराजांना प्रचंड विरोध होता तिथून त्या अशा ठिकाणी आल्या की पूर्ण वातावरण असं होतं जय हो गजाननमय हो! पुढे मुली एकदम चुणचुणीत झाल्या स्वत:च्या पायावर उभं राहण्यास समर्थ झाल्या. आमच्या साहेबांनी हे सगळं जवळून पाहिलं, अनुभवलं आणि एक दिवस हळूच म्हणाले. एकबार शेगांव जानेकी इच्छा है आणि ते जाऊन आले. आता ते आमच्यापेक्षा जास्त वेळा शेगांवला जात असतात आणि ज्याला त्याला सांगत असतात कुछ भी कहो लेकीन शेगांव मे जो बात है वो शेगांव मे ही है!

असो विषय मोठा आहे पण कुठेतरी थांबायला हवं. बोलले नसते तर मनाला रुखरुख लागून राहिली असती. तेव्हा माझे हे बोल समजून घ्या आणि गजानन महाराजांकडे जगाच्या भल्यासाठी प्रार्थना करून म्हणा, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

कल्पना जकाते (जलतारे), नागपूर. – ९७३००७४७९३.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## *८ – भक्तांचे हितचिंतक गजानन महाराज – श्री. मोहन वराडपांडे, नागपूर.*

जय गजानन! माझा मोठा मुलगा आज एका नामवंत कंपनीत टेस्टिंग डिपार्टमेन्ट मधे चांगल्या हुद्यावर काम करतो. पगार तर चांगला आहेच पण त्याहीपेक्षा आज तो त्याच्या क्षेत्रात चांगलं नाव कमावून आहे. त्याचा अधिकार, त्याच्या शब्दाला वजन आहे. वास्तविक पाहता सुरवातीला त्याला या डिपार्टमेन्टमधे काम करण्यात अजिबात रुचि नव्हती, त्याचा इंटरेस्ट होता डिझाईनिंग मधे! तिथे त्याला काम हवं होतं. खरं सांगायचं तर त्याच्या आवडीचं डिपार्टमेन्ट तर खूप दूरची गोष्ट पण तो हुशार असला तरी बाजारात असलेल्या मंदीच्या परिस्थितीमुळे त्याला नोकरीच मिळण्याची मुश्कील होती. मला आठवतं, तो इ. स २००५ साली B. E. (इले. टेली.) पास झाला आणि त्याचा नोकरीचा शोध सुरू झाला. रोज सकाळी वर्तमानपत्र, एम्प्लॉयमेन्ट एक्सचेन्ज, नोकरी डॉटकॉम, ऑनलाईन शोध, अर्ज आणि रिझ्यूम आणि काय काय. सर्व मार्गांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण नोकरी लागण्याचे नाव नाही. असं होत होत २००६ चा मार्च उजाडला, एक वर्ष पूर्ण झालं. आता नोकरी सोबत एक चिंता अजून अशी निर्माण झाली की, जर २००६ ची बॅच बाजारात उतरली तर जुन्या लोकांची किंमत स्वाभाविकपणेच कमी होणार, त्यामुळे अजूनच नाराज झाला. उदास झाला आणि त्याला त्याच्या बाबांची आणि गजानन महाराजांची आठवण झाली. तो मला म्हणू लागला. बाबा, तुम्ही लहानपणापासून गजानन महाराजांचं एवढं करता आणि सारखं त्यांच्याविषयी सांगता, तर एकदा माझ्यासाठी तुम्ही त्यांना साकडे घाला. एवढी माझी तुम्हाला विनंती आहे. मग रोज त्याची माझ्यामागे एकच भूण भूण सुरू झाली आणि माझ्याच मनावर दडपण यायला लागलं. मनात वाटू लागलं पोरानी तर माझ्याच कसोटीची वेळ आणली, त्यातच एक असा योग घडून आला की माझ्या एका मित्राच्या मुलीचं लग्न ठरलं आणि साक्षगंध ३० मार्च गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर श्री क्षेत्र शेगांव येथे करण्याचं निश्चित झालं. प्रत्यक्ष शेगांवला जाऊन प्रार्थना करण्याची संधी चालून आली. मला अजूनही स्पष्ट आठवतं, गुढीपाडव्याच्या दिवशी मी महाराजांना कळवळून प्रार्थना केली, विनवणी केली आणि पोरासाठी साकडं घातलं आणि नागपूरला परतलो. चारच दिवसात पुणे रांजणगाव MIDC येथील JABIL (जाबील) कंपनीतून फोन आला. ताबडतोब टेस्टिंग डिपार्टमेन्ट मधे रुजू व्हावे! मुलाला पत्राचा आनंद झाला पण संधी डिझाईनिंग मधे नाही म्हणून तो थोडा खट्टू झाला. मी म्हटलं, हे बघ महाराजांना विनंती केली आहे. आता मागे हटायचं नाही आणि शक्य आहे यातच तुझं हित असेल! तू लक्षात घे. माऊलींनी हरिपाठात म्हटलं आहे, मनोमार्गे गेला तो तेथे मुकला हरि पाठी स्थिरावला तोचि धन्य. संतांना आपलं हित जास्त चांगलं समजतं, त्यामुळे आपल्या वाटण्यापेक्षा त्यांच्या म्हणण्याला मान दे! त्यानी ते ऐकलं आणि पुढे तो ६ एप्रिल २००६ रोजी रामनवमीच्या मुहूर्तावर नोकरीवर रुजू झाला.

गुढीपाडवा ते रामनवमी एवढ्या काळात माझी प्रार्थना फळास आली. पुढे त्याच्याच बाबतीत महाराज कृपेने एक छान गोष्ट घडली. इ. स २०१३ ची ही घटना आहे. त्यावेळी त्यानी ETON (इटॉन) कंपनीत नोकरी धरली होती आणि त्याला कंपनीतर्फेअमेरिकेत पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र त्यावेळी व्हिसा देण्याच्या बाबतीत अमेरिकन पॉलिसी प्रमाणे त्याला दोनदा व्हिसा नाकारण्यात आला. त्यामुळे तिसऱ्यांदा जेव्हा पुन्हा मुलाखतीसाठी मुंबईला जाण्याचं ठरलं. त्यावेळी तो दडपणाखाली आला आणि चेहरा पाडून मला म्हणाला, बाबा तुम्हाला शेगांवला जावं लागतं! मी ज्या वेळी मुंबईला मुलाखत देईन साधारण त्याच वेळी तुम्ही शेगांवला महाराजांसमोर रहा म्हणजे माझं काम होईल. मग काय मुलगा मुंबईच्या दिशेने रवाना झाला आणि त्याचे आई-बाप, शेगांवला हजेरी लावण्यासाठी निघाले. तिकडे त्याची मुलाखत पार पडली आणि इकडे आम्ही मनापासून गजानन महाराजांना प्रार्थना केली, अर्थातच पुढे व्हिसाचे काम यशस्वी झाले आणि तो महाराजांच्या कृपेने अमेरिकेत जाऊन आला आणि महाराजांनीच त्याला निवडून दिलेल्या टेस्टिंग डिपार्टमेन्टमधे अधिक अनुभव समृद्ध झाला. आता जेव्हा केव्हा त्याला म्हटल्या जातं की सर तुमच्या या क्षेत्रातील अधिकाराला सलाम करायलाच हवा. तेव्हा तेव्हा तो मनोमन मान्य करतो की आपलं हित कशात आहे, हे आपल्यापेक्षा गजानन महाराजांनाच जास्त कळतं. शेवटी काय संत हेच भूमीवर,चालते बोलते परमेश्वर, तयांचा आधार ज्यासी मिळे, तो मोठा. त्यामुळे संतांचा आधार मिळावा यासाठी प्रार्थना करा आणि संत गजानन महाराजांचं स्मरण करूण म्हणा, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. मोहन वराडपांडे, नागपूर – ९४२२८६५८९७.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! माझा मोठा मुलगा कौंत्येय आणि लहान मुलगी रेणुका. रेणुकाच्या जन्माच्या वेळी आम्हाला मुलगी व्हावी अशी आमची इच्छा होती म्हणून मी गजानन महाराजांना नवस बोलले की जर मुलगी होईल तर मी गुरूवारचा उपास करीन. मी गजानन महाराजांना असं म्हटलं याचं कारण माझी आई! मी लहान-पणापासून आईला कधी गजानन विजय ग्रंथ वाचताना तर कधी महाराजांच्या मंदिरात प्रदक्षिणा घालताना पहात आले. एकदा तर आईला इतकं डिप्रेशन आलं की जीवन निरस झाल्यासारखी तिची वागणूक होती पण गजानन विजय ग्रंथ पारायणाने ती त्या संकटातून बाहेर आल्याचं मी जवळून अनुभवलं आहे. पुढे आईने धार्मिक विषयावर लिखाणही सुरू केले. असो, माझ्या नवसाला महाराज तर पावले आम्हाला मुलगी झाली,पण मी मात्र त्या आनंदात गुरूवारचे उपास विसरले. माझ्या शब्दाला जागले नाही. असं विस्मरण भक्ताला जेव्हा केव्हा होतं, तेव्हा महाराज तशी जाणीव करून देतात. निदान असे काही संकेत आपल्याला मिळतात की आपल्याला केलेल्या नवसाची जाणीव व्हावी. जसे आपण पोथीत एकोणविसाव्या अध्यायात वाचतो की तुकारामाला महाराजांनी नवसाची जाणीव करून दिली.

दोन तीन मुले झाली । परी नवसाची न राहिली । आठवण तुकारामा भली । संततीच्या मोहाने ॥

दासगणूंनी म्हटलं आहे, संकट आल्यावर, महाराजांचा नवस चुकवू नये या गोष्टीची जाणीव तुकारामाला झाली. पण हे सर्व असलं तरी विस्मरण हा मानवी स्वभाव आहे. मी त्याला कशी अपवाद असेन? रेणुका तीन वर्षाची असेल तेव्हाची गोष्ट, आमच्या विदर्भात महालक्ष्म्यांचा सण, मोठ्या प्रमाणात केल्या जातो. आम्ही सजावटीसाठी मोठे लोखंडी रॉड आणले होते. भिंतीला टेकून ठेवले होते. ते रॉड घसरून रेणुकाच्या डोक्याला मार लागला, जखमेला दोन टाके घालावे लागले. पण तेवढ्यावरच निभावलं, तेव्हा गजानन महाराजांना प्रार्थना केली पण नवसाची आठवण तरीही झाली नाही. नंतर असेच किरकोळ आजार तिला होत राहीले पण केलेला नवस काही आठवला नाही आणि मग काही दिवसांनी तिला कुठलंही दृष्य कारण नसताना जोरदार सर्दी झाली आणि काही केल्या ती सर्दी काही कमी होईना. घरगुती इलाज झाले, वेगवेगळे डॉक्टर झाले, कान नाक घसा तज्ञ झाले, एक्सरे झाला, वेगवेगळ्या टेस्ट्स, रिपोर्ट्स. झाले पण सर्दी थांबण्याचे लक्षण दिसेना आणि मग मी त्या विचाराने हैराण झाले आणि एक दिवस पोथीत एकोणविसाव्या अध्यायात वर उल्लेख केलेल्या ओव्या वाचताना अचानक महाराजांना गुरूवारच्या उपवासाचे बोलल्याचे स्मरण झाले आणि लगेच क्षमा मागून संकल्प सोडून उपास सुरू झाला. अर्थातच काहीच दिवसांनी तिची तब्येत ठणठणीत झाली.

या सर्व घटनाक्रमाचा मी विचार केला तेव्हा मला विस्मरणाचा पश्चात्ताप निश्चितच झाला पण कुठेतरी एक विचार हाही आला की रेणुकाकडे महाराजांचं लक्ष आहे. मला आठवतं काही वर्षापूर्वी गुढीपाडव्याच्या दिवशीची गोष्ट, मी कौंत्येय आणि रेणुका आम्ही घराजवळील गजानन महाराज मंदिरात वर्षाचा पहिला दिवस म्हणून संध्याकाळी दर्शनासाठी गेलो. त्यावेळी अगदी तुरळक लोक तिथे होते, तेही परतण्याचा स्थितीत. सहसा आम्ही दोन तीन मिनिटं शांत बसतो नंतर अकरा प्रदक्षिणा पूर्ण करून प्रार्थना करून परततो. त्या दिवशी आम्ही प्रदक्षिणा सुरू करणार तोच तिथे एक बाई दर्शन घेऊन पेढे वाटू लागल्या, रेणुकाला पेढा खूप आवडतो. मोठमोठ्यांना प्रसादाचा,पेढ्याचा मोह आवरत नाही. रेणुका तर लहानच होती, तिचं लक्ष पेढ्याकडे गेलं आणि ती अधीर झाली, मी तिला दटावून म्हटलं आधी प्रदक्षिणा नंतर उरला तर पेढा आमच्या सहा सात प्रदक्षिणा झाल्या असतील, त्या पेढे वाटणाऱ्या बाई तिथून निघून गेल्या. रेणुकानी माझ्या कडे रागाने पाहिलं आणि तणतणत नाराजी व्यक्त करत बाकीच्या प्रदक्षिणा पूर्ण केल्या. प्रसाद न मिळाल्याची खंत तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. आमची प्रार्थना झाली आणि आम्ही बाहेर पडलो मी आणि कौंत्येय गाडीपर्यंत पोहोचलो पण रेणुका आली नाही, आम्ही एकमेकांकडे प्रश्नार्थक नजरेने बघितलं, कुठे गेली? आणि दोनच मिनिटांत हसतमुखाने ती बाहेर आली. पाहिले, तर तिच्या हातावर पेढा. आई मला त्या आजोबांनी पेढा दिला! कोण आजोबा? कुठले? आम्ही दोघेही आत जाऊन पाहू लागलो. आम्हाला आत कुणीही दिसले नाही. काही असो रेणुकाला महाराजांचा प्रसाद मात्र मिळाला आणि महाराजांचं तिच्याकडे लक्ष आहे हे माझ्या लक्षात आलं.

अगदी मागच्याच महिन्यातील अजून एक घटना! रेणुका तिच्या टिप टॉप कॉन्व्हेन्ट शाळेकडून खो खो खेळते, मागील वर्षी शाळेकडून खेळाडूंना खेळताना वापरण्यासाठी ड्रेस देण्यात आला आणि शाळेनी स्पष्ट सूचना दिली की हा ड्रेस दोन वर्ष वापरावयाचा आहे, ड्रेस गहाळ झाल्यास पूर्ण जबाबदारी विद्यार्थीनीची असेल. मागील वर्षी रेणुकाचा खेळ खूप छान झाला. मुली प्रॅक्टीस ला ड्रेस घेऊन शाळेत जायच्या. ते वर्ष संपलं, मॅचेस संपल्या मधे काही महिन्यांची गॅप गेली आणि नवीन वर्ष आलं शाळेत खेळासंबंधी नोटीस आली आणि विशिष्ट तारखेला ड्रेससह हजर राहण्याची सूचना आली आणि घरी ड्रेसचा शोध सुरू झाला पण ड्रेस काही सापडेना, म्हटलं. शाळेत विचारून पहा,पण शाळेनी नाही आहे म्हटलं. मग घरी सर्व कपाटे रिकामी केली पण ड्रेसचा पत्ता नाही. शाळेत पुन्हा विचारलं, तर टीचरनी चिडून आमच्या जवळ नाही असं सांगितलं. मग आता ड्रेस गेला कुठे? घरी आम्ही सगळे बेचैन. डोक्यात सारखा एकच विचार, मग काय आपली धाव महाराजांपाशी. मला आठवतंय गुरूवार होता मी रेणुकाला म्हटलं तू गजानन महाराजांना म्हणून बघ,रेणुकानी महाराजांना हात जोडून म्हटलं माझा ड्रेस सापडत नाही आहे. मला मदत करा मी मंदिरात १०८ प्रदक्षिणा घालीन. दुसरे दिवशी शुक्रवारी शाळेतून घरी आली ते आई आई, ओरडतच, पाहिलं तर तिच्या हातात ड्रेस. मला पहाताच ड्रेस बाजूला ठेवला, आणि मला बिलगून सांगू लागली अगं आज शाळेतील मावशी दोन नंबरचा ड्रेस कुणाचा आहे? विचारत वर्गात आल्या नजरचुकीने तो सापडत नव्हता, कागदाखाली झाकून गेला होता. अचानक आज तो सापडला. मी रेणुकाला म्हटलं जाऊ दे मिळाला नं, दे टाळी, जय गजानन, तिनी पण मला टाळी देत जोरात म्हटलं जय, गजानन आणि मग एकदम गंभीर झाली, म्हणाली आई मी तयार होते आपल्याला मंदिरात जायचं आहे, १०८ प्रदक्षिणांचं लक्षात आहे नं? लगेच मी म्हटलं चल बाई, बोलिलेला नवस कोणी महाराजांचा चुकवू नये! त्या दिवशी प्रदक्षिणा घालताना रेणुकाच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मनोमन महाराजांचे आभार मानून मन जयघोष करु लागले. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. श्रध्दा देशपांडे, नागपूर. – ९७६६७८८२०३.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! मी भास्कर दिक्षीत. बरेच वर्षांपूर्वी रेल्वे खात्यातून निवृत्त झालो. रेल्वेत असल्याने सतत गाड्यांशीच संबंध आला आता माझ्या आयुष्याची गाडी ऐंशीच्या पुढे सुरू आहे. आपण सर्व गजानन महाराजांविषयी अनुभव वाचताहात, ऐकता आहात, ही आनंदाची गोष्ट आहे. कारण त्यामुळे आपली श्रद्धा बळकट होते आणि भक्ती प्रखर होते.

आज मी तुम्हाला गजानन महाराजांविषयी मला आलेला जो अनुभव सांगणार आहे तोही रेल्वे गाडीतच आलेला आहे. मी तरुण असतानाची ही गोष्ट आहे. मध्य प्रदेशातील सातफाटा नावाच्या एका छोट्या गावात असिस्टंट स्टेशन मास्तर म्हणून माझं पोस्टिंग झालं होतं. तेव्हा त्याला केबिन इनचार्ज असंही म्हणायचे. माझी मोठी बहीण शांताताई तेलंग तेव्हा इंदौरला राहत होती. मला आठवतं काही कारणाने मला तिच्याकडे जाणं आवश्यक होतं. तेव्हा खांडवा इंदौर पॅसेंजर होती. रात्रीचाच पूर्ण प्रवास होता. त्या वेळच्या रेल्वे गाड्यांविषयी आजच्या पिढीला कदाचित कल्पनाही करता येणार नाही. गाडीतील दिवे कमी प्रकाशाचे, बसायला लाकडी पाट्यांचा बेंच, कोळशाचं इंजिन, कधी गज नसलेल्या खिडक्या, म्हणजे एकूण स्वरूप आणि दृश्य आजच्यासारखं नव्हतं आणि बाहेरचं दृश्यही आजच्या सारखा झगमगाट नसल्यामुळे दूर कुठे मिणमिणता दिवा दिसला तर दिसणार, तसही रात्रीचा प्रवास अशा वातावरणात अधिकच अस्वस्थ करणारा असतो, अशा सर्व स्थितीत रात्री एक दीडच्या सुमारास खांडवा स्टेशनवर मी गाडीत प्रवेश केला तेव्हा पूर्ण बोगीत आम्ही फक्त चार लोक होतो. दोघांनी वरच्या बर्थवरती चादर टाकून ते आडवे झाले. एक एका कोपर्यात बसला आणि मी आत एका खिडकीशी जाऊन बसलो. आमचा प्रवास सुरू झाला. ती पॅसेंजर असल्यामुळे प्रत्येकच स्टेशन वर थांबणार होती. पुढच्याच स्टेशनवर गाडी थांबली आणि सुरू झालं एक थरार नाट्य!

काही क्षणातच सगळं दृश्य बदलून गेलं! साठ सत्तर लोक एकदम डब्यात चढले आणि पूर्ण बोगी एका विचित्र ऊग्र वासानी भरून गेली. ती एक लग्नाची पार्टी होती,काही स्त्रिया आणि काही पुरूष ! प्रत्येक पुरूष आडदांड आणि काळाकभिन्न. जवळ पास प्रत्येकाने मस्त दारू झोकलेली. प्रत्येकाचे भटारडे डोळे. ती कुठलीशी विशिष्ट जमात होती, त्यांचा एक मुखिया होता. हिंदी सिनेमातील डाकू शोभावा असा प्रत्येक गडी होता. डोक्यावर घुंघट असलेल्या स्त्रिया. मुखिया म्हणेल ती पूर्व दिशा, डब्यात शिरल्यावर बर्थवरती झोपलेल्या माणसाकडे मुखियाची नजर गेली, उंच पुरा रांगडा गडी तो, त्यानी अक्षरशः एखादी वळकटी खाली टाकावी तसं बर्थवरील माणसाला खाली टाकलं. तोंडानी तुम्हारे बाप की गाडी समज रखी है क्या? म्हणत घाणेरडी शिवी हासडली, दुसर्याचीही तीच गत केली. भानावर आले तेव्हा दोघेही चळचळ कापत होते. भागो साले यहांसे! मुखिया ओरडला. कसबसं सामान घेऊन ते दोघे आणि खाली असलेला तिसरा, तिघंही खाली उतरले आणि गाडी सुरू झाली माझ्या आजुबाजूला असलेल्या स्त्रियांनी घुंघटाआडून माझ्याकडे पाहिले आणि तोंडावर बोट ठेवून मला चूप बसून रहा अशी खूण केली. मी भानावर यायच्या आत गाडीनी गती पकडली होती आणि माझ्या हृदयाच्या ठोक्यांनीही. काही वेळातच मुखियाचा मोर्चा आतील कम्पार्टमेन्टकडे वळला आणि त्याची नजर माझ्यावर पडली. तो जोरात ओरडला, ये साला कौन बैठा है यहां पर? मुखियाचं पुढील वाक्य माझ्या हृदयाचा थरकाप, करीत माझ्या कानावर आदळलं, ठीक है एक काम करते है शादी तो बहोत बढिया हो गयी। लेकीन, नर्मदा मैया को बली चढाना बाकी रह गया, आगे नर्मदा है इसका बली चढा देते है! मला ते ऐकून दरदरून घाम फुटला.

पुढला प्रवास, मोरटक्का, नर्मदेवरील पूल, मला पुढे दिसू लागलं आणि दिसू लागलं माझं मरण आणि आठवण झाली माझ्या दैवताची, गजानन महाराजांची. नित्य नियमाने गजानन विजय वाचणारा मी, मला आठवला चौदावा अध्याय आणि आठवली नर्मदा नदी. आता मी थोडा शांत झालो आणि महाराजांचे. शब्द स्मरू लागले. जय जय नर्मदे निरंतर। ऐसेच रक्षण अंबे करी ॥ मग काय डोळे शांत मिटले आता एवीतेवी मृत्यू अटळ आहे यातून वाचण्याची शक्यता एकच गजानन महाराज आणि नर्मदा मैया महाराजांना जीवाच्या आकांतानी साद घातली, म्हटलं महाराज तुम्हीच आता रक्षण कर्ते. मला कथा कथन वगैरे माहिती नाही पण माझ्यावर कृपा करा आणि आज माझ्या मुखातून नर्मदा स्तुतीचा झरा वाहू द्या. मला एक प्रकारची वाचा सिध्दी प्रदान करा! नंतर नर्मदेला हात जोडले. आई महाराजांनी तुझी स्तुती केलेली आम्ही वाचतो. नर्मदे मंगले देवी। रेवे अशुभ नाशिनी। मंतू क्षमा करी यांचा। दयाळू होऊनी मनी ॥

या महाराजांच्या भक्ताला सहाय्य कर आणि मग मी अंगातील बळ एकवटून मुखियाला नमस्कार करून म्हटलं. मुखियाजी मेरी एक ख्वॉइश है. मै आपको नर्मदा मैया की एक कहानी सुनाना चाहता हूँ. जो हमारे महाराज शेगांव के संत गजानन महाराज से भी जुडी हुई है. आश्चर्य म्हणजे काही क्षण विचार करून त्यानी लगेच अनुमति दिली. मनात महाराजांचे आभार मानले एक टप्पा तर ओलांडला. मला नर्मदेचा पूल पार पडेपर्यंत कहाणी सांगण्याचं दिव्यकर्म आता करायचं होतं. गाडी पूलावरून जाताना काहीतरी वेगळाच आवाज येतो हे आपल्याला माहिती आहेच. आता माझी कहाणी सुरू झाली. चौदाव्या अध्यायातील वर्णन मला करायचं होतं, मला आठवून आजही रडायला येतं. महाराजांनी त्या दिवशी मला खरंच वाचा सिध्दी दिली की काय कोण जाणे. सांगता सांगता पूलाचा आवाज सुरू झाला, संपत आला पण कुणाचंही तिकडे लक्ष गेलं नाही. पूल संपला कहाणी संपली. मी जोरात घोष केला. नर्मदे हर। नर्मदे हर। नर्मदे हर. काहीच क्षण शांततेत गेले आणि कुणीतरी आवाज दिला. नर्मदा मैया की, सगळे ओरडले जय तीनदा जयघोष झाला. सगळेच कसे संमोहित झाले होते, महाराज पावले नर्मदा धावून आली आणि बडवा स्टेशन आलं, गाडी थांबली. मुखियानी प्रश्नार्थक नजरेनी सगळ्यांना विचारलं, पुलिया निकल गया? पण आता दृश्य बदललं होतं. नर्मदा मैया त्यांचं दैवत होतीच, तिचं गुणगान करणारा मी त्यांचा मेहमान झालो. त्यांनी खाली उतरून चहा पिण्यासाठी आग्रह धरला, मी बॅग घेऊन खाली उतरलो माझा पुनर्जन्म झाला होता. क्षणात सगळं बदललं होतं, पण पुढचा क्षण कुणाला माहिती असतो? त्या स्टेशनवरच मी महाराजांना विनंती केली की, महाराज एका रेल्वे स्टेशनवर तुम्ही भास्कराचा डोळा चुकवून भलत्याच डब्यात शिरण्याची किमया केली होती. आज या भास्कराला एका वेगळ्याच डब्यात बसविण्याची किमया करून दाखवा ! आणि महाराजांनी किमया केली. स्टेशनवरील गर्दीत काय आणि कसा देव जाणे मी दूरवरच्या एका वेगळ्याच डब्यात जाऊन बसलो. गाडी सुरू होईपर्यंत धाकधुक होत होती पण एकदाची इंजिननी शिटी दिली आणि इंदौर च्या दिशेने माझा सुखरुप प्रवास सुरू झाला. मात्र त्या रात्री मी प्रवास संपेपर्यंत दोन्ही जप एकसाथ करत होतो. नर्मदे हर! जय गजानन! नर्मदे हर! जय गजानन !

श्री भास्कर दिक्षीत, नागपूर. – ९३७०१४०३७२.

शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

*११ – वारसा हक्काने मिळाली गजानन महाराजांची भक्ती – श्री. शशिकांत बोरडकर, गडचांदूर.*

जय गजानन माझे आई वडील दोघेही अत्यंत भाविक, गजानन महाराज त्यांचं दैवत! पोथी वाचन आणि महाराजांचं दर्शन हा त्यांचा ध्यास, आणि मी मात्र अगदी वेगळा. अगदी लहानपणी आपल्या मताला तशी काहीच किंमत नसते, त्यामुळे मी केवळ सर्व न्याहाळत होतो. पण वाढत्या वयाबरोबर मला असं वाटू लागलं की आपल्या कर्तृत्वावर आपला विश्वास असावा. देव आणि महाराज करण्यापेक्षा लाथ मारीन तिथे पाणी काढीन अशी धमक असावी आणि हे मी वडिलांना बोलूनही दाखवायचो. ते म्हणायचे, तुझं म्हणणं योग्य आहे. फक्त त्या कर्तृत्वाला भगवंताचं अधिष्ठान असावं आणि पुढे ते असही म्हणायचे की उद्या तुझी मतं बदलतील आणि गजानन महाराजच हे परिवर्तन घडवून आणतील.

आम्ही तेव्हा चंद्रपूरला रहात असू आणि माझी आई मात्र नोकरीच्या निमित्ताने माझ्या एका भावासह बल्लारशा येथे रहात होती. ती गव्हर्नमेन्ट हॉस्पिटलला नर्स होती. आईची अचानक जवळच्याच सास्ती नावाच्या गावाला बदली झाली. मधे असणारी नदी ओलांडून त्या गावी जावं लागायचं, नदीवर तेव्हा धड पुलही नव्हता. शिवाय ते गावही फारच लहान होतं. एकंदरीत तिथे आईने रहाणं गैरसोयीचं होतं. त्यामुळे आईने तिथे न जाण्याचा निर्णय घेतला आणि ती एक सुटीचा अर्ज देऊन चंद्रपूरला आमच्या जवळ आली. त्या नंतर आईनं काय करावं? तिने गजानन विजय ग्रंथाची रोज एक प्रमाणे लगातार १२१ पारायणं पूर्ण केलीत. मला मनात वाटायचं की वडिलांनी बदलीसाठी काही प्रयत्न करावेत. त्या काळात अनायसेच आई घरी असल्याने वडिलांनी आमचं स्वतःचं घर बांधण्याचा निर्णय घेऊन ते काम सुरू झालं. एकीकडे बांधकाम पूर्ण होत आलं. आईची पारायणं पूर्ण झालीत तेव्हा वडील म्हणाले मी सहज संबधित ऑफिसमध्ये चौकशी करून येतो आणि ते मुंबईला जाऊन आले. त्यांना तिथून सांगण्यात आलं नर्सची संख्या सध्या कमी आहे आणि सध्या चंद्रपुरलाच तशी गरज आहे. त्यामुळे आईची बदली चंद्रपूरलाच करण्यात येत आहे, म्हणजे काय? एकीकडे स्वतःचं घरही बांधून तयार आणि दुसरीकडे आईची बदली हवी तिथे झाली. हे सर्व पाहून माझं मन थोडं बदललं आणि गजानन महाराजांनी हळूच मनात प्रवेश केला.

दरम्यानच्या काळात मला नोकरी लागली, माझं लग्न झालं, आणि अति अल्प अंतरानी मला दोन अपत्य झालीत. दोन्ही मुली! दुसरे अपत्याच्या वेळी दोघांमधील कमी अंतर, माझा तुटपुंजा पगार, भविष्यातील जबाबदारी यामुळे आम्हा उभयतांना वाटलं की दुसरी जबाबदारी आता नको, पण वडिलांचं मत मात्र उलट होतं. त्यांनी एकीकडे आर्थिक आधार देण्याचं आश्वासन देऊन म्हटलं बघूया काय होईल ते. गजानन महाराज समर्थ आहेत. ते काळजी घेतील. त्या नंतर अशा काही घटना घडून आल्या की आमच्या मताला काही अर्थच उरला नाही आणि नियतीच्या चक्रात दुसरं कन्यारत्न जन्माला आलं आणि लगेचच माझं प्रमोशन होऊन भरघोस पगार वाढ मिळाली आणि गजानन महाराजांनी मनात नकळत थोडं स्थान मिळवलं.

पुढे २००४ मधे मला वडिलांनी आग्रहानी आर्थिक मदत करून ऑल्टो कार घेऊन दिली. आर्थिक सहाय्य करताना ते म्हणाले, बालू ( मला वडील बालू म्हणायचे) हा पैसा तू मला परत करायचा आहेस आणि समजा मी मधेच जगाचा निरोप घेतला तर देवाची इच्छा, हा पैसा तुझा! ईश्वरेच्छा बलियसी! फेब्रुवारी २००५ मधेच वडिलांनी जगाचा निरोप घेतला. जाताना मला म्हणाले , तुझ्यात होणारा बदल मी अनुभवतो आहे, तू गजानन विजय वाचत जा, तुझं भलं होईल आणि वडील गेले, त्यांचे पैसे देण्याचं ओझं माझ्या मनावर होतं. इ. स २००७ मधे मला माझ्या आर्थिक परिस्थितीने पैसे देण्याची अनुमति दिली आणि माझ्या मनाने कौल दिला की हे पैसे शेगांव येथे आनंद विहारला खोलीसाठी वडिलांच्या नावाने द्यावे. या आधी मी आई वडीलांबरोबर कधी शेगांवला गेलो होतो पण तटस्थ बुद्धीने. आता मात्र मी शेगांवला गेलो तो भावनिक नात्याने. देणगी देण्याच्या निमित्ताने तेथील सर्व गोष्टी जवळून पाहता आल्या आणि शेगांवनी माझ्या मनात एक भावनिक ओलावा निर्माण केला.

काही वर्ष मधे गेलीत आणि एक दिवस कंपनीत एका पठारवजा जागेवर काही आवश्यक काम करीत असताना एकाएकी माझा तोल गेला आणि वरून घसरत, धडपडत, ठेचकाळत, तीस फूट खाली येऊन पडलो. नाकाला थोडी जखम झाली आणि मी बेशुद्ध झालो. भानावर आलो, तो मला हॉस्पिटल मधे अ□ॅडमिट केलं होतं. मी वाचलो कसा याचं सगळ्यांना आश्चर्य वाटलं. मला दवाखान्यातून सुटी मिळाली. मी घरी आलो. आमच्या क्वार्टरच्या परिसरात एक उषा मधुसूदन मारूवडा नावाच्या दाक्षिणात्य बाई रहायच्या. त्या अध्यात्मिक वृत्तीच्या, सत्प्रवृत्तीच्या होत्या, त्या भेटायला आल्या. माझ्याकडे बघताच त्या म्हणाल्या तुम्ही तुमच्या आई वडीलांच्या पुण्याईने वाचलात, मी तुम्हाला प्रामाणिकपणे सांगते तुम्ही शेगांवच्या संत गजानन महाराजांची पोथी गजानन विजय वाचा आणि एकदा आभार मानायला शेगांवला जाऊन या! तुम्ही सध्या सुटीवर आहात, पोथी देवासमोर बसून वाचायला हवी असंही नाही. जिथे आणि जशी शक्य होईल तशी वाचा. त्यांचं हे वाक्य कुठेतरी खोल जाऊन माझ्या मनात शिरलं आणि मग मी ‘असं आहे तरी काय ह्या पोथीत’ ह्याचा शोध घेण्यासाठी म्हणून घरी भावाला निरोप पाठविला, घरी असलेल्या पोथ्यांपैकी एक पाठव. योग असा की नेमकी वडिलांची पोथी माझ्या हाती आली. मग मी इकडे तिकडे बसत जसं शक्य होईल तसा गजानन विजय ग्रंथ वाचून काढला.

मग काय दासगणू महाराजांची ती रसाळ वाणी आणि गजानन महाराजांनी जिवंत केलेले कल्पनेहूनही सुंदर प्रसंग, यांनी माझ्या मनावर ताबा मिळविला नसता तरच नवल. एक प्रकारे वडिलांकडून वारसा हक्काने गजानन महाराजांची भक्ती माझ्याकडे चालून आली. पुढे इ. स २०१२ मधे मी आनंद विहार ला पुन्हा माझ्या करिता म्हणून देणगी दिली आणि तेव्हा पासून जवळपास दर महिन्याला मी शेगांव वारी करतो आहे आणि शक्य तेव्हा गादीसमोर पारायणही. आता मी कंपनीत ‘डेप्युटी जनरल मॅनेजर सिव्हील’ असं छान पद भूषवितो आहे, स्वकर्तृत्वावर कामाची छाप पाडतो आहे. पण आज माझ्या कर्तृत्वाला गजानन महाराजांचं अधिष्ठान वडिलांच्या आशीर्वादाने प्राप्त झाले आहे. आज हा क्षण पाहण्यासाठी आई वडील जिवंत नाहीत याची खंत आहे पण त्यांच्याच आशीर्वादाने समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज मला लाभले याचे समाधान आहे. आज आई असती तर हे सर्व पाहून आनंदाने म्हणाली असती. श्री गजानन जय गजानन !श्री गजानन जय गजानन!

श्री. शशिकांत बोरडकर, गडचांदूर. – ९५४५५९०१६४.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! गजानन विजय ग्रंथाचा रोज एक अध्याय वाचण्याचा माझा नेम. त्या दिवशी पहिला अध्याय होता, वाचनास प्रारंभ झाला, दासगणूंनी प्रारंभी सर्व देव देवतांना वंदन केलं आहे, त्यात मी वाचू लागले, हे दुर्गे तुळजे भवानी । हे अपर्णे अंबे मृडानी । ठेवी तुझा वरद पाणी । दासगणूच्या शिरावर ॥

या ओव्या वाचता वाचता डोळे भरून आले आणि मी अंथरुणावर पडल्या पडल्या ढस-ढसा रडू लागले. हो, गेले दोन महिने मी अंथरुणावरच होते. जानेवारी २०१२ ची घटना, अगदी सकाळी मी मुलांना सूर्यनमस्कार शिकविण्यासाठी म्हणून शाळेत गेले आणि गाडी स्टँडवर लावताना माझा अंदाज चुकला, दुर्लक्ष झालं आणि माझीच गाडी माझ्या अंगावर पडली. अपघात विचित्र झाला पण फारच गंभीर झाला. माझ्या डाव्या हीपजॉईंटला प्रॉब्लेम येऊन जांघेतील बॉल मांडीच्या हाडापासून वेगळा झाला. असह्य वेदना होत होत्या, मला डॉ. नावंदर यांच्या हॉस्पिटलमधे अ□डमिट करण्यात आलं. डॉक्टरांनी मला तपासलं आणि त्यांचा चेहरा गंभीर झाला. ते म्हणाले, ऑपरेशन करावं लागेल पण जरा कॉम्पलिकेशन्स वाटताहेत. मी अशी बरीच ऑपरेशन्स केली आहेत, पण या केस मध्ये फिफ्टी फिफ्टी चान्सेस आहेत. आपण प्रयत्न करू. पण शक्य आहे जन्मभराकरीता कुबडी अथवा काडीचा आधार घ्यावा लागू शकेल. मी प्रयत्न करतो पण यश भगवंताचे हाती आहे. शस्त्रक्रिया नीट होणं आणि नंतर नीट चालता येणं असे दोन टप्पे आहेत. तुम्ही देवाला प्रार्थना करा!

माझी श्रद्धा गजानन महाराजांवर आहे हे घरचे सगळेच जाणून होते. माझे भाऊजी घरून गजानन विजय पोथी आणि महाराजांचा अंगारा घेऊन आले. मी सद्गुरू श्री गजानन महाराजांना हात जोडून म्हटलं, महाराज मी अज्ञानी भक्त यातील काही जाणत नाही. आई तुळजा भवानी. कुलस्वामिनी आणि तुम्ही सद्गुरू! आता तुम्हीच माझे मार्गदर्शक आणि हितचिंतक! आणि मला ऑपरेशन थिएटर मधे हालविण्यात आलं! ऑपरेशन नंतर डॉक्टर म्हणाले, आता दोन अडीच महिने अंथरुणावर पडून रहायचं तेही पाठीवर. पाय हलू नये म्हणून घोट्यापासून वरपर्यंत लोखंडी स्टँड राहील, नंतर एक्सरे काढू,चांगले झाले तर ठीक नाहीतर परत बॉल बदलवावा लागेल तीन मोठ्या स्क्रूंच्या सहाय्याने आपण बॉल जोडला आहे. बाकी त्याची इच्छा! एवढं बोलून डॉक्टर तर निघून गेले पण माझ्यासाठी सुरू झाला प्रचंड मानसिक दडपणाचा काळ, शरीराने अंथरुणावर बंदिस्त, अंघोळ बंद, आता सबकुछ अंथरुण आणि मनात एकच विचार दोन अडीच महिन्यानंतर काय होईल?

आज हे सांगायला सोपे आहे पण अशी वेळ कधी कुणावर येऊ नये. जो भोगतो त्यालाच कळतं. माझ्यासमोर दोन प्रश्न होते. एक ऑपरेशन यशस्वी झाले का? आणि दोन मी पुढील आयुष्यात कशी चालीन? आणि या दोन्ही प्रश्नांसाठी माझ्या जवळ आधार होता एकच. समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज ! माझ्या खोलीत गजानन महाराजांचा फोटो होता. निजल्या निजल्या जे शक्य होतं ते म्हणजे, जमेल तसा एक अध्याय. गण गण गणात बोते नाम जप. कधी मोबाईलवर रामरक्षा. हे सर्व मी करीत होते. आमची कुलस्वामिनी तुळजापूर भवानी मातेचं स्मरण करून मी म्हणायचे, आई सद्गुरूंना मी प्रार्थना करते आहे. गजानन महाराजांना म्हणायचे, सद्गुरूच मार्गदर्शक असं मी ऐकत आले आहे. तुम्ही हे सर्व योग्य मार्गावर आणाल नं?

मला रडायला येणं हा माझ्या मनातील भावनांचा उद्रेक, होता. मानसिक परीक्षेच्या या काळात, मी अनेकदा रडले, कधी खिन्न झाले तर कधी अतिशय आर्तपणे महाराजांना कबूल केलं, म्हटलं, मी या परिस्थितीतून सुखरुप बाहेर पडले तर तुमच्या मंदिरात प्रगट दिनाचा महाप्रसाद करीन, मला बरं करा. मी अकोला ते शेगांव पायी वारी करीन आणि आता निकालाची घडी जवळ आली होती. ऑपरेशन जमलं का? या प्रश्नाचं उत्तर मिळणार होतं आणि अडीच महिन्यानी एक दिवस एक्सरे काढला. महाराजांच्या कृपेने ऑपरेशन यशस्वी झाले होते. पूर्ण हाड जुळले होते. लोखंडी स्टँडमधून माझा पाय निघाला होता पण पाय बारीक आणि लाकडासारखा कडक झाला होता. तो आपले काम विसरला होता. पण येवढे निश्चित की गेला अडीच महिनाभर मी ज्या राक्षसी शंकेने ग्रस्त होते त्या माझ्या मानसिक अवस्थेतून महाराजांनी मला सुखरुप बाहेर काढलं होतं.

आता दुसरा प्रश्न बाकी होता, मला नीट चालता येईल का? कुबडी सुटेल की नाही?आणि याही प्रश्नाचं उत्तर मला महाराजांनी दिलं, मात्र उत्तर देण्यासाठी महाराजांनी निवडलेली पद्धत मला तरी लाखात एक वाटली, ती पद्धत आयुष्यभर विसरता येणार नाही अशी होती. एक्सरे रिपोर्ट ठीक आल्यानंतर डॉक्टरांनी मला प्रथम वॉकरच्या सहाय्याने हळू हळू चालून पहा, पायाला योग्य पद्धतीने मॉलीश करा, तज्ञ लोकांच्या मार्गदर्शनाखाली पायाची हालचाल करा, असा सल्ला दिला. वॉकर घेऊन पहिल्यांदा उभी राहिले तेव्हा पायासह संपूर्ण अंग थरथर कापत होतं. माझी बहीण नियमित पायाला मॉलीश करून देत होती. आमच्या परभणीतील डॉ. गिरीश वेलणकर यांचा योगाचा भरपूर अभ्यास आहे, त्यांच्या मार्गदर्शना खाली पद्धतशीर पायाची हालचाल होत होती. जवळपास दीड महिन्यानंतर डॉक्टरांनी कुबड्यांच्या सहाय्याने चालण्याचा सल्ला दिला.

आता मी कुबड्या घेऊन चालू लागले होते. विचारपूस करायला हितचिंतक घरी यायचे, जो तो आपापल्या परीने सल्ला द्यायचा, अपवाद वगळता प्रत्येक जण कुबड्यांची प्रॅक्टीस चालू ठेवा, एकदम त्या सोडू नका, पहा बरं घसराल! सांभाळून चाला, कुबड्या सहजासहजी सुटत नाही बरं मॅडम. अशा सारखं बोलायचा. एखाद्या गोष्टीला वारंवार मनावर बिंबविलं की मन ती गोष्ट स्वीकारायला नकळत तयार होतं. मला मनात वाटायला लागलं की या कुबड्या दीर्घ कालीन आपली सोबत करणार. घरी तेच. रस्त्यावर थोडं बाहेर पडलं तरी तेच. आमच्या घराजवळ सद्गुरू नगरला असलेल्या गजानन महाराज मंदिरा- पर्यंत मी कुबड्या घेऊन जाऊ लागली होती. आणि त्या दिवशी सकाळी काही वेगळच घडलं. मला आठवतं ती जूनची सात तारीख होती. गुरुवार महाराजांचा वार! सकाळी पाच साडेपाच ची वेळ असेल, मी मंदिराच्या जवळ पास होती. रस्त्यावर अन्य कुणीही नव्हतं. तशात समोरून अचानक एक माणूस माझ्या दिशेने चालत आला, अंगावर पांढरे शुभ्र कपडे. अगदी शेगांव पंढरपूर वारीत वारकरी घालतात तसे. तो थेट माझ्यासमोर येऊन उभा झाला. माझ्याकडे पाहून मला म्हणाला. अगं बाई ती कुबडी सोड आता. त्यावर मी त्याला ऑपरेशनचं आणि डॉक्टरांनी कुबडी दिल्याचं सांगितलं, तसं तो म्हणाला, हो हो मला सगळं माहिती आहे. मी वारकरी, मी तुळजापूरलाही जाणार, मी पंढरपूरलाही जाणार आणि सर्व जाणणार. त्यानी त्याचा उजवा हात त्याच्या छातीवर ठेवला आणि विश्वासात घेत एखाद्याला सांगावं तसं मला म्हणाला तू आता बरी आहेस. मी सांगतोय नं तुला,

कुबडी सोड. चालून बघ. असं म्हणत म्हणत तो दूर निघून गेला. ज्याला याआधी मी कधीच पाहिलं नव्हतं आणि नंतरही तो माणूस कधीच दिसला नाही तो माझ्या मनात विश्वास निर्माण करून निघूनही गेला. मी घरी जाऊन मिस्टरांना हे सांगितलं. ते म्हणाले, कुबड्या भिंतीला टेकवून ठेव आणि चालून बघ! अहो आश्चर्यम! मला नीट चालता येत होतं.

महाराजांनी माझं ऐकलं होतं. आता नवस पूर्ण करण्याची जबाबदारी माझी होती. मी आमच्या त्रिमूर्ति नगर येथील गजानन महाराज मंदिरात २०१३ च्या प्रकट दिनाला पाच ते सहा हजार भक्तांसाठी महाप्रसाद केला. मात्र काही कारणाने पदयात्रेचं राहून गेलं, यंदा दिवाळीच्या सुमारास आम्ही अकोला-शेगांव पदयात्रेसाठी दिवसही निश्चित केला, पण माझ्या उजव्या पायाला पुन्हा थोडा अपघात झाल्यामुळे ती वारी राहिली पण माझा मुलगा शशांक मला म्हणाला, आई तुझ्यासाठी मी ही पदयात्रा करून येतो आणि त्याने ती यात्रा केली. यावर आमचे एक स्नेही मला म्हणाले, अहो तुमच्या मुलानी मातृऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत असतानाच तुम्हाला गुरूऋणातून थोडी मोकळीक मिळवून दिली आहे. त्यांचं म्हणणं मला थोडं पटलंय, पण आता गजानन महाराज माझ्याकडून वारीचं सत्कर्म केव्हा पूर्ण करून घेतील याकडे मी लक्ष ठेवून आहे. बाकी मनातल्या मनात जप चालू आहे. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. शामा हेलसकर, परभणी. – ९४२३४४३२४७.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## १३ – भक्त वत्सल गजानन महाराज – श्री. विनय लोहे, नागपूर.

जय गजानन! आपण जेव्हा शेगांव दर्शनाला जातो, तेव्हा श्रींच्या दर्शनासाठी उजव्या हाताला असलेल्या दारातून आत शिरताना हिंदी भाषेत लिहीलेली एक माहिती आपण वाचू शकतो, मंदिर नवीन स्वरूपात साकारण्यापूर्वी हीच माहिती समाधी दर्शनाकरीता उतरण्यासाठी जे दार होतं त्याच्या बाजूला वर टांगलेल्या पाटीवर होती. ती माहिती थोडक्यात अशी की श्री गजानन महाराज ८ सप्टेंबर, १९१० रोजी ऋषीपंचमी च्या दिवशी समाधिस्त झाले, महाराजांनी आधीच याची कल्पना देऊन ही जागा निश्चित झाली होती. महाराज संजीवन स्वरूपात इथे आहेत आणि ते सत्य संकल्पाचे दाता आहेत. याची प्रचिती महाराजांची भक्ती, श्रध्दा आणि निष्ठेने करणारे भक्त घेऊ शकतात. हे सत्य आहे! मी जेव्हा जेव्हा ही पाटी वाचतो तेव्हा तेव्हा मनात विचार येतो की, श्रद्धायुक्त अंतःकरणानी महाराजांचं स्मरण केल्यावर महाराज आपल्या लहान लहान इच्छा पूर्ण करतात. तोच प्रत्येक भक्तासाठी त्याच्या पातळीवर अनुभवच नाही का? अर्थात कधी कधी असं होतं की एखादी गोष्ट महाराजांचं नाव घेऊन केली तरी आपल्या मनासारखी होत नाही पण थोडा धीर धरला तर पुढे जाऊन लक्षात येतं की अरे ही तर महाराजांचीच योजना होती! आणि मग आपलं मन अधिकच आनंदित होतं आणि आपली निष्ठा अधिक दृढ होते.

काही वर्षांपूर्वीची गोष्ट. मला आठवतं. माझं गजानन विजय पारायण पूर्ण झालं, प्रसादासाठी काही मंडळींना आमंत्रित केलं होतं. आमचं घर तेव्हा गावाबाहेर होतं. वस्ती तुरळक होती. मी पूजेची पूर्ण तयारी केली. महाराजांसाठी निशिगंधाचा हार आणावा असं मनात आलं. मी आणि माझ्याहीपेक्षा माझ्या भावानी जवळपासची हाराची दुकानं पालथी घातली पण निशिगंधाचा हार काही मिळाला नाही. मग महाराजांची इच्छा! असं म्हणून पुढील तयारीला लागलो. वेळ पुढे सरकत होता. एक एक भक्त येत होता. माझा एक मित्र आणि गजानन बाबा हा विषय ज्याच्यासाठी विशेष आस्थेचा आहे तो महेश कुलकर्णी देखील माझ्याकडे अपेक्षित होता. काही वेळात तो आला, त्यानी पॉलिथिन च्या पिशवीत एक मोठा हार आणला होता. तो मला म्हणाला, विनय महाराजांनी मला प्रेरणा दिली की मी तुझ्याकडे हार घेऊन जावा आणि मला येताना मनासारखा हार मिळालाही, असं म्हणून त्याने पिशवी माझ्यासमोर धरली, मी पिशवीत डोकावलो. आत सुंदर निशिगंधाचा हार होता.

असाच एक प्रसंग, मागे एकदा नरसोबाची वाडी आणि औदुंबर असा यात्रेचा योग आला आणि अचानक थोड्या काळाकरीता मला पाठदुखीचा त्रास सुरू झाला. एकदम मोठा प्रवास एकत्र शक्य नव्हता म्हणून मग पुण्याला थांबून नंतर पुढे जा, असा सल्ला डॉक्टरांनी दिला, त्याप्रमाणे आम्ही पुण्याला पोहोचलो. बरेच दिवसांपासून दगडूशेठ गणपतीचं दर्शन घ्यावं असं मनात होतं. पुण्याला थांबल्यामुळे महाराजांनी सहाजिकच तो योग जुळवून आणला. मी देवदर्शनाला जातो तेव्हा तिथे जर खूप गर्दी असेल तर मी हार फुलं विकत घेत नाही कारण ते व्यवस्थित अर्पण होत नाही, असा माझा अनुभव आहे. आम्ही गणपती दर्शनाला गेलो तेव्हा तिथे प्रचंड गर्दी होती, बाजूला विकायला सुंदर ताजी लाल फुलं आणि दुर्वा होत्या, प्रथम मला त्या विषयी काही वाटलं नाही, आम्ही दर्शनाच्या रांगेत उभे झालो. रांग पुढे सरकू लागली आणि माझ्या मनात हुरहुर सुरू झाली की आपण रिक्त हस्तेच जाणार का? मी अस्वस्थ झालो. माझा मुलगा आणि बायको दोघांनीही ते टिपलं, आणि फुलं, दुर्वा घ्याव्या की न घ्याव्या विषयी आम्ही बोलू लागलो. त्यातच रांग बरीच समोर सरकली अर्ध्याहून जास्त समोर आल्यावर रांग सोडून देणही उचित नव्हतं आणि दुसरीकडे मन मात्र कमालीचं बेचैन होतं. शेवटी गजानन महाराजांना हात जोडून, म्हटलं आज मी मंदिरात फुलं अर्पण करण्याचा योग आहे की नाही तुम्हास ठाऊक आणि ओम श्री गजानन महाराज की जय! असा मनात उच्चार करून समोर चालू लागलो. पाचच मिनिटं झाली असतील दोन लहान मुलं कठड्याच्या बाजूने घाईघाईने त्या दोन चारशेच्या गर्दीत नेमकी माझ्याकडे आलीत, त्यांच्या हातात सुंदर लाल फुल आणि दुर्वा होत्या माझ्यापुढे हात करून मला म्हणाले आम्हाला उशीर होतो आहे तुम्ही हे फूल देवाला अर्पण कराल का? मी यंत्रवत हात समोर केला माझ्या हातावर फूल आणि दुर्वा ठेवून दोन्ही मुलं निघूनही गेली. देवळात ती फुलं माझ्याकडून व्यवस्थित स्वीकारल्याही गेलीत, ही गोष्ट २१ जून २०१७ ची आहे. माझ्या पाठदुखीमुळे पुण्याला थांबण्याचा आणि गणपती दर्शनाचा योग आला हे तर मला कळलं, पण शेकडो लोक तिथे असताना ती मुलं नेमकी माझ्याकडेच का यावी, याचं उत्तर मला अजूनही कळलेलं नाही. मात्र या सर्व संदर्भात विचार करताना वाटतं आपण महाराजांना किती वारंवार त्रास देत असतो आणि महाराजही वारंवार भक्तांसाठी कृपासिंधू-भक्त वत्सल ठरत असतात. पण असं वाटलं तरी मन पुन्हा पुन्हा महाराजांशी हितगूज करायचं काही सोडत नाही.

मागे एकदा मी सलग २१ दिवसात गजानन विजय ग्रंथाची २१ पारायणं करण्याचं ठरविलं. माझी सोळा सतरा पारायणं पूर्ण झाली असतील आणि एक दिवस पारायणात भाऊ कवरांचा अध्याय वाचीत असताना, महाराजांच्या आवडीचे पदार्थ त्यांना द्यावे अशा ओळी आल्या आणि माझं मन भरकटलं, मी महाराजांना म्हटलं, महाराज गेले पंधरा सोळा दिवस मी तुम्हाला वरण भाताचा नैवेद्य दाखवितो आहे. तुम्हाला कंटाळा नाही नं आला? मला खिचडी खूप आवडते. तुम्हाला आवडते का? मी तुम्हाला खिचडीचा नैवेद्य दाखविला तर चालेल का? काही क्षण हा विचार मनात घुटमळला आणि पुढील वाचन सुरू झालं, मग क्रमशः एकवीस अध्याय पूर्ण झालेत. आता नैवेद्य, आरती आणि मग सगळ्यांनी प्रसाद घ्यायचा. नमस्कार करून पोथी समोर ठेवली आणि आईला म्हटलं. आई नैवेद्य वाढून आण. आई समोर आली, पाहतो तर आईचा चेहरा उतरलेला. ती म्हणे, अरे विनय चूक झाली रे बाबा आज माझ्याकडून, खरं म्हणजे असं कधी होत नाही पण तुला काय सांगू अरे आज कुकर लावताना डाळ धुवत होते तर कसं काय कोण जाणे, पण माझ्याच हातून भाडं निसटलं आणि सर्व डाळ तांदळाच्या पातेल्यात सांडली मग काय करणार, आज मी डाळ तांदूळ एकत्रच शिजविले. त्यामुळे आज खिचडीचाच नैवेद्य दाखवावा लागणार किंवा तुला चालणार नसेल तर मी पुन्हा कुकर लावते. असं म्हणून आई थांबली, हे सर्व ऐकून माझे डोळे पाणावले, आईला म्हटलं, नाही आई तुझं काहीच चुकलं नाही. आण आज महाराजांना खिचडीच हवी होती. असं म्हणता म्हणता कितीही आवरलं तरी मला येणारा हुंदका काही मी रोखू शकलो नाही. आई म्हणाली अरे चूक माझी आहे! तू का रडतोस? गालावर आलेले अश्रू पुसत तिला म्हटलं, अगं चूक तुझी नाहीच आहे, असलीच तर माझी असू शकेल पण त्याही पेक्षा ही गजानन महाराजांचीच लीला आहे, असच मला मनातून वाटतं आहे. जा लवकर खिचडी घेऊन ये आजचा प्रसाद विशेष महत्त्वाचाआहे! आईला यातलं काही कळलं नाही ती पटकन स्वयंपाक घराकडे वळली. मात्र मुलाला राग आला नाही याचा तिला आनंद झाला आणि गजानन महाराजांचे त्यासाठी आभार मानतच ती आत गेली, कारण मला स्पष्ट ऐकू आलं तिचं पुटपुटणं, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. विनय लोहे, नागपूर. – ८८०५७१०३२८.

शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! आज मी सत्तरीच्या घरात पोहोचलो आहे. अनेक छोट्या मोठ्या प्रसंगात गजानन महाराजांनी माझी पाठराखण केली आहे. पण अगदी लहानपणी म्हणजे नवव्या वर्गात असताना माझ्या जीवनात आलेले दोन अनुभव अजूनही माझ्या स्मरणात आहेत. एका अनुभवातून महाराजांनी मला शिकविले की, तू माझं दर्शन केलेलं असू दे वा नसू दे. माझा फोटो तू पाहिला अथवा नाही यानी काही फरक पडत नाही. तू मला आर्तपणे साद घाल. मी भक्ताच्या हाकेला प्रतिसाद देईन आणि दुसऱ्या अनुभवातून त्यांनी मला शिकविलं, असेल हरी तर देईल खाटल्यावरी हे चालायचं नाही. तू मेहनत घेतली तर तुझ्या यशाला अधिक उजाळा मिळेल.

मला आठवतं. १९६३ मधील ती घटना असावी. मला टाईफॉईड झाला, नुसता झालाच नाही तर तो पुन्हा पलटून दुबार झाला, रिलॅप्स झाला. रिलॅप्सड् टायफॉईड काय भयंकर प्रकार आहे हे कदाचित नवीन लोकांना कळणार नाही,कारण अलिकडे नवीन शोध, अद्ययावत दवाखाने, तज्ञ डॉक्टर,यामुळे टाईफॉईड शब्द तेवढा भितीदायक वाटत नाही. पण पूर्वी बरेच लोक या रोगात दगावले आहेत. त्या काळी टेरॅमाईसिनच्या गोळ्या टायफॉईडसाठी दिल्या जात. मला त्या गोळ्या फार उष्ण पडत होत्या, पण इलाज नव्हता, टायफॉईड मधे ताप नॉर्मल येणं म्हणजे रोगाला उतार, पण नॉर्मल तर जाऊ द्या, मला सतत तीन दिवस तीन रात्र १०३ ते १०४ असा ताप होता. सर्व प्रयत्न केल्यावर डॉक्टरांनी वडिलांना सांगितलं, वैद्यकीय इलाज आता संपले, तुम्हाला काही पारमार्थिक उपाय करायचे असतील तर करू शकता. ते ऐकून मुलगा हातचा जाणार असं समजून वडील हताश झाले, पारमार्थिक उपाय म्हणजे काय? हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा झाला. आम्ही तेव्हा भुसावळला रहात होतो. वडिलांनीआसपास चौकशी केली, तेव्हा कळले की शेगांवला गजानन महाराज होऊन गेलेत त्यांच्या आशीर्वादाने गावातील श्री बाबू गुरूजी जोशी हे असे काही उपाय सुचवितात, वडील त्यांना भेटले आणि माझी सर्व परिस्थिती कथन केली. त्यांनी काही नामजप करून एक काळा गंडा आणि अंगारा दिला. गंडा माझ्या उशीखाली ठेवायचा आणि मला अंगारा लावत रहायचा सल्ला दिला, तसेच तब्येत बरी झाल्यावर शेगांवला जाऊन समाधी दर्शन घेऊन या, असे सांगितले. वडिलांनी त्यांना दक्षिणा विचारली तेव्हा, मला काही पैसा नको, जेव्हा शेगांवला जाल तेव्हा सव्वा रूपया अभिषेकासाठी द्या, असं सांगितलं. तो उपाय सुरू झाला आणि डॉक्टरही आश्चर्य करू लागले, क्रमशः ताप उतरत गेला, नॉर्मल झाला आणि कुणाचा विश्वास बसणार नाही पण मी पंधराव्या दिवशी शेगांवला समाधीपुढे उभा होतो. दर्शन घेऊन गजानन महाराज की जय! गजानन महाराज की जय! म्हणतच समाधीच्या पायऱ्या चढून वर आलो, तेव्हा पूर्ण भारावून गेलो होतो. ते माझे पहिले शेगांव दर्शन होते. त्या काळी शेगांव फारसं कुणाला माहिती नव्हतं. स्टेशनवर शुकशुकाट, दर्शनासाठी फारशी गर्दी नाही, अशी स्थिती होती. वडिलांना गजानन महाराजांनी मुलाचा जीव वाचवून अतिशय आनंद दिला होता. त्यामुळे त्यांनी एक अनोखा संकल्प केला की गजानन विजय ग्रंथ शेगांव येथून घ्यायचा आणि परिचितांकडे जाऊन त्यांच्या घरी त्याचं पारायण करायचं आणि तो ग्रंथ त्यांना भेट द्यायचा. त्यांनी दादर, कल्याण, डोंबिवली या भागात बऱ्याच पोथ्या वाटल्या आणि अनेकांना तोंड भरून गजानन महाराजांची महती सांगितली आणि गजानन महाराजांना प्रत्येक वेळी प्रार्थना केली की महाराज तुमची किमया यांना कळू द्या अनेकांना कळू द्या आणि या सर्वांवर तुमची कृपादृष्टी असूद्या. वडिलांच्या या प्रार्थनेकडे पाहून मला नेहमी वाटायचं की अशा सर्व भक्तांनीच त्यांच्या दैवताची महती सर्वत्र पसरविण्यात दैवताच्या आशीर्वादानेच मुंगीचा वाटा उचललाआहे.

आजच्या घटकेला शेगांव जगप्रसिद्ध आहे. पण अगदी वडिलांच्या पद्धतीने जरी नाही तरी विजय ग्रंथ वाटण्याचे कार्य त्यांची सून आजही करते आहे. आम्ही वर्षातून किमान दोनदा शेगांव दर्शनाला जातो, तेव्हा गजानन विजय ग्रंथाच्या काही प्रति आणायला चुकत नाही. असो, मी बरा झालो,मरणाच्या दारातून परत आलो. अशक्तपणा आला होता आणि वार्षिक परीक्षेची वेळ आली. मी शाळेत हुशार विद्यार्थी म्हणून ओळखला जायचो, नेहमी वरच्या नंबरनी पास व्हायचो, माझी प्रकृती पाहून काही शिक्षक म्हणाले याला आपण परीक्षेशिवाय वरच्या वर्गात जाऊ देऊ कारण वार्षिक परीक्षा तशीही झाली आहे. तसं सहामाही परीक्षेत मी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालो होतो पण आता शाळेत माझ्याविषयी चर्चा सुरू झाली आणि माझी मानसिक स्थिती विचित्र होऊन गेली. पण आता मला गजानन महाराज माहिती झाले होते मी त्यांना प्रार्थना केली की तुम्ही मला गंभीर आजारातून बाहेर काढले. आता परीक्षेविषयी मुख्याध्यापकांना योग्य निर्णय घेण्याची बुद्धी द्या. नंतर शाळेनी वडिलांना सांगितलं की आम्ही स्वतंत्रपणे त्याची एकट्याची पूर्ण विषयाची परीक्षा घेऊ. त्याला अभ्यास करायला सांगा, त्याची तयारी करून घ्या. मग मला परीक्षेची पूर्ण तयारी करावी लागली, माझी एकट्याची नव्याने परीक्षा झाली आणि रिझल्ट जाहीर झाला. मी शाळेतील चारही वर्गांमधून सर्वाधिक गुण घेऊन पहिला आलो होतो. गजानन महाराजांनी माझ्याकडून थोडी जास्त मेहनत करून घेतली पण त्याचं फळही पदरात घातलं आणि माझ्या यशाला अधिक उजाळा दिला.

आज या गोष्टीला पन्नास वर्षे होऊन गेली, त्या बाबु गुरुजींच्या माध्यमातून मी गजानन महाराजांकडे ओढल्या गेलो. आजही नियमानी गजानन विजय ग्रंथ पारायण करीत असतो. एकोणीसाव्या अध्यायात महाराज म्हणतात कैवल्याच्या मार्गावर भाविकांना आणण्याचं काम ईश्वरी योजनेतून होत असतं आणि महाराज असंही म्हणतात, ज्याची निष्ठा बसेल । वा जो माझा असेल । त्याचच कार्य होईल । इतरांची ना जरूर मला ॥ हे वाचलं की महाराजांना एकच प्रार्थना करावीशी वाटते, की त्यांनी मला आपलं समजावं,भक्तीच्या या मार्गावर मला सतत मार्गदर्शन करीत रहावं,आणि त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालता चालता मुखातून एकच जप होत रहावा. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. सुधाकर नरगुंदकर, नाशिक. – ९४२३१४२८५२.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! गजानन महाराजांच्या संपर्कात एखादी व्यक्ती आली की पर्यायानी त्या व्यक्तीचा संबंध गजानन विजय ग्रंथाशी येतोच. माझा अगदी लहानपणी म्हणजे मी पाचव्या वर्गात असतानाच गजानन विजय ग्रंथाशी संबंध आला. मी पाचव्या वर्गात असतानाच माझे वडील देवाघरी गेले. आई निरक्षर होती, कधी शाळेत गेली नाही. तिला मी त्या वेळेपासून रोज गजानन महाराजांच्या पोथीतील एक अध्याय वाचून दाखवित होते. गजानन विजय च्या सातव्या अध्यायात दासगणू महाराज एका ठिकाणी म्हणतात, जे मुळात असती शहाणे। त्यांना शाळा नको की॥ ही ओळ माझ्या आईला तंतोतंत लागू होत होती. वडील गेल्यावर मानसिक शांतीसाठी तिनी गजानन विजय ग्रंथाचा आधार घेतला आणि त्याच वेळी मला त्या पवित्र ग्रंथाच्या संपर्कात आणून गजानन महाराजांचा परिचय करून दिला. माझी गजानन महाराजांशी त्या काळात जी ओळख झाली ती पुढे आयुष्यभर कायम टिकली, नव्हे पदोपदी गजानन महाराजांनी माझ्यासाठी धाव घेतली.

पुढे लग्नानंतर माझं पारायण तेवढं नियमितपणे होत नव्हतं पण गुरूवारचा उपास आणि गजानन महाराजांची नित्य भक्ती नियमानी सुरू होती. माझे मिस्टर मात्र उपवास, जप, तप, अर्चना, यापासून दूर होते, ते मला म्हणायचे तू करते आहेस नं? आहेत नं तुझे गजानन महाराज, मग झालं तर! तुझं पुण्य मला कामात येईलच. माझं पुण्य कामात आलं की अन्य काही, ते मला माहिति नाही पण त्या दिवशी भक्तांचे कनवाळू गजानन महाराज माझ्या सौभाग्याच्या रक्षणासाठी धावून आले हा माझा दृढ विश्वास आहे. ती एक ह्रदयाचा थरकाप उडविणारीच घटना होती साधारण १९८४-८५ सालची गोष्ट, माझे पती श्री. विजय कुलकर्णी हे एन. आर. सी. कंपनीत अंबिवली येथे इलेक्ट्रीशियन म्हणून काम करीत होते. मुंबईच्या लोकांना लोकलची धावपळ हा नित्याचाच भाग. सकाळी ७.०५ ची लोकल कामावर जायला आणि परत यायला संध्याकाळी ४.४८ ची टिटवाळा लोकल हा यांचा नित्यक्रमच होता. एकदा कामावरून परत येत असताना संध्याकाळची लोकल त्यांनी पकडली, पण काही कळायच्या आत त्यांचा हात दारात असलेल्या दांड्यावरून घसरला, पडता पडता त्यांच्या हातात दारात जी पट्टी असते ती आली एक आधार म्हणून त्यांनी ती घट्ट पकडली आणि त्याच वेळी गाडी सुरू झाली, एकीकडे गाडी वेग पकडू लागली, आता हे फलाटावर आडवे झाले होते,हे घसरत समोर जाऊ लागले आणि त्यांचे दोन्ही पाय लोकल व फलाट यांच्या मधे जाऊ लागले, जीवाच्या आकांतानी ते पाय वाचविण्याचा प्रयत्न करू लागले, तेव्हा फलाटावर काही बांधकामासाठी आणलेली थोडीफार खडी होती आणि बाजूला एक बऱ्यापैकी मोठा दगड पडला होता. काही क्षणांचंच ते दृश्य, बघणाऱ्यांच्या लक्षात आलं की हा माणूस आता गेला. वाचणं अशक्य आहे. त्या काही क्षणातच यांच्या डोक्यात विचार चमकून गेला की आता हे पाय वाचणं अशक्य आहे आणि दोन्ही पायाशिवाय जीवन म्हणजे सर्वांवर भार या शिवाय अन्य काय? त्यापेक्षा नको ते जीवन. जे व्हायचं ते होऊ द्या या विचारानी त्यांनी गाडीला धरलेले दोन्ही हात काढून घेतले, आणि निमिषार्धात काय चमत्कार झाला माहिती नाही जो दगड होता त्या दगडावर ते आपटले व ऊठून ऊभे राहिले आणि तिकडे गाडीने स्टेशन सोडले. फलाटावर दोन मित्र होते, त्यांनी यांना धरले व बाकावर बसविले. कॅन्टीनवाल्यानी चहा दिला. तो वार होता गुरूवार!

मित्र यांना घरी घेऊन आले, म्हणाले, वहिनी काळ आला होता पण वेळ आली नव्हती, ते सर्व ऐकून मी हबकलेच, गजानन महाराजांना मनोमन नमस्कार केला आणि माझ्या माहितीप्रमाणे तेव्हा कल्याणात महाराजांचं मंदिर नव्हतं म्हणून मग मी घरीच फोटो समोर पाच पेढ्यांचा नैवेद्य दाखविला आणि आमचे फॅमिली डॉक्टर श्री. अरूण जोशी यांना थोडक्यात हकीकत सांगून संध्याकाळची भेट निश्चित केली. ह्यांना दवाखान्यात घेऊन गेले, डॉक्टरांच्या पुढ्यात एक अनोळखी माणूस बसला होता. आम्हाला बघताच डॉक्टरांनी आत बोलावले व म्हणाले, ऐका काय सांगतोय ते, त्या माणसाने प्रत्यक्ष अपघात पाहिला होता आणि त्याचंच वृत्तकथन करीत होता. शेवटी एवढेच म्हणाला, बिचाऱ्याचं हाड सुध्दा मिळालं की नाही माहीत नाही? घरी मुलं बाळं किती? कसं होईल त्यांचं? काय आपत्ती आहे बघा असं म्हणून तो रडायला लागला. मी त्यांना विचारलं, दादा हा अपघात कधी? कुठे व केव्हा झाला? त्यावर तो म्हणाला, आजच! ४.४८ ची टिटवाळा लोकल होती. अंबिवली स्टेशन वर! माझ्या अंगावर सर्रकन काटा आला. त्यांना शांत करून म्हटलं काही काळजी करू नका, अपघात झालेली व्यक्ती त्याच्या पत्नीबरोबर तुमच्यासमोर उभी आहे. तो माणूस अवाक् होऊन पहात राहीला.

दुसऱ्या दिवशी मी जिथे बालवाडी शिक्षिका म्हणून काम करीत होते, त्या छत्रपती शिक्षण मंडळात सुटीचा अर्ज देण्यासाठी गेले. तिथे आमचे मा. चिटणीस श्री. टोकेकर सर बसले होते. त्यांचं रहाणं अंबिवली इथेच होतं आणि ते ४.४८ च्या लोकलनेच कल्याणला येत असत. त्यांनीही आदल्या दिवशीचा अपघात पाहिला होता आणि ते अपघाताचं वर्णन करीत होते, त्यांचं सांगणं पूर्ण होताच मी म्हटलं सर, ते माझे मिस्टर होते. हे ऐकताच ते ताडकन उभे झाले. एवढा मोठा अपघात होऊन सुद्धा फारशी इजा न होता हे वाचले कसे ही सर्वांनाच अचंबित करणारी गोष्ट होती. अजून आश्चर्य म्हणजे २-३ दिवसानंतर एका अनोळखी माणसाने यांचा पेन, रुमाल, पैशाचं पाकीट, किल्ली व बिल्ला, बॅग, डबा, चष्मा. सर्व सामान घरी आणून दिलं.

दोन दिवसांनी शांतपणे यांना विचारलं, हे कसं झालं? ते म्हणाले, एका दगडावर आपटलो पण कसा उभा राहिलो कळलच नाही. पण खरं सांगू? माझा विश्वास आहे, मी म्हणायचो न तुला, तुझं पुण्य माझ्या कामात येईल. बस तुझ्या गुरूवारमुळे आणि गजानन महाराजांमुळे मी वाचलो. त्यांच्या त्या वाक्यानी मला थोडं भूतकाळात नेलं. मी लहानपणी पोथीतील ओव्या वाचायची.

बांधीत असता मंदीर। काम करीत शिखरावर। एक होता मजूर। हाताखाली गवंड्याच्या॥ तो धोंडा देता मिस्तरीला। एका एकी झोक गेला। तीस फुटांवरुन पडला। खाली घडीव दगडावर॥ तो पडता लोकांनी पाहीला। जन म्हणती मेला मेला। उंचावरून खाली पडला। आता कशाचा वाचे तो॥ परी घडले अघटित। कोठेही न लागले त्याप्रत।

हे सर्व वाचून मी आईला म्हणायचे, आई किती विलक्षण आहे नं हे सर्व? त्यावर आई माझ्या डोक्यावरून हात फिरवून म्हणायची, बाळा अगं गजानन महाराजांची सर्व लीलाच विलक्षण आहे. त्यांची भक्ती कर, तुझं भलं होईल! आज आईचा तो आशीर्वाद माझ्या मदतीला धावून आला होता आणि अंतर्मनातून एक नाद उमटत

होता. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. विद्या विजय कुलकर्णी, कल्याण. – ९८३३७२५४६५.

शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! चांगल्या गोष्टीचा संकल्प करून, संकल्परत राहणारी माणसं, त्यांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींचं काही ना काही भलं करतात, असा माझा अनुभव आहे. कारण सद्विचारांच्या लहरी आजूबाजूचं वातावरण चांगलं करण्यात निश्चितपणे हातभार लावतात. फार पूर्वी आमच्या शेजारी श्रीमती काणे रहायच्या, त्या नर्स होत्या, आम्ही त्यांना नर्सकाकू म्हणत असू. त्यांचा एक संकल्प होता. आगळा वेगळा संकल्प! एक डिलिव्हरी झाली की एक गजानन विजय ग्रंथ दान करायचा. त्यांच्या या उपक्रमात एकदा माझा नंबर लागला आणि त्यांनी मला गजानन महाराजांची पोथी देऊन सांगितलं की रोज या पोथीतील एक अध्याय वाचत जा आणि नाहीच जमलं तर निदान एक पान तरी वाचण्याचं ठरव, मग बघ गजानन महाराज तुझ्याकडे लक्ष ठेवतील. ते ऐकून मी पोथी स्वीकारली आणि ठेवून दिली. असं म्हणतात की प्रत्येक गोष्टीचा योग यावा लागतो. माझा पोथी वाचण्याचा योग तेव्हा आला. जेव्हा माझ्या दोन्ही मुली, एक अडीच वर्षाची आणि दुसरी सात वर्षाची, एकाच वेळी आजारी पडल्या. डॉक्टरी उपाय चालू होते, पण दोघींचा एकत्र आजार पाहून मनाला जाणीव झाली की, अरे आपल्याकडे गजानन विजय पोथी आहे आणि योग पहा कसा असतो? एकीकडे पोथी आठवली आणि दुसरीकडे माझे वडील शेगांवला गेले होते, ते ध्यानीमनी नसताना माझ्यासाठी महाराजांचा फोटो घेऊन आले आणि मग त्या फोटोच्या साक्षीने बाजूला पडलेल्या त्या पोथीची १०८ पारायणं होऊनच पुढील नोंदी थांबल्या पण पारायणं मात्र पुढेही सुरूच राहिलीत.

आता माझं वाचन नियमानी सुरू झालं होतं आणि एक दिवस वेळ आली, नर्स काकूंनी दिलेल्या शब्दांच्या कसोटीची! त्या दिवशी माझे मिस्टर ऑफिसातून घरी आले आणि त्यांना अस्वस्थ वाटू लागलं, सारखं म्हणायला लागले, मला कसतरीच होतंय आणि थोड्याच वेळात त्यांना भडभडून रक्ताची उलटी झाली आणि क्षणभर माझ्या पायाखालची जमीनच सरकली. काय करावे असा मोठा प्रश्न समोर उभा. घरात दोन लहान मुली आणि वृध्द सासरे. आता आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे? मन चिंती ते वैरी न चिंती, नाही नाही ते विचार सर्रकन डोक्यात चमकून गेले आणि नजर गेली महाराजांच्या फोटोवर आणि माझ्या नकळत माझ्या तोंडून वाक्य बाहेर पडलं, हे गजानन महाराजा, हे या परिस्थितीतून सहीसलामत बाहेर पडले तर आम्ही शेगांवला तुमच्या दर्शनाला येऊ !

आमचे फॅमिली डॉक्टर आले, त्यांनी यांना पूर्ण तपासलं, काही औषधं देऊन सोबत एक चिठ्ठी देऊन त्यांनी सांगितलं, या काही तपासण्या आहेत त्या करून घ्या, बाकी रिपोर्ट पाहून नंतर सांगतो! तपासण्या झाल्या, पुढील दोन दिवस प्रचंड मानसिक दडपणात गेले. काय निघतंय अन् काय नाही? त्या दिवशी सहजपणे निघालेलं शेगांव दर्शनाचं आता या काळात मात्र जाणीवपूर्वक, तळमळीने प्रार्थना करून महाराजांना म्हणत होते आणि तिसऱ्या दिवशी रिपोर्ट्स आलेत. पूर्ण नॉर्मल! डॉक्टरांनी एकच शक्यता व्यक्त केली, सदोष आहारातून झालेली अ□सिडीटी. असं लक्षात आलं की हे गुळांबा खाऊन त्यावर ताक प्यायले होते आणि गुळ आणि ताक एकत्र तब्येतीला घातक ठरू शकतं. डॉक्टरांनी पुढे दक्षता घ्यायला सांगितलं आणि आमच्यावर आलेलं एक संकट टळलं.

शेगांवला दर्शनासाठी जाण्याची जबाबदारी आता आमची होती. आम्ही दुसऱ्याच दिवशी निघण्याचा निर्णय घेतला. तो काळ वेगळा होता. आम्ही दोन कपडे पिशवीत भरले, गरजेपुरते पैसे घेतले आणि आमची प्रवासाची तयारी पूर्ण झाली. गाडी व्ही. टी. स्टेशनवरून सुटणार होती व्ही. टी. च्या दिशेने जाणाऱ्या लोकलसाठी घरातून बाहेर पडलो. हे दारात पूर्ण तयार आणि मी महाराजांच्या फोटो समोर हात जोडून उभी. ह्यांनी विचारलं, अगं चल लौकर, काय सांगतेय आता महाराजांना? मी हासून म्हटलं, आम्ही शेगांवला येतो आहोत, आमच्यावर लक्ष असू द्या आणि प्रवासात आमची काळजी घ्या.

लोकल नेहमीप्रमाणे लेट झाल्यामुळे व्ही. टी. ला पोहोचताना आमची बरीच तारांबळ उडाली. धावत पळत पोहोचलो तर तिकीटासाठी ही मोठी लाईन. गाडी सुटायची वेळ जवळ येत होती. आम्ही बरेच मागे लाईनीत उभे झालो. तिथे थोडी स्थिरावल्यावर मी गजानन महाराजांना डोळे मिटून प्रार्थनापूर्वक विचारलं, आम्हाला तिकीट मिळेल नं? दर्शनाचा योग आहे नं? आणि अचानक समोरून एक माणूस आमच्या दिशेने चालत आला. त्यानी मला विचारलं ताई कुठे जायचं आहे? मी म्हटलं शेगांवला. अहो मी पण शेगांवलाच निघालो आहे आणि माझा नंबर आलाच आहे, द्या पैसे, मी तिकिट आणून देतो. मी पैसे दिल्यावर काहीच मिनीटात शेगांवचे तिकीट आमच्या हातात होते.

आता आमचा मोर्चा घाईघाईने गाडीकडे वळला, कसा बसा गाडीत प्रवेश झाला. एका गुजराथी कुटुंबाने पूर्ण कम्पार्टमेन्ट व्यापून टाकलं होतं. कसंतरी जेमतेम बूड टेकवायला जागा मिळाली. काही वेळ झाला आणि माझ्या मनात विचार आला, पूर्ण शेगांवपर्यंत असा प्रवास? मग लगेच स्वतःला सावरलं, असो जे होईल ते होऊ द्या, महाराजांची इच्छा. दोनच मिनिटे मधे गेलीत आणि गप्पांच्या ओघात एकानी मला प्रश्न केला कुठे जाणार? मी म्हटलं शेगांव. त्यावर तो पुटपुटला अरे तुम्हाला बरेच अंतर जायचं आहे असं करा भाऊ इथे बसतील तुम्ही समोर बसा! त्यानंतर त्या प्रवासात ना शरीर थकलं ना मन. शेगांव आलं कळलंच नाही.

आम्ही शेगांवला उतरलो तर एक सायकल रिक्षावाला समोर दत्त म्हणून उभा झाला. तो म्हणाला, हे बघा इथे फुकट बस सेवा आहे, पण तुम्हाला मात्र माझ्याच सायकल रिक्षातून यायचे जायचे आहे. एखाद्या ज्येष्ठाने सल्ला द्यावा तसा त्याचा सूर होता. आम्ही मुकाटपणे त्याच्यामागून चालू लागलो. त्यानी आम्हाला सांगितलं, हे बघा परतीचा रिझर्वेशनचा फॉर्म भरून ठेवा, जाताना उपयोगी पडेल. आम्ही ठीक आहे म्हणून फॉर्म भरला, मात्र सोबत एकही पैसा न देता केवळ फॉर्म देऊन आम्ही मंदिराकडे निघालो. एका हॉटेलपाशी त्यानी रिक्षा थांबवली, म्हणाला, मी संध्याकाळी येतो, त्याला पैसे विचारले तर म्हणाला संध्याकाळी पाहू.

आमचं दर्शन खूपच छानपणे पार पडलं, अगदी पोथी वाचन, प्रसाद ग्रहण सर्व काही सुरळीत,माझा नवस पूर्ण झाला होता आणि मनात आनंदाच्या उर्मी दाटून येत होत्या. या आधी कधीही न मिळालेला आनंद अनुभवास येत होता. संध्याकाळी तो रिक्षावाला वेळेत पुन्हा हजर झाला. त्यानी स्टेशनवर सोडलं, पैसे विचारल्यावर म्हणाला तुम्हाला जे द्यायचे ते द्या. तो तृप्त होता, समाधानी होता!तो निघून गेला. आम्ही दोन साधी तिकिटं घेऊन स्टेशनवर प्रवेश केला आणि जनरल बोगीच्या जागेवर उभे झालो. गाडीची वेळ झालीच होती, इतक्यात परचुरे कुठे आहेत? असा आवाज आला. तो टि. सी चा आवाज होता. मी पुढे होऊन म्हटले मी आहे रजनी परचुरे, टि. सी. म्हणाला, हे घ्या तुमचं रिझर्वेशन. मी म्हटलं अहो आम्ही साधी तिकिटं काढली आहेत, त्यावर म्हणे ती मला द्या आणि मधला फरक जो आहे तेवढे पैसे द्या. मी

बघीन काय करायचं ते. असं म्हणत तो दूर निघून गेला आणि गाडीनी स्टेशनात प्रवेश केला. माझ्या मनात जन्मभर सोबत करणारे काही प्रश्न निर्माण झाले, तो तिकीट काढून देणारा कोण? गाडीतील सहप्रवाश्यांना आम्हाला जागा देण्याची बुद्धी देणारा कोण? तो रिक्षावाला कोण? पैसे दिलेले नसतानाही आम्हाला शोधत तिकीट देण्यासाठी टि. सी. कसा आला? आणि या प्रश्नांच्या सोबतीनेच आमचा परतीचा प्रवास सुरु झाला. अनपेक्षितरित्या अगदी आरामात.

आम्ही घरी पोहोचलो, मी सर्वप्रथम महाराजांच्या फोटो समोर उभी झाले. माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू ओघळू लागले. महाराजांना विनंती केल्या- प्रमाणे त्यांनी प्रवासात खरंच आमची काळजी घेतली होती. निघताना मी एकटीच फोटोसमोर होते. आता मात्र मिस्टरही माझ्यामागे येऊन उभे झाले होते. त्यांनी मला हातानी हलवून म्हटलं, अगं तुझी प्रार्थना त्यांनी ऐकली त्यांना म्हण, जेथे जातो तेथे तू माझा सांगाती, चालविशी हाती धरूनिया, मग आम्ही दोघांनी मिळून ती ओळ पुन्हा म्हटली. मग मी यांना म्हटले, आता येवढे तुम्ही नमस्कारासाठी आलाच आहात, तर मी उदबत्ती लावते आणि आपण थोडावेळ जप करूनच घेऊ मी उदबत्ती लावली आणि आमचा एका सुरात जप सुरू झाला. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. रजनी श्रीकांत परचुरे, डोंबिवली - ९७६९९४५०७३.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! आज एक्कावन्न वर्ष होतील, मी गजानन विजय ग्रंथाचे नियमित पारायण करतो आहे, पण मला आजही मी केलेलं पहिलं पारायण, जे जवळ जवळ पूर्ण दिवस चाललं होतं ते आठवतंय. मला लहानपणापासून परमेश्वर कृपेने एका अध्यात्मिक वातावरणात वावरण्याचं. सौभाग्य प्राप्त झालं. श्री क्षेत्र कौंडिण्यपूर पासून केवळ एक कि. मी. अंतरावर असलेल्या, वर्धा जिल्ह्यातील आर्वी तहसिलीत राजापूर या गावी माझा जन्म झाला. घराच्या आवारातच एक चारशे वर्षांपूर्वीचे नारायणाचे प्राचीन मंदिर आहे. तिथे सकाळ संध्याकाळ गजानन महाराजांची आरती होत असे. आई वडिलांसह आम्ही सर्व भावंड तिथे हजर असायचो. एके दिवशी वडिल तिथे बराच वेळ पोथी वाचत बसलेले पाहून मी त्यांना हे काय? असं विचारलं. त्यावर ते म्हणाले, बेटा आज गुरूपुष्यामृत योग आहे म्हणून मी गजानन विजय पोथी वाचत होतो. ते ऐकून माझ्याबालमनाने वडिलांजवळ हट्ट केला की मी देखील पोथी वाचणार. मला पुढील गुरुवारी पोथी वाचण्याची अनुमती मिळाली. तेव्हा मी फक्त अकरा वर्षांचा होतो. त्या गुरूवारी मी सकाळीच स्नान पूजा करून पोथी वाचण्यास प्रारंभ केला. रात्रीचे नऊ वाजले तेव्हा माझा एकोणीसावा अध्याय सुरु होता. वडील म्हणाले, आण बेटा, मी आता पुढील अध्याय वाचून घेतो,पण मी निग्रहाने पारायण पूर्ण करण्याचे ठरविले, रात्री अकरा वाजता माझे पारायण पूर्ण झाले. त्या दिवशी मी फक्त दोनदा दूध घेतलं होतं. पुढे लहानाचा मोठा झालो आणि नोकरीच्या निमित्ताने नागपूरात स्थायिक झालो. गजानन महाराजांच्या कृपेने मला सहकारनगर भागात गजानन महाराज मंदिराच्या बाजूला एक प्लॅाट विकत घेता आला. अर्थातच मंदिराचं सान्निध्य इथेही प्राप्त झालं. पुढे कुटुंबाचा विस्तार होत गेला, नातेसंबंध वाढत गेले. महाराजांच्या कृपेने बरीच सात्विक प्रवृत्तीची माणसं जोडल्या गेल त्यापैकी एक बावनवीर नामक खेडेगावात राहणारे गृहस्थ होते. ते भविष्याविषयी बोलायचे. त्यांनी एकदा मला म्हटलं तुमच्यावर सद्गुरूंची कृपा आहे. तुम्ही शक्यतो शनिवारी मारुतीला थोडं तेल अर्पण करा, अर्थात सद्गुरू हे पूर्णत्वास नेतील, त्यांच्याच कृपेने मारूतीरायाही प्रसन्न राहील. त्याप्रमाणे मी काही शनिवार हे केलं आणि नंतर काही कारणानी राहून गेलं. नित्याप्रमाणे माझं पारायण आणि महाराजांचं दर्शन हा क्रम सुरू राहीला. मला आठवतं १९८७ ची ही गोष्ट आहे. मी दुसऱ्यांदा बाप होणार होतो, आधी मुलगी होती आणि आता काय होणार? याची वेळ जवळ आली होती. नेमकं सांगायचं तर १४-०४-१९८७ ही ती तारीख. तेव्हा फोनची संख्या अगदीच अल्प होती. प्रत्यक्ष भेटून एखादी गोष्ट कळवण्याचा तो काळ होता.

त्या दिवशी सकाळीच सौ. ला अंकुर मॅटर्निटी होम इथे अ□डमिट केलं, डॉक्टर म्हणाल्या, वाट पाहू आवश्यक वाटलं तर सिझेरियन करावं लागेल. पाहू या काय करायचं ते आणि मी घरी आलो. तेव्हा वडील घरी होते, सकाळी साडेअकरा पावणेबाराची वेळ असेल वडील जेवायला बसत होते, त्यांनी घास हातात घेतला आणि दाराशी कुणीतरी आवाज दिला. मी डोकावून पाहिलं तर एक साठीचा माणूस, पांढरा बंगाली शर्ट, धोतर, थोडी वाढलेली पांढरी दाढी, असा दाराशी उभा दिसला. वडील म्हणाले, जा त्याला पोळी भाजी नेऊन दे. त्या प्रमाणे मी दाराशी गेलो, तेव्हा म्हणाला, मला पोळी भाजी नको, मी आत आलो,वडील म्हणाले अरे त्याला धान्य पैसा हवा असेल, मग मी एका भांड्यात तांदूळ आणि काही पैसे घेऊन गेलो, तेव्हा म्हणाला मला हे नको. मी पुन्हा आत आलो, वडील म्हणाले, अरे त्यांना विचार तरी नेमकं काय हवं आहे. बाहेर येऊन विचारलं, तर म्हणाला, बेटा माझ्या भांड्यात थोडं तेल दे! मी छोट्या वाटीभर तेल त्याच्या भांड्यात टाकलं आणि आत आलो. पाहतो तो वडील घास तसाच धरून महाराजांच्या फोटो समोर उभे होते, त्यांचे डोळे भरून आले होते. मी ताबडतोब बाहेर आलो. आमच्या घरासमोर तीन बाजूला तीन सरळ रस्ते जातात, बराच मोठा भाग एक दृष्टिक्षेपात नजरेत येतो तो माणूस कुठेच नव्हता. मग माझेही डोळे भरून आले, मी आत आलो आणि माझ्या डोक्यात एकदम जाणीव झाली की अरे आज तर हनुमान जयंती. मग मी तडक दवाखाना गाठला, डॉक्टरांनी हासून स्वागत केलं म्हणाले, अभिनंदन! थोडे कॉम्पलिकेशन्स झाले होते, मूल नाजूक स्थितीत होतं पण आता नॉर्मल आहे. तुम्हाला पुत्ररत्न प्राप्त झालं आहे! मला क्षणात आठवण झाली त्या वाक्याची, कार्य सद्गुरू पूर्णत्वास नेतील. मारुतीराया कृपा करील, माझ्या समजुतीप्रमाणे ती सद्गुरूंची कृपा आणि मुहूर्त देखील हनुमान जयंतीचा! व्वा! मी मनातल्या मनात हनुमंताचे आभार मानले आणि गजानन महाराजांना एकवीस पारायणं कबूल केलीत.

त्यानंतर महाराजांच्या कृपेने मी अनेक वेळा अशी पारायणं केलीत. पण मला आजही आठवतंय ती १९९८-९९ ची घटना. मी रोज एक अध्याय अशी एकवीस पारायणं केलीत आणि प्रत्येक वेळी नात्यातील एक कुटुंब प्रसादासाठी बोलवत गेलो, जेव्हा पारायणं पूर्ण झाली तेव्हा एक विचार मनात आला की आपण या लोकांना शेगांव दर्शनाला नेलं तर? पण तो विचार मला सोडून द्यावा लागला कारण माझ्या आर्थिक परिस्थितीमुळे मला ते शक्य नव्हतं. मग काय महाराजांना रोज म्हणायचं आणि स्वस्थ बसायचं. एकदा रात्री खूप रडायला आलं पोथीत नेहमीच वाचत आलो, हा ग्रंथ केवळ चिंतामणी । चिंतिले फळ देईल जाणी । दृढतर विश्वास असल्या मनी । हे मात्र विसरू नका ॥ म्हटलं महाराज माझा दृढ विश्वास आहेच, तुम्ही समर्थ आहात. तुमची लीला अगाध आहे. जशी तुमची इच्छा तसं होऊ द्या. अशात इ. स २००० उजाडलं आणि एक दिवस आर्वीहून मोठ्या भावाचा फोन आला. विजय तुझ्या पुतणीचं लग्न ठरलं आहे, मुलगा जळगावचा आहे. लग्न सतरा फेब्रुवारीला आहे. पण त्या लोकांचा आग्रह आहे की लग्न खामगावला व्हावं. सर्व नातेवाईकांना आमंत्रण करतोच आहे. फोन ठेवला आणि मनात विचार आला. एक पार्टी आर्वी. दुसरी जळगाव आणि लग्न खामगाव? शेगांवच्या जवळ? वारे महाराजांची लीला! आणि त्यात भर म्हणजे जे नातेवाईक मला अपेक्षित होते त्यांनीच प्रस्ताव ठेवला. आपण तीन गाड्या करून खामगावला जाऊ आणि अनायसेच प्रकट दिन आहे तेव्हा शेगांवला दर्शनासाठी जाऊ. महाराजांची अगाध लीला आणि माझी इच्छा पूर्ण!

ठरल्याप्रमाणे खामगाव इथे लग्न उरकून आम्ही शेगांवला पोहोचलो. प्रकट दिनामुळे तिथे प्रचंड गर्दी होती,तरीही आमचं दर्शन मात्र व्यवस्थित झालं आणि आम्ही बाहेर महाद्वाराशी आलो. प्रवेश द्वाराशी आम्ही एकत्र होतो तशात पालखी निघाली ,हत्ती, घोडे, भक्तगणांची मांदियाळी,आणि त्या गर्दीत आमचा एक ड्रायव्हर आणि गाडी सहजासहजी दिसेना, म्हणून थोडं उंच व्हावं या उद्देशानी तिथे जवळच असलेल्या झाडाच्या बुंध्याशी जाऊन, टाचा उंचावून मी पाहू लागलो आणि मला जाणवलं की कुणीतरी स्पर्श करून मला खुणावतंय, पहिले डोक्याला नंतर पाठीला स्पर्श जाणवला आणि कानावर आवाज आला 'आला सर्वांना घेऊन शेगांवला'? झाली तुझी इच्छा पूर्ण? मी चमकून मागे पाहिलं, मागे कुणीच नव्हतं. मला दिसला एक तांबडा केशरी प्रकाश, त्या प्रकाशात मला बाकी काहीच दिसलं नाही. माझ्याही नकळत माझे हात नमस्कारासाठी जुळले आणि मुखातून शब्द बाहेर पडले, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. विजय देशमुख, नागपूर - ९९७०७५३९०२.

शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## १८ - तो साधू नव्हता वेषधारी - श्री. रामभाऊ थाटे, शिवणखुर्द, मूर्तिजापूर.

जय गजानन! माणसाच्या आयुष्यात परिवर्तनाचा योग असला की अशा काही घटना घडतात की ज्या आपले आयुष्य एका वेगळ्या मार्गावर आणून सोडतात, आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसाला हे तेव्हा लक्षात येत नाही पण पुढे जाऊन थोडा मागील गोष्टींचा विचार केला की घटनाक्रम उलगडीत जाऊन थोडाफार बोध होतो. माझ्याही आयुष्यात असंच काहीसं झालं. मी रामभाऊ थाटे. इ. स १९६५ च्या सुमारास पंचायत समिती, मुर्तिजापूर अंतर्गत शिवणखुर्द या गावी शिक्षक म्हणून लागलो. इ. स ६७-६८ मधे मला ट्रेनिंगच्या निमित्ताने बुलडाणा इथे जावं लागलं आणि ट्रेनिंग पूर्ण झाल्यावर १९६९-७० मधे एक वर्षासाठी पं. स. रिसोड मधील मोठेगाव येथील शाळेत सहशिक्षक म्हणून कार्य करावं लागलं.

त्या काळात मी नित्यनियमाने रोज गजानन विजय ग्रंथाचा एक अध्याय वाचीत असे आणि दर एकवीस दिवसानी पारायण पूर्ण झालं की देवासमोर एक नारळ फोडीत असे. गजानन महाराज माझं दैवत आणि जे काही होतं ते त्यांच्याच इच्छेने, त्यांच्या योजनेनुसार! ही माझी प्रामाणिक भावना. आज मी तुम्हाला जो अनुभव सांगू इच्छितो, तो म्हणजे गजानन महाराजांनी एका साधूच्या रुपाने किंवा त्याच्या माध्यमातून माझ्यावर केलेली कृपा. त्याची ही कथा आहे.

गजानन विजय मधे दासगणू महाराजांनी साधूचं वर्णन करताना म्हटलं आहे, परी तो साधु पाहिजे । साधु असल्या वेषधारी । ऐसी न होय गोष्ट खरी । माती न होय कस्तुरी । हे ध्यानी असू द्या । षड्विकार धुतल्याविना । अंगी साधुत्व येईना । आणि साधुविण होईना । अघटित कृत्य केव्हाही ॥ पोथीचे वाचक हे वर्णन नेहमीच वाचतात, मीही वाचायचो पण असा साधू आपल्या संपर्कात कधी येईल हे स्वप्नातही वाटलं नव्हतं.

जेव्हा मला मोठेगाव इथे जावं लागलं, तेव्हा मी फारसा उत्सुक नव्हतो, पण मी मनाला समजावलं की हे सगळं महाराजांच्या इच्छेने घडत आहे. मी रुजू झालो. गाव आणि शाळा यात एक ते दीड कि. मी. अंतर होतं आणि वाटेत मधोमध एक महादेवाचं अति पुरातन हेमाडपंथी मंदिर होतं. आम्ही पाच सहा शिक्षक त्याच रस्त्याने शाळेत जाणं येणं करायचो. एक दिवस अचानक आम्हाला त्या मंदिरात एक साधू महाराज बसलेले दिसले. साधारण साठीच्या आसपास वय, भगवे कपडे, केस वाढलेले, दाढी वाढलेली, बाजूला कोपऱ्यात एक चटई, पाण्यासाठी मातीचं मडकं, एक कंदील आणि पाटी पेन्सिल. असं लक्षात आलं की ते मौनात आहेत. काहीही बोलत नाही, कुणी विचारलंच तर आपलं म्हणणं पाटी पेन्सिलच्या सहाय्याने व्यक्त करतात.

आम्ही त्यांची आस्थेनी चौकशी केली, मी त्यांना जेवणा विषयी विचारलं. पुढे शाळेत जाता येता मंदिरात जाऊन त्यांचं दर्शन हा आमचा रोजचा क्रम झाला, बहुतेक वेळा त्यांच्यासाठी जेवण नेण्याचं काम मी करु लागलो. माझ्या बाबतीत योग असा झाला की साधारण त्याच सुमारास अध्याय पाचवा येऊन पिंपळगावच्या शंकराच्या मंदिराचा संदर्भ आला होता. त्यामुळे माझी त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी जरा आदराची होती आणि आम्हा सर्व मित्रांमधे माझ्याकडे ते विशेष कृपादृष्टीने पाहत होते. ते नेहमी मंदिरातच बसून आपल्या साधनेत निमग्न रहात, भिक्षा मागण्यासाठी कधी बाहेर पडले नाहीत. कुणी दिलं तर उदरभरण. अन्यथा आपल्या जागी स्वस्थ! गरजा कमी,ते एक तपस्वी जीवन होतं.

एक दिवस त्यांनी मला समोर बसण्याची खूण केली, आणि पाटीवर माझ्यासाठी लिहिलं, राम तुझ्यावर संतकृपेचा योग आहे. आता माझा मुक्काम इथून हलणार, तुला काही मागायचं असेल तर या पाटीवर लिहून दे. मी पाटीवर लिहीलं, गजानन महाराजांच्या कृपेने सर्व आहे. मला काही नको! एक दिवस मधे गेला, त्यांनी पुन्हा लिहीलं बेटा माग तुला काही देण्याची इच्छा आहे. मी पुन्हा तेच लिहिलं. गजानन महाराजांच्या कृपेने सर्व आहे. मग दोन दिवसांनी त्यांनी मला पुन्हा समोर बसायला सांगितलं. काही मिनिटं ते डोळे मिटून स्वस्थ बसून होते. त्यांनी करूणायुक्त नजरेनी माझ्याकडे पाहिलं आणि पाटीवर लिहीलं बेटा आता मी इथून मुक्काम हलविण्याची वेळ आली आहे. हे सर्व गजानन महाराजांच्या इच्छेने होत आहे हे समजून, गजानन महाराजांचीच ती इच्छा असं समजून तुला जे हवं ते तू मागून घे पुन्हा अशी वेळ येणार नाही. मग मात्र मी महाराजांचं स्मरण करून पाटीवर लिहीलं, मला पहिला मुलगा व्हावा. त्यांनी लिहीलं तुझी इच्छा पूर्ण होईल, त्या मुलाचं नाव गजानन ठेवशील. मला ते ऐकून आनंद झाला. त्यानंतर त्यांनी पुन्हा लिहीलं अजून काही माग. मग मी लिहिलं पं. स. मुर्तिजापूर इथे मी नोकरीला लागलो. त्याच पंचायत समितीमधे माझी शेवटपर्यंत सेवा व्हावी. त्यावर त्यांनी लिहिलं, तथास्तु, पुढे लिहिलं, श्रावण महिन्यातील गुरूवारी शेगांवच्या वाऱ्या करीत जा आणि दर पौर्णिमेला घरी सत्यनारायणाची पूजा करीत जा. गजानन महाराज तुझी मनोकामना पूर्ण करतील. आमचा संवाद पूर्ण झाला, मी त्या दिवशी शिव मंदिरातून बाहेर पडलो. तो एक प्रचंड उर्जा घेऊन! आयुष्यभर साथ करील अशी एक आठवण माझ्या सोबत होती. काहीच दिवसांनी एक दिवस शाळेला सुट्टी होती पण मी खास त्यांना भेटण्यासाठी म्हणून मंदिरात गेलो, तर मला दिसलं एका कोपऱ्यात, चटई, मडकं, कंदील, आणि पाटी सुध्दा ठेवली आहे. पण त्यांचा मात्र कुठेच पत्ता नाही. फक्त वातावरणात त्यांच्या अस्तित्वाचा भास होत होता. ते कुठेच दिसले नाहीत. त्यानंतर आयुष्यात ते कधीच आढळले नाही, कुणाकडून तसं काही कळलंही नाही.

त्यांची एक भविष्यवाणी तर लगेच खरी ठरली होती. मला तीन मुलं व एक मुलगी आहे, माझ्या मोठ्या मुलाचं नाव गजानन आहे. दुसरी भविष्यवाणी खरी ठरण्यासाठी मला बरीच वर्षे वाट पहावी लागली. कारण तेव्हा माझ्या नोकरीची खूप वर्षे बाकी होती. अनेक वर्ष सेवा झाल्यानंतर एकाच पंचायत समितीत सेवा देऊन मी निवृत्त झालो. निवृत्तीच्या दिवशी मला त्यांची प्रकर्षाने आठवण झाली आणि मनानी आधीच मान्य केलेल्या गोष्टीचा मी पुनरुच्चार केला तो साधू नव्हता वेषधारी, तो वृत्तीनेही साधू होता आणि अगदी माझ्याच पुरतं बोलायचं तर माझं अंतर्मन सांगतं की गजानन महाराजांनीच त्याच्या माध्यमातून मला मार्गदर्शन केलं. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी आयुष्यभर वागलो. आजही वयाची बहात्तर वर्ष पूर्ण झालीत पण श्रावण महिन्यातील गुरूवारी शेगांवच्या वाऱ्या आनंद देताहेत. त्यातही महाराजांनी छान अनुभव गाठीशी बांधून दिले आहेत, पण ते पुढील भागात सांगीन म्हणतो. तोपर्यंत, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. रामभाऊ थाटे, शिवणखुर्द, मूर्तिजापूर - ९७६३९१३१८२.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## १९ - इथे मशी त्राता कोण, गजानना तुज वाचून - श्री. रामभाऊ थाटे , शिवणखुर्द, मूर्तिजापूर.

जय गजानन! अध्यात्मिक वाटचाल करताना, आपल्या उपास्य दैवताची उपासना करताना, वाटेत कुणा जाणकाराची, सत्शील प्रवृत्तीच्या, अधिकारी व्यक्तीची साथ मिळाली तर आपल्या मनातील विश्वास वाढून साधना करण्यात अधिकच समाधान प्राप्त होते. माझ्या नशीबाने मला एका महादेव मंदिरात असाच एक साधू भेटला. तेव्हा मी गजानन महाराजांची गजानन विजय पोथी वाचणे, त्यांचं स्मरण करणे अशी साधना करीतच होतो, साधूने सुचविल्यानंतर मी श्रावण महिन्यात दर गुरुवारी शेगांवची वारीही करू लागलो. श्रावणात कधी चार तर कधी पाच गुरूवार येणार. पण मी मात्र सलग पाच गुरूवारी वारी करण्याचा क्रम ठरवून ठेवला आणि सातत्याने तो क्रम पाळत आलो आणि गजानन महाराजांना माझी विनम्र विनंती आहे की त्यांनी माझ्याकडून हा नियम शेवटपर्यंत पूर्णत्वास न्यावा. एवढे मात्र खरे की अनुसंधानातील सातत्य टिकवून ठेवले तर महाराजांपर्यंत आपली प्रार्थना पोहोचते आणि तसा वारंवार अनुभव आपल्याला ते देतात.

इ. स १९९०-९१ ची एक घटना मला आठवते, आमचं शिवणखुर्द गाव मुख्य रस्त्यापासून बरच आत आहे. आम्हा खेड्यातील लोकांना रस्त्याअभावी, वाहतुकीच्या साधनांअभावी प्रवासात काय त्रास होतो याची कल्पना सिमेंटच्या जंगलात असणाऱ्या लोकांना येणं जरा कठीणच आहे. तो काळ तर अधिकच बिकट होता. पाउलवाटेसारख्या रस्त्याने जंगलवजा भागातून,नाला ओलांडून प्रथम दोन कि. मी. अंतर चालत जाऊन, नंतर छोट्या रस्त्यावर एस. टी. बसची वाट पाहून किनखेड फाट्यापासून मुर्तिजापूर स्टेशन पर्यंत,मग तिथून पॅसेंजर मिळाली की जवळपासच्या गावात जायचं आणि तिथेही पुन्हा तोच प्रकार करायचा. तर झालं असं की माझ्या एका मुलानी तलाठी या पदासाठी जिल्हा निवड मंडळाकडे अर्ज केला, कारंजा या गावी एका रविवारी लेखी परीक्षा होणार होती, मुलानी माझ्या जवळ इच्छा व्यक्त केली की मालखेड या गावी एक अधिकारी राहतात त्यांना मी भेटून यावं जेणेकरून पुढील मार्ग कदाचित सोपा होऊ शकेल,परीक्षेची कल्पना पण येऊ शकेल. त्यानुसार मी शुक्रवारी जाऊन शनिवारी परत यावं अशी योजना ठरली आणि मी बाहेर पडलो. माझ्या कडून सर्वतोपरी प्रयत्न करून मी शनिवारी परतीच्या प्रवासाला निघालो. दगडधानोरा या गावापासून पायी पाच किलोमीटर अंतरआलो तिथे वरफळी गाव आहे तिथून एस. टी. बसने बडनेरा गाठलं तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते तिथून मुर्तिजापूर स्टेशनला रात्री साडेदहाच्या सुमारास उतरलो. दरम्यानच्या काळात त्या परिसरात जोरदार पाऊस येऊन गेला. तिथून किनखेड फाट्यापर्यंत पोहोचलो तो साडेअकरा बाराचा सुमार झाला होता. एस टी बस मला सोडून पुढे निघाली, आता तिथे मी एकटा होतो. किर्रर अंधार, आजुबाजूला बऱ्यापैकी जंगल, दोन कि. मी. एकटं पायी जायचं. वाटेत वस्ती नाही, रस्त्यावर लाईट नाही, अन्य काही पर्याय नव्हताच मी वाट चालण्यास प्रारंभ केला,सोबतीला रात किड्यांची किरकिर, पानांची सळसळ, बाजूला काही सरपटल्याचा आवाज , मधेच कुठेतरी पक्षाची फडफड. मनात विचार आला तिकडे नाल्याला पूर आलेला असणार, मिनिटा मिनिटाला कुठे विचित्र आवाज आला की अंगावर सर्रकन काटा. प्रचंड भितीदायक वातावरण. मी गजानन महाराजांचा धावा सुरू केला, एकटाच होतो, जोरजोरात गजानन महाराज की जय असा घोष सुरू केला. हे गजानन महाराजा इथे शी त्राता कोण/गजानना तुजवाचून.? देवा मला सुखरुप घरी पोहोचवा. मी नाला कसा पार करीन? गजानन महाराज की जय! गजानन महाराज की जय! करीत समोर सरकू लागलो. एकेक पाऊल जपून टाकावं लागत होतं आणि अचानक मागे कुणीतरी चालतो आहे असा भास झाला. एक उंच पुरा तरणाबांड पुरूष मागे उभा होता. म्हणला घाबरु नकोस मी पुढच्याच गावात राहतो, नाल्याला पूर आला असेल नं? चल एकमेकांच्या सोबतीने अंतर सहज पार करू. नंतर पुढील प्रवास त्याच्या सोबतीने कसा संपला कळलंच नाही. मी घरी पोहोचलो तर रात्रीचा एक वाजत होता. मी कपडे बदलून अंथरुणावर पडलो तेव्हा लक्षात आलं,त्याला आपण नाव विचारलं नाही. त्या मार्गावर वारंवार बस येत नाही. रात्रीच्या शांततेत दूरवरून वाहनाचा आवाज येतो तो आलाच नाही,बसचे दिवेही दिसले नाहीत,मग हा माणूस आपल्याजवळ आला कसा?पण त्या प्रश्नाचं उत्तर माझ्याजवळ नव्हतं. मी गजानन महाराज की जय!म्हणून झोपी गेलो.

माझ्या श्रावण वाऱ्या सुरू झाल्या पासून मी आतुरतेने श्रावणाची वाट पाहत असतो. एका श्रावणात माझ्या चार वाऱ्या पूर्ण झाल्या आणि पाचवा गुरूवार आला. तेव्हा मी शाळेत मुख्याध्यापक होतो. मी गुरूवारी अर्ध दिवसीय रजेचा अर्ज देऊन दुपारी २.३० च्या पॅसेंजरनी मुर्तिजापूर येथून शेगांव साठी जात असे, मी पाचव्या वारीच्या तयारीत अर्ज देऊन बाहेर पडणार तोच शाळेत उपशिक्षणाधिकाऱ्याची गाडी आत शिरली, गाडी पाहून माझं मन उदास झालं, कारण आता माझी पाचवी वारी चुकणार हे निश्चित झालंआणि माझी तगमग सुरू झाली. चेहरा चिंताग्रस्त दिसू लागला. अधिकारी म्हणाले थाटे सर शाळेचा रेकॉर्ड घेऊन या तपासणी करायची आहे. रेकॉर्ड तर मी आणला पण तोंडानी माझी पुटपुट सुरू झाली. हे गजानन बाबा, महाराजा, अधिकाऱ्यांच्या समोर मी काही बोलू शकत नाही, गजानन विजय मधे मी वाचतो की संस्थानला झालेला दंड माफ करण्याची बुद्धी तुम्ही त्या अधिकाऱ्याला दिली आता या अधिकाऱ्याचं काय करायचं ते मी तुमच्यावर सोडतो. माझी अस्वस्थता त्या शिक्षणाधिकाऱ्याच्या नजरेतून कशी सुटणार? त्यांनी विचारलं थाटे सर तुमची तब्येत बरी नाही का? कशाची चिंता करताय? त्यावर माझ्या सहकारी शिक्षकांनी मोकळेपणानी सांगितलं आज त्यांची पाचवी शेगांव वारी आहे. ती सुटू नये म्हणून त्यांची ही चिंता आहे त्यावर आश्चर्य म्हणजे अधिकाऱ्यांनी सरळ फाईल बंद केली आणि म्हणाले अहो एवढंच ना? मग सांगा न मोकळेपणानी, शेगांवला जाता आहे नं? हे घ्या माझे एकवीस रुपये तिथे द्या आणि निघा आधी तुम्ही. आधीच ऊशीर झाला आहे. मी पलीकडच्या शाळेत जातो उद्या आपण भेटू. मी घाईघाईने पळत सुटलो मला बराच ऊशीर झाला होता, आता धोका गाडी सुटून जाण्याचा होता. शरीराने वेग पकडला होता, मनात महाराजांचा धावा सुरू होता. आणि एकीकडे वारी पूर्ण होऊ द्या ही प्रार्थना सुरू होती. धावत पळत मुर्तिजापूर स्टेशन गाठलं, पाहिलं तर प्लॅटफॉर्म रिकामा, धस्स् झालं. बहुधा गाडी निघून गेली होती. धापा टाकत समोर असलेल्या टि. सी. ला विचारलं, २.३० ची पॅसेंजर? त्यानी माझं वाक्य पूर्ण केलं आज लेट आहे. पाच दहा मिनिटात येईल. ते ऐकून माझ्या डोळ्यात टचकन पाणी आलं. महाराजांनी सगळं काही सांभाळलं होतं. मी गाडीत बसलो तेव्हा पूर्ण अस्वस्थता संपली होती आणि मी कमालीचा शांत झालो होतो आणि मनात घोष होत होता. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन !

श्री. रामभाऊ थाटे , शिवणखुर्द, मूर्तिजापूर - ९७६३९१३१८२.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! गजानन महाराज हा माझ्यासाठी अगदी लहानपणापासून जिव्हाळ्याचा विषय. माहेरी असणारंच वातावरण माझ्या सुयोगामुळे मला सासरीही प्राप्त झालं. अर्थात तिथेही सर्वांनाच गजानन महाराज हा अत्यंत प्रिय विषय. मी मूळची महाराष्ट्रातील, मात्र लग्नानंतर माझं वास्तव्य मध्य प्रदेशात इंदौर इथे आहे. आज आमच्या लग्नाला बरीच वर्षे झालीत. माझा मोठा मुलगा कौस्तुभ आणि लहान मुलगी गीता त्यावेळी दहा आणि आठ वर्षाचे असतील, तेव्हाची गोष्ट. दसरा होता नेमकं सांगायचं तर दसऱ्याच्या नंतरचा तो दिवस होता. आपल्या देशात दसरा वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या पद्धतीने मनविण्यात येतो. इंदौर कडील भागात दसऱ्याच्या दिवशी रावण दहनाला महत्त्व आहे आणि दुसऱ्या दिवशी आप्तेष्टांना शुभेच्छा देण्यासाठी जाण्याची प्रथा आहे. काही लोक याला बासी दसरा असं म्हणतात.

आमच्या परिचयात एक अध्यात्मिक प्रवृत्तीच्या व्यक्ती आहेत. त्यांना आम्ही आदरानी अण्णा महाराज असं म्हणतो, त्या दिवशी मी माझ्या मोपेडवर कौस्तुभ आणि गीताला घेऊन अण्णांना भेटून शुभेच्छा देणे आणि नमस्कार करून आशीर्वाद घेणे या उद्देशाने निघालो. छावणी बाजारपेठेच्या भागातून मी समोर जात होते, रस्त्यावर गर्दी होती, सभोवताली वाहनांची गर्दी झाली म्हणून मी रस्त्यावर गाडीच्या दोन्ही बाजूला पाय सोडून सावकाश समोर सरकत होते आणि अचानक कसं काय कोण जाणे,एके ठिकाणी अ□क्सिलरेटर दिल्या जाऊन गाडी वेगात समोर सरकली. पण माझा उजवा पाय रस्त्यावरच राहून चपलेसकट उलट दिशेने दबल्या गेला. मी जोरात ओरडले, लोकांना कळेना की अपघात झालेला दिसत नाही आणि ही बाई ओरडते का आहे? मी कळवळून गाडी वरून उतरण्याचा प्रयत्न केला. दोन जणांनी माझी गाडी धरली आणि मला बाजूला एका बंद दुकानाच्या पायरीवर बसतं केलं, गाडी बाजूला घेतली, मुलं भेदरल्या सारखी बाजूला उभी होती. माझा पाय चांगलाच सुजला होता, एक पाऊलही समोर टाकणं मला शक्य होत नव्हतं. मी डोकं हातात धरून कळवळत होते, आई गं, गजानन महाराजा. आई गं, गजानन महाराजा. तशातच आता आजुबाजूचे बघे गायब झाले होते. आम्ही तिघेच तिथे होतो. आईला रडताना पाहून मुलं बिचारी अजूनच केविलवाणी झाली. तशातच विचार आला, चालणं शक्य नाही, सभोवताल कुणी नाही, कुणाची मदत नाही, गाडी कशी नेऊ, घरी कशी जाऊ? तशातच पायात जोरात कळ आली आणि पुन्हा ओरडले, आई आई गं! देवा गजानन महाराजा! डोळ्यासमोर अंधेरी आली आणि अचानक एक माणूस समोर आला. शुभ्र स्वच्छ कपडे अंगावर असलेला साधारण साठीच्या घरातला, तो समोर बसला. त्याच्या हातात एक कसलीशी डबी होती. त्यातून तो माझ्या पायाला मलम लावू लागला. मी एकदम चमकले. म्हटलं, अहो बाबा हे काय करताय? तसं म्हणाला, बेटी शांत हो जाओ सब ठीक होगा. त्यावर मी म्हणाले, मला द्या मी लावते, तर म्हणाले, देखो बेटी मेरे हाथोसे मलहम लगेगा तो ठीक हो जाएगा! आपल्या वडिलांच्या वयाचा माणूस पायाला मलम लावतो आहे. मला कसतरीच झालं. पण एवढं मात्र नक्की की जसा त्यांचा हात पाऊलावरून फिरू लागला तसं दुःख चमत्कारिकरित्या कमी झालं. त्यांनी अगदी पायात असलेल्या पैंजणापासून बोटापर्यंत औषध लावलं, वेदना कमी झाल्यावर मी त्यांना विचारलं, बाबा आपण कोण? त्यावर म्हणाले लक्ष्मी नारायण मिठाईवाला दुकान आहे तिथे नोकरी करतो. आता माझ्या लक्षात आलं, त्यांचे कपडेच केवळ स्वच्छ शुभ्र नव्हते तर वाणीत गोडवा होता, एकूण व्यक्तिमत्व प्रभावी व अतिशय प्रसन्न होतं आणि स्पर्श तर जादूचा होता!

मला म्हणाले, बेटा पांच मिनिटोमे आप चल सकोगी और धीरे धीरे ठीक होगा. मी म्हटलं, मला हे मलम द्याल का? म्हणाले, मै नयी डबी लाकर देता हूं. ते बाजूला दोन मिनिटं चालत जाऊन डावीकडे वळले आणि पाच मिनिटांनी परत आले. त्यांनी एक डबी मला दिली, किती पैसे द्यायचे विचारलं तर राहू द्या म्हणाले, मी खूपच आग्रह केला तेव्हा पाच रुपये घेतले आणि ते त्याच दिशेनी निघून गेले. हे सगळं दहा मिनिटात आटोपलं, मुलं जेव्हा म्हणाली आई आपण त्यांना थँक्यूही म्हटलं नाही. तेव्हा मी भानावर आले, मला लंगडत, पण चालता येत होतं.

मी तिथून थोडी कष्टाने का होईना पण अण्णा महाराजांकडे पोहोचली त्यांनी सगळं ऐकलं म्हणाले आज तुझ्यावर महाराजांनी कृपा केली. तिथून परत येताना मुलं म्हणाली आई चल आपण लक्ष्मी नारायण मिठाईवालाकडे जाऊ, ते आजोबा असतील त्यांना थॅन्क्स तर देऊ. आता माझ्याही मनात त्यांना पाहण्याची उत्सुकता निर्माण झाली होती, मी गाडी दुकानाकडे नेली. दुकानदाराला सगळं सांगितलं, तो म्हणाला तुम्ही सांगता तसा कुणीही इथे नाही. मी फारच आग्रह केला तेव्हा त्यानी चक्क दुकानात असणाऱ्या सर्व लोकांना माझ्यासमोर अगदी ओळख परेडसाठी उभं करावं तसं सर्वांची रांग लावली पण त्यात माझे डॉक्टर कुठेच नव्हते. आता माझी उत्सुकता शिगेला पोहोचली, त्याच मनस्थितीत आम्ही घरी पोहोचलो. मी पहिले महाराजांच्या फोटोसमोर हात जोडून उभी राहिले, तर मुलांनी घरात सर्व वृत्त कथन केलं. मला फोटोत महाराजांच्या चेहऱ्याऐवजी तोच चेहरा दिसू लागला. दोन चेहरे आलटून पालटून दिसू लागले. घरात सगळ्यांनी महाराजांचे आभार मानले, आईंनी महाराजांसमोर दिवा लावला. त्या रात्री मी मिस्टरांजवळ खूप रडले. महाराजांनी त्यांच्या रुपाने मदत धाडली आणि आपण नमस्कारही करू शकलो नाही. मिस्टरांनी आश्वासन दिलं उद्या आपण त्या औषधांच्या दुकानाला भेट देऊ.

दुसरे दिवशी सकाळी आम्ही, मी जिथे बसले होते तिथे पोहोचलो. मी मिस्टरांना, ती दिशा, ते अंतर आणि डावीकडे ते वळले होते हे सांगितलं. मिस्टर तेवढं अंतर बरोबर त्या दिशेने गेले पण उजवीकडे तर रस्ताच नव्हता आणि डावीकडे होता एक कचऱ्याचा ढीग. जवळपास कुठलही दुकान नव्हतंच. ते सर्व कळल्यावर आम्ही फक्त आश्चर्याने एकमेकांकडे पाहत राहिलो, बाकी आम्ही करणार तरी काय होतो? पुढे आम्ही ते औषध वापरलं पण काहीच परिणाम जाणवला नाही आणि 'देखो बेटी मेरे हातोसे मलहम लगेगा तो ठीक हो जाएगा' या वाक्याचं महत्त्व कळलं.

आज त्या गोष्टीला इतकी वर्षं लोटलीत पण ते सर्व आठवलं की आजही अंग शहारून येतं आणि नकळत माझा हात माझ्या उजव्या पाऊलावरून फिरतो, त्या जादुई स्पर्शाची आठवण एकदम ताजी होते आणि आपोआप स्मरण होतं. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. शुभांगी पुराणिक देशपांडे, इंदौर - ९००९७९९७९.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९ – आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे ९

जय गजानन ! माझ्या आजोबांनी गजानन महाराजांना प्रत्यक्ष पाहिले होते. त्यामुळे आमच्या घरात गजानन महाराजांचं गुणगान हा माझ्या जन्माच्या पूर्वीपासून असलेला भाग. मी केव्हा त्यात सामील झालो हे तर मला आठवतही नाही. १९७२ साली जेव्हा मी मॅट्रीक झालो, (तेव्हा अकरावी मॅट्रीक होतं) मला स्वाभाविकच वाटलं, आपण शेगांवला जायला हवं, दर्शन घ्यायला हवं. म्हणून मग मी आणि माझा एक मित्र, आम्ही घरून परवानगी घेऊन मनमाड स्टेशनवरून शेगांव साठी प्रवासास प्रारंभ केला. आमचं शेगांव दर्शन छान पार पडलं आणि आम्ही परतीच्या प्रवासासाठी शेगांव स्टेशन गाठलं. तेव्हा वारंवार गाड्या नसल्यामुळे गाडी येण्याच्या थोडावेळ आधी तिकीटाची खिडकी उघडायची. आम्ही स्टेशनवर पोहोचलो तेव्हा तिकीट खिडकी बंद असल्यामुळे आणि बाहेर बसायला जागा नसल्यामुळे, आम्ही विचार केला आत प्लॅटफॉर्म वर जाऊ खिडकी उघडली की येऊन तिकीट घेऊ कारण गाडीला वेळ होता. आम्ही आत एका बेंचवर बसलो, थोड्या वेळाने दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर कुठलीशी एक पॅसेंजर येऊन गेली. काही लोक उतरले, गाडी निघून गेली. पाच मिनिटांनी आम्ही बसलो होतो तिथे टि. सी. आला आणि आम्हाला तिकीट विचारू लागला अर्थातच आमच्या जवळ तिकीट नव्हतच. टि. सी. चा समज झाला की आम्ही आताच गेलेल्या गाडीतून उतरलो आणि डब्लु. टी. अर्थात विदाऊट तिकीट आहोत आणि त्याचं लहान मुलं पाहून, दंड, शिक्षा, वगैरे धमक्या देणं सुरू झालं. आम्ही घाबरुन गयावया करू लागलो. मनात महाराजांची प्रार्थना सुरू झाली. त्याला सांगितलं आम्ही दर्शन घेऊन आलो आहे आणि येणाऱ्या गाडीने मनमाडला जायचं आहे. प्रथम तो ऐकेना आणि माझा इकडे गजानन महाराजांचा धावा सुरू, तोच काय झालं कुणास ठाऊक. टि. सी. म्हणाला, तुम्ही दर्शन घेऊन आलात नं? पाहू तुमची पिशवी? मी गजानन विजय पोथी विकत घेतली होती. त्याची नजर विजय ग्रंथावर जाताच त्यानी ग्रंथ अत्यंत आदरानी डोक्याला लावला आणि सांभाळून जा मुलांनो, असं म्हणून आपल्या कामाला निघून गेला. इकडे आम्ही दोघांनी गजानन महाराज की जय! म्हणून सुटकेचा श्वास सोडला.

पुढे महाराजांच्या आशीर्वादाने शिक्षण पूर्ण झालं आणि मला युनायटेड वेस्टर्न बँकेत नोकरी लागली (जिचं नाव पुढे आय. डी. बी. आय. झालं)जसं जमेल तसं गजानन विजय ग्रंथाचं पारायण होत होतं. १९९२ सालची गुरूपौर्णिमा होती. त्या दिवशी माझ्या मनात असं आलं की, प्रगट दिन आणि ऋषी पंचमी आपण महत्त्वाचे दिवस मानतो. पण गजानन महाराज आपले गुरू, मग गुरूपौर्णिमेला आपण काही करायला नको का? आणि मी एकवीस रूपयांची मनीऑर्डर शेगांवला पाठवली. नंतर दरवर्षी गुरूपौर्णिमेला न चुकता कधी एकवीस, एक्कावन्न, शक्य झालच तर एकशे एक अशी काही राशी पाठविण्याचा क्रम सुरू झाला. ही आपली गुरूदक्षिणा, या भावनेतून मी हा क्रम न चुकता सुरू ठेवला. सतत अठरा वर्ष हा क्रम अखंडपणे सुरू राहिला आणि मला वाटतं साधारण २०१० ची वगैरे ती गोष्ट असावी, मी नोकरीच्या निमित्ताने नाशिक जिल्ह्यातील मालेगाव इथे बॅन्केत कार्यरत होतो. तो गुरूपौर्णिमेचा दिवस होता, मला पोस्टात जाऊन नित्याप्रमाणे मनिऑर्डर करायची होती आणि इकडे आपली जागाही सोडता येत नव्हती, पोस्टात रोखीच्या व्यवहाराची विशिष्ट वेळ ठरली असते. आता निघतो, नंतर निघतो, करीत मला थोडा उशीरच झाला आणि मी घाईघाईने पोस्टात पोहोचलो. पण माझ्यासमोरच तिथल्या लेडीजनी खिडकी बंद केली. मी म्हटलं मॅडम, काही सेकंदच झाले आहेत, एवढे माझे फक्त एकवीस रुपये घ्या, शेगांवला मनिऑर्डर करायची आहे. माझ्यावर कृपा करा नाही म्हणू नका. एक ना दोन त्या बाईंनी माझ्या विनंतीकडे साफ दुर्लक्ष करून त्या आत निघून गेल्या. बरं पूर्ण दोष त्या बाईंचाही नव्हता, माझ्या कडूनच हलगर्जीपणा झाला होता. इतक्या वर्षांचा गुरूदक्षिणेचा क्रम आज खंडित होणार होता. माझा चेहरा काळवंडला मी स्वतःला दूषणं देत माघारी फिरलो. घरी परतलो तर चेहऱ्यावरचं औदासिन्य लपत नव्हतं. सौ. ला सगळा प्रकार सांगितला, आता मी करू काहीच शकत नव्हतो, सौ. नी सुचवलं, आता देवासमोर स्वस्थ बसा, महाराज सगळं जाणतातच. तरीही त्यांना सर्व कथन करून क्षमा याचना करा. गजानन महाराज कृपाळू आहेत तेच काही मार्ग सुचवतील. मग बराच वेळ तिथे बसून मनाला शांत करण्याचा प्रयत्न केला, अशा वेळी आपणच आपली समजूत घालण्याचाही प्रयत्न करतो. मला ओव्या आठवू लागल्या, पैशाप्रती पाहून । महाराज बोलले हांसोन । काय व्यापारी समजून । मजला तू हे अर्पिसी? ॥ हे नाणे तुमचे व्यवहारी । मला न त्याची जरूरी । भावभक्ती नाण्यावरी । संतुष्ट मी रहातसे ॥ महाराजांना म्हटलं महाराज हे तर त्रिवार सत्य आहे, पण आज तुमचा हा भक्त गुरूदक्षिणा न दिल्या कारणानी उदास झाला आहे. आता सर्व तुमच्या हाती. ती संध्याकाळ, ती रात्र, अस्वस्थतेत संपली आणि दुसरा दिवस निघाला. मी बॅन्केत पोहोचलो आणि स्वतःला कामात गुंतविण्याचा प्रयत्न करू लागलो.

दुपारी तीन वाजण्याचा सुमार असेल, चपराशी बोलावण्यासाठी आला. साहेब तुमचा फोन आहे, कुणी भानगावकर आहे, ते ऐकून मी बुचकळ्यात पडलो. मग स्मरणशक्तीला ताण दिल्यावर मला आठवलं, सहा सात वर्षांपूर्वी याच ब्रॅन्चला माझ्यासोबत काम केलेला हा मित्र होता. मधल्या काळात त्याच्याशी फारसा संबंध आला नव्हता. आज अचानक त्याचा फोन ऐकून मी चकित झालो. पण पुढे तो जे काही बोलला ते ऐकून तर माझी अवस्था चकित होण्याच्याही पलीकडची झाली. तो सांगत होता अरे, प्रदीप काल, गुरूपौर्णिमा झाली. मी तुला न विचारता आपल्याच मनानी एक उद्योग केला यार. काल मी शेगांवला होतो. मला अचानक अशी प्रेरणा झाली की तुझ्या नावानी शेगांवला पैसे द्यावे आणि मी पंचवीस रूपये देऊन तुझ्या नावे पावती घेतली. मला तुझा पोस्टल अ◌ॅड्रेस सांग मी प्रसाद पाठविण्याची सोय करतो. आमचं बोलणं संपलं मी फोन ठेवून केबिनच्या बाहेर आलो तेव्हा चेहऱ्यावरील औदासिन्य पार नाहीसं झालं होतं. माझ्या मित्रांच्याही ते लक्षात आलं, पण अर्थात त्यांच्या हे नाही लक्षात आलं की तो क्षण मला कुणी प्राप्त करून दिला आहे आणि त्या क्षणी माझं मन गजानन महाराजांच्या भक्तीने ओतप्रोत भरलेलं आहे, इतकंच नाही तर मी आनंदानी आतल्या आत जप करतो आहे. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. प्रदीप कारेकर, मालेगाव - ९४२३५५७२७२.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## २२ - दीनांचा दयाळू , भक्तांचा सोयरा - सौ. शामा शरद भुसे, नाशिक.

जय गजानन! गजानन महाराजांची भक्ती, त्यातून येणारी प्रचिती,आणि त्यातून वाढीस लागणारी भक्ती. असा अनुभव एखाद्या गजानन महाराज भक्ताला मिळत असेल तर त्याला त्यापेक्षा अधिक काय हवं? आम्ही जेव्हा नाशिक येथे आमच्या घराची वास्तूशांत केली तेव्हा आम्ही उभयतांनी महाराजांच्या मंदिरात जाऊन महाराजांना अतिशय आग्रहाने निमंत्रण दिले आणि गजानन महाराजांनी आमच्यावर कृपा केली. महाराजांनी आमंत्रण तर स्वीकारलंच पण मी पेशाने वकील म्हणून की काय महाराज घरात एक खूण मागे ठेवून गेले. गजानन महाराज संस्थान शेगांव, भोजन कक्ष ताट क्र. ३०१ ही ती खूण. जी अनेक भक्तांनी आवर्जून घरी येऊन पाहिली आणि अजूनही भक्त येत असतात.

आपण गजानन महाराजांना आपल्यासाठी काही प्रार्थना करतो आणि महाराज जेव्हा आपली प्रार्थना ऐकतात, तेव्हा आपलं मन आनंदित होतंच पण आपण जेव्हा दुसऱ्यासाठी प्रार्थना करतो किंवा ज्याला गजानन महाराज माहिती नाही अशा कुणाला आपण महाराजांना प्रार्थना करण्याचे सुचवितो आणि त्याची प्रार्थना जेव्हा फलदायी होते, तेव्हा आपल्याला विशेष आनंद होतो. मला महाराजांनी नुकताच असा आनंद प्राप्त करून दिला, ती गोष्ट मला तुम्हाला सांगायची आहे.

त्याचं असं झालं की, आम्ही ज्या सोसायटीत राहतो तिथे वॉचमन म्हणून साधारण साठीच्या घरात वय असणारे एक रामराव नावाचे गृहस्थ कामाला आहेत, स्वभावाने गरीब, मवाळ, शांत. नेमून दिलेलं काम व्यवस्थित करणारे म्हणून आम्ही त्यांना ओळखतो. आधीच पदरात गरीबी त्यातून तीन मुली एक मुलगा असं मोठं कुटुंब, एका मुलीचं कसंबसं लग्न झालं, जावयाच्या ओळखीने ही नोकरी मिळाली आणि रामराव बायको मुलाला गावीच ठेवून दोन मुलींसह कामाच्या ठिकाणी आले आणि मिळालेल्या छोट्या जागेत आसरा मिळविला. आता आयुष्याची घडी सुरळीत होईल असं वाटून ईमानदारीने काम करीत असतानाच मध्यंतरी एक दिवस सोसायटीने विनाकारण, किंवा कदाचित अत्यंत क्षुल्लक कारणाने, किंवा कदाचित कुणाचा अहंकार दुखावल्याने तडकाफडकी रामरावला कामावरून काढून टाकलं आणि सामान घेऊन बाहेर कुठे निघून जाण्याचा आदेश दिला, रामरावचा संसार अचानक उघड्यावर आला. सोसायटीने नवीन कुणाचीतरी नेमणूक रामरावच्या जागेवर करून टाकली. आता एकीकडे रात्रीचा काळोख दुसरीकडे भविष्यातील अंधार. दोन मुलींसह जाणार कुठे? कारण जावयाचं घर अगदीच लहान, कसंबसं मुलींना बहिणीच्या घरी रात्रीचा सहारा देऊन रामरावनी सोसायटीच्या कंपॉउन्डवॉलशी आपली वळकटी पसरली. मी माझी कामं उरकून घरी आले तेव्हा चौकशी केल्यावर मला सर्व हकीकत समजली. त्या रात्री बरीच थंडी होती. रामरावला बाहेर झोपू देणं मला आणि मिस्टरांना तर अमानवी वाटलं. आम्ही त्यांना आग्रहानी घरात निजायला सांगितलं, प्रथम ऐकायला तयार नव्हते पण खूप समजूत घातली तेव्हा रात्री हॉलमधे निजावे आणि सकाळी कामाच्या शोधात बाहेर जावे हे त्यांनी मान्य केलं.

आमच्या हॉलमधे महाराजांसाठी एक खास बैठक तयार करून त्यावर शेगांवला प्रसादरुपाने मिळणारी मूर्ती व त्यामागे समाधीचा फोटो लावला आहे. माझ्या दिवसाची सुरुवात महाराजांना नमस्कार करून होते आणि रोज रात्री महाराजांसमोर उभं राहून त्यांचे आभार मानून माझा दिवस संपतो. दोन रात्री रामराव त्याच हॉलमधे निजले आणि दिवसभर कामाच्या शोधात वणवण फिरले, पण काम काही मिळाले नाही. त्यांच्या मनात गावाकडे परत जाण्याचा विचार घर करू लागला. तिसऱ्या दिवसाच्या शेवटी रात्री, मी जेव्हा महाराजांसमोर उभी राहिली तेव्हा अचानक माझ्या मनातील भावनांचा उद्रेक झाला. रामराव तिथेच होते. मी त्यांना सांगू लागले, रामराव, हा माझा देव आहे नं, याच्याजवळ सगळ्या प्रश्नांचं उत्तर आहे. हा फारच प्रेमळ आहे, हा भाव भक्तीचा भुकेला आहे. याला तुम्ही तुमचं म्हणणं सांगा. बघूया आपण काय होतं ते. रामराव म्हणाले, मॅडम या दोन दिवसातच मी यांना इथे पाहिलं, बाकी मला काही माहिती नाही. त्यावर मी म्हटलं, तुम्हाला जरी काही माहिती नसलं तरी माझा देव सर्व जाणतो, असं म्हणून मी निजण्यासाठी निघून गेले. दुसरे दिवशी सुटी असल्यामुळे आम्ही जरा आरामात उठलो तर रामराव अंथरुण पांघरूणाची व्यवस्थित घडी कोपऱ्यात ठेवून बाहेर निघून गेले होते. त्यांनी महाराजांना प्रार्थना केली किंवा नाही, हे मला कळायला काही मार्ग नव्हता.

इतक्यात दारावरची बेल वाजली, दारात एक नेपाळी बाई उभी होती. ती सांगू लागली की, आम्ही इथले नवीन चौकीदार. पण आम्ही काम सोडून जातो आहे. इथे साप आहेत, किडे खूप आहेत. मला काल रात्री खूप किडे चावलेत. आम्ही हे काम नाही करू शकणार. मी म्हटलं, बाई हे मला कशाला सांगतेस? ज्यांनी कामावर ठेवलं त्यांना सांग. ते कुटुंब संबंधित माणसांना सांगून, तडकाफडकी रिक्षात सामान कोंबून निघून गेलं. आता अडचण झाली सोसायटीची. कारण सगळीच कामं आ वासून उभी होती. आता अन्य काही पर्यायच नव्हता, रामरावांचा शोध घेणे आवश्यकच होते.

रामराव घाईघाईने आवारात शिरले, तो थेट प्रथम माझ्यासमोर उभे झाले. नमस्कारासाठी जुळलेले हात, डोळ्यातून घळघळ पाणी आणि रामराव बोलू लागले. मॅडम दोन दिवसांपूर्वी मला वाटलं होतं, इथे आपलं कुणीही नाही पण मॅडम तुम्ही तर आपलेपणा दाखवलाच पण ते तुमचे गजानन महाराज तेही माझे झालेत, काल रात्री निजण्यापुर्वी त्यांना खूप कळवळून प्रार्थना केली आणि तुम्हाला, काय सांगू मॅडम. अहो ते काल रात्री माझ्या स्वप्नात आले. त्यांनी विचारलं. काय रे इथे गावापासून दूर का आलास? मी म्हटलं, देवा माझ्यावर फार कर्ज आहे. माझं दुकान बसलं. शेती पिकत नाही म्हणून पोट भरण्यासाठी इथे आलो. त्यावर ठीक आहे म्हणून अदृश्य झाले आणि आज हे सगळं असं घडून आलं. मी कसे ऋण फेडणार त्यांचे?मी त्यांना म्हटलं अहो माझा देव चतकोर भाकरी आणि पिठल्यावर संतुष्ट राहतो. जेव्हा तुम्हाला जमेल तसं त्यांना दोन घास खाऊ घाला की झाले तुम्ही त्यांच्या ऋणातून मुक्त! हां पण त्यांचं नाव मात्र कधीच सोडू नका.

पुढे मार्गशीर्षातील शेवटच्या गुरूवारी रामरावांच्या मुलीनी उपवास केला आणि पोळी, भाजी, चमचाभर साखर आणि कुरडई. असं सगळं महाराजांसमोर ठेवून उदबत्ती लावली. ते सगळं दृश्य पाहून माझे डोळे भरून आले आणि मीही मनातल्या मनात प्रार्थना केली, महाराज आम्हा सर्व भक्तांवर अशीच कृपादृष्टी असू द्या आणि तुमच्या प्रेरणेनी सतत आमच्या मुखी तुमचं नाव असू द्या. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. शामा शरद भुसे, नाशिक - ९३७३९०३७७१.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! मी शर्मिला भाटे. माझे माहेर श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर. लहानपणापासून घरातील वातावरणामुळे गजानन महाराजांची भक्ती होतीच. त्यात माझं लग्न ठरण्यासाठी पंढरपूर येथील गजानन महाराज मंदिराची जागा निमित्त ठरल्यामुळे ही भक्ती अजून बहरली. माझ्या आते- बहिणीच्या लग्नाला मी पंढरपूरला गेले असताना माझ्या बहिणींनी माझ्या नकळत मला दाखविण्याचा उद्योग तेथील गजानन महाराज मंदिरात पार पाडला आणि मी सासरच्या लोकांना पसंत पडून माझे लग्न ठरले आणि जणू महाराजांच्या योजनेचाच भाग म्हणून मी लग्नानंतर पंढरपूरला आले. तिथून पुढे १९९८ साली मिस्टरांनी व्यवसायाच्या उद्देशाने मडगाव गोवा येथे स्थलांतरित होण्याचा निर्णय घेतला आणि आमचं कुटुंब मडगावला स्थायिक झालं. सुरुवातीला तिथे गजानन महाराजांचं मंदिर नव्हतं पण महाराजांच्या कृपेने लवकरच तिथे मंदिराची उभारणी झाली आणि एक श्रध्दास्थान प्राप्त झालं. महाराजांच्या आशीर्वादाने दिवस समोर सरकत गेले आणि माझ्या मोठ्या मुलीचं लग्न ठरलं.

२६ एप्रिल २०१३ रोजी सांगली येथील खरे मंगल कार्यालयात लग्न म्हणजे मडगाव पासून तीन चारशे किलोमीटर दूर! त्यामुळे आम्ही सर्वांनी निर्णय घेतला की, २४ एप्रिलला सकाळी आपण खाजगी गाड्यांनी मडगाव येथून निघायचे. ठरल्याप्रमाणे २४ तारखेला पहाटेच घर जागे झाले आणि तयारीची एकच धांदल सुरू झाली. बॅगा भरणे, फराळ करणे, आंघोळी उरकणे, हास्य विनोद आणि एकच तारांबळ. लग्न घरच ते! अशात सकाळचे साधारण सात साडेसात वाजले असतील,मिस्टर म्हणाले मी आंघोळीला जातो आहे आणि त्यांनी आंघोळीला नंबर लावला.

इकडे आमच्या गप्पा सुरू होत्या,पाच मिनिटे झाली असतील आणि खूप जोरात कसलासा आवाज आला. आम्ही एकदम स्तब्ध झालो. सर्वांचेच डोळे विस्फारले,कान टवकारले,आणि आम्ही बाथरूमच्या दिशेने धाव घेतली. बाथरूम मधूनच तो आवाज होता. आम्ही दार वाजवून आवाज दिला पण आतून काहीच प्रतिसाद नव्हता. पुन्हा सगळ्यांनीच जोरात हाक मारली पण प्रतिसाद शून्य. 'दरवाजा तोडावाच लागणार' कुणी तरी ओरडलं, कुठलाही वेळ न दवडता दरवाजा तोडण्यात आला. आत हे निपचित पडले होते पूर्ण बेशुद्धावस्थेत. यांना चार जणांनी उचलून बाहेर आणलं, आमचे फॅमिली डॉक्टर, डॉ. रायपूरकर यांना फोन लावण्यात आला, सोबतच अँब्युलन्सही मागविण्यात आली. माझ्या काळजाचा ठोका चुकला, माझ्या सकट सर्वांचाच चेहरा खर्रकन उतरला. प्रत्येकालाच प्रत्येकाच्या मनातलं वादळ समजत होतं. या सगळ्या धावपळीत मी आत देवघराकडे धाव घेतली, गजानन महाराजांच्या फोटोकडे शून्यात हरवलेल्या नजरेने पाहू लागले. महाराजांसमोर दिवा लावला आणि तोंडून एकच वाक्य बोलले. मुलीच्या लग्नाला यांचं येणं होऊ दे.

दरम्यान डॉक्टर, अँब्युलन्स आले, यांना हॉस्पिटलमधे अ□डमिट करण्यात आलं. त्या दिवसाचा कार्यक्रम पुढे ढकलून आम्ही सर्व हॉस्पिटलमधे दाखल झालो. तपासण्या झाल्या, निदान झाले आणि निदान ऐकून सर्वांनाच जबरदस्त धक्का बसला. मानेतील उभ्या मणक्याला हेअर क्रॅक आणि कमरेच्या खाली संवेदनाहीन ऐकून मी तर मटकन खाली बेंचवर बसले. कुणीतरी खांद्यावर हात ठेवला, पाहिलं तर वर्षा, माझ्या वहिनी, त्या म्हणाल्या, काळजी करू नकोस. महाराज घेतील काळजी, तुझ्या देवघरात महाराजांची पंचधातूंची जी मूर्ती आहे, जिला तू रोज अभिषेक करतेस, ती मी ताम्हणात पाण्यात ठेवून आले आहे. त्यांना सांगितलं आहे काळजी घ्यायला. होईल सर्व ठीक. इतक्यात डॉक्टर बाहेर आले, म्हणाले, परिस्थिती नाजूक आहे. पुढे काय होईल काही सांगता येत नाही. एवढ्या लांबच्या प्रवासासाठी आम्ही परवानगी देऊ शकत नाही. मग डॉक्टरांना सर्व परिस्थिती सांगितली. आमचे फॅमिली डॉक्टर बोलले, तेव्हा ते म्हणाले, ठीक आहे जर उद्या पायांना संवेदना आल्या तर यांना परवानगी देता येईल. इतक्या कमी वेळात पायांमध्ये संवेदना येणं किती कठीण आहे हे डॉक्टर मनातून जाणून होते.

आता काय? महाराजांचं स्मरण, आता हाच उपाय । आठवावे सद्गुरू पाय । याविणे दुसरी सोय । काही नसे राहिली ॥ धावपळीत तो दिवस केव्हा संपला कळलेच नाही. आता उरली होती फक्त एक रात्र. त्या रात्री झोप येतही होती आणि नव्हतीही. अर्धवट ग्लानीत एक ओळ सारखी आठवत होती. गण गण गणात बोते म्हणूनी लावा अंगारा सामर्थ्याने गजाननाच्या संकट जाई माघारा आणि त्याच पार्श्वभूमीवर 'गण गण गणात बोते' चा जप कळत न कळत होत होता. ती रात्र एकदाची सरली. सूर्याची किरणं अंगावर आली आणि डॉक्टरांच्या बोलण्याचा आवाज कानावर आला. अनबिलीव्हेबल! त्यांच्या पायात संवेदना आल्या आहेत. अर्थात बाकी परिस्थिती नाजूकच आहे. अत्यंत सांभाळून, सावकाश, धक्का न लागू देता त्यांना नेता आलं तरच, तेही मानेत पट्टा अडकवून ठेवावा लागेल. बरं व्हायला बरेच दिवस लागणार आहेत. प्रवासात सांभाळून नेण्याच्या जबाबदारीवर तुम्ही त्यांना नेऊ शकता.

डॉक्टरांच्या त्या सांगण्यानंतर संमिश्र प्रमाणात का होईना, वातावरण पुन्हा बदललं. आम्ही सर्वांनी आधी निघायचं आणि माझी लहान मुलगी आणि माझा लहान भाऊ हे मिस्टरांना घेऊन एस एक्स फोर गाडीनी मागावून सावकाश येतील असं ठरलं. थोडा जरी धक्का बसला तरी त्यांना खूप वेदना व्हायच्या आणि थांबून मलम लावावं लागायचं. अशा रितीने ते तिघं रात्रीपर्यंत सांगलीला येऊन पोहोचले. तिथे पोहोचल्यानंतर मुलीनी सांगितलं, आई, बाबा म्हणत होते, मध्य रात्री कुणीतरी आलं,त्यांनी पाठीला आणि मानेला खूप शेक देऊन मसाज केला म्हणून मला बरं वाटलं!

लग्नाचा दिवस उजाडला, हे मधेच विस्मृतीत जात होते, लग्नाचे सर्व विधी माझे दीर आणि जाऊ यांनी करावेत आणि कन्यादानाचा विधी ह्यांच्या हातून व्हावा असे ठरले. हे कन्यादानासाठी उभे झाले. मुलीच्या लग्नाला यांचं येणं होऊ दे, हे माझं मागणं महाराजांनी पूर्ण केलं होतं. दोनच दिवसांपूर्वी जो माणूस पूर्ण बेशुद्धावस्थेत होता, मधला बराच वेळ जो आय सी यू मधे होता, ज्याची कमरेखालच्या भागातील संवेदना गेली होती आणि ज्याला पूर्ण बरं व्हायला पुढे सहा महिने लागले, अशा माणसानी एवढा प्रवास सहन करून कन्या दानासाठी उभं राहणं ही माझ्यासाठी महाराजांचीच कृपा होती.

आदल्या दिवशी डॉक्टरांनी मिस्टरांना लग्नाला घेऊन जाण्याची परवानगी दिली, तेव्हा घरी जाऊन मी माझी पंचधातूंची गजानन महाराजांची मूर्ती आभार मानून स्वच्छ पुसली होती आणि प्रवास आणि लग्न सुरळीत पार पडू दे, म्हणून जागेवर ठेवली होती. आता मी कल्पनेनेच ती मूर्ती हातात धरून हृदयाशी कवटाळली आणि डोळ्यातील अश्रूंना वाट मोकळी करून दिली. आजूबाजूला उभे असणारे माझे नातेवाईक ते दृश्य न्याहाळत होते आणि कदाचित आतल्या आत म्हणत होते. श्री

गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. शर्मिला भाटे, मडगाव, गोवा - ९७६६७२८६१६
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! माझं माहेर म्हणजे नायगाव, उस्मानाबाद जिल्ह्यातील अगदी लहान गाव. माझ्या बालपणी आई गजानन विजय ग्रंथ वाचायची. तेव्हा तिच्या बाजूला बसून पोथीतील चित्र पाहता पाहता आणि आईकडून ती गोष्ट समजून घेताना गजानन महाराजांची भक्ती माझ्या मनात केव्हा रुजली ते कळलंच नाही आणि अगदी अकरावीत असताना पासूनच माझी विजय ग्रंथाची पारायणं सुरू झालीत. माझ्यासोबत असणाऱ्या मैत्रिणींना माझ्याकडूनच गजानन महाराजांविषयी माहिती झाली. त्याचं मला कधी कधी थोडं कौतुकही वाटायचं की आपल्यामुळे यांना शेगांव समजलं.

मी जेव्हा मॅट्रीक झाले तेव्हा आमच्या गावात कॉलेज नसल्यामुळे सात किलोमीटर दूर लातूर जिल्ह्यातील मुरूड या गावी मला कॉलेजमधे प्रवेश घ्यावा लागला, तिथे होस्टेल होतं पण मी रोज बसने जाणं येणं करीत असे. मला आठवतं, मी सेकंड इयरला असतानाची ही गोष्ट आहे. त्या दिवसात आमच्या घरात काही बांधकाम होत होतं, आदल्याच दिवशी बांधकाम पूर्ण करून कामगार निघून गेले होते. त्यामुळे बरीच धूळ घरात होती. ती माघ वद्य सप्तमी होती अर्थात गजानन महाराजांचा प्रगट दिन. पण कसं काय कोण जाणे त्या दिवशी प्रगट दिन आहे, याचं मला स्मरणच राहिलं नाही आणि सकाळी मला होस्टेल मधून माझ्या मैत्रिणीचा, आशाचा फोन आला. सारिका, अगं आज महाराजांचा प्रगट दिन आहे नं काय करता येईल आपल्याला? मी तिला म्हटलं, मी कॉलेजला येते मग आपण बोलू. मी फोन ठेवला आणि आत विचारांची विचित्र कालवाकालव झाली. जिला महाराजांविषयी माहिती मी दिली तिला प्रगट दिन लक्षात आहे आणि आपल्याला विस्मरण व्हावं? त्याच विचारात मी कॉलेजला निघण्याची तयारी करू लागले. ते पाहून आई म्हणाली, अगं घरात एवढी कामं पडली आहेत आणि तुला कॉलेज काय सुचतंय? त्यावर मी आईला तावातावात सांगून टाकलं आज मी घरी आल्यावर तुला घरातील फरशी धुवून स्वच्छ पुसून देईन! आणि असं सांगून मी कॉलेजसाठी बाहेर पडले. मनाचं संतुलन ढळलं की मोठमोठ्यांची गडबड होते, मी तर लहानच होते. कॉलेजमधे मैत्रिणीनी का गं! प्रगट दिनाला काय करावं? असा प्रश्न पुन्हा विचारला. तेव्हा आज आपण दिवसभर महाराजांचं स्मरण करु! असं सांगून स्वतःला मोकळं केलं आणि कॉलेज मधील सर्व वर्ग अटेन्ड करून परतीच्या बसची वाट पाहू लागले. परतीचा प्रवास सुरु झाला आणि मनातील आंदोलन गतीशील झालं. पश्चात्तापानी दग्ध झालेलं मन म्हणू लागलं, महाराज माझी चूक झाली, महाराज माझी चूक झाली आणि याचं परिमार्जन कसं करता येईल हा विचार मनात येऊन मी महाराजांना म्हटलं, महाराज आज दिवसभरात जर मला प्रगट दिनाचा प्रसाद मिळाला तरच मी भोजन करीन नाही तर आज मी जेवणार नाही.

मी घरी पोहोचले, वास्तविक मला भूक अजिबात सहन होत नाही, पण आईनी जेवणाचं विचारलं तेव्हा बाहेर खाऊन आले आहे, असं सांगून फरशी स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली. भुकेने जीव कासावीस झाला होता, पण आज महाराजांना मी काही बोलले होते. बसून फरशी पुसताना पायात गोळे आले, प्रत्येक वेळी फडकं फिरवताना मी मागे सरकत होते आणि विचार पुढे धावत होते. माझं मन म्हणू लागलं, अगं वेडे तू हे काय बोललीस? जेमतेम पाच सहा हजार लोकसंख्येचे हे गाव, गावात एकही महाराजांचं मंदिर नाही, गावात गजानन महाराजांची फारशी माहिती नाही, जेमतेम बोटावर मोजता येतील एवढ्याच ठिकाणी पोथी वाचन होतं, तुला प्रगट दिनाचा प्रसाद मिळेलच कसा? या विचारांनी रडायला येऊन महाराजांना म्हणत होते, आज माझ्यासोबत तुमचीही परीक्षा आहे, आज प्रसाद मिळाला तरच मी भविष्यात तुमच्यासमोर पदर पसरविण्याच्या मनस्थितीत राहीन. नाही तर माझी हिम्मत तुटून जाईल. तुम्ही बघा काय ते.

माझं काम आटोपलं, संध्याकाळ झाली होती. मी हात पाय स्वच्छ धूवून कपडे बदलले, मला वाटलं, मैत्रिणीकडे जाऊन थोडं मन हलकं करावं. तेवढंच भुकेकडे तरी निदान दुर्लक्ष करता येईल. मी आईला विचारून दिपालीच्या घरी गेले, तर ती आमच्या दुसऱ्या मैत्रिणीकडे, वंदनाकडे गेलेली! म्हणजे अजून काही अंतर चालणं आले. पण म्हटलं, चला आज महाराजांनी परीक्षाच घ्यायची ठरवली आहे. दोन पावलं अजून चालू. मी तिथे पोहोचताच आतून दिपाली बाहेर आली. मला पाहून म्हणाली, सारिका तू किती भाग्यवान आहेस गं! अगं आज लातूरला गजानन महाराज मंदिरात प्रगट दिनाला माझ्या आत्यातर्फे महाप्रसाद होता. तिने एवढ्या पन्नास किलोमीटर दूर अंतरावरून हा डबा माझ्याकडे पाठविला. तोच प्रसाद घेऊन मी इथे आली आहे. हा घे प्रगट दिनाचा प्रसाद! ते ऐकताच मी दिपालीच्या गळ्यात पडून रडायला लागले. तिला सर्व कहाणी सांगितली आणि म्हटलं, दिपा असं म्हणतात की तुम्ही दोन पावलं देवाच्या दिशेने चाला, तो तुमच्यासाठी दहा पावलं समोर येईल. पण इथे तर मला दोन पावलं जास्त चालवून माझे गजानन महाराज माझ्यासाठी पन्नास किलोमीटर धावून आले. त्या दिवशी माझ्यासाठी त्या प्रसादाची गोडी अवर्णनीय होती.

महाराजांनी प्रगट दिनाचा प्रसाद देऊन माझ्यावर कृपा केली, त्या कृपा प्रसादाच्या योगाने माझ्या भक्तीत वाढ झाली हे तर खरेच पण पुढे वेळोवेळी मला तशी प्रचितीही दिली. माझं लग्न ठरत असताना आलेला एक अनुभव मला सांगावासा वाटतो, पुढे शिक्षणाच्या निमित्ताने मी माझ्या मोठ्या बहिणीकडे पुण्याला जाऊन राहीले. एकीकडे माझं शिक्षण पूर्ण होत आलं आणि दुसरीकडे माझ्यासाठी लग्नाची स्थळं पाहणं सुरू झालं. एका ठिकाणाहून मला होकार आला आणि घरच्यांना खूप आनंद झाला, पण तो थोडाच काळ टिकला, कारण तिकडून रोज नवीन निरोप, रोज नवीन मागणी सुरू झाली. सोनेच द्या, पैसे द्या, फाइव्ह स्टार हॉटेल बुक करा. घरचे परेशान झाले आणि इकडे त्या पंधरा दिवसांत माझ्याही मनाची अवस्था विचित्र झाली. रोजच्या मनाच्या हेलकाव्यांनी मी त्रस्त झाले आणि एका रात्री मी गजानन महाराजांच्या फोटो समोर हात जोडून उभी राहिले, म्हटलं, महाराज मला हा त्रास सहन होत नाही. यातून काही मार्ग काढा, मला ही अस्वस्थता आणि अस्थिरता नको, तुमची जशी इच्छा तसं होऊ द्या पण मला उद्याच्या दिवसात याचं उत्तर मिळायला हवं. एवढं म्हणून मी झोपी गेले.

दुसरे दिवशी सकाळी, मी, माझी बहीण, आणि तिची नणंद. आम्ही तिघी अंगणात गप्पा करीत असताना, एक उंच सावळ्या रंगाचा माणूस समोरून जात होता, तो माझ्याकडे पाहून बडबड करू लागला, ए बाई, मोडलं! मोडलं तुझं लग्न! त्याचं ते बोलणं ऐकून बहिणीची नणंद म्हणाली, अगं त्याच्याकडे लक्ष नको देऊ. हे लोक पैश्यासाठी असं काही करतात. त्यावर तो बोलला,अहो बाई पैशाचा प्रश्न येतोच कुठे? प्रश्न उत्तराचा आहे,ते देतो. बाईचं लग्न मोडलं! जाऊ द्या, बाईचं लग्न मोडलं! असं बोलत तो निघून गेला. बातमी लग्न मोडल्याची होती पण ती महाराजांच्या योजनेतून होती, त्यामुळे ती चांगलीच असणार, पुढे खरोखरच त्या स्थळाशी संबंध तुटले आणि नंतर समजलं की त्यांनी अशाच कारणानी किमान चाळीस ठिकाणी मनस्ताप दिला होता.

असो, महाराजांच्या आशीर्वादाशिवाय अजून काय हवं होतं, पुढे त्यांच्या आशीर्वादाने चांगल्या ठिकाणी योग जुळून आला. आज मी पोथी वाचायला घेते तेव्हा माझी मुलगी मला पोथीतील चित्र दाखविण्याचा आग्रह करते. मी पण प्रेमाने तिला चित्र दाखवून तिच्याकडून म्हणून घेते. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. सारिका सुमीत समदानी, घोडेगाव, ता. नेवासा - ९१४६१०७१४७.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! मी प्रवचनकार संजय देशमुख,माझा प्रवचनाचा विषय असतो मोरया अर्थात श्री गणेश! या विषयावर प्रवचन करण्यासाठी माझं रक्षण केलं संत शिरोमणी गजानन महाराजांनी. मी असं म्हणतो, याचं कारण माझ्या आईला माझं संगोपन करताना वेळोवेळी गजानन महाराजांचा भक्कम आधार मिळाला नसता तर मी आजचा दिवसच पाहू शकत नव्हतो.

माझी आई गजानन महाराजांची निस्सीम भक्त होती, त्यांच्यावर तिची अढळ श्रद्धा होती. अगदी तिच्या बालपणापासून! माझे वडील रेल्वेत नोकरीला होते. त्यांची शिफ्ट ड्युटी असायची. माझी आई मला माझ्या लहानपणची घटना नेहमी सांगायची, मी तेव्हा साधारण वर्षाचा असेन. आम्ही तेव्हा चंद्रपूर येथे रहात होतो. एक दिवस माझी तब्येत बिघडली, जुलाब व्हायला लागले,आईने घरच्यांना म्हटलं, कुणा डॉक्टरला बोलवायला हवं. पण घरच्यांनी तिच्याकडे लक्षच दिलं नाही. खरं तर आम्ही एकत्र कुटुंब पद्धतीत असल्याने घरी बरेच लोक होते. पण आईकडे पहाण्याची सासरच्यांची दृष्टी म्हणावी इतकी सहानुभूतीपूर्ण नव्हती आणि वडील ड्युटीवर गेले होते. अशात संध्याकाळ झाली पण लक्षणं काही घरगुती उपायांनी ठीक होईनात. आईनी पुन्हा म्हणून पाहिलं पण घरच्यांनी आईच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून, आम्हाला मुलं झाली नाहीत का?आम्ही वाढवलीत नं त्यांना? एखादी गुटी दे, होईल तो ठीक! असं म्हणून आईचं म्हणणं उडवून लावलं, रात्र झाली थोड्या वेळात सगळीकडे निजानीज झाली. आई मला मांडीवर घेऊन एकटी जागी होती. गुटी देऊन झाली पण लक्षणं काही कमी झाली नाहीत, उलट आता अंगही गरम वाटू लागलं रात्री तीन साडेतीनचा सुमार असेल मी हात पाय वाकडे करून डोळे फिरवले, आई घाबरली, तिला आता कुणाचा आधार होता? आईनी मला खाली ठेवलं, ती उठली, देवात गजानन महाराजांचा फोटो होता, आईनी रडत रडत, तो फोटो उालला, एका परातीत पाणी टाकलं आणि तो फोटो भिंतीशी परात ठेवून पाण्यात उभा केला, आता मी रडत नव्हतो, किरकिर करत नव्हतो, शांत होतो आता आई रडत होती, फोटो समोर बसून तिचा संवाद आता गजानन महाराजांशी सुरू झाला होता. ती म्हणत होती मान्य आहे मला आमची हयगय झाली पण तू पाहतो आहेस मी कुठे हलू शकत नव्हते, घरच्यांनी मी सांगूनही ऐकलं नाही, पण मला सांग यात त्या बाळाची काय चूक आहे? आमच्या चुकीची शिक्षा त्याला का? त्याचं रक्षण कर. मी तुला शरण आहे, या शिवाय मी काय करू शकते, रक्षण कर! असं म्हणता म्हणता रात्रभराच्या जागरणात काही क्षण तिला ग्लानी आली, जेमतेम उजाडू लागलं होतं आणि घराच्या दाराशी एक बैलगाडी येऊन थांबली. त्यातून एक गाडीवान आणि दाढी वाढलेले, शुभ्र धोतर आणि पांढरी बंडी परिधान केलेले एक, असे दोघेजण उतरले, घरात आले, ते आईला म्हणाले मला कळलं तुझ्या बाळाची तब्येत ठीक नाही, मी त्याच्यासाठी औषध आणलं आहे. हे घे ह्या तीन पुड्या. एक लगेच दे पाण्यातून, एक दुपारी, एक संध्याकाळी, बरं वाटेल तुझ्या बाळाला. असं म्हणून ते जाऊ लागले आईला वाटलं ह्यांना निदान रुपयातरी द्यावा, त्या काळी खूप किंमत होती रुपयाला, आईने शोध सुरू केला पण सहजपणे रूपया काही सापडला नाही ते वैद्यराज म्हणाले हे बघ मला काहीही नको, तुझं पोरगं बरं झालं की पाठवून दे एक रुपया, ते लगेच निघाले आणि बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज दूर दूर गेला.

आईने मला लगेच एक पुडी दिली आणि मला काहीच मिनिटात स्वस्थ झोप लागली, उरलेल्या दोन पुड्यांनी मला पूर्ण तंदुरुस्त केलं. सकाळ झाली, सूर्य वर आला, घराला जाग आली, आईला प्रश्न पडला होता ते वैद्यराज आले कसे? घरच्यांनी कुणाला सांगण्याची शक्यता नव्हतीच तरीही आईने सर्वांना विचारलं की त्यांनी कुणाला निरोप दिला होता का? नव्हताच दिला! शेजारच्यांना फारसं माहिती नव्हतंच तरीही आईने आजूबाजूला विचारलं, वडील घरी आल्यावर त्यांनाही विचारलं, तेव्हा फोन नव्हतेच त्यामुळे बाकी कुणाला काही कल्पनाच नव्हती. कुणीही कुणाला सांगितलं नव्हतच, मग ते कोण होते? आईसाठी शेवटपर्यंत तो प्रश्न अनुत्तरीतच राहिला. आईने फोटो पुसून जागेवर ठेवला पण तेव्हापासून खाली दोन इंच फ्रेम रंग जाऊन वेगळी दिसू लागली आणि आई त्या फ्रेमकडे पाहून तिच्या अनुत्तरीत प्रश्नाचं उत्तर शोधत राहिली.

पुढे सहा महिन्यानी वडिलांची बदली देवळाली, (नाशिक)इथे झाली. आम्ही रेल्वे क्वार्टर मधे रहायला गेलो. तिथे आजूबाजूला जंगल होतं, मागे डोंगर होता, तेव्हा तिथे वीज नव्हती, कंदील आणि चिमणी हेच काय ते प्रकाशाचं माध्यम. आई मला ही गोष्ट नेहमी सांगायची. दसरा येऊ घातला होता त्या निमित्ताने आमच्याकडे आजी आजोबा (आईचे आई वडील) आणि मावशी असे तिघेजण आले होते. त्या दिवशी कोजागिरी पौर्णिमा होती. वडील चार ते बारा ड्युटीवर गेले होते. महाराष्ट्रात बरेच ठिकाणी कोजागिरी पौर्णिमेला मोठ्या मुलाला, मुलीला, ओवाळण्याची प्रथा आहे. त्याला आसनी असं म्हणतात. त्या संध्याकाळी आईनी सतरंजी पसरली, त्यावर पाट मांडला व औक्षवणासाठी तबक तयार केलं. हे सगळं कंदिलाच्या अगदी मंद प्रकाशात होत होतं. आईनी प्रथम देवाला ओवाळलं, महाराजांना ओवाळून संजयचा जीव त्या दिवशी तुम्हीच वाचवला त्याचं सदैव रक्षण करा, अशी प्रार्थना केली. मला पाटावर बसवलं, मला शेजारच्या आलेल्या मावशींसह सर्वांनीच औक्षवण केलं. औक्षवणाचं काम पूर्ण होताच आईने तबक देवासमोर ठेवलं आणि मला पाटावरून उचललं. आई मला घेऊन जेमतेम मागे सरकली असेल तोच पाटाखालून एक दोन फूट लांबीचा नाग अचानक पाटावर आला. थोडा पाटावर स्थिरावला, फणा काढून सगळ्यांकडे पाहिल्यासारखं केलं आणि निघून गेला. सगळे स्तिमित होऊन फक्त पहात राहीले. नंतर कंदील घेऊन शोधाशोध केली पण तो कुठेही दिसला नाही. सगळे धास्तावल्यासारखे झाले. आजोबा आईला म्हणाले, तू यावर विचार करून बघ. याचे दोनच अर्थ निघतात, एकतर महाराजांनी नागापासून रक्षण केलं, नाही तर महाराज त्या रुपात आशीर्वाद देऊन गेलेत. पण काहीही असो, मला तरी महाराजांच्या अस्तित्वाची ही प्रचिती वाटते. तू एक काम कर, मला एक रुपया दे मी शेगांवला जाणारच आहे, तेव्हा तुझ्यातर्फे तिथे देईन. आजोबांचं ते वाक्य ऐकून आई नखशिखांत शहारली, तिला त्या दिवशीच्या एक रुपयाची आठवण झाली, तिने लगेच एक रुपया महाराजांना देण्यासाठी आजोबांच्या हातावर ठेवला. ती दक्षिणा तिच्या डोळ्यातून आलेल्या थेंबांनी आपोआपच ओली झाली होती.

पुढे आम्ही मोठे झालो, आईने तोच फोटो पुढील पन्नास वर्षे देवात सांभाळून ठेवला. पूजा करताना तिच्या हातात तो फोटो पाहून आम्ही भावंड म्हणायचो, आई तो फोटो नवीन करायचा का? ती म्हणायची, बिलकूल नाही. अरे तो महाराजांचा जागृत फोटो आहे! पुन्हा आग्रहपूर्वक म्हटलं की अगं ती फ्रेम तरी बदलवून घेऊ, त्यावर मात्र काहीच न बोलता त्या रंग गेलेल्या भागावर पकड मजबूत करून फक्त आमच्याकडे पहायची आणि म्हणायची. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय

गजानन!

श्री. संजय देशमुख, नागपूर - ९८६०३६२२४५.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! मी वैशाली फाटक, सांगली माझं माहेर आणि पोफळी माझं सासर. १९७४ ला माझं लग्न झालं. मागील पंचेचाळीस, शेहेचाळीस, वर्षांपासून मी गजानन महाराजांच्या अनुसंधानात आहे. गजानन विजय ग्रंथाची आजपर्यंत एकासनी आणि वेगवेगळ्या पद्धतीने खूप पारायणं पूर्ण झालीत, चिंतन झालं, आता मनातून पटायला लागलं आहे की, सद्गुरूंवर श्रद्धा ठेवून रहा ते तुम्हाला मार्गावरून ढळू देणार नाहीत. तुमच्या मनोकामना पूर्ण करतील आणि दुःख वाट्याला आलंच तर ते भोगण्याची शक्ती तुम्हाला प्रदान करतील. अशा तीनही बाबतीतील अनुभव जीवनात माझ्या वाट्याला आलेत.

जीवनात सुख दुःखाचं मिश्रण असायचंच, १९९५ साली माझ्या मोठ्या मुलाचं,डिप्लोमाच्या शेवटच्या वर्षाला असताना अपघाती निधन झालं. मी पूर्ण हलून गेले, हळवं मन आतून बाहेरून रडायचं, गजानन महाराजांना मी उभं राहण्याची शक्ति मागत होते. माझ्या काही मैत्रिणी मला म्हणू लागल्या, अगं तू कुणाला गुरू कर मनाला आधार मिळेल, पण मला ते पटत नव्हतं. मी म्हणायची गजानन महाराज आहेत, तेच माझे गुरू. एका मैत्रिणीने खूप आग्रह धरला की चिपळूणला एक जण आहेत ते तुम्हाला हवा तोच गुरू मंत्र देतात, ते ऐकून मला हसायला आलं, पण सगळ्याच म्हणू लागल्या की या गुरूपौर्णिमेला तू तिथे जा मी भांबावल्यासारखं होऊन तिला हो म्हटलं आणि साधारण एक तासाभरात मला काहीतरी वेगळं वाटायला लागलं,एक पिवळं कापड, त्यावर साधारण मूठभर लांबीची चिलीम, गंधाचे ओढलेले पट्टे, त्यावर हळदीकुंकवाची बोटं, असं दृश्य एकसारखं नजरेसमोर यायला लागलं, मला अन्य काही दिसेना, सुचेना, यात बराच वेळ गेला आणि मला पुंडलिक भोकरे आणि भागी ठाकरीणीची गोष्ट आठवली, मी लगेच महाराजांच्या फोटोसमोर हात जोडून उभी झाले, म्हटलं हा मी संकेत समजते, मी कुठेही जाणार नाही. तुम्हीच माझे गुरू, तुमचे चरण हेच श्रद्धा स्थान. माझी प्रार्थना झाली आणि अक्षरशः क्षणातच ते दृश्य नजरेसमोरून बाजूला झालं आणि मी नॉर्मल झाले. सद्गुरूंनी मार्गावर सांभाळून ठेवलं.

माझ्या लग्नाला जेमतेम एक महिना झाला होता, एके रात्री यांना अचानक उलट्या आणि जुलाब सुरू झाले, ते काही केल्या थांबेनात. कमालीचा अशक्तपणा येऊन यांना दवाखान्यात भरती करावं लागलं, सलाईन लावावं लागलं, डॉक्टरांना सहजी निदान होईना डॉक्टर म्हणाले बाकी कॉम्पलिकेशन्स झाले नाही म्हणजे मिळवलं. पाहू गॉड इज ग्रेट! मग काय माझा गॉड एकच. मी महाराजांना म्हटलं, संध्याकाळपर्यंत यांना घरी येऊ दे, मी गजानन विजयची एकवीस पारायणं करीन. डॉक्टरांना निदान होऊन औषध लागू पडलं आणि ह्यांना संध्याकाळी डिसचार्ज मिळाला. यांच्यावर आलेलं गंडातर टळलं होतं.

मी एकट्यात विचार करीत असते तेव्हा मला कधी कधी वाटतं, गजानन महाराजांच्या चरणाशी किती विविध प्रकारच्या मागण्या घेऊन भक्त येत असतात. महाराजांना सगळ्यांकडेच लक्ष द्यावं लागतं. मी एकदा महाराजांना एक विचित्र मागणी केली, कदाचित असं कुणीही मागितलं नसेल, अगदी आगळी वेगळी मागणी.

मला पाच नणंदा होत्या आणि एक दीर होते, सासरे हयात असताना तिघींची लग्न झालीत. दीराचंही लग्न नंतर झालं, आम्हाला दोन मुलं आणि एक मुलगी आणि दीरांना दोन मुलंच होती. असं म्हणतात की, कन्यादानाचं सौभाग्य लाभावं तो एक चांगला योग समजतात. मला मनातून वाटायचं की जर दोन्ही नणंदांच एकाच दिवशी लग्न होण्याचा योग आला तर एकीचं कन्यादान दीर जावेला करता येईल. मी तशी इच्छा कुटुंबात व्यक्तही करून दाखविली, मुळात लग्न ठरणंच महत्त्वाचा टप्पा , तेच सहजासहजी शक्य नाही. त्यात एकदम दोन लग्न आणि तेही एकाच दिवशी? मला सर्वांनी वेड्यात काढलं. मी म्हणायची सहाय्य होतो जगजेठी। हेतू शुध्द असल्यावर. मी गजानन महाराजांना रोज तशी प्रार्थना करायची, म्हणायची यात माझा काही स्वार्थ नाही. मी त्यांच्यासाठी अशी इच्छा धरून आहे. महाराजांनी माझी मनोकामना पूर्ण केली. २७ जुलै, १९८७ रोजी माझ्या दोन्ही नणंदांची लग्न, एकाच तारखेला, एकाच वेळी, एकाच ठिकाणी, गजानन महाराजांच्या कृपेने व्यवस्थित पार पडली आणि त्यात एकीचं कन्यादान आम्ही केलं आणि एकीचं कन्यादान दीर-जावेनी केलं आणि त्या दिवसापासून माझ्या जावेची महाराजांवर श्रद्धा दृढ झाली.

माझ्या मनातील अनेक इच्छा महाराजांनी वेळोवेळी पूर्ण केल्यात. अगदी मनोवांछित अपत्य प्राप्ती पासून तर ह्यांची नोकरी परमनंट होईपर्यंत. मीही अनेक वेळा महाराजांच्या चरणी एकवीस पारायणंरूपी दुर्वांची जुडी अर्पण केली आणि हे सर्व होत असताना माझ्या नकळत महाराज माझ्या मनावर संस्कार करते झाले. कदाचित पुढे मला फार मोठ्या संकटाला सामोरं जायचं आहे म्हणून की काय २००८ च्या सुमारास एक वाक्य राहून राहून माझ्या मनात घोळायला लागलं देवा जशी तुझी इच्छा, त्यातच माझं भलं! मग हळूहळू मनातून काही मागू नये असं वाटायला लागलं. मे २००८ मधील ती घटना. तिसरा अध्याय वाचत असताना, हे गंडांतर रुपाचे । मृत्यू दोन प्रकारचे । भौतिक आणि दैविक साचे । हे आहेत ख्यात जगी ॥ मृत्यू जो का अध्यात्मिक । तो कवणाच्याने न टळे देख । पाहा अर्जुनाचा बालक । कृष्णा समक्ष पडला रणी ॥ या ओव्यांवर मन घुटमळायला लागलं. एकसारख्या त्याच ओव्या डोळयासमोर नाचत होत्या. २७ मे २००८ रोजी हे घरातच ब्रेन हॅमरेज होऊन जमिनीवर कोसळले,यांना दवाखान्यात आय. सी. यू. मधे हलविण्यात आले पण तिथेही रक्ताची उलटी होऊन हे सगळ्याच्या पलीकडे पोहोचले, २९ मे रोजी ह्यांनी जगाचा निरोप घेतला आणि मृत्यू जो का अध्यात्मिक । तो कवणाच्याने न टळे देख । या ओव्या माझ्या नजरेसमोर वारंवार का येत होत्या, याचा उलगडा झाला. महाराजांनी ते दुःख भोगण्याचे धैर्य मला प्रदान केलं होतं.

चौतीस वर्षे साथ देऊन अचानक मिस्टर निघून गेल्यावर निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी आवश्यक असणारे धैर्य महाराजांनी मला देऊन आज माझ्या मनाची घडण अशी तयार केली आहे की, त्यांच्यासमोर प्रार्थनेला उभी राहिले की एकच मागणं मागितल्या जातं, गजानन महाराजा तुमच्या इच्छेप्रमाणे होऊ द्या. तुमची इच्छा तीच माझी इच्छा असू द्या! अर्थात आज ही इच्छा आनंददायी वाटते याचं कारण महाराजांविषयी मनात सातत्याने चालणारे चिंतन आणि त्या चिंतनाला आधार असणाऱ्या दोन गोष्टी, एक म्हणजे गजानन विजय ग्रंथाचे पारायण आणि दोन, महाराजांचा मनात सतत सुरू असलेला जप श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्रीमती वैशाली विलास फाटक, पुणे - ९६६५९६५८९६.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## २७ - जय जय स्वामी गजानन - श्री. पुंडलिक रामकृष्ण दोड, खुरई, जि. सागर (म. प्र.)

जय गजानन! जामनेर तालुक्यातील तोंडापूर या गावी एका गरीब कुटुंबात या पुंडलिकाचा जन्म झाला. वडिलांचं नाव रामकृष्ण. माझ्या नावाला साजेलसं वातावरण मला आमच्या कुटुंबात लाभलं. १९६६ चा तो काळ, त्या काळात शोभून दिसेल अशी आमची कुटुंब संख्या मोठी होती. आम्ही दोन भाऊ चार बहिणी, भावंडात अंतर जास्त. त्यामुळे १९७८ साली माझ्या मोठ्या बंधूंचं लग्न झालं तेव्हा मी लहान बारा वर्षांचा होतो. विवाहानंतर नवीन वर-वधू दर्शनासाठी तीर्थस्थानी जाण्याची प्रथा आमच्या परिवारात सुरुवातीपासून होती, त्यानुसार भाऊ उत्तमराव व सौ. चंद्रकला वहिनी यांच्यासोबत घरातील एक ज्येष्ठ सदस्य आणि मी, आम्ही दर्शनासाठी शेगांवला जावे असे ठरले, २० एप्रिल १९७८ ला शेगांवी मी प्रथमच गजानन महाराजांच्या समाधीवर मस्तक टेकले व मनाने ठरविले, महाराज! आजपासून मी तुमचा भक्त.

१९८९-९० साली मी महाराजांच्या कृपेने बी. एड. झालो आणि शिक्षकी पेशा स्वीकारला, त्यानंतर मी शिक्षक म्हणून विविध संस्थामधून वेगवेगळ्या ठिकाणी नोकरीच्या निमित्ताने फिरलो. १६ फेब्रुवारी १९९३ ला माझा विवाह संपन्न झाला आणि परंपरेनुसार सपरिवार गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगांव गाठलं. तेव्हा मला कल्पनाही नव्हती की आता आपल्याला नोकरीच्या निमित्ताने खूप दूर जावे लागणार आहे.

श्रीं चे दर्शन घेऊन परतलो आणि २२ फेब्रुवारी १९९३ ला जवाहर नवोदय विद्यालय, कीर्तनपूर, जि. बहराईच उ. प्र. येथे शिक्षक पदावर रुजू होण्यासाठी ऑर्डर हातात पडली. मार्च १९९३ ला मी कीर्तनपूर येथे सेवेत रुजू झालो. घरापासून तेराशे कि. मी. लांब उत्तर प्रदेशात. आता निदान काही वर्ष तरी तिथे रहाणं भाग होतं कारण शाळेच्या प्रशासनात विशिष्ट काळानंतरच बदलीसाठी अर्ज करता येतो, त्यामुळे मनातून तो बदल स्वीकारला पण मनाला रुखरुख याची होती की शेगांवला दर्शनासाठी जाणं सहजासहजी शक्य होणार नव्हतं शिवाय तिथे महाराजांचं मंदिरही नव्हतं, मंदिर तर असू द्या पण फोटो देखील मिळू शकला नाही. मग मी शेगांव संस्थानला एक विनंतिवजा पत्र लिहिलं आणि मला शेगांव व्यवस्थापनाचं कौतुक वाटलं, वास्तविक तिथे शेकडो पत्र त्या काळात येत असत, परंतु त्यांनी माझ्या पत्राची योग्य ती दखल घेऊन मला महाराजांचे दोन सुंदर फोटो पाठविले. पुढे रोज फोटो समोर उभा झालो की सूप्त मनात एक विचार येऊनच जायचा महाराज किती दूर पाठवलं मला, आता पुढील बदली तरी अशा ठिकाणी होऊ द्या की सहजपणे तुमच्या दर्शनाला येणे शक्य व्हावे.

मार्च २००१ मधे आम्हाला बदलीसाठी अर्ज करता येत होता, अर्ज भरत असताना महाराजांना प्रार्थना करता करता मी लिहिले महाराष्ट्रात कुठेही आणि अर्ज दिला. मे महिन्यातील सुट्यामधे प्रथम शेगांव दर्शनाला पोहोचलो तेव्हा महाराजांच्या कानावर ही गोष्ट घातली आणि पुढील आदेशाची वाट पाहू लागलो. २० जुलै २००१ ला माझी बदली नवोदय विद्यालय, नवसारी, अमरावती येथे झाली. माझी मनोकामना पूर्ण झाली.

शेगांवची वारी करता येते या आनंदात सहा वर्षे कशी निघून गेलीत कळलंच नाही आणि पुन्हा बदली होण्याचे दिवस आले. पुन्हा फॉर्म भरावा लागला,यावेळी दुसऱ्या प्रदेशात जायचे होते. सर्वांचा नंबर लागून माझ्यासाठी शेवटच्या दोनच जागा शिल्लक उरल्या, त्या म्हणजे उ. प्र. तील हरदोई व जम्मू जवळ कठूआ ! नाईलाजाने कठूआसाठी पसंती नोंदविली. शेगांवपासून खूप दूर जाण्याचा योग येत होता. मन नाराज झालं चेहऱ्यावर उदासी आणि मनात शेगांव आलं. जून महिन्यात शेगांवी जाऊन महाराजांना साकडं घातलं की एक वर्ष माझी बदली पुढे ढकला. २९ जून २००७ ला समितीच्या संकेतस्थळावर आमच्या बदलीची यादी जाहिर होणार होती. २९ जूनला विद्यालयात जाऊन संगणकावर यादी पाहिली, माझाच विश्वास बसेना, माझी बदली टळली होती. नाव न आल्याने मला आपोआप तिथेच एक वर्षाचं एक्सटेंशन मिळालं होतं.

मी दरवर्षी शेगांवला दर्शनासाठी जातच होतो, जसं जमेल तसं, आतापर्यंत अनेक वेळा जाणं झालं, पण ६ जून २०१२ ला झालेली शेगांव वारी एक वेगळया कारणाने आजही माझ्या स्मरणात आहे. मला आठवतं, संध्याकाळी साडेसात वाजता भुसावळ स्टेशनवरून पॅसेंजरनी आमचा प्रवास सुरू झाला पण काहीच वेळात काळेकुट्ट ढग, विजांचा लखलखाट, गडगडाट होऊ लागला. गाडी बोदवड स्टेशनात शिरत होती आणि धो धो पाऊस सुरु झाला. गाडी बराच वेळ तिथे थांबून होती. अर्थातच पुढील प्रवासाला विलंब होऊन, रात्री साडेअकराच्या सुमारास आम्ही शेगांवला उतरलो. बाहेर पडताच संस्थानची बस आम्हाला मिळाली, मंदिर परिसरात पोहोचताच भक्त निवास क्र. पाच मधे चौकशी केली असता रुम शिल्लक नाही, असे विश्वस्त सूत्रांनी सांगितले. आम्ही भक्तनिवास एकमधे चौकशी केली, तिथेही जागा नव्हती. आता रात्रीचे १२ वाजून गेले होते, त्या दिवशी तिथे खूप गर्दी होती, मग आम्ही गाद्या भाड्यानी घेऊन मंदिर प्रांगणातच झोपलो. रात्री दीड वाजता पावसाने सर्व भक्त गणांना जागे केले आणि सर्वांनाच आजूबाजूला जागा शोधून झोपण्याची सोय करणे क्रमप्राप्त झाले.

रात्री साडेतीन, चारच्या सुमारास मला जाग आली, पाहतो, तो पत्नीच्या उशाशी असलेली बॅग गायब झाली होती, माझी झोप पार उडाली कारण बॅगमधील वस्तूंची यादी मला आठवू लागली, पैशाची पर्स, घड्याळ, मोबाईल, एटीएम कार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स व मतदान कार्ड. मी बायको मुलांना जागं केलं, आजूबाजूला चौकशी केली पण व्यर्थ. प्रत्येक जण वेगवेगळा सल्ला देऊ लागला. मग क्षणभर डोळे मिटून विचार केला आणि म्हटलं, आपण पहिले महाराजांचं दर्शन घेऊ नंतर पोलिसांच्या कानावर घालू. महाराजांसमोर त्या दिवशी फार काही बोलणं सुचलंच नाही. एकच म्हटलं गजानन बाबा तुम्ही सर्व जाणताच, आज माझ्याजवळ काहीच नाही, बाकी सामान गेलं तर जाऊ द्या, पण कागदपत्र फार महत्त्वाची आहेत, ती मिळाली तर खूप बरं होईल.

दर्शन घेऊन आम्ही सकाळी सातच्या सुमारास पोलिस स्टेशन गाठले. तिथे श्री. शेख हवालदार ड्युटीवर होते, त्यांना सर्व हकीकत सांगितली, त्यांनी मी सांगितलेल्या नंबरवर फोन केला. दुसऱ्या तिसऱ्या रिंगच्या वेळी फोन उचलल्या गेला. तो हॉटेलचा वेटर होता त्यानी सांगितलं, ही बॅग पायरीवर ठेवलेली दिसली, त्यात हा फोन वाजला म्हणून मी उचलला. श्री शेख यांनी त्याला पत्ता विचारला, आम्ही लगेच तिथे पोहोचलो. बॅग पाहून मला आनंद झाला पण एक शर्ट, पैशाची पर्स, आणि कागदपत्र त्यात नव्हते. पुन्हा थोडा निराश झालो पण आता अन्य काही करण्यासारखे नव्हते. हरवलेल्या कागदपत्राचा एफ. आय. आर. नोंदविला. तिथल्या फौजदार

साहेबांनी चौकशी करून वाटेत अडचण आलीच तर त्यांच्या सहीशिक्क्यासह एक पत्र दिलं व काही पैसे देऊ केले. मी पत्र घेतले पण पैशाला विनम्रपणे नकार देऊन 'गजानन महाराजांची इच्छा' असं स्वगत बोलून स्टेशनचा मार्ग धरला.

पाय स्टेशनची वाट चालत होते आणि विचार पुढे धावत होते. मिळतील का कागद पत्र? की डुप्लीकेट करावे लागतील? पण आपण तर गजानन महाराजांना सांगितलं आहे? कोण आणून देईल? की पोलीसांचा फोन येईल? विचारांच्या तंद्रीतच स्टेशन आलं. समोर एक कार्ड पडलेलं दिसलं, ओळखीचं वाटलं,पाहिलं तर माझंच पॅनकार्ड होतं, पुढे दोन पावलावर निवडणूक कार्ड आढळलं, पाहतो तो काय माझे सर्व कागदपत्र एका रेषेत पडलेले आढळले. मग काय आनंद गगनात मावेना. भराभर एकेक कागद उचलत गेलो आणि प्रत्येक वेळी महाराजांचे आभार मानत मुखाने नाम घेत गेलो, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. पुंडलिक रामकृष्ण दोड, खुरई, जि. सागर (म. प्र.) - ९४२४४२६९४२.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! संत कवी ह. भ. प. दासगणू महाराज विरचित गजानन विजय ग्रंथाचं पारायण करीत असताना असे अनेक प्रसंग आहेत की जिथे भक्तांनी केलेला धावा आणि महाराजांचं हाकेला धावून जाणं किंवा काही मार्गदर्शन करणं, याचं वर्णन वाचलं की मनातील भक्तिभाव प्रज्वलित झाल्याशिवाय राहत नाही. मग वाटतं धन्य ती भक्ती धन्य तो देव! पुढे असही वाटतं की आपलीही भक्ती अशी तीव्र होऊ शकेल का? माझी एक मैत्रीण आहे तिची, गजानन विजय ग्रंथाची शेकडो पारायणं झाली आहेत. तिला महाराजांविषयी अनेकदा असेच विलक्षण अनुभव आले आहेत. तिच्या एका अनुभवात ती, महाराज आणि मी असा संबंध आहे, म्हणून तो अनुभव मला सांगावासा वाटतो.

एका पहाटे मैत्रिणीला स्वप्न पडलं. स्वप्नात येऊन गजानन महाराज तिला म्हणाले. 'वंशाचा दिवा! वंशाचा दिवा!' एवढं बोलून स्तब्ध झाले. तिला प्रथम काही अर्थबोध होईना. नंतर म्हणाले, तुझी मैत्रीण जी मनिषा आहे, त्या मनिषाला उद्या सकाळी दिवा दे. मनिषा घोरपडेला उद्या सकाळी दिवा द्यायचा आणि एवढं बोलून दिसेनासे झाले. सकाळ होतच आली होती, मैत्रीण जागी झाली, स्वाभाविकपणे तिच्या मनात विचार चक्र सुरू झालं, आपण घरातीलच दिवा द्यायचा आहे का? त्यापेक्षा तुळशीबागेत जाऊन छान नवीन दिवा विकत घ्यावा व तो देणं केव्हाही चांगलं. कारण हा महाराजांचा आदेश आहे. मैत्रीण स्नान पूजा करून तयार झाली आणि दारावरची बेल वाजली, मैत्रीणीनी दार उघडलं, दारात पोरगेलीशी स्त्री उभी होती, जिला चार पाच वर्षापूर्वी मैत्रिणीने गजानन महाराजांची उपासना करण्याचा सल्ला दिला होता. त्या सल्ल्यानुसार केलेल्या गजानन महाराजांच्या भक्तीची प्रचिती आल्यामुळे तिने मैत्रिणीसाठी विनम्रपणे एक भेटवस्तू आणली होती. पाच वर्षाच्या कालावधीनंतर ती प्रथमच येत होती. तिने एक सुंदर चांदीचा दिवा आणला होता, तिचा भक्तीभाव, हातातील दिवा आणि दिवा येण्याआधीच दिव्याविषयी महाराजांनी केलेलं मार्गदर्शन, या तीनही कारणांनी मैत्रिणीचे डोळे पाणावले. मनिषाला कोणता दिवा द्यावा? या प्रश्नाचं उत्तर तिला मिळालं होतं.

मला मैत्रिणीचा निरोप मिळाला, मी दिवा घेऊन आले. मला फारसं कळलं नाही पण मी महाराजांसमोर दिवा लावून प्रार्थना केली. दोन दिवसांनी तो दिवा मी बाजूला ठेवून दिला. माझा मोठा मुलगा मनोज, सून मानसी आणि पाच वर्षाचा नातू मानस असे तिघे तेव्हा बोरीवलीत राहत होते. माझा लहान मुलगा मयूर त्यांच्याकडे गेला होता. ते संध्याकाळी बाहेर फिरायला गेले आणि येताना मानस साठी तीन चाकी सायकल घेऊन आले. मानस स्वयंपाकघरात त्या सायकलवर उभा राहून फ्रिजवरून काही काढण्याचा प्रयत्न करीत असताना खाली पडला वरून एक बरणीपण खाली पडून फुटली. तिची काच मानसच्या डोक्याला लागली. जखम होऊन त्यातून चांगलंच रक्त यायला लागलं आणि त्याला दवाखान्यात भरती करावं लागलं, डॉक्टरांनी सांगितलं त्याला अंडर ऑब्झर्व्हेशन ठेवावं लागेल. मला ही सर्व घटना फोनवरून समजली आणि वंशाचा दिवा या शब्दाचा थोडा उलगडा झाला.

मी लगेच मैत्रिणीशी फोनवर संपर्क साधला आणि तिला ही घटना सांगितली. तेव्हा मी नियमितपणे मारुती स्तोत्र म्हणत असे. आम्ही दोघी थोडं सविस्तर बोललो. मी तो दिवा पुन्हा धुवून पुसून, तेलवात करून सिध्द केला. महाराजांसमोर शांतपणे संकल्पासह बसले, शेगांवचा औदुंबर वृक्ष आणि त्याही पूर्वीपासून असणारा मारुतीराया नजरेसमोर आला आणि महाराजांच्या साक्षीने त्या दिव्याच्या शांत प्रकाशात भीमरुपी स्तोत्राचं अकराचं एक आवर्तन, अशी अकरा आवर्तने केलीत. आम्ही उभयतांनी महाराजांना हात जोडून वंशाचा दिवा तेवत रहावा अशी प्रार्थना केली आणि मुंबईला चौकशी साठी फोन केला. नातू नवीन सायकलवर बसून आनंदात खेळत होता.

महाराज स्वप्नात येऊन भक्तांना मार्गदर्शन करतात असे अनेक प्रसंग गजानन विजय ग्रंथात आहेत. पेठकराचे ब्राह्मण भले। सांग कशाने राहिले?। अरे गजानन स्वामी गेले। त्या उभयतांच्या स्वप्नात॥ विसाव्या अध्यायात या ओव्या वाचताना मला देखील महाराजांनी बरेचदा स्वप्नी येऊन प्रचिती दिल्याची जाणीव होते. मनोज मुंबईला असताना मला नेहमीच वाटायचं की याला पुण्याला नोकरी लागली तर बरे होईल. अर्थात आई बापांना मुले जवळ असलेली आवडतात, हीच भावना त्यामागे होती. मी महाराजांना नेहमी तशी विनंती करायची, एकदा संध्याकाळी अशीच तीव्रतेने प्रार्थना केली आणि त्याच रात्री महाराज स्वप्नात येऊन मला म्हणाले अगं तुझा मनोज पुण्यात आला आहे तू काळजी का करतेस? मी मिस्टरांना सकाळी हे सांगितल्यावर त्यांनी त्याकडे फारसं गांभीर्याने पाहिलं नाही पण थोड्या वेळात घरासमोर गाडीचा ओळखीचा हॉर्न वाजला, मनोज आला होता, त्याला आम्हाला आश्चर्याचा धक्का द्यायचा होता. पण तो आत आल्या आल्या आम्हीच त्याच्या नवीन नोकरीचं विचारुन त्यालाच आश्चर्य चकित केलं. असे आहेत गजानन महाराज!

भक्त वत्सल गजानन महाराज केव्हा आणि कसे येऊन जातील, हे कोण जाणू शकतो? म्हणूनतर दासगणू महाराजांनी म्हटलं आहे, त्यांच्या दिनचर्येचा। नियम नव्हता एक साचा। प्रकार वायुच्या गतीचा। न ये ठरविता कोणासी॥ मला आठवतंय मागे मी एकदा एकवीस पारायणांचा संकल्प केला आणि प्रत्येक पारायणानंतर मुद्दाम कुणाला न बोलावता प्रथम जो कुणी येईल त्याला असोला नारळ आणि सव्वा रूपया दक्षिणा देण्याचा निर्णय घेतला. माझी सहा पारायणं पूर्ण झालीत, सकाळी ऑफिसची घाई असायची, पण पारायण, पूजा, तुळशीसमोर रांगोळी, सर्व उरकून ऑफिसला जात असे. सहा वेळा कुणी ना कुणी आलं होतं, सातव्या पारायणाच्या दिवशी आज कोण येईल? कोण असेल ती व्यक्ती? असा विचार पूजेत, पोथीत सतत डोक्यात घोळत होता. रांगोळी काढून मी आत येतच होते तो दारात असतानाच बेल वाजली, खरं तर मी तिथेच होते पण कुणी आल्याची चाहूलही लागली नाही. वळून पाहते तो पांढरा पायजमा आणि शुभ्र पांढरा शर्ट परिधान केलेला तो माणूस आत आला. मी विचारलं आपण कुठून आलात तर म्हणाला नागपूर हून येणं झालं नुकतच पारायण झालं होतं त्यामुळे मला तो चांगला योग वाटून मी त्यांनाच असोला नारळ व दक्षिणा दिली तर चालेल का? असा प्रश्न केला. त्यावर म्हणाले मी तेवढ्याचसाठी आलो आहे, मला घाई आहे, लौकर द्या. मी नारळ दक्षिणा देऊन त्यांना नमस्कार केला, त्याचा स्वीकार करून ते घाईने निघूनही गेले.

ते गेले, मी भानावर आले आणि अनेक प्रश्न डोक्यात फेर धरून नाचू लागले. बाहेर लगेच जाऊन पाहिलं पण कुणीही दिसले नाही. आधी कधी पाहिले नाही पुन्हा कधी दिसला नाही, कोण होता तो माणूस? पण तसं पाहिलं तर आता या प्रश्नांना काहीच अर्थ नव्हता, सर्व विचार बाजूला सारून मी ऑफिसच्या तयारीला लागले

आणि त्यांनी जिथे पाय ठेवले होते त्या जागेला पुन्हा नमस्कार करून मनापासून पुन्हा एकदा समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराजांचं मनोमन स्मरण केलं श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन!जय गजानन!

श्रीमती मनिषा मनोहर घोरपडे, सिहगड रोड, पुणे - ९०९६०८५११२.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## २९ - जय जय सद्गुरू गजानना, रक्षक तूचि भक्तजना - सौ. अनघा विजय जलतारे. नागपूर.

जय गजानन! १९६९ सालची ही गोष्ट, तेव्हा मी सहा वर्षांची असेन, वडिलांची अमरावतीहून नागपूरला बदली झाली, वडील गजानन महाराजांचे भक्त त्यामुळे स्वाभाविकपणे नागपूरात आल्यावर पहिली चौकशी, जवळपास गजानन महाराजांचे मंदीर आहे का? आम्हाला जिथे घर मिळालं, तिथून साधारण दोन कि. मी. अंतरावर धरमपेठ येथील झेंडा चौकात गजानन महाराज मंदीर आहे, असं वडिलांना समजलं. आज नागपूरातील अत्यंत जुन्या गजानन महाराज मंदिरात या मंदिराची गणना होते. वडील तिथे नियमाने दर्शनाला जाऊ लागले.

एक दिवस अचानक माझे डोळे आले आणि डोळे बंद झाले. वडील मला घेऊन डॉक्टरांकडे पोहोचले, डॉक्टरांनी एक औषध दिलं आणि म्हणाले, हे दोन दोन थेंब डोळ्यात घालायचं. पण औषध घालणार कसं ? माझे डोळे तर बंद. मी काही केल्या डोळे उघडेना. मग काय वडिलांची श्रद्धा, ते म्हणाले मी हिला गजानन महाराजांच्या दर्शनाला नेतो, डोळ्यासारखा नाजूक भाग, उगाच हयगय नको. संध्याकाळी वडिलांनी मला कडेवर घेतलं आणि मंदिराच्या दिशेने मार्गक्रमण सुरू झालं. मुखाने महाराजांचा नामजप सुरू ठेवला. वडील देवळात पोहोचले, तेथील अंगारा लावला, थोडा सोबत घेतला आणि प्रार्थना केली की, सर्वस्वी तुमच्या हाती आहे. माझ्या मुलीचे डोळे उघडू द्या. संध्याकाळी दर्शन घेऊन आम्ही घरी गेलो आणि सकाळी माझे डोळे आपोआप उघडले,त्यानंतर पुढील औषधोपचार सोपा होऊन आठवड्याभरात डोळे पूर्ववत झाले.

असे अनेक लहान मोठे अनुभव वडिलांना अनुभवता आले आणि महाराजांच्या चरणी त्यांची श्रद्धा दृढ होत गेली. गजानन विजय ग्रंथाच्या सोळाव्या अध्यायात शेवटी म्हटलं आहे, प्रचीती वीण कवणाची । परमार्थी न निष्ठा बसे । ती एकदा बसल्यावर । मग मात्र होते स्थीर ॥ संत सेवा महाथोर । हे भाविक जाणती ।.

वडिलांना जशी प्रचिती आली तशीच त्यांच्या सान्निध्यात राहून आम्हा तीन बहिणींना पण ती जवळून अनुभवता आली. वडील नियमाने विजय ग्रंथाचे पारायण करायचे. मी लहानपणापासून त्या गोष्टीची साक्षीदार आहे. वडिलांची पारायण करण्याची पध्दत काही औरच होती. पारायण करीत असताना,कुणी मनातल्या मनात वाचतं. कुणी हलकीशी ओठांची हालचाल करीत वाचतं. कुणी वेगाने ओळींवरून बोटं फिरवून पारायण करतात. कुणाचा गुणगुणल्या सारखा आवाज येतो. वडील अत्यंत भावपूर्ण, मोठ्याने, रसाळ पध्द्तीने पारायण करायचे. आजूबाजूनी कुणी नवखा माणूस गेला तर त्याला ते ऐकावसं वाटायचं. शेजारचे लोक नेहमी असं बोलून दाखवायचे. वडिलांचं मत असं, की जे करता ते भावपूर्ण अंतःकरणानी करा. एक मात्र निश्चित की आम्ही तिघी बहिणी वडिलांमुळे गजानन विजय ग्रंथाच्या संपर्कात आलो आणि पुढे आम्हीही पारायण करु लागलो. जसा माझ्या तब्येतीच्या बाबतीत अनुभव आला तसाच वेगवेगळ्या वेळी घरच्या बाकी सदस्यांनाही महाराजांच्या कृपाप्रसादाचा लाभ झाला.

माझ्याहून लहान आमची दोन नंबरची बहीण, तिच्या तब्येतीच्या बाबतीत आलेला अनुभव सांगताना तर आजही अंग शहारून येतं. १९७६ सालची ही गोष्ट आहे. प्रथम बहिणीला ताप आला, तसे आमचे नेहमीचे डॉक्टर होते डॉक्टर एम. एन. मोरे, पण त्यावेळी योग काही वेगळा असावा, काही कारणाने आम्ही एका वेगळ्या डॉक्टरांना बहिणीची तब्येत दाखविली आणि त्यांचं औषध सुरू केलं पण त्यांना काही निदान होईना आणि बहिणीची तब्येत बिघडतच गेली, ताप नॉर्मल होत नव्हता, तिचं खाणं पिणं कमी होत गेलं, कमालीचा अशक्तपणा आला, ती बोलेनाशी होऊन शांत निपचित पडली. डॉक्टरांना विचारलं, तर ते म्हणाले, ती अशक्तपणामुळे झोपली आहे. आई वडिलांना वाटलं, असेल अशक्तपणा, काही वेळानी दादांनी (वडील) सहज अंगाला हात लावून पाहिला आणि पहाताच दादांना धस्स् झालं. अंग थंड झालं होतं आणि तिच्या ओठांच्या बाजूला दोन चार मुंग्या फिरताना दादांना दिसल्या, त्यांचा समज झाला मुलगी गेली, ते जोरात ओरडून आईला म्हणाले आपली मुलगी गेली आवाज ऐकून शेजारचे लोक आत आले. दादा घाईघाईने डॉक्टर मोरेंना बोलवायला रवाना झाले आणि डॉक्टरांना घेऊनच ते घरी आले. डॉक्टरांनी तपासलं, डॉक्टर म्हणाले ती कोमात गेली आहे. आपल्यापाशी अठ्ठेचाळीस तास आहेत, या काळात ती शुद्धीवर आली तर वाचली, आपण प्रयत्न करू बाकी परमेश्वराची इच्छा. डॉक्टरांनी तिला घरीच सलाईन लावलं आणि औषधोपचार सुरू केले. तिच्यावर सतत लक्ष ठेवून रहा, हे सांगायला डॉक्टर विसरले नाहीत.

वडिलांनी गजानन महाराजांना कळवळून प्रार्थना केली, गजानन विजय ग्रंथ माथ्याला टेकला आणि उदबत्ती ओवाळून वडिलांचं पारायण सुरू झालं. निपचित पडून असलेली बहीण, आणि बाजूला चिंताग्रस्त बसलेले लोक. त्या दिवशी वडिलांच्या आवाजात एक वेगळीच आर्तता सगळ्यांना जाणवू लागली. प्रत्येक अध्यायानंतर बहिणीच्या अंगावर अंगाऱ्याचा हात मायेने फिरत होता. दासगणूंचे रसाळ वर्णन भावनेला हात घालत होते.

येवीतेवी मरते पोर । माझे आता साचार । पाहू करून एकवार । उपाय हा शेवटचा ॥ या ओव्या ऐकताना तर वडिलांसह बाजूला बसलेल्यांना हुंदका आवरणं कठीण झालं. अगदी पोथीसारखीच परिस्थिती होती. पुढे ओव्या आल्या, अमृततुल्य तुझी दृष्टी । त्याची करावी आज वृष्टी । नको करूस मला कष्टी । महापुरुषा गजानना ॥ भावनांच्या हिंदोळ्यावर मन खाली वर होत होतं. पुन्हा सगळे आशावादी होत होते आणि मनापासून तब्येतीसाठी प्रार्थना करीत होते. ती प्रार्थना महाराजांच्या चरणाशी पोहोचली. डॉक्टरांच्या उपचाराला यश आलं, दिलेला अवधी संपण्याच्या आधीच बहीण शुद्धीवर आली. तो टायफॉईड असल्याचं निदान झालं, अर्थातच पुढे योग्य कालावधीत तिची तब्येत ठणठणीत झाली.

आज आम्हा सर्व बहिणींची आणि आमच्या कुटुंबियांची गजानन महाराजांवर श्रद्धा आहे. आजही आम्ही एकत्र गप्पा करीत असतो तेव्हा गजानन महाराजांचा विषय निघाला की मागे घडून गेलेल्या बऱ्याच प्रसंगात महाराजांचा प्राप्त झालेला कृपाशीर्वाद आठवतो आणि सर्वच मनोमन महाराजांचे आभार मानून त्यांचं स्मरण करतो. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. अनघा विजय जलतारे. नागपूर - ९७३००७४७९३.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! माणसाच्या आयुष्यात काही घटना अशा घडतात की त्या नेहमीकरीता लक्षात तर रहातातच, पण जर आपण त्यापासून काही धडा घेतला तर त्या घटना आपल्याला बरंच काही शिकवून जातात. सद्गुरू गजानन महाराजांची भक्ती करणारे आपण सर्व भक्त अशा काही अनुभवांमधून गजानन महाराजांवर श्रद्धा ठेवून भक्ती करीत राहिलो आणि महाराजांची लीला, त्यांची करणी, आपल्या कल्पनेच्या बाहेर आहे, हे जर समजून घेऊ शकलो तर संत म्हणतात त्या प्रमाणे आपली वाटचाल योग्य दिशेने होते आहे, असं आपण म्हणू शकू.

मी माझं भाग्य समजते की, मी गजानन महाराज आणि गजानन विजय ग्रंथाच्या संपर्कात आले. मी आठव्या वर्गात होते, आम्ही ज्यांच्या घरी भाड्यानी रहायचो त्यांच्या घरी गजानन महाराज प्रकट दिन मोठ्या प्रमाणात साजरा व्हायचा. त्या काकू आईला म्हणायच्या, तुमच्या दोन्ही मुलांना ( मी आणि माझा भाऊ) प्रकट दिनाला पोथी वाचायला लावा. तिथून माझी पोथी सुरू झाली, ती लग्नानंतरही सुरूच राहिली. अगदी मिस्टरांच्या नोकरीच्या बदली मुळे वेगवेगळया गावीही महाराजांच्या कृपेने गजानन विजय वाचन सुरूच राहिले आणि शेगांवला गेल्यावर प्रथम समाधीला यथाशक्ती प्रदक्षिणा व नंतर गादी समोर पारायण, असा आनंदही महाराजांनी मला अनेक वेळा प्राप्त करून दिला. पारायणाच्या आनंदासह महाराजांनी प्रचिती पण अनेक वेळा दिली. गजानन महाराजांविषयी आलेल्या अनेक अनुभवांपैकी सोमवती अमावस्येला आलेला एक अनुभव नेहमी करीता लक्षात रहावा असाच आहे.

२०१६ ची ही गोष्ट आहे. मिस्टरांची बदली झाल्यामुळे त्यांना औरंगाबादहून कोल्हापूरला शिफ्ट व्हावं लागलं. मी मात्र दोन मुलांसह औरंगाबादलाच रहात होते. तेव्हा मी घरी महाराजांचा प्रगट दिन मोठ्या प्रमाणात साजरा करीत असे. त्या वर्षी प्रकट दिन एक मार्चला आला होता. महाराजांसमोर काय करता येईल? यावर विचार सुरू होता. असं वाटलं एकवीस दिवसात एकवीस पारायणं करावीत, एकविसावं पारायण प्रकट दिनाला करू या. ते लीप इयर असल्याने फेब्रुवारी एकोणतीस दिवसांचा, म्हणजे १० फेब्रुवारी पासून पारायणाला सुरुवात करावी लागणार.

असा सर्व तारखांचा हिशेब मनात सुरू होता आणि २५ जानेवारी ला नागपूरात सासऱ्यांचं निधन झालं. अंत्यविधी आणि पुढील क्रियांसाठी म्हणून मी व मुलं घरच्या गाडीने नागपूरात हजर झालो. आता सहा सात फेब्रुवारीला तेरावा चौदावा व पुढे उदकशांत. मात्र आठ फेब्रुवारीला अमावस्या येत होती. सोमवती अमावस्या, त्यामुळे दिरांनी उदकशांत ९ फेब्रुवारीला करण्याचा निर्णय घेतला. माझ्या मनात विचारांचं द्वन्द्व सुरू झालं. जर आपण १० फेब्रुवारीला, इथून निघालो तर एकविसावं पारायण प्रगट दिनाला कसं येऊ शकेल? मग दुसऱ्या मनाने उचल खाल्ली की आपण ८ फेब्रुवारीलाच निघू औरंगाबादला पंधरा. दिवस घर बंद आहे, तेव्हा ९ फेब्रुवारीला साफसफाई करून घेऊ म्हणजे १० पासून पारायणं सुरू करता येतील.

८ फेब्रुवारीला सकाळी ९ वाजता मी आणि दोन मुलं, आम्ही औरंगाबादसाठी अमरावती रोडने निघालो. अमरावती रोड फोर लेन आहे. मधे डिव्हाइडर,आणि दोन्ही बाजूंनी वेगाने वाहतूक सुरू असते. साधारण एकशे तीस कि. मी. अंतरावर तिवसा हे गाव येतं. ते क्रॉस करून आम्ही पुढे निघालो, ८०-९० च्या स्पीडने गाडी पुढे जात होती, मोठा मुलगा श्रीराम बाजूला सीट वर होता तर धाकटा तेजस गाडी चालवत होता. मी मागच्या सीटवर होते. समोर डॅशबोर्डवर गजानन महाराज विराजमान होते. माझे विष्णूसहस्त्रनामाचे पाठ सुरू होते, मुलगा रामरक्षा, मारुती स्तोत्र म्हणत होता. गजानन विजय ग्रंथही जवळ होता. अशा वातावरणात प्रवास सुरू होता. फोर लेन रस्ता असल्याने वाहतुकीत अडथळयाची शक्यता कमी होती. पण वाहतूक नियम धाब्यावर बसवणारे लोक केव्हा कुणाला कसे अडचणीत आणतील सांगता येत नाही. वाटेत एका ठिकाणी डिव्हाइडरवर वाढलेल्या झाडामागून अचानक एक ट्रॅक्टर रस्त्यावर आला. आता ब्रेक दाबून गाडी थांबविणे शक्य नव्हते, गाडी ट्रॅक्टरवर जाऊन आदळली असती. म्हणून मुलाने गाडी डावीकडे घेतली जेणेकरून गाडी ट्रॅक्टरच्या समोरून पुढे निघेल, तशी ती निघालीही पण डावीकडे खोल खड्डा आणि त्याला लागून शेत होतं. म्हणून रस्त्यावर आणण्यासाठी गाडी उजवीकडे घेतली, आता ती डिव्हाइडरवर आपटण्याची भिती होती म्हणून गाडीला ब्रेक लावत पुन्हा डावीकडे वळवली आणि काय होतयं हे कळण्याच्या आत पुन्हा शेतीच्या बाजूला येत गाडी डाव्याबाजूला पलटली, मग गाडी पूर्ण उलटी झाली, मग उजवी बाजू खाली झाली मग पुन्हा एकदा कुस बदलावी तशी पलटून गाडी सरळ होऊन थांबली. पुढची दोन चाकं खड्ड्यात मागील दोन चाकं उंचवट्यावर अशी तिरपी गाडी. हे सगळं काही मिनिटात घडलं. त्या काही मिनिटात एक मुलगा ड्रायव्हींगवर लक्ष देण्याचा प्रयत्न करीत होता, मोठा मुलगा आई गं, धावरे गजानन बाबा, असं ओरडत होता आणि मुलांची आई गजानन महाराज तुम्हीच आहात आता तुम्हीच आहात असं म्हणत होती. गाडी थांबली आम्ही तिघं गाडीतून खाली उतरलो तिघांनाही साधा ओरखडाही आला नव्हता. गाडीच्या उजव्या बाजूच्या आणि मागील बाजूच्या काचेचा पूर्ण चुराडा झाला होता. ड्रायव्हर आणि बाजूच्या सीटच्या मधील छताचा भाग दगडावर आपटून सहा इंच खाली आला होता. आता बघ्यांची गर्दी जमा होऊ लागली होती. अर्थात मदतही मिळाली, मिस्टर आणि दीर लगेच यायला निघाले.

आम्ही गाडीच्या बाजूला उभे होतो, मुलगा अस्वस्थपणे मला म्हणाला आई डॅशबोर्डवर गजानन महाराज दिसत नाहीत. मग आम्ही तिघांनीही आजूबाजूला, गाडीत, बराच शोध घेतला. पण ते कुठेच दिसले नाहीत आणि तेव्हा ते एक गुढच राहिलं. नंतर मिस्टर आणि दीर आल्यावर कार कंपनीत फोन करून गाडीची पुढील व्यवस्था करायला सांगितली आणि आम्ही एफ. आय. आर. साठी तिवसा पोलीस स्टेशन गाठलं. तिथला पोलीस यांना म्हणाला, साहेब तो स्पॉट डेंजरस आहे. मी मागील दीड वर्षापासून इथे आहे, या काळात तिथे बरेच अपघात झालेत आणि ते सर्व फॅटल होते. (जीवाची हानी होणारे) इतक्या मोठ्या अपघातात या लोकांना साधा ओरखडाही येऊ नये, हे कल्पनेच्या बाहेरचं आहे.

सर्व सोपस्कार पूर्ण करून आम्ही पुन्हा नागपूरला परतलो. मी मुलांना म्हटलं मोठ्या संकटातून महाराजांनी तारलं आहे. आता प्रथम शेगांवला दर्शन घेऊन नंतरच मी औरंगाबादला येणार. ९ तारखेला उदक शांत होऊन आम्ही बसनी शेगांवसाठी निघालो. दहा तारखेला शेगांवला पारायण केलं पुढील पारायणं रीतसर ठरल्याप्रमाणे घरी पार पडलीत आणि प्रकट दिन एकविसाव्या पारायणाने साजरा झाला.

पोथीमधे बाळाभाऊंनी भाऊ कवरांना म्हटल्याचा उल्लेख आहे की, मानवाचे अवघे बेत । सिध्दीस जाणे अशक्य । संतांच्या जे असेल मनी । तेच येत घडोनी ॥ भरवसा त्यांचे चरणी । ठेवून स्वस्थ असावे । महाराजांनी मला उदकशांतीच्या कार्यक्रमाला उपस्थित ठेवून, पारायणाची सुरुवात शेगांवहून करून घेतली. कल्पनाही केली नव्हती असा सुंदर प्रकट दिन पण करवून घेतला. म्हणूनच महाराजांसमोर हात जोडले की तोंडून आपसूकच शब्द बाहेर पडतात अगाध करणी तुझी गुरूवरा । न कोणा कळे ॥ कार कंपनीच्या वर्कशॉपमधे गेली होती, ती पुढे पूर्ण चांगली होणार होतीच, चार दिवसांनी तिथल्या वर्क मॅनेजरचा फोन आला, मॅडम लवकरात लवकर गाडी करण्याचा प्रयत्न करतो आणि हो, तुम्ही सांगितलं होतं म्हणून मी चेक केलं, डॅशबोर्डला थोडी गॅप होऊन आत गजानन महाराजांची मूर्ती अगदी सुखरुप आहे. मी मुलांना ती माहिती दिली आणि स्वाभाविकपणेच आम्ही एकत्र जय घोष केला, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. अंजली प्रशांत पट्टलवार, औरंगाबाद - ९४२२२१२९४६.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## ३१ - गुरु योग्य असल्यावरी वाया, न जाई सेवा खरी - श्री. मिलिंद भिडे, बडनेरा.

जय गजानन! चमत्काराशिवाय नमस्कार नाही. ही म्हण अत्यंत सार्थ आहे. चमत्कार जाणवला तरच नमस्कार करण्याची जगाची रीत आहे, हेही खरे आहे. पण नमस्कार करता करता चमत्कार जाणवला तर होणारा नमस्कार अधिक भावपूर्ण झाल्याशिवाय राहत नाही, हेही तितकंच खरं आहे.

गजानन महाराजांना नमस्कार करण्यास, मी केव्हा प्रारंभ केला मला आठवतं नाही. माझ्या घरी असं काही वातावरण नव्हतं की मी गजानन महाराजांच्या संपर्कात यावं हां पण एवढं मात्र निश्चित की ज्या भागात मी राहिलो, तो प्रदेश मात्र त्यांच्या चरण स्पर्शाने पावन झालेला आणि त्यात धन्यता मानणारा प्रदेश आहे. अमरावतीच्या जवळ बडनेरा येथे माझं राहणं. पोथीत म्हटलं आहेच, महाराज शेगांवासी आले । परी न स्थीर राहीले । हमेशा ते भटकत फिरले । मनास येईल त्या स्थळा ॥ अकोट अकोले मलकापूर । नावे सांगावी कुठवर?।, शेगांव, आकोट, अमरावती. किंवा शेगांव, अकोला, अमरावती. हा तो पट्टा आहे की जिथे महाराजांनी अनेक वेळा भटकंती केली, त्यामुळे त्या भागातील रहिवाशांकडून गजानन महिमान ऐकण्याचे भाग्य मला लाभले आणि त्यातून गजानन विजय ग्रंथाचा परिचय होऊन शेगांवच्या वाऱ्या सुरू झाल्या.

बडनेरा हे मुख्य रेल्वे लाईनवर येतं, त्यामुळे मनात येईल तेव्हा शेगांवला जाणे हा छंदच लागला होता. घरची आर्थिक स्थिती यथातथाच होती पण तेव्हा तिकीटही अगदी अल्प होतं. कधी मित्रही तिकीट काढून घ्यायचे त्यामुळे मित्रांसोबत शेकडो वेळा शेगांवला जाणं झालं होतं. आमच्या प्रवासात अनेक वेळा आमच्या बोलण्याचा विषय असायचा पायी वारी. लोक आषाढीला एवढे दूरदूरून पायी वारीत हजेरी लावतात आणि पंढरीचा कळस पाहून समाधान पावतात. पोथीत पुंडलिक भोकरे पायी वारीला जात असा उल्लेख आहे, बडनेरा-शेगांव साधारण १३४ कि. मी. अंतर आहे. आपण पायी वारी करावी का? असा विषय चर्चेला असायचा आणि एक दिवस आम्ही तीन मित्रांनी हे प्रत्यक्षात आणण्याचं ठरविलं.

मी स्वत मोती नगर अमरावतीचा माझा मित्र किशोर देशमुख आणि अजून एक मित्र, असे आम्ही तिघे ९ जानेवारी २००५ रोजी सकाळी बडनेरा येथून शेगांवसाठी पायी वारीला निघालो. आम्हा तिघांनाही पायी चालण्याचा अनुभव असा नव्हताच. वाटेत जिथे संध्याकाळ होईल तिथे थांबायचं, फक्त अकोला येथे किशोरची बहीण असल्यामुळे तिथला मुक्काम तेवढा मनात होता, बाकी महाराज करवून घेतील ह्या विश्वासाची शिदोरी सोबत होती. पहिल्या दिवशी उत्साहाने चालण्यास प्रारंभ केला, आपसात गप्पा करीत वाटचाल सुरु होती. अशा वेळी मौन ठेवून नामस्मरण केले तर पुण्यसंचय होऊन शक्तीचा व्यर्थ अपव्यय टळतो, याची कल्पना तेव्हा नव्हती. त्यामुळे दुपार टळता, टळता, तिघांनाही कमालीचा थकवा तर जाणवू लागलाच पण तिघांच्याही पायाला चांगलेच फोड आले आणि पाऊल पुढे टाकणे कठीण झाले. मधापुरी नामक गावाला आम्ही पोहोचलो होतो, तिथे एक लहरी बाबा मठ दिसला. त्यांनी आमच्या विश्रांती आणि भोजनाची सोय केली.

मात्र दुसऱ्या दिवशी आम्ही जेव्हा पुढे जाण्याचा निर्णय घेतला, आमच्या तिसऱ्या मित्राने माघारी परतण्याचा निर्णय घेतल्यामुळे, मी आणि किशोर आम्ही दोघेच शेगांवच्या दिशेने पुढे निघालो. रात्रभराच्या विश्रांतीमुळे थकवा थोडा कमी झाला होता पण पायांची अवस्था गंभीर झाली होती. पाऊल टेकवणं कठीण होतं. कसं बसं काही कि. मी. अंतर चाललो तर एक धाबा दिसला आणि त्या धाब्यावर एका छोट्या खोपट्यात एक शिंपी दुकान थाटून बसला होता. तिथे चिंध्यांचा ढीग पाहून मित्राच्या डोक्यात एक कल्पना आली त्या नुसार आम्ही त्या शिंप्याला चिंध्या देण्याची विनंती केली, त्याने त्या सहज देऊ केल्या, मग आम्ही नाडी आणि लांब चिंधीच्या सहाय्याने दोन्ही पायांना त्या चिंध्या बांधल्या. ते रूप दिसायला खूप विचित्र दिसत होतं. आम्ही गावात असतो तर मुलांनी आम्हाला चिंधीवाले बाबा म्हणून चिडवलं असतं, इतकं ते हास्यास्पद होतं. पण त्या चिंध्यांच्या सहाय्याने आमचं मार्गक्रमण पुढे सुरू झालं, पाय त्रास देत होते पण आता मनाच्या खंबीरतेने शरीराच्या वेदनांवर विजय मिळविला होता, गजानन महाराजांचं स्मरण आणि शेगांवचं दर्शन, दोनच गोष्टी महत्वाच्या होत्या.

मुर्तिजापूर साधारण तीन कि. मी. वर आलं असेल,रस्त्याच्या बाजूला मातीचं पठार आणि तिथे गर्द छायेचं कडुलिंबाचं झाड होतं, थोड्या विश्रांती साठी आम्ही तिकडे वळलो. झाडाखाली एक ऐंशी च्या वयातील खेडवळ म्हातारेबाबा बसले होते. त्यांनी विचारलं, कोठं चालले? म्हटलं, शेगांवला! गजानन बाबाच्या दर्शनाला? त्यांचा प्रश्न. मग विचारलं, पायाला कपडे काऊन बांधले? म्हटलं, पायी वारी करतो आहे, चालून पायाला फोड आलेत. बडनेऱ्याहून येतो आहे. म्हणाले, बाप्पा इतक्या दूरून? कायले शरीराची काहिली करून राहिले बापा हो, यानं कां देव भेटतो कां? अरे माय बापाची सेवा करावी, मानुसकीनं वागावं, देव त्यानं खूष होतो. माहं ऐकान तर घराकडे परत जा. पायाला दवापानी करा. दोन दिवसात पाय ठीक होऊन जाईन. देहाचे हाल अन् देवाची प्राप्ती याचा काही संबंध नाही राजे हो. देव अंतरात ठेवा लागते. त्याचं नामस्मरण करा लागते. मन शुध्द असन तिथे देव राहते. एवढं बोलून आमच्याकडे पाहिलं, त्यांच्या नजरेत वात्सल्य ओतप्रोत भरलं होतं. आम्ही उठलो त्यांना नमस्कार केला, म्हटलं, येतो आम्ही. त्यांनी विचारलं, मग? कोठं चालले? आम्ही म्हटलं, शेगांवला त्यावर म्हणाले, आता तुमची मर्जी. त्यांनी आशीर्वाद दिला गजानन बाबा तुमचं भलं करो !

आम्ही शेगांवच्या दिशेने पुढे निघालो. बघता बघता मुर्तिजापूरच्या वेशीवर येऊन पोहोचलो. मित्र म्हणाला, गावात शिरण्याआधी चिंध्या काढून घेऊ. एका चहाच्या टपरीवर आम्ही थांबलो, दोघांनीही चिंध्या काढल्या आणि दोघांचीही नजर मागे तीन कि. मी. वर काही दिसतं का यासाठी वळली पण इतक्या मागे पहाण्याची दिव्यदृष्टी आमच्या जवळ नव्हती. आम्ही डोळे विस्फारून एकमेकांकडे पाहू लागलो. दोघांचेही पाय पूर्ण ठीक झाले होते. पुढील दोन दिवसात पायी चालत असतानाच नामस्मरणाचा आम्हाला मिळालेला सल्ला आम्ही आचरणात आणला आणि अतिशय समाधानी वृत्तीने आमची वारी पूर्ण झाली.

आज त्या घटनेला खूप वर्ष होऊन गेलीत. आता ती जागाही तशी राहिली नाही पण आजही तिथून जाण्याचा कधी योग आला तर वेडं मन ते कडुलिंबाचं झाड कुठे दिसतं का आणि त्याखाली कुणी आहे का? हा शोध घेत रहातं. मग लगेच म्हातारेबाबांचा सल्ला आठवतो नामस्मरण, करा अन् जप सुरू होतो, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. मिलिंद भिडे, बडनेरा - ८३०८९३०७६६.

शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

### ३२ - मी गेलो ऐसे मानू नका, भक्तीत अंतर करू नका - श्री. जितेन्द्र विनायक करमरकर, नागपूर.

जय गजानन! शेगांवच्या वाटेवर चालायला मला माझ्या आईनं शिकवलं. माणसाच्या मनात प्रबळ निष्ठा असेल आणि दैवतावर निस्सीम प्रेम असेल तर बाह्य परिस्थिती माणसाच्या भक्तीत फारसे अडथळे आणू शकत नाही. वास्तविक आमची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती, आईला नोकरी करणं भाग होतं. ती रेल्वे मेन्स प्रायमरी शाळेत शिक्षिका म्हणून काम करायची. गजानन महाराज तिचं दैवत! आम्ही जिथे रहायचो तिथून शाळा तीन ते चार कि. मी. अंतरावर होती. बस आणि रिक्षाचे पैसे वाचवून आई रोज पायी शाळेत जायची ते पैसे बाजूला ठेवून शेगांवच्या तिकीटाचे पैसे जमले की शेगांवची वारी करायची.

अस्मितेने जगा, आपलं गाऱ्हाणं सांगायचंच झालं तर गजानन महाराजांना सांगा, आर्ततेने हाक मारा, ते तुमच्या हाकेला ओ देतीलच. अशी शिकवण देत देत तिनं आयुष्य घालवलं. २००८ साली आईने जगाचा निरोप घेतला. वडील एका टॉकीज मधे बुकींग क्लर्क होते, चार मुली एक मुलगा, घरभाडे, अत्यल्प मिळकत. ह्या सर्व रेट्यात त्यांचा प्रवास २००३ मधेच पूर्ण झाला. कशीबशी बहिणींची लग्न झालीत. खाजगी पध्द्तीने मला थोडेफार पैसे मिळू लागले होते आणि मीही लग्नाच्या बेडीत अडकलो.

इ. स २०१५ ची ही गोष्ट आहे. मी, बायको आणि आमची एक मुलगी, आम्ही तिघं भाड्याच्या घरात रहात होतो. कसाबसा संसाराचा गाडा रेटत होतो. जे काही थोडंफार कमवत होतो तो पैसाही कमी मिळू लागला. उधारी वाढत गेली, घरभाडं थकत गेलं, अनेक महिन्यांचं भाडं थकलं. घरमालक चांगला म्हणूनच त्यानी रस्त्यावर काढलं नाही. त्यालाही कळत होतं की याची नियत चांगली आहे, हा काम शोधतो आहे, पण नशीब साथ देत नाही. मी ही शरीराने आणि मनाने थकून गेलो होतो. नको ते विचार मनात डोकावू लागले आणि आईच्या शब्दांची आठवण झाली. मी माझी कैफीयत शेगांवला जाऊन सांगण्याचं ठरवलं. बायकोला सांगितलं, मी एक आठवड्यात परत येतो. जेमतेम एक वेळच्या तिकीटाचे पैसे आणि फार तर दहा वीस रुपये वरती, एवढेच पैसे होते. एका शबनम बॅगमधे दोन चादरी आणि एक ड्रेस ठेवला आणि शेगावची वाट धरली.

शेगांवला पोहोचताच नाग मंदिराच्या बाजूला जो मोकळा हॉल आहे, तिथे चादर घालून निवाऱ्याची जागा निश्र्चित केली. त्यानंतर पुढील सात दिवस, चार सव्वाचारला उठणे, नंतर शुचिर्भूत होऊन पहाटे पाच वाजता खाली मूळ स्वरूपातील मूर्तीचं दर्शन घेणे आणि नंतर पारायणगृहात गजानन विजय ग्रंथाचं पारायण करणे, नंतर महाप्रसाद घेऊन तृप्त होणे. जवळ पैसे नव्हते त्यामुळे संध्याकाळी जेवणाचा प्रश्र्नच नव्हता. पूर्ण सात दिवस एकवेळ जेवून महाराजांच्या अनुसंधानात घालविले, त्यांच्याच कृपेने तब्येतही ठीक राहिली. सातव्या दिवशी निरोप घेण्यासाठी महाराजांसमोर उभा झालो, डोळ्यातून अश्रू वाहत होते. महाराजांना म्हटलं, आज मी परत निघतोय. तुम्ही जाणताच तिकीटाचेही पैसे जवळ नाहीत पण सांभाळून घ्या. मी शुध्द मनाने निघतो आहे. मला माझं पुण्य किती माहिती नाही, पण मला वाटतं माझ्या आईची पुण्याई खूप होती. तिच्या सल्ल्यानुसार माझं गाऱ्हाणं तुमच्या समोर मांडलं आहे, आता अधिक काय बोलू? येतो मी.

मी परतीच्या प्रवासात ठरवलं होतं की, टी. सी. आलाच तर त्याला सगळं खरं सांगायचं, खोटं बोलायचं नाही. जे होईल ते होऊ दे. जनरलच्या त्या डब्यात त्या दिवशी टी. सी. आला. पण आश्र्चर्य म्हणजे माझ्या आजुबाजूला सर्वांकडे तिकीटाची चौकशी केली, पण माझ्याकडे पाहिलंही नाही आणि निघून गेला. गाडी नागपूर स्टेशनला थांबली मी सुखरुप बाहेर पडलो. मी सिताबर्डी भागात येऊन पोहोचलो, तिथे कसं काय कोण जाणे अचानक अशी प्रेरणा झाली की राजाराम वाचनालयात जा! मी पंचवीस वर्षांपूर्वी लहानपणी कधी तिथे गेलो होतो, माझी पावलं त्या दिशेने वळली. तिथे समोर मला वर्तमानपत्र दिसले, मी ते चाळू लागलो आणि माझी दृष्टी एका चौकटीवर येऊन थबकली, तिथे लिहीलं होतं, सहकार नगर गजानन महाराज मंदिरात पुजारी हवा. अपेक्षा:- पूजेचे कार्य व्यवस्थित करणे. निवासाची सोय मंदिरात करण्यात येईल. फोन नं. मी त्या नंबर वर फोन केला, त्यांनी दोन दिवसांनी भेटीला बोलावले.

शेगांवला महाराजांनी माझं गाऱ्हाणं ऐकलं, सात दिवसाच्या आत माझा प्रश्र्न मार्गी लावला. अनेक लोकांमधून गजानन महाराजांच्या मूर्तीची पूजा करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली. निवासाचा प्रश्र्न सुटला. नागपूरात सहकार नगरला गजानन महाराज मंदिराची विस्तीर्ण जागा आहे. रस्त्याला लागून थोडं आत मंदिराचा मुख्य प्रवेश दरवाजा, तिथून तीन चार पावलावर तुळशी वृंदावन, तिथून तीन चार पावलांवर मंदिराच्या पायऱ्या आणि दार. आत मंदिरात प्रवेश केला की साधारण पंधरा पावलावर पादुका, पुढे गाभारा आणि त्यात महाराजांची मूर्ती. पायऱ्या चढून मंदिरात आलं की उजव्या कोपऱ्यात एक तक्तपोस ठेवला आहे, तिथे वर महाराजांचा मांडी घालून प्रसन्न चित्त बसलेला मोठा फोटो आहे. तिथेच कोपऱ्यात एका छोट्या रॅकमधे काही गजानन विजय ग्रंथ ठेवले आहेत. मंदिरात सकाळ संध्याकाळ पूजा आरती होते, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या गुरूवारला भरपूर असतेच पण अन्य दिवशी पण बरेच भाविक येतात. सकाळी बाराच्या सुमारास नियमाने सहा सात भाविक दर्शनाला येतात. मी साधारण त्याच सुमारास पादुकांच्या भोवती स्वच्छ पुसून, मंदिराचं दार बंद करून पुन्हा संध्याकाळी दर्शनासाठी उघडतो.

शुक्रवार, २० ऑक्टोबर २०१७ ची ही गोष्ट. दिवाळी पाडव्याचा तो दिवस होता. आदल्या दिवशी लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने मंदिरातील फोटोंना हार घातले होते, बरेच लोक दर्शनाला येऊन गेले होते. त्या दिवशी साधारण साडेअकराच्या सुमारास मला काहीतरी विचित्र वाटायला लागलं, मंदिरात एक अस्वस्थ करणारी गूढ शांतता जाणवत होती. मंदिरात अन्य कामासाठी असलेला एक कर्मचारी आवारात दूर कुठे गेला होता. पावणे बारा वाजत आलेत, पण त्या दिवशी नेमाने येणाऱ्या भाविकांपैकी एकही मंदिरात वळला नाही. मी पादुकांच्या बाजूला खाली मान करून साफ करीत उभा होतो, अचानक कुणी ट्रक भर गुलाबाची फुलं बाजूला ठेवावीत असा घमघमाट सुटला, कुणीतरी बाजूला आहे असं जाणवलं, मी बाजूला पाहिलं आणि नखशिखांत शहारलो, मी खालून वर पहात गेलो, प्रथम गुडघ्यापर्यंत आलेले हात दिसले, बाजूला एक सहा फूट उंच अजानुबाहू पुरूष उभा होता. अंगात मळकट गुंड्या तुटलेला हाफ शर्ट, खाली बरमुडा वजा पैजामा, डोळे असे भेदक की नजर आपल्या शरीराला भेदून आरपार निघून जाईल. मला एक उष्णता जाणवायला लागली. काय बोलावं सुचेना. कसं तरी मी म्हटलं, मी येथील पुजारी आपण., मला तोडत म्हणाले, हो आम्ही सर्व जाणतो! तुमच्या आईच्या पुण्याईने तुम्ही आहात. बरं, हिशेब वगैरे ठेवता की नाही? काही पैसे द्यायचे आहेत, काढा पावती पुस्तक असं म्हणून एक

खुर्ची ओढून त्यावर बसले. अंगातील शर्ट काढून टाकला, म्हणाले, हां आता कसं आम्ही आमच्या वेषात आलो. खांद्यावरील बॅग मधून दोन हजाराच्या चार नोटा काढल्या आणि पाचशेच्या सहा. मग म्हणाले हं आता आम्हाला आवडणारा आकडा झाला. हे घ्या अकरा हजार. मी म्हटलं नाव काय लिहू? म्हणाले लिहा. गजानन महाराज, मी म्हटलं अहो असं नाव नाही लिहिता येणार तर म्हणाले न लिहायला काय झालं? सगळीकडे आमचं नाव मिरविता मग इथे का नाही? ठीक आहे असं करा शेगांवला आम्हाला नारायण म्हणतात तुम्हीही नारायण लिहा. मी सवयीने पावती आणि खडीसाखर त्यांना देऊन नमस्कारसाठी खाली वाकलो, जय गजानन म्हटलं आणि त्यांचा स्पर्श माझ्या डोक्याला जाणवला. जणू प्रचंड विद्युत प्रवाहाचा संचार व्हावा तसं होऊन मी घामाघूम होऊन गेलो. ते उठले कोपऱ्यातील फोटोकडे त्यांनी पाहिलं, म्हणाले, हा हार आमचा आहे. मग म्हणाले, गजानन विजय ग्रंथ मिळेल का? मी यंत्रवत पुढे होऊन एक पोथी काढली आणि त्यांना देणार तोच फोटोचा हार आपोआप खाली पडला. त्यांनी झटकन जमिनीवर टाकलेला शर्ट, पोथी आणि तो हार जवळच्या पिशवीत ठेवला. म्हणाले, येतो आम्ही आणि मी पहाताच राहिलो. तुळशी वृंदावनापर्यंत ते गेले आणि दिसेनासे झाले. मला काही सुचेना, भानावर आलो आणि वरती घरात शिरलो, बायको वेड्यासारखी माझ्याकडे पहायला लागली तिला म्हटलं मला आंघोळ करायची आहे. आंघोळ करून शरीर थोडं शांत झालं. बायकोला सगळा प्रकार कथन केला, मग मनही थोडं शांत झालं. त्या दिवशी आईच्या पुण्याईने मला महाराजांनी प्रचिती दिली होती. मी गेलो ऐसे मानू नका, भक्तीत अंतर करू नका.

आम्ही मंदिरातील सी. सी. टी. व्ही. कॅमेरा चेक केला तर त्यात फक्त माझ्या हालचाली दिसल्या. अन्य कुणीच दिसलं नाही. मी प्रसाद देताना दिसलो, पण कुणाला दिला ते दिसलं नाही. पैसे घेताना दिसलो, पण अकरा हजार कुणी दिले ते दिसलं नाही. मंदिराच्या व्यवस्थापनाने ते अकरा हजार रुपये महाराजांचा आशीर्वाद म्हणून जपून ठेवावे असं ठरवलं आहे. आणि हा सर्व प्रसंग आयुष्यभर जपून ठेवण्याचा मी प्रयत्न करणार आहे आणि त्यासाठी सहाय्यभूत ठरणारा जप सोबत असणारच आहे. श्री गजानन ! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. जितेन्द्र विनायक करमरकर, नागपूर - ९६२३८७०११८.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! माणसाच्या आयुष्यात ज्या काही बऱ्या वाईट घटना घडतात त्याचा परिणाम होऊन माणसाचं व्यक्तिमत्व घडत जातं. माझ्या आयुष्यात अनेक वेळा मी शारिरीक दृष्ट्या आणि मानसिक दृष्ट्या पार तुटून जाण्याचा योग आला, पण गजानन महाराजांच्या कृपेने मी त्यातून सावरल्या गेले. मात्र त्याचा परिणाम असा झाला की आता मी त्यांच्यासमोर बसते, संभाषण करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा जसं एखाद्या मुलीनी तिच्या वडिलांशी किंवा आजोबांशी बोलावं, किंवा प्रसंगी थोडं भांडल्याचा स्वर असावा, तसं काहीसं माझं होतं. ते नेहमी माझं ऐकतातच असं नाही, पण तिथे आपल्या लक्षात येतं की बालकाचे हित माऊलीवीण कोण जाणे? पण बहुतांश वेळा ते आपला प्रामाणिक हट्ट ऐकतात. अर्थात हा अनुभव माझ्यासह अनेक गजानन महाराज भक्तांचा आहे. गजानन महाराज त्यांच्या भक्तांसाठी जीवन जगण्याचा एक फार मोठा आधार आहेत.

इ. स २००५ मधे मी माझ्या दोन मुलींसह वर्ध्याला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. मला आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात ऑडीट सेक्शनला नोकरी मिळाली. साधारण त्याच सुमारास सीमालाही तिथेच नोकरी लागली. ती माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान, पण चांगली मैत्री व्हायची असेल तर वय कधीच आड येत नाही. सीमा मला मॅडम म्हणू लागली पण आमची मैत्री दृढ झाली. सीमाचं लग्न इ. स २००४ मधे झालं. सर्वसामान्य स्त्रीला मातृत्वाची ओढ असते तशी ती तिलाही होती. तिची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्यामुळे तिला नोकरी करणं भाग होतं. अशात तिने स्वतःच्या पसंतीने लग्न केल्यामुळे घरुन फारसं सहकार्य असं नव्हतं.

लग्नाला चार वर्ष होत आलीत, या काळात सीमाला मिसकॅरेज होऊन चार ते पाच वेळा मातृत्वपदाने हुलकावणी दिली. सीमा मानसिक दृष्ट्या पार खचून गेली, तिचा धीर संपत चालला. ती माझ्याजवळ तिचं मन मोकळं करायची, म्हणायची, मॅडम गजानन महाराजांजवळ माझ्यासाठी काही बोला नं! तशात २००८ साली वर्ध्याला गजानन महाराजांवर एक मोठ्या प्रमाणावरील नाटकाचा शो जाहीर झाला. मी आग्रहाने सीमाला नाटक पाहण्याचा सल्ला देऊन नाटकाच्या उत्कट क्षणी महाराजांना विनंती करण्याचा सल्ला दिला. सीमा तिच्या सासूबाईसोबत त्या दिवशी नाटकाला गेली अन् फारच प्रभावित झाली. सर्व उपस्थितांना झुणका भाकरीचा प्रसाद वाटण्यात आला.

योग चांगला जुळून आला, सीमाने काहीच दिवसात मला गुड न्यूज दिली. त्या दिवशी माझ्या गळ्यात पडून ती खूप रडली. म्हणाली, मॅडम मला मुलगी हवी आहे, पण या आधी झालं तसं व्हायला नको. तुम्ही प्लीज गजानन महाराजांना माझ्यासाठी साकडं घाला. म्हटलं, ठीक आहे, उद्या अनायास गुरूवार आहे, सकाळी प्रथम महाराजांच्या मंदिरात जाऊ, नंतर डॉक्टरांकडे. डॉक्टरांचा पूर्ण सल्ला नीट ऐकायचा. म्हणाली, ठीक आहे उद्या साडेनऊला मंदिरात भेटू या!

दुसऱ्या दिवशी सकाळी मगनवाडी येथील गजानन महाराज मंदिरात मला चक्क साडी परिधान केलेली पाहून सीमा कुतुहलाने पाहू लागली, तिला म्हटलं बाई गं आज तुझ्यासाठी मी अक्षरशः महाराजांसमोर पदर पसरून मागणी करणार आहे आणि आजच नाही, इथून प्रत्येक गुरूवारी मी महाराजांसमोर हे मागणं मागणार आहे. तेथील पुजारी हे सगळं ऐकून प्रसन्न हसले आणि मनोमन आम्हाला साथ देण्याचं ठरवून म्हणाले, आत या आणि जे काही बोलायचं ते बोला. मनात म्हटलं, देव पावला. मी महाराजांसमोर बसले, उदबत्ती ओवाळली, सीमा लक्षपूर्वक ऐकत होती, महाराज तुम्ही सर्व जाणताच. तुम्हीच सर्व ठीक करणार आहात, पण तरीही सध्या चार गोष्टी तुम्हाला सांगते आहे. एक- या वेळी आधीसारखं न होता गोष्ट पूर्णत्वास न्या. दोन-तिची आर्थिक स्थिती तुम्ही जाणता, या सगळ्यात तिची नोकरी सुटायला नको. तीन-बाळंतपणाचा खर्च आम्हाला फार झेपणार नाही तिकडेही लक्ष असू द्या आणि चार. तिला मुलगी झाली तर आम्हाला आनंद होईल. बाळंतपणानंतर मी स्वखर्चाने तिच्या बाळाला दर्शनासाठी शेगांवला घेऊन येईन. माझी प्रार्थना संपली, मिनिटभरानंतर मी डोळे उघडले. म्हटलं, चला डॉक्टरांकडे जाऊ. आमची नोकरी तिथेच असल्यामुळे डॉक्टरांनी आपुलकीनी तपासलं. केस हिस्ट्री समजून घेतली आणि प्रथम दोन महिने बेड रेस्ट सांगितली. या सगळ्या काळात बाकी लोकांसह ऑफिसनी छान साथ दिली. तिथे राहून तिला काम करण्याची अनुमती दिली. दोन महिन्यानंतर डॉक्टरांनी तपासून सांगितलं की, केस कठीण आहे. आम्हालाही शिकण्यासारखं यात आहे. सारखं सारखं ब्लिडींग हा काळजीचा विषय आहे. धिस सिम्टम इज रेअर, बट इट इज देअर. आपण काळजी घेऊच. त्या लक्षणा सह आणि चिंतायुक्त काळजीसह सीमानी नवव्या महिन्यात प्रवेश केला. बाकी कुणी काही उत्साह दाखविणार नव्हतंच. त्यामुळे मी तिचा पाळणा करण्याचा निर्णय घेतला. घरच्या गच्चीवर, जुलै शेवट किंवा ऑगस्टचा पहिला आठवडा होता. तो दिवस आला, संध्याकाळी कार्यक्रम होता. पावसाळ्याचे दिवस, विदर्भात खूप पाऊस होतो, असं नाही. पण जुलै ऑगस्ट या काळात येणारा पाऊस कधी झड लागणारा तर कधी धो-धो. नेमका त्या दिवशी सकाळपासून पावसानी जोर धरला. काळेभोर ढग. धो धो पाऊस. थांबायचं नाव नाही, मी सगळ्यांना निरोप देऊन ठेवले होते. माझा महाराजांवर पूर्ण भरवसा होता. मी पोथी वाचायला बसले. तेरावा अध्याय वाचायला घेतला, तै महाराज म्हणाले झ्यामसिंग। ऐसा सचिंत होसी कागा। तुला न उद्या देईल दगा। हा पर्जन्य कधीही॥ आताच मी वारितो त्यासी। ऐसे बोलून आकाशासी। पाहू लागले पुण्यराशी। तो आभाळ फाकले॥ मेघ क्षणात निघून गेले। सर्व ठायी उन पडले। हे एका क्षणात झाले। अगाध सत्ता संतांची॥ महाराजांना म्हटलं हा पावसाळा आहे हे खरंच. पाऊस यायलाच हवा. पण मी तुम्हाला सांगून कार्यक्रम ठरवला, आता सर्व जबाबदारी तुमची. मी पुढील कामाला लागते. मी रेनकोट चढवला, लाईटवाल्याच्या दुकानात पोहोचले. संध्याकाळी दोन लाईट लावायला सांगितले, त्याने प्रथम आभाळाकडे मग माझ्याकडे पाहून चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह आणले. त्याला सांगितलं. बाकी चिंता करण्याचं तुमचं काम नाही. तीच गोष्ट कॅटरिंगचं काम करणाऱ्या बाईची आणि सजावट करणार असलेल्या व्यक्तीची झाली. सीमाचा फोन आला. तिलाही सांगितलं, तू साडेपाचला माझ्याकडे येते आहे. पावसाची काळजी गजानन महाराजांवर सोपवली आहे आणि फोन बंद केला. साडेपाच वाजले आणि पाऊस अचानक थांबला. नुसता थांबला नाही तर रात्री साडेआठपर्यंत सुंदर कार्यक्रम पार पडला. सीमाला घेऊन तिचा नवरा घरी परत पोहोचला आणि पुन्हा धो धो पाऊस सुरु झाला.

नऊ महिने पूर्ण झाले होते, ३ सप्टेंबर २००९ सिझेरियनची तारीख ठरली. मी मंदिरातून अंगारा घेऊन दवाखान्यात पोहोचले, विशेष अनुमतीने अंगाऱ्याचं बोट मी पोटाला लावलं, सीमानी डॉक्टरांना सांगितलं की माझं बाळ सर्वात पहिले स्वाती मॅडमच्या हातात द्यायचं. मधल्या काळात आम्ही पेशंटची आर्थिक स्थिती आणि तो इथलाच कर्मचारी आहे. हे लक्षात घेऊन फी आकारण्याची विनंती करून ठेवली होती. त्या दिवशी सीमाला कन्यारत्न प्राप्त झालं, सीमाची नोकरीही टिकून राहिली

आणि तिच्या बाळंतपणाचं बिल काढण्यात आलं रू. सहाशे. या वेळी महाराजांनी माझ्या सगळ्या गोष्टी ऐकल्या होत्या. मी स्वखर्चाने सीमाला बाळासह शेगांवला नेऊन माझा नवस पूर्ण केला. त्यावेळी तिचा नवरा शेगांवला आला नाही, पण आज परिस्थिती बदलली आहे. सर्व कौटुंबिक वातावरण चांगलं होऊन पूर्ण कुटुंब गजानन महाराजांच्या भक्तीत रस घेऊ लागले आहे. सीमा तर या सर्व प्रसंगात गजानन महाराजांच्या कृपेने इतकी आनंदीत झाली की मॅडमचं स्वाती नाव आहे. त्यातील अक्षर तरी आपल्या मुलीच्या नावात असावं म्हणून तिने तिच्या मुलीचं नाव स्वरा ठेवलं. बारश्याच्या दिवशी सीमा मला म्हणाली, मॅडम तुम्ही काही तिच्या कानात बोला नं, मी लगेच खाली वाकले आणि स्वराच्या कानात हळूच सांगितलं, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

स्वाती देशमुख, वर्धा - ९७६४९७२७७९.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## ३४ - ते नाणं, भाव भक्तीचं - श्री. शैलेश देशकर, अहमदाबाद.

जय गजानन! आपण गजानन महाराजांची भक्ती करतो, गजानन विजय ग्रंथाचं पारायण करतो. पण बरेचदा माझ्या मनात येतं, आपण ओवी वाचतो, पण त्यावर मनन किती करतो? ओळ वाचतो पण पचवतो का? अर्थात हे माझं मनोगत आहे. त्यामुळे मी माझ्या पुरतं बोलतो आहे. मी अनेकदा पोथीत भाऊ कवरांचा प्रसंग वाचला आहे, गुरुराया कृपारासी । नको उपेक्षू लेकरासी । ही शिदोरी सेवण्यासी । यावे धावून सत्वर ॥ थोर आपुला अधिकार । क्षणात पाहता केदार । मग या या येथवर । का हो अनमान करीतसा ॥ हे मी वाचतो. पण प्रत्यक्षात काय झालं की मी वयानी मोठा होत असताना आणि चांगला इंजिनिअर होत असताना, माझ्यातील भाबड्या भक्तीने मला सुचवलं की, आपण भारतात वेगवेगळ्या ठिकाणी फिरतो तर सोबत गजानन विजय ग्रंथ घेऊन फिरायचं आणि त्या माध्यमातून गजानन महाराजांना त्या ठिकाणाचं दर्शन करण्यासाठी न्यायचं. मग काय? सात आठ ज्योतीर्लिंग, द्वारका, बदरीनाथ, वृंदावन, मथुरा आणि कळस म्हणजे पंढरपूर सुध्दा. अशा प्रत्येक ठिकाणी विजय ग्रंथ रुपात महाराजांना घेऊन गेलो. अशा रीतीने एकदा केदारनाथला पोहोचलो. महाराजांशी संवाद केला. महाराज हे केदारनाथ. आमचं दर्शन झालं आणि मी बाहेर पडलो, मागे असलेल्या शंकराचार्य मठात दर्शन घेऊन परत फिरलो, तो तिथे काही साधू बसले होते. मी तिकडे वळलो आणि एका साधू समोरच्या परातीत काही पैसे ठेवले आणि बाजूला होणार तोच चमकलो, माझ्या नजरेनी काही टिपलं, मी वाकून पाहिलं, तिथे गजानन महाराजांची मूर्ती होती. एवढ्या दूर केदारनाथला गजानन महाराज? मी साधूला विचारलं, साधू महाराज ये किसकी मूरत है? आप इन्हे जानते हो? साधू म्हणाला हां बेटा ये शेगांवके गजानन महाराज है! और इन्हे कौन नही जानता? बेटा ये तो सर्वव्यापी है. ये कहां नही? हे सर्व ऐकून माझंच मला हसायला आलं. क्षणात पाहता केदार ही ओळ मला त्या दिवशी समजली. तिथून पुढे हा दर्शन प्रकार कमी झाला आणि मनातील श्रद्धा जास्त झाली.

पुढे गजानन विजय ग्रंथाचं वाचन अधिक समरसून होऊ लागलं आणि महाराजांच्या कृपेने वेळोवेळी सुखद अनुभव सुध्दा वाट्याला आलेत. इ. स. १९९१ मधील घटना मला आठवते. त्या वेळी भारतात शेअर मार्केट मधे बूम पिरिएड होता, भरभराट होती. त्या वेळी मराठी माणूस शेअर्स वगैरे गोष्टींपासून दूरच होता. माझं शिक्षण सुरू होतं, माझ्या मित्राच्या डोक्यात एक कल्पना आली. एका चांगल्या कंपनीचा शेअर मार्केटमधे येतो आहे, तो विकत घ्यावा. हजार रुपये भरायचे होते. मला तेव्हा त्यातील काहीही कळत नव्हतं पण मी वडिलांना पैसे मागितले,त्यांनी अतिशय नाखुशीने हा आयुष्यातील पहिला व शेवटचा चेक, असं म्हणून माझ्याकडे चेक सुपूर्द केला. मी गजानन महाराजांचं नावं घेऊन फॉर्म भरून दिला आणि मित्रानी असे आठ दहा मित्रांचे चेक कंपनीकडे पाठविले. शेअर्स अ□लॉट व्हायला बरेच दिवस लागणार होते, त्यामुळे ती गोष्ट माझ्या विस्मरणात गेली. मी आपला अभ्यासात गुंतून गेलो.

महाराजांचा प्रकट दिन जवळ येत होता. माझं गजानन विजय ग्रंथाचं पारायण सुरू होतं. प्रकट दिन कशा पद्धतीने करावा? थोडे जास्त लोक प्रसादासाठी बोलवता येतील का? पण आपण विद्यार्थी आहोत. वगैरे विचार डोक्यात घोळत होते. प्रकट दिनाच्या काहीच दिवस आधी, मला पहाटेच्या सुमारास स्वप्न पडलं. मला दिसलं की मी शेगांवला गेलो आहे. दर्शनाच्या बारीतून फिरून माझं दर्शन पूर्ण झालं. गादीचं दर्शन घेऊन मी आवारात आलो आणि भिक्षुकाच्या रुपात महाराज माझ्यासमोर आले, मी त्यांना काही पैसे दिले. वास्तविक पैसे घेऊन त्यांनी निघून जायचं. पण तसं न होता ते म्हणाले, हात पुढे कर, तुला मी पैसे देतो आहे. हा पैसा तुला प्रगट दिनासाठी वापरायचा आहे. चांगल्या पध्द्तीने प्रगट दिन साजरा कर ! असं म्हणून त्यांनी माझ्या हातावर पूर्वी चलनात होतं तसं पंचवीस पैशाचं नाणं, चार आणे माझ्या हातावर ठेवले. मी नाण्यासह मूठ बंद केली आणि मला जाग आली. आतून आनंदाच्या ऊर्मी उठत होत्या. मी सकाळीच वडिलांना स्वप्न सांगितलं, त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रगट दिन करुच असा निर्णय घेतला. आमच्या गप्पा होत असतानाच ज्याने माझ्याकडून शेअर्स साठी हजार रुपयाचा चेक नेला होता, तो मित्र आला. त्यानी आनंदाची बातमी आणली होती. त्याने भरलेल्या आठ नऊ फॉर्मस् पैकी फक्त मला शेअर्स अ□लॉट झाले होते आणि ते विकल्यास हजार रुपयाचे तब्बल साडे दहाहजार रुपये मिळत होते. महाराजांनी संकेत केला होताच, आम्ही शेअर्स विकून आलेल्या पैशातून प्रकट दिन मोठ्या प्रमाणावर करण्याच्या तयारीला लागलो.

त्यावर्षी प्रकट दिन चांगलाच मोठ्या प्रमाणावर झाला. भजन, पूजन, आरती, महाप्रसाद, सर्व साग्रसंगीत पार पडलं. अहमदाबादसारख्या शहरात त्याकाळी गजानन महाराज, प्रकट दिन या विषयी फारशी माहिती नव्हती. त्या कार्यक्रमाचा परिणाम असा झाला की अनेकांनी आपुलकीने चौकशी करून पुढील वर्षापासून सर्व लोकांनी मिळून कार्यक्रम करण्याचा निर्णय घेतला. आज पंचवीस वर्षे झालीत, महाराज दरवर्षी आमच्याकडून वाढत्या प्रमाणावर प्रकट दिन करवून घेताहेत. पण या सर्व पार्श्वभूमीवर मला १९९१ साली घडलेली एक गोष्ट आजही अगदी जशीच्या तशी आठवतेय.

मला आठवतं, त्या दिवशी साडेतीनशे लोक महाप्रसादासाठी आले होते, पूजेकरीता आम्ही एका गुरुजींना बोलावले होते. मोठ्या प्रमाणात आरती झाली. आरतीच्या वेळी लोकांनी तबकात पैसे टाकले, आता सर्व कार्यक्रम संपत आला होता. आम्ही महाप्रसादाच्या तयारीला लागलो. आम्ही गुरुजींना म्हटलं तबकातील पैसे दक्षिणा म्हणून ठेवून घ्या. गुरूजींनी त्याप्रमाणे तबक रिकामं करून फोटोच्या बाजूला ठेवून दिलं. महाप्रसाद घेऊन आणि पुढील वर्षी प्रकट दिन करण्याचा निर्णय घेऊन सर्वांनी निरोप घेतला. मी एकटा महाराजांच्या फोटो समोर उभा झालो. कार्यक्रमाच्या यशाने मन समाधानाने भरून आले होते आणि डोळे भक्तीभावाने डबडबले होते. महाराजांना म्हटलं, तुम्ही सुचविल्याप्रमाणे दिलेल्या पैशातून प्रकट दिन करण्याचा प्रयत्न केला. तो गोड मानून आशीर्वाद द्या आणि मी गुडघ्यावर झुकून मस्तक टेकविलं, माझं लक्ष तबकाकडे गेलं. तबकात एक नाणं होतं, मला ते पाहिल्यासारखं वाटलं, मी उत्सुकतेने ते नाणं उचललं. ते पंचवीस पैशाचं नाणं होतं, ते चार आणे होते, ते तेच चार आणे होते जे महाराजांनी मला देऊन प्रगटदिन करण्याचा आशीर्वाद दिला होता, ते नाणं मी हृदयाशी कवटाळून धरलं आणि महाराजांचा आशीर्वाद म्हणून पाकीटात ठेवून दिलं, खरं सांगतो त्या दिवसापासून माझं पाकीट रिकामं नाही झालं.

आजही ते नाणं माझ्या पाकीटात आहे. लोकांसाठी जरी ते चलनातून बाद झालेलं नाणं असलं तरी माझ्यासाठी मात्र त्या नाण्याचं वर्णन आहे. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. शैलेश देशकर, अहमदाबाद (विश्वस्त, सद्गुरू धाम गजानन महाराज मंदिर) - ९४२७०१६३७८.

शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! कोकणातील रायगड जिल्ह्यात माणगाव या छोट्या गावात माझं बालपण गेलं. लहानपणी आजीच्या मागे मागे फिरत असताना तिच्या मनात असणारी गजानन महाराजांची भक्ती आणि गजानन विजय ग्रंथाचं वाचन, माझ्याकडे केव्हा आलं कळलंच नाही. मी माहेरची अस्मिता शेठ, लग्नानंतर झाले लीना धारिया. म्हणजे तसं पाहिलं तर मी गुजराथी पण आम्ही सगळे घरी मराठीच बोलतो. या मराठीचा उल्लेख मी याच्यासाठी करते आहे की संत कवि दासगणू महाराजांचं रसाळ मराठी गजानन विजय ग्रंथाच्या माध्यमातून माझ्यापर्यंत पोहोचलं, हे मी माझं भाग्य समजते. गेली अनेक वर्षे मी रोज एक अध्याय याप्रमाणे पारायण करते. शिवाय महिन्यात एकदा तरी एक दिवसीय पारायण करते.

लग्नानंतर मला वाटायचं, की, माझ्या मिस्टरांनीही गजानन विजय ग्रंथ वाचावा जेणेकरून त्यांना गजानन महाराजांचे महात्म्य कळेल व त्यांच्या मनात महाराजां विषयी भक्तिभाव जागृत होईल. मी त्यांना अनेक वेळा तसं म्हटलंही पण त्यांनी त्याकडे फारसं लक्ष दिलं नाही. अर्थात ते त्यांच्या व्यवसायात अतिशय व्यस्त असतात हे त्यामागचं मोठं कारण होतं. मिस्टर वाचनाचं मनावर घेत नाहीत हे लक्षात आलं, तेव्हा महाराजांना म्हटलं. माझी प्रामाणिक इच्छा तुम्ही जाणताच बाकी आता तुमची मर्जी.

महाराज आपल्या लहान लहान इच्छा पूर्ण करुन त्याचा परिणाम मात्र छान घडवून आणतात, असं बरेच वेळा लक्षात येतं. गेली पंधरा, सोळा वर्षे झालीत, आम्ही गणपतीच्या दहा दिवसात केव्हातरी एकदा सगळे मिळून शेगांवला जातोच, तसं २००९ साली आम्ही दोघं, मुलगा, माझी बहीण तिचे मिस्टर, लहान बहीण, असे सर्व शेगांवला दर्शनासाठी पोहोचलो. दर्शनानंतर मनात आलं की आज बंकट सदन पहावं. म्हणून आम्ही सर्व तिथे पोहोचलो. आम्ही तिथे असताना अचानक एक गृहस्थ तिथे आले. उंच, पांढरा शुभ्र पायजमा आणि अंगात पांढरा फुलशर्ट असा पोशाख होता. त्यांच्या हातात एक लहान पोथी सारखं साहित्य होतं. त्यावर लिहिलं होतं, सुख-शांती-समाधान व सुख समृद्धीत वाढ करणारे गजानन महात्म्य. त्यांचं व्यक्तिमत्व प्रसन्न होतं. ते आम्हाला म्हणाले, या, मी तुम्हाला बंकट सदना विषयी माहिती सांगतो. मग त्यांनी महाराजांना त्याकाळात आंघोळ कशी घातली, तो आंघोळीचा दगड, बैठक, महाराजांच्या लीला, या विषयी पाच मिनिटे माहिती दिली आणि मग त्यांनी ते पुस्तक माझ्या मिस्टरांना देऊन म्हटलं, तुम्ही फार व्यस्त असता पण हे रोज वाचा. फार वेळही लागणार नाही आणि तुम्हाला गजानन महाराजांविषयी माहितीपण होईल. मिस्टर ते पाहून हो म्हणाले आणि ते गृहस्थ निघून गेले. पुस्तक पाहून बहिणींना मोह झाला की आपल्याही जवळ हे पुस्तक असावे, म्हणून मग आम्ही बरीच दुकानं फिरलो. पण पुस्तक काही मिळालं नाही. तेव्हा माझ्या लक्षात आलं की, ते गृहस्थ निरपेक्षपणे पुस्तक देऊन निघून गेले, ते पुस्तक सहज उपलब्ध होईलसे दिसत नाही, आमच्यासोबत दोघंजण होते, नेमकं यांनाच कसं पुस्तक दिलं? हे फार व्यस्त असतात हे त्यांना काय ठाऊक? आजुबाजूला बाकी लोक होते, हे नेमके आमच्याकडे कसे आले? मला या पार्श्वभूमीवर पोथीतील ओवी आठवली, समर्थ वाक्य खोटे झाले । ऐसे कोणी न कधी ऐकिले । असो शेगांवचे लागले । लोक भजनी स्वामींच्या ॥ मनात म्हटलं बघूया काय होतंय ते. आज ही गोष्ट जुनी झाली पण मी प्रांजळपणे सांगते की तेव्हापासून मिस्टरांचं वाचन सुरू झालं आणि ते महाराजांच्या प्रेमात पडले, स्वामींच्या भजनी लागले.

आता गजानन स्वामी आमच्या सगळया घराचंच दैवत झालं. मी, हे, मुलगी, मुलगा. आम्हा सगळयांनाच शेगांव, गजानन महाराज, गजानन विजय ग्रंथ, हा आवडीचा विषय झाला. महाराजांनी अनेक वेळा लहान-सहान प्रसंगातून आमचं हे प्रेम वाढीस लावलं. एक आई म्हणून मला इ. स २०१२ मधे घडलेला एक प्रसंग इथे सांगावासा वाटतो. २ मार्च २०१२ रोजी आमच्या लग्नाच्या एकविसाव्या वाढदिवसाला महाराजांनी एक अनुभव दिला. त्या रात्री आम्ही दोघे आणि मुलगा रोहन हॉटेलमधे जेवायला गेलो. उत्तम दर्जाचं हॉटेल होतं. आम्ही तिघंही एकाच टेबलवर जेवलो, जेवण झालं आणि घरी यायला निघालो, तो रोहनला अस्वस्थ वाटू लागलं. वाटलं, थोडी अ□सिडीटी असावी, म्हटलं घरी जाऊन एखादी गोळी घेतली की होईल ठीक. पण प्रत्यक्षात घरी जाताना गाडीतच त्याला भडभडून उलटी झाली, इतकी की गाडी पूर्ण घाण होऊन गेली. घरात शिरलो तो त्याच्या अंगावर पूर्ण रॅश आला, सर्वांगाला खाज सुटू लागली, खाजवल्यावर अंगावर चट्टे पडले. अतिशय काळजी करण्यासारखी सगळी लक्षणं होती. रात्रीचे दहा वाजून गेले होते. मला रोहनची तगमग पहावत नव्हती. एका आईच्या हृदयात भावनांची विचित्र कालवाकालव होत होती, रडायला येत होतं पण रडताही येत नव्हतं. आईच रडली तर मुलाचं काय? आईसाठी एकच मार्ग होता, गजानन महाराजांचा धावा. काळजीत हेही होते पण यांनी लगेच निर्णय घेऊन आमचे फॅमिली डॉक्टर, डॉक्टर लाहोटींना फोन केला. नशीबाने ते दवाखान्यातच होते, म्हणाले ताबडतोब घेऊन या. गजानन महाराजांचा धावा करतच आम्ही दवाखान्यात पोहोचलो. तिथे टेबलवर मला गजानन आशिष मासिकाचा अंक दिसला, त्यावर असलेला गजानन महाराजांचा फोटो पाहून जीवात जीव आला. डॉक्टरांनी लगेच रोहनला तपासलं, त्याला फूड पॉयझनींग झाल्याचं निदान केलं. त्यानंतर डॉक्टर जे बोलले ते ऐकून आम्ही आश्चर्य चकित झालो. म्हणाले, तुमच्यावर देवाची कृपा आहे. आजच सकाळी एका कंपनीचा माणूस माझ्याकडे आला आणि अन्नातून होणाऱ्या विषबाधेवर या दोन गोळ्या आणि मलम देऊन गेला. जणू त्या तुमच्यासाठीच कुणीतरी पाठवल्या. कारण ही काही वारंवार येणारी केस नसते. शिवाय या गोळ्या अजून बाजारात यायच्याच आहेत. तुम्हाला कुठेही मिळणार नाही. एवढंच काय माझ्याकडे देखील तुम्हाला द्यायला तिसरी गोळी नाही, अर्थात त्याची गरजही नाही. ते ऐकून माझ्या तोंडून सहज निघालं गजानन महाराज की जय. मी गजानन आशिषचा तो अंक, महाराजांचा फोटो डोक्याला लावला आणि दोन दिवसांसाठी अंक द्या म्हणून डॉक्टरांची परवानगी घेतली.

एक गोळी डॉक्टरांनी तिथेच दिली, दुसरी घरी आल्यावर द्यायची होती,शिवाय मलम होतेच. आश्चर्य म्हणजे तासाभरातच रोहन एकदम ठीक झाला. दुसरे दिवशी त्या गोळयांचा आम्ही बाजारात खरोखरच शोध घेतला. खूप दुकानं पालथी घातलीत पण आम्हाला त्या कुठेही मिळाल्या नाहीत. एवढंच काय दुकानदारांनी ते नावही ऐकलं नव्हतं. खरं म्हणजे आपण एखादी वस्तू शोधतो तेव्हा ती मिळाली की आपल्याला आनंद होतो पण इथे उलटच होतं. त्या गोळ्या बाजारात नाहीत आणि केवळ आपल्याच डॉक्टरांकडे नेमक्या त्याच दिवशी, आपल्याचसाठी कुणीतरी त्या आणून ठेवाव्यात. याचा अर्थ माझ्या दृष्टीतून तरी एकच होता. तो म्हणजे, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. लीना धारिया, पुणे - ९०११४५९३५१.

शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! गजानन विजय ग्रंथात वाचकाला आर्थिक, सामाजिक, अध्यात्मिक पातळीवर मार्गदर्शन मिळू शकेल अशा अनेक ओव्या आहेत. एकोणीसाव्या अध्यायात बाळाभाऊंना उपदेश करताना महाराज जेव्हा म्हणतात, आम्ही ही भावंडे सारी । येतो झालो भूमीवरी । कैवल्याच्या मार्गावरी । भाविक आणून सोडावया ॥ हे ऐकून बाळाभाऊंच्या डोळ्याला प्रेमाश्रूंचा पूर येतो, हे वर्णन पारायणात मी जेव्हा वाचते, तेव्हा माझे डोळे पाणावतात आणि महाराजांना विनंती केल्या जाते. महाराज मला कैवल्याच्या वाटेवर घेऊन चला.

मी एकांतात जेव्हा विचार करीत असते तेव्हा मला नेहमी वाटतं, भक्ती साठी भक्ती, नामासाठी नाम आणि गजानन महाराजांची सेवा, हेच असावं काम! महाराजांची अखंड सेवा घडो, हेच मी महाराजांना लहानपणापासून मागत आले आहे आणि महाराजांनीही त्याकडे लक्ष दिले आहे. बाकी बाबतीत त्यांनी अनेक प्रसंगी माझ्या इच्छा पूर्ण केल्याच पण आज मी जे काही इथे सांगू इच्छिते त्यात सेवा घडू द्या, ही माझी विनंती महाराजांनी मान्य केली त्या विषयी कृतज्ञता व्यक्त करून ही सेवा अखंड घडत राहो, अशी विनम्र प्रार्थना त्यांच्या चरणी करणं, हा माझा शुध्द हेतू आहे.

दहा वर्षांपूर्वी एकदा माझ्या मनात तीव्रतेने असा विचार आला की, आपण शेगांवची पायी वारी करावी, पण हे जमणार कसं? मी एक स्त्री,घरून परवानगी मिळणे दूरची गोष्ट, पण मनात इच्छा तीव्र होती. परिणामी महाराजांनी असा काही योग जुळवून आणला की आम्ही काही समविचारी लोक एकत्र येऊन इ. स. २००९ ला आमचा कल्याण ते शेगांव पायी वारी करण्याचा योग जुळून आला आणि हे पायी वारी प्रकरण तिथेच न थांबता महाराजांच्या कृपेने दर वर्षी जानेवारी महिन्यात १ ते १७ तारखेच्या दरम्यान आम्ही एकवीस भाविक कल्याण-शेगांव पायी वारी करीत आहोत. आज दहा वर्ष या वारीला पूर्ण झालीत. सोळा ते सतरा दिवस पायी चालून आम्ही शेगांव गाठतो. वारीत एकवीसच भाविक असावेत असं काही आम्ही ठरविलेलं नाही. परंतु वाटेवर कधी कधी अगदी लहान गावात रात्री मुक्काम असतो. अशा वेळी भक्त आमची निजण्याची सोय महाराजांवरील भक्ती पोटी करतात. अशात घर लहान असेल तर थंडीचे ते दिवस असल्यामुळे आम्हाला घरात निवारा देऊन स्वतः मात्र बाहेर झोपतात. या सगळ्या पार्श्र्वभूमीवर आम्ही वारीतील संख्या वाढविण्याचा प्रयत्न करीत नाही. एक मात्र निश्चित आहे की, महाराजांच्या भक्तांनी केलेल्या आदरातिथ्यामधे अनेक हृदयस्पर्शी प्रसंग आम्हाला अनुभवायला मिळाले आहेत आणि ते सर्व महाराजांच्या भक्तीत वाढ करणारे आहेत.

इ. स. २०१५ ची ही गोष्ट, आमची कल्याण-शेगांव पायी वारी पूर्ण झाली. मुंबईला असणारे आमचे स्नेही आणि गजानन महाराजांचे भक्त श्री. माधवकाका जोशी यांची मी नित्याप्रमाणे भेट घेतली, त्यांनी आशिर्वाद देऊन पुढील वारीच्या आधी गजानन विजय ग्रंथाची ५०१ पारायणं पूर्ण कर, असं सांगितलं. तिथे समोरच महाराजांचा फोटो होता, माझे हात नमस्कारासाठी जुळले. मनावर आलेल्या दडपणासह माझ्या तोंडून प्रश्न निघाला, ३६५ दिवसात, ५०१ पारायणं? हे मी कसं करू शकणार? माधवकाका आत्मविश्वासाने उद्गारले, तू हे करू शकशील! त्यांचं ते वाक्य मनात घोळतच मी घरी पोहोचले. माझे मिस्टर जय यांच्या कानावर मी ती गोष्ट घातली. माझे मिस्टर बंगाली आणि मी मराठी. माझं पाहून त्यांनी इंग्रजीतून महाराजांची पोथी वाचणं सुरु केलं होतं. ते म्हणाले, महाराजांची इच्छा असेल तर काहीही अशक्य नाही.

मी २२ जानेवारी, २०१५ रोजी ५०१ पारायणं करायला सुरुवात केली. कधी दिवसाला दोन तर कधी एका दिवसात तीन पारायणं महाराज माझ्याकडून करवून घेत होते. असं करत माझी ४८० पारायणं पूर्ण झाली आणि मला लक्षात आलं की मला पोथी पाठ झाली आहे. मग मी सर्वानुमते असा निर्णय घेतला की बाकी पारायणं शेगांव मंदिराला प्रदक्षिणा घालीत पूर्ण करायची. मी २४ नोव्हेंबर २०१५ ते १६ डिसेंबर २०१५ या काळात शेगांव भक्त निवास क्र. एक येथील खोली क्र. एकोणीस मधे वास्तव्यास राहीले. संस्थानमधे तसा वेगळा फॉर्म भरून दिला. दर चोवीस तासांनी तेथील वास्तव्यासाठी सूचना देऊन प्रदक्षिणा करीत, करीत माझी एकवीस पारायणं पूर्ण झालीत. महाराजांनी एका वर्षात माझ्याकडून ५०१ पारायणं पूर्ण करण्याची सेवा करवून घेतली.

महाराजांची सेवा, महाराजांचाच आशीर्वाद घेऊन केली तर महाराजच ती पूर्ण करवून घेतात, असं अनुभवास येतं. मी मुंबईला डोंबिवली इथे असते. पाच वर्ष झालीत मी दर गुरुवारी शेगांवला दर्शनासाठी येऊन जसं जमेल तसं तिथे पारायण करण्याचा माझा प्रयत्न, महाराजांच्या कृपेनेच पूर्ण होऊ शकला. इ. स. २०१० ला महाराजांनी माझ्याकडून तीन दिवसात, पहिल्या दिवशी नऊशे, दुसरे दिवशी आठशे व तिसरे दिवशी चारशे. अशा एकवीसशे प्रदक्षिणा पूर्ण करवून घेतल्या.

माझ्याकडून महाराजांची सेवा घडत होती पण मी तसा नवस मात्र कधी बोलले नव्हते. मात्र इ. स. २०१३ ची गोष्ट असावी. माझी आई, जिच्याकडून माझ्याकडे ही भक्ती चालून आली. ती साधारण ७४ वर्षांची असताना एक दिवस घरातच पाय घसरून पडली. तिचं मणक्याचं ऑपरेशन करावं लागलं. एकीकडे तिला मधुमेहही होता, ती अंथरुणाला खिळल्यासारखी. झाली तेव्हा मात्र मी शेगांवला येऊन महाराजांना विनंती केली की, एकतर आईला पायावर उभे करा अथवा सोडवा. मी १००८ प्रदक्षिणा करीन. महाराजांनी माझं ऐकलं, आई चालू लागली आणि मी नवस फेडण्यासाठी शेगांव गाठलं. तो मे महिना होता. नेमका दशमी, एकादशी, द्वादशी असा योग आला. मी त्या तीन दिवसांत, एकीकडे पारायण गृहात हजेरी लावली आणि मला आठवतं एकादशीच्या त्या दिवशी काही अध्याय वाचून, मी दुपारी बाराच्या सुमारास १००८ प्रदक्षिणा घालायला सुरूवात केली. मे महिना म्हणजे ऐन उन्हाळा, त्या दिवशी महाराजांचं सान्निध्य अवतीभवती जाणवत होतं, त्यामुळे उन्हाची दाहकता कमी आणि भक्तीची शीतलता जास्त असा योग जुळून आला होता. महाराजांची कृपादृष्टी आपल्यावर आहे याची जाणीव होत होती. त्या दिवशी गजानन महाराजांनी कुठली अचाट शक्ती प्रदान केली, ते तेच जाणोत. पण अक्षरश: ना भूक, ना तहान, ना बाथरूम, ना काही, कुठलाही खंड न पडता , रात्री जवळपास एकच्या सुमारास प्रदक्षिणा पूर्ण करूनच मी थांबले. महाराजांना नमस्कार केला. अष्टसात्विक भाव दाटून आले होते. आजूबाजूला कुणीही नव्हतं. मग तिथे अश्रूंना वाट मोकळी करून दिली. काही मिनिटांनी लक्षात आलं, आता आपल्याला भक्त निवास चार मधील खोली क्र. पाच मधे परतायला हवं आणि जाणीव झाली आज आपण काहीही खाल्लं नाही. आता तर सर्वत्र सामसूम झाली, सगळं बंद. याच विचारात मी मुख्य प्रवेशद्वाराच्या बाहेर आले आणि अचानक कुठुनसे एक म्हातारे बाबा, मळकट धोतर, अंगात पांढरा सदरा समोर उभे झाले, मला विचारलं बेटा, चहा घेणार? मी म्हटलं, बाबा थोडा गोड चहा मिळेल? म्हणाले, पाच मिनिटं! पाचच मिनिटात एक मोठा काचेचा ग्लास भरून

गोड चहा आणि दोन बिस्किट पुडे मला देऊ केले. चहा पिणाऱ्यांना चहा नेहमी चांगलाच वाटतो, पण त्या रात्रीचा तो चहा आणि ती बिस्किटं माझ्यासाठी विलक्षण शक्तीदायी ठरलं. मी पैशाचं काही विचारण्याआधीच ते ग्लास घेऊन निघूनही गेले .

मी भक्त निवासात पोहोचले, निवांतपणे अंघोळ केली, महाराजांसमोर उभी झाले. सेवा घडली म्हणून कृतज्ञतेने नतमस्तक झाले, पुढेही अशीच सेवा हातून घडू द्या म्हणून प्रार्थना केली आणि अंथरुणावर पहुडले. माझा डोळा लागला. पहाटे-पहाटे, अर्धवट स्वप्नावस्था, अर्धवट जागृती अशा अवस्थेत एक मंद सुवास खोलीत दरवळला. माझ्या कानावर आवाज आला, घाबरु नकोस मी आहे आणि मला महाराज दिसले. फक्त काही क्षण. माझ्या १००८ प्रदक्षिणा आणि एका वर्षात ५०१ पारायणांचा प्रसादच जणू महाराजांनी दिला होता. महाराज जणू मला सांगून गेले. दुःख न करावे यत्किंचित । आम्ही आहो येथे स्थित । तुम्हा सांभाळण्याप्रती सत्य । तुमचा विसर पडणे नसे ॥.

उन्हाळ्याच्या दिवसात दिवसभर चालल्यानंतर वास्तविक शरीराला आणि मनाला दुसऱ्या दिवशीही थकवा जाणवायला हवा होता, पण तसं काहीही लक्षण नव्हतं. शरीराने आणि मनानेही मी पूर्ण प्रफुल्लित होते. ती द्वादशी होती, मला पारायण पूर्ण करायचं होतं. मी पारायणगृहात गेले. वाचन सुरू करण्यासाठी पोथी माथ्यावर धरली आणि गादीवरील फोटोकडे बघून मनात जयघोष केला. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

अस्मिता सेन, डोंबिवली (पूर्व) – ९८६७४२५१५३.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! माझं नाव सीताराम स्वामी. आन्ध्र प्रदेशातील पश्चिम गोदावरी जिल्ह्यात नरसापूरम या लहान गावात माझा जन्म झाला. माझं बालपण आणि शिक्षण आन्ध्र प्रदेशातच पार पडलं. माझी मातृभाषा अर्थातच तेलगू माझं इंजिनिअरींग विशाखापट्टणमला झालं. मी केमिकल इंजिनिअर आहे. हे सर्व ऐकून तुम्ही म्हणाल या माणसाचा संबंध शेगांवच्या गजानन महाराजांशी कसा? तर त्याचं असं आहे की प्रत्येकाचे सद्गुरू ठरलेले आहेत. सद्गुरूमधील गुरुत्वाकर्षण शिष्याला योग्य पध्द्तीने गुरुंकडे आकर्षित करून घेतं.

मला नोकरीच्या निमित्ताने १९८५ साली वडोदरा (बडोदा) येथे जाण्याचा योग आला. तिथे मी एका मराठी कुटुंबाशी जुळल्या गेलो आणि १९८८ साली विमलशी विवाह होऊन मी त्यांचा जावई झालो. विमलची मोठी बहीण आणि तिचे मिस्टर गजानन महाराजांचे भक्त! ते मला वारंवार गजानन महाराजांविषयी सांगायचे. अशात आम्ही इ. स. २००० च्या सुमारास अष्टविनायक, पंढरपूर, शिर्डी, शेगांव अशा स्थळांचं दर्शन घेतलं आणि त्या लोकांनी मला गजानन विजय ग्रंथाची इंग्लिश आवृत्ती घेऊन दिली व हे वाचा तुमचं भलं होईल, असा सल्ला दिला. मी ते पुस्तक स्वीकारलं आणि कपाटात ठेवून दिलं, मी अनेक वेळा पुस्तक हाती धरायचो पण कधी चार ओळी वाचून तर कधी एखादं चित्र पाहून कपाटात ठेवून द्यायचो. वास्तविक मला वाचनाची प्रचंड आवड पण त्या पोथीचा योग महाराजांच्या मनात काही वेगळा होता.

पोथी घेऊन जवळपास दोन वर्षं होत आलीत, अजूनही वाचनाचा योग आला नव्हता आणि महाराजांनी एक विलक्षण योग जुळवून आणला. २००२ ची ती गोष्ट असावी. आता मी इंडियन ऑइल कार्पोरेशन मधे रुजू झालो होतो. उत्तर प्रदेशातील आग्रा येथून जवळ तुंडला नावाचं गाव आहे. तिथे आमच्या प्लांटचं काम सुरू होतं. कंपनीने मला तिथे इन्स्पेक्शनसाठी पाठविलं. दूर अज्ञात गावी एकटं जायचं आहे. म्हणून घरच्यांनी माझ्या सामानासोबत मला पोथी दिली. मी पण ती आधार म्हणून ठेवून घेतली. मी तुंडला येथे पोहोचलो. हॉटेलवर सामान ठेवलं आणि प्लांटला भेट दिली. मला तिथलं वातावरण वेगळं, संशयास्पद आणि भयावह वाटलं. मी थोडा वेळ तिथे घालवून संध्याकाळी परत येतो, असं सांगून हॉटेलवर परतलो. त्या दिवशी प्रथमच मला जाणवलं की इथे आपल्याला एकच आधार आहे आणि तो म्हणजे गजानन महाराज, मी सामानातून पोथी बाहेर काढली आणि चक्क चार अध्याय वाचूनच पोथी बाजूला ठेवली. मनातून महाराजांचा खूप आधार वाटू लागला. मी संध्याकाळी पुन्हा कामाच्या ठिकाणी गेलो, मी टेबलशी बसलो असतानाच अचानक सहा सात गुंड प्रवृत्तीची माणसं चक्क हातात बंदूक घेऊन आत शिरली, त्यांनी माझ्या कानशिलाला बंदूक लावली. त्यांच्या मते त्यांना आमच्या कंपनीकडून वीस ते पंचवीस लाख रुपये घ्यायचे होते. ते म्हणाले. आम्ही तुम्हाला इथून बाहेर जाऊ देणार नाही, जास्त गडबड केली तर मारुन टाकू. त्या दिवशी मी आयुष्यात प्रथमच महाराजांचा धावा सुरू केला. थोडा धीर आला. मग परिस्थिती समजावून घेतली. माझ्या लक्षात आलं आमच्या सब कॉंट्रॅक्टरनी पैशाचे गैरव्यवहार करून त्यांचे पैसे दिले नाहीत. गजानन महाराजांच्या स्मरणामुळे मी धैर्याने प्रसंगाला सामोरा जाऊ शकलो. माझी बाजू त्यांना पटली. त्या दोन तीन दिवसांत एकीकडे हॉटेलवर सकाळ संध्याकाळ मिळून मी पारायण पूर्ण केलं आणि दुसरीकडे महाराजांच्या कृपेने परिस्थिती निवळत गेली. हा माणूस आपल्या हितासाठी काही करेल अशी त्यांना खात्री पटली आणि तो दौरा संपला. तिथून माझं रोज एक चॅप्टर प्रमाणे पारायण सुरू झालं. दुसऱ्या पारायणाचे वेळी एकविसाव्या चॅप्टर मधे दशमी एकादशी द्वादशी ला पारायणाचे महत्त्व असा उल्लेख आला. तेव्हा मला सहज वाटलं की तुंडला येथे कोणत्या तीन दिवसांत आपण पारायण केलं? मी आश्चर्य चकित झालो जेव्हा मी कॅलेंडरमध्ये तपास केला. महाराजांनी माझ्याकडून आयुष्यातील पहिलं पारायण योगायोगाने दशमी एकादशी द्वादशीलाच करवून घेतलं होतं .

माझी निष्ठा आता गजानन महाराजांच्या चरणी जडली. मला मनातून वाटू लागलं की, अम्माला देखील महाराजांविषयी काही कळावं, पण त्यासाठी आवश्यक होती तेलगू पोथी. त्यासाठी मी शोध घेतला पण तेलगू पोथी काही मिळू शकली नाही, ही २००७ ची गोष्ट आहे. मी त्या विचारात असतानाच मला कामासाठी जपानला जाण्याचा योग आला. मला आठवतं तो मे महिना होता, मी महाराजांसमोर उभा राहिलो की मला जणू ते सुचवायचे की अम्मासाठी तूच तेलगूतून पोथीचं भाषांतर कर. प्रथम मी हा विचार बाजूला सारला. कारण गेली पंचवीस वर्षे माझी तेलगू लिहीण्याची सवय सुटली होती. पण एकदा रात्री दोनच्या सुमारास माझ्या कानात कुणीतरी म्हटलं, उठ, पोथीचं तेलगू भाषांतर कर. मी खडबडून जागा झालो आणि कागद घेऊन रात्रीच भाषांतर सुरू केलं. त्या नंतर मला लगातार रोज रात्री बरोबर दोन वाजता कुणी तरी उठवल्यासारखी जाग येत राहिली आणि मी भाषांतर करीत राहिलो. आषाढी एकादशीच्या दिवशी माझं रफकाम पूर्ण झालं. मी महाराजांच्या चरणी ती पोथी ठेवून प्रार्थना केली. म्हटलं, महाराज तुम्ही सुचविल्याप्रमाणे हे काम केलं आहे याला पूर्ण चांगल्या रुपात मी गणपती बसतील त्या दिवसापर्यंत पूर्ण करून त्या दिवशी पूजेत ठेवून अथर्वशीर्षाची एकवीस आवर्तनं करीन मात्र आता मला हे काम संध्याकाळी ते रात्री साडेदहा पर्यंत करण्याची अनुमती द्या आणि ही पोथी मी अम्माला शेगांव इथे देऊ इच्छितो ते तुम्ही घडवून आणा. महाराजांनी ही विनंती मान्य केली त्याच रात्रीपासून मला कुणीही उठवलं नाही आणि माझ्या अम्मासाठी तेलगू पोथी तयार झाली. पुढे भारतात परतल्यावर मी, विमल, मुलगा आनंद, आणि आमचे लिमकर म्हणून एक स्नेही, आम्ही अम्माला घेऊन शेगांवला पोहोचलो तिथे प्रथम ती पोथी खाली महाराजांच्या चरणाला लावून वर श्रीराम मंदिरात अम्माला पोथी देऊन नमस्कार केला. अम्माला म्हटलं, पारायणगृहात बसून आज एकविसावा अध्याय वाच, उद्यापासून रोज एक अध्याय वाचशील. ही मी जपानहून तुझ्यासाठी आणलेली भेट आहे. ऐकून तिचे डोळे भरून आले आणि मीही कृतकृत्य झालो.

पुढे बदलीच्या कारणाने इ. स. २०१५-१६ ला मी चेन्नई येथे वास्तव्यास होतो . महाराजांनी माझ्याकडून इंग्लिश मधून तेलगू भाषांतराचं काम करवून घेतलं होतं आणि आता मी देवपूजेला बसल्यावर मला वारंवार आतून अशी सूचना होऊ लागली की साईबाबांवर एक छोटी तेलगू पोथी आहे, त्या पोथीचं इंग्लिशमधे भाषांतर कर. वारंवार अशी प्रेरणा होऊ लागल्यामुळे मी तेलगूमधून इंग्लिश भाषेत ती छोटी पोथी भाषांतरीत केली. मात्र पुढे काही प्रेरणा न झाल्याने मी ते तसच ठेवून दिलं. मला १८ फेब्रुवारी २०१६ रोजी बडोदा इथे जाणं आवश्यक होतं. तेव्हा मनात विचार आला की हे, भाषांतर चेन्नईमधील साई मंदिरात दाखवून बडोदा येथून येताना शेगांवला महाराजांच्या चरणी लावू जेणेकरून महाराजांनी केलेल्या सूचनेची अंमलबजावणी पूर्ण होईल. मी गजानन महाराजांना तशी प्रार्थना केली आणि म्हटलं तुम्ही सगळं जाणताच, तुम्ही तुमच्या योजनेनुसार योग्य काय ते करून घ्यालच, असं म्हणून नमस्कार केला.

१० फेब्रुवारी, २०१६ रोजी सकाळी उठतानाच महाराजांनी प्रेरणा दिली की भाषांतरीत पोथीचं प्रिंटआऊट काढून तयार ठेव. वाटलं, आपण शेगांवला त्या स्वरुपात काम नेण्यासाठी ही सूचना असावी, म्हणून त्याप्रमाणे मी प्रिंटआऊट तयार केलं. मी ११ फेब्रुवारीला ऑफिसला गेलो आणि महाराजांची योजना पाहून मी थक्क झालो. ध्यानीमनी नसताना एक सहकारी माझ्याजवळ आला, माझ्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला. स्वामी यार आय वॉन्ट वन फेवर म्हटलं काय? म्हणाला, ऑन थर्टींथ आय अ□ॅम गोईंग टू शिर्डी आय वॉन्ट युवर कंपनी. तुझं प्लेनचं तिकीट मी काढीन, पुण्याला जाऊन टॅक्सीने शिर्डीला जाऊ. शिर्डीला दर्शनाला जाताना मी छातीशी कवटाळून काही प्रिंटेड कागद आणलेले मित्राने पाहिले, मी श्रद्धापूर्वक ते साईंच्या चरणावर ठेवले तेव्हा त्यानी विचारलं, हे सर्व काय आहे? तेव्हा त्याला गजानन महाराज आणि साईबाबांची ती संयुक्त योजना समजावून सांगितली. ऐकून त्याचे डोळे भरून आले. माझे डोळे तर घळघळा वाहत होते.

मी कुठेतरी वाचल्याचं आठवतं की, गजानन महाराजांनी समाधी घेतली तेव्हा शिर्डीला साईबाबा अस्वस्थ झाले होते आणि साईनाथांपाशी ज्ञानदृष्टी असल्याचा उल्लेख गजानन महाराजांच्या तोंडी गजानन विजय ग्रंथात आलाच आहे. शेवटी आपण सामान्य माणसं, आपल्याला यातलं फारसं काही कळत नाही. जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति त्यामुळे संतांच्या चरणी दृढभाव ठेवा आणि मुखाने नाम जप चालू ठेवा. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सीताराम स्वामी, चेन्नई/वडोदरा – ९८८४१७५१०१.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! नाशिक येथील पंचवटी काळाराम मंदिराजवळ माझं आजोळ. तिथेच माझं बालपण गेलं. काहीही समजण्याचं वय नसतं इतक्या लहानपणी आजीकडून गजानन विजय ग्रंथातील गोष्टी ऐकल्या. त्यामुळे आजी आणि गजानन महाराज माझ्यासाठी श्रद्धेच्या गोष्टी होत्या.

१९७१ ची घटना, मी पाचव्या वर्गात होते. २६ जानेवारीला शाळेतील मोठ्या वर्गातील मुलींचा पोलीस परेड ग्राउंडवर कार्यक्रम होता. आमच्या शाळेतील कार्यक्रम सकाळी आठ वाजता संपल्यावर सर्व मुलींना तिकडे नेण्यात आले, मी व माझी एक मैत्रीण राधा आम्ही दोघी शाळेच्या गणवेषात मोठ्या मुलींच्या मागे मागे पोलीस परेड ग्राउंड वर जाऊन पोहोचलो. तो कार्यक्रम संपल्यावर तिथून परत येताना सी. बी. एस. कोर्टाजवळ मोठा रस्ता क्रॉस करीत असताना, मैत्रिणीचा हात सुटून ती पलीकडे पोहोचली, पण मी भर रस्त्यात असतानाच समोरून येणाऱ्या ट्रकचा धक्का मला लागला. माझ्या तोंडून तेव्हा फक्त आजी, गजानन महाराज असे दोन शब्द बाहेर पडले. शाळेचे एक शिक्षक देवघरे यांचं लक्ष जाऊन त्यांनी मला बाजूला केलं आणि मी बेशुद्ध झाले. मला शाळेत नेण्यात आलं, तिथे काही वेळाने मी शुद्धीवर आले, तेव्हा बाजूला असणारे शिक्षक आपसात म्हणत होते. ही वाचली कशी हे खरोखर आश्चर्यच आहे. ते वाक्य माझ्या मनावर कोरल्या गेलं आणि सोबत कोरल्या गेलं गजानन महाराजांचं नाव. १९८२ साली माझं लग्न झालं आणि मी सौ. शीतल शरद करंदीकर झाले. माझे मोठे दीर खामगाव येथे असल्यामुळे आणि खामगाव-शेगांव अंतर जेमतेम सोळा, सतरा कि. मी. त्यामुळे अनेकदा शेगांवला जाण्याची संधी मिळाली. तिथून मूर्ती आणून घरी तिची प्राणप्रतिष्ठा झाली.

महाराजांनी जीवनात विविध अनुभव दिलेत आणि कठीण प्रसंगात जीवनातील सत्याला सामोरे जाऊन खंबीरपणे उभं राहण्याची शक्तीही दिली. महाराजांनी एका अनुभवातून मला शिकवलं, सत्याला सामोरं जावंच लागतं. सत्याला पाठ फिरवून नाही जगता येणार. तो अनुभव दुःखद आहे, गंभीर आहे, पण जीवनात कठीण प्रसंग आलेच तर खंबीरपणे लढा हे सांगणारा आहे. माणसाला कधी कधी सूचक स्वप्न पडतात. ते स्वप्न जर सुखद असेल तर आपल्याला आल्हाददायी वाटतं. पण ते जर विपरीत असेल तर आपण अस्वस्थ होतो. संतांसारखं आपल्याला त्याकडे समबुध्दीने नाही पाहता येत. आपण त्याकडे साक्षीभावाने नाही पाहू शकत.

मला तीन मुली आहेत. इ. स. २००० ची गोष्ट. माझी मोठी मुलगी तेव्हा बारावी सायन्सला होती. १ मार्चच्या सुमारास तिची परीक्षा सुरू होणार होती. तो फेब्रुवारीचा मध्य असावा, एका रात्री मला स्वप्न पडलं. स्वप्नात मी पाहिलं की मिस्टरांनी भगवे कपडे परिधान केले आहेत. ते शांत बसले आहेत आणि मला ते ओळखत नाहीत. मी मुलींना बोलावून समोर उभं केलं तर त्यांनी मुलींनाही ओळखलं नाही. ते स्वप्न पाहून मी अस्वस्थ झाले. मिस्टरांना सांगितल्यावर ते कदाचित मनातून काही समजले, पण जाऊ दे लक्ष देऊ नकोस, असं मला म्हणाले, चार दिवस बेचैनीत गेल्यावर मी गजानन महाराजांना प्रार्थनापूर्वक म्हटलं. काय समजावा मी याचा अर्थ? काय होणार आहे? तुम्ही जे मार्गदर्शन कराल तसं वागण्याचा मी प्रयत्न करीन. दुसऱ्याच रात्री मला स्वप्न पडलं. गोदावरी नदीच्या काठावर मी आणि मिस्टर पाण्यात पाय सोडून बसलो आहोत, माझ्या पायाला सापानी वेढा घातला आहे. मी मिस्टरांना ते दाखविलं आणि ते काढा अशी खूण केली पण ते शांतपणे बघत राहिले आणि मीच मग तो वेढा बाजूला केला. याचा अर्थ सरळ होता. महाराजांनी जणू सुचवलं की येणाऱ्या संकटाला खंबीरपणे तोंड दे. तुझ्या अडचणी तुलाच दूर करायच्या आहेत. एकटीला. सकाळी उठल्यावर नित्य प्रार्थनेसोबत एकच वाक्य महाराजांना बोलले, सांभाळून घ्या.

मार्च महिना सुरू झाला, मुलीची बारावीची परीक्षा सुरू झाली. यांना अचानक ताप आला. जोरदार कावीळ झाली, दुःखणं विकोपाला गेलं. दवाखान्यात अ ॅडमिट करावं लागलं. डॉक्टरांना नीट निदान कदाचित झालं नाही, मुलीचा तिसरा पेपर होता, त्याच्या आदल्या रात्री हे खूपच सिरीयस झाले. आम्ही सर्व रात्री दीड वाजेपर्यंत दवाखान्यात होतो. मोठी मुलगी उत्तरा घरी पेपरचा अभ्यास करीत होती. मला रात्री थोडी विश्रांती घे, म्हणून नातेवाईकांनी घरी पाठविलं. मी उत्तराला म्हटलं, आता अभ्यास बाजूला ठेवून थोडी विश्रांती घे. आम्ही दोघी अंथरुणावर विसावलो. मला थोडीबहुत कल्पना आली होती. मी गजानन महाराजांना आम्हा सर्वांसाठी बळ मागत होते. मुलीने डॉक्टर व्हावे ही तिच्या वडिलांची इच्छा त्यांच्या जिवंतपणी पूर्ण होईल का? असं मोठ्ठं प्रश्न चिन्ह नजरेसमोर नाचत असतानाच दवाखान्यातून पहाटे निरोप आला, सर्व संपलं होतं. महाराजांनी पूर्वसूचना दिलेल्या संकटाला सामोरं जाणं आता भाग होतं.

उत्तराचा सकाळी अकरा वाजता पेपर होता, तिला सर्वांनी विचारलं, उत्तरा काय करायचं? उत्तराचं उत्तर ऐकून मलाही थोडा धीर आला. ती म्हणाली, मी डॉक्टर व्हावं ही दादांची इच्छा होती. अभ्यास करून परीक्षा देणं आणि डॉक्टर होणं, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. सकाळी सर्व सोपस्कार पूर्ण करायचे. नंतर मी पेपरला जाणार. तिच्या निर्णयाचा सर्वांनी मान राखला. मी मनातून गजानन महाराजांजवळ तिच्यासाठी शक्ती मागितली. उत्तरा त्या परीक्षेत उत्तम पास झाली, नव्हे ती कॉलेज मधून पहिली आली, पुढे ती डॉक्टर झाली. आज माझ्या तीनही मुली चांगल्या पध्द्तीने शिक्षण पूर्ण करून त्यांच्या घरी आहेत. दैवयोगाने घडणारी गोष्ट जर टळूच शकत नसेल तर महाराजांनी त्याची पूर्व सूचना देऊन ते भोगण्याचं धैर्य दिलं, ही गोष्ट मला महत्त्वाची वाटते. मग आपण एखाद्या पिडीताला गजानन महाराजांचा धावा करायला सांगतो आणि त्याचा त्याला फायदा होतो. तेव्हा त्याच्या नकळत त्याने ती आपल्या वेदनांवर घातलेली समाधानाची फुंकर ठरते.

मी ज्या शाळेत शिक्षिका आहे तिथे माझ्यासोबत माझी एक मैत्रीण होती, तिला संधिवाताचा खूप त्रास होता. इ. स. २००९ च्या सुमारास तो त्रास इतका वाढला की तिला उठणे, बसणे, चालणे सर्वच कठीण होऊन बसले. मी तिला भेटायला हॉस्पिटलला गेले तेव्हा तिच्या वेदना बघवत नव्हत्या. ती मला म्हणाली, मी नोकरीचा राजीनामा देते आहे. मला हे जीवन जगण्यात स्वारस्य वाटत नाही. मी हताश झाले आहे. हे दुखणं जीव नकोसा करणारं आहे. काही दिवसांनी परिस्थितीत फारसा फरक न होताच तिला सुटी मिळाली, ती घरी गेली, मी घरून गजानन विजय ग्रंथ घेतला आणि तिला भेटायला गेले. तिला ग्रंथ देऊन म्हटलं, काहीही करण्याची तुला इच्छा नाही हे जरी खरं असलं तरी ही पोथी वाच. जसं जमेल तसं जेवढी जमेल तेवढी. एक पान, निदान पाच ओव्या रोज वाच. गजानन महाराजांच्या इच्छेने काय होईल ते होऊ दे, असं म्हणून वाच. तिने माझी ती गोष्ट ऐकली आणि तिचं वाचन महाराजांपर्यंत पोहोचलं. हळूहळू ती खूपच बरी झाली. पुढे तिने दोन वर्षं नोकरी करून स्वेच्छानिवृत्ती घेतली. तिच्या घरच्यांनी हे सर्व जवळून अनुभवलं. त्यांनी स्वतःची कार घेतली त्यातून ते सहकुटुंब शेगांवला दर्शनासाठी जाऊन आले. आज तिचं पूर्ण

कुटुंब महाराजांच्या भक्तीत विजय ग्रंथाच्या पारायणाचा आनंद घेत आहे.

आता माझं निवृत्तीचं वय झालं. आयुष्यातील पूर्व घटनांचा मी जेव्हा विचार करते तेव्हा मला पोथीतील ओव्या आठवतात, संत मृत्यू ना टाळिती। निसर्गाप्रमाणे वागती। परि संकटाते वारिती। आगंतुक असल्यास ते॥ घडणारी घटना तीच असते पण त्याकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन फार महत्त्वाचा असतो. आपली दृष्टी महत्त्वाची असते आणि योग्य ती दृष्टी प्रदान करण्याचं सामर्थ्य सद्गुरूंजवळ असतं. त्यामुळे समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराजांच्या चरणी मी एकच प्रार्थना करते, आम्हा सर्व भक्तांवर कृपादृष्टी असू द्या आणि आमच्याकडून सतत नामस्मरण करून घ्या श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्रीमती शीतल शरद करंदीकर, नाशिक – ८१४९६२३१९७.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## ३९ – गजानन माऊलीचं अस्तित्व – सौ. कमला आत्माराम हनवते, ठाणे.

जय गजानन! असं म्हणतात, माणसाच्या आयुष्यात हसण्याला फार महत्व आहे. हसत रहा, मजेत रहा. हे खरंही आहे. पण मला इथे एक सांगावसं वाटतं की माणसाच्या आयुष्यात योग्य वेळी रडण्यालाही तेवढच महत्त्व आहे आणि ही जाणीव मला गजानन महाराजांनी माझ्या पहिल्या शेगांव भेटीत करून दिली. त्या दिवशी मी शेगांवला जर रडले नसते, तर एकतर मी आज मानसिक दृष्ट्या अस्वस्थ अवस्थेत असते, किंवा हृदयविकार अथवा अन्य व्याधीने ग्रस्त असते. देवदर्शनाचा योग नशीबात असावा लागतो, असं म्हणतात. खरं तर बुलडाणा जिल्ह्यातील रायपूर सैलानी या गावी माझं सासर आणि बुलडाणा जिल्ह्यातच शेगांव. म्हणजे वास्तविक लग्नानंतर शेगांव दर्शनाचा योग लगेच यायला हरकत नव्हती, पण योग आला नाही. अर्थात मला स्वतःला तेव्हा गजानन महाराजांविषयी माहितीही नव्हती.

माझं लग्न वायुसेनेत कार्यरत असणारे श्री. आत्माराम हनवते ( आता निवृत्त विंगकमांडर) यांच्याशी झालं. आमच्या संसारवेलीवर दोन फुलं फुलली. मोठी मुलगी मीता आणि धाकटा मुलगा संदीप. वायुसेनेत असल्यामुळे जिथे यांची बदली होणार तिथे आमचा मुक्काम हलणार, हे ठरलेलं होतं. मुलांचं शिक्षण होत असतानाच आमच्या मीताचं लग्न इ. स. १९९४ मधे तिच्या वयाच्या मानाने थोडं लवकरच एका ऑर्थोपेडिक डॉक्टरशी झालं. इ. स. १९९६ ला तिला कन्यारत्न प्राप्त झालं. दिवस आनंदात चालले होते, आम्ही तेव्हा राजस्थान मधे जैसलमेर येथे होतो आणि मुलगी नाशिकला होती.

इ. स. १९९८ चा शेवट आमच्या जीवनात फार मोठं वादळ घेऊन आला. जावई, मुलगी आणि नात दुचाकी वरून जात असताना एका ठिकाणी समोरून एक डम्पर आला. बाजूला रेती पसरली होती, त्यावरून गाडी स्लीप झाली आणि गाडीवरून पडून जोरदार मुका मार लागल्याचं निमित्त झालं. वयाच्या फक्त २३ व्या वर्षी मुलीला पोरकं करून आमची मीता या जगातून निघून गेली. आम्हाला जैसलमेर इथे निरोप आला तेव्हा जैसलमेर-नाशिक या साधारण साडेबाराशे कि. मी. प्रवासासाठी आम्हाला टॅक्सी करून निघावं लागलं. तीन दिवसपर्यंत तिचं शरीर अंत्यसंस्कारासाठी आमची वाट पहात होतं. प्रवासात आम्ही दोघं सुन्नपणे बसून होतो. नेमकं काय झालं कळायला मार्ग नव्हता अडीच वर्षाच्या नातीचा शोक पाहून आतल्या आत विचित्र कालवाकालव झाली. ह्यांची अवस्था विचित्र झाली. माणूस मोठा झाला की त्याला कधी कधी रडता पण येत नाही. मुलगी ह्यांची अत्यंत लाडकी. मला बरेचदा वाटतं की आम्ही स्त्रिया रडून अश्रूंना वाट करून देतो पण पुरूष बरेचदा आतल्या आत रडत राहतात. मग त्या सगळ्या विचारांचा परिणाम होऊन मी पण रडले नाही. बरेचदा शून्यात नजर लागून बसून रहायची. अबोल झाले, सर्व अर्थशून्य वाटू लागलं, घरातून बाहेर पडू नये असं वाटायचं. त्याचा माझ्या वागण्या बोलण्यावर परिणाम होऊ लागला. हिला वेड लागेल की काय असं सर्वांना वाटू लागलं दोन महिने अशी सगळी स्थिती होती. अशात भुसावळला आमच्या एका नातेवाईकाकडे लग्न निघालं आणि मला थोडं जबरदस्तीनंच लग्नाला नेण्याचा निर्णय घरच्यांनी घेतला. आम्ही भुसावळला पोहोचलो, तिथे माझा एक भाऊ आला होता. सर्व परिस्थिती पाहून त्याने आग्रहाने आम्हा दोघांना शेगांवला गजानन महाराजांच्या दर्शनाला जाण्याचा सल्ला दिला. ह्यांना म्हणाला एकदा तुम्ही गजानन महाराजांचं दर्शन घेऊन तर या. बघू या काय होतंय ते? ह्यांची सैनिकी शिस्त, हे नास्तिक नाहीत पण देवासंतांच्या दर्शनावर यांचा फारसा विश्वासही नव्हता, पण ह्यांनी शेगांवला जाण्याचा निर्णय घेतला आणि आम्ही दोघं शेगांवला पोहोचलो. त्या दिवशी मी प्रथमच महाराजांचं दर्शन घेणार होते. मी दर्शनासाठी तळघरात उतरले, महाराजांच्या नजरेतील ती विलक्षण करूणा मी पाहिली. ते जणू आत्मीयतेने मला विचारत होते, बाई गं, काय दुःख आहे तुला? बस्स! कुणीतरी आपलं भेटावं आणि त्याच्याजवळ आपण अंतःकरण मोकळं करावं असं झालं. माझा बांध फुटला, जोराचा हुंदका आला. मी चेहेऱ्यावर दोन्ही हात धरून तशीच धावत वर आले. आवारात असलेल्या बेंचवर बसले आणि हमसून हमसून रडले. हे बाजूला उभे होते आणि अक्षरशः अर्धा तास मी रडत होते. रडणं थांबलं तेव्हा जसं काही आपल्या मनावरून कुणी मणभराचा भार खाली उतरवून ठेवावा तसं झालं. ह्यांचेही डोळे त्या दिवशी पाणावले. त्या दिवशी शेगांव माझं माहेर झालं.

त्या आमच्या वारीनंतर हे दोन कारणांनी महाराजांचे भक्त झाले. एक कारण तर उघड होतं, आम्हा दोघांनाही एक मानसिक आधार मिळाला आणि दुसरं कारण म्हणजे वायुसेनेत अधिकारी असूनही शेगांवची शिस्त, स्वच्छता आणि व्यवस्थापन पाहून ते खूष झाले. आमच्या शेगांव वाऱ्या सुरू झाल्या आणि प्रत्येक वारी तेथील स्वच्छतेविषयी, शिस्तीविषयी आम्हाला अनुभव समृद्ध करीत राहिली. दर्शनाच्या बारीत हजारो लोक असूनही कुठे गोंधळ नाही, मध्ये कधी चहाची सोय, औषधाची सोय, मध्येच बाहेर जावं लागल्यास पासची सोय. सारच कसं शांततेत. प्रसादाचा दाणा पडला तरी सेवेकरी उचलून घेणार. इथे एक प्रसंग सांगावासा वाटतो. एकदा आनंद सागर परिसरात एक माणूस सवयीने खर्रा (मावा, गुटका) थुंकला. मागेच असलेल्या सेवेकऱ्याने तो पुसून टाकला. थोडं समोर गेल्यावर पुन्हा तेच झालं. पण सेवेकऱ्याने काहीही नबोलता पुन्हा पुसलं, हे त्या माणसानं पाहिलं. पुन्हा मान वाकवून थुंकणार, तो नम्रपणे उभं राहून पुसण्याच्या तयारीत असलेल्या सेवेकऱ्याकडे त्याचं लक्ष गेलं. तो ओशाळला, त्यानं कान धरले आणि जवळील गुटक्याची पुडी केराच्या पेटीत टाकून सेवेकऱ्यासमोर कान धरून माफ करा, पुन्हा असं होणार नाही, असं बोलला. ह्यांचं म्हणणं सैन्यात आम्ही शिस्त पाळतो, तिथे आम्हाला धाक असतो, बंधन असतं पण इथे असं काहीही नसताना हे कसं होतं? याचं उत्तर एकच! इथे गजानन माउलीचं अस्तित्व आहे.

असो, मधल्या काळात ओझरला होतो तेव्हा शेगांव शक्य होत होतं पण पुढे चंदीगडला बदली झाली अन् त्या काळात शेगांव दर्शन होऊ शकलं नाही. मात्र नंतर मध्य प्रदेशात आमला इथे ह्यांची बदली झाली. तिथून कारने सासरी आलो तर वाटेत शेगांव दर्शन शक्य होतं. सासरहून निघालं की शेगांव-अचलपूर-परतवाडा-भैसदेही, वाटेत घाट तिथे खंडोबा मंदीर आणि पुढे आमला असा मार्ग होता. वाटेत आदिवासी वस्ती असल्याने ट्रॅफिक तेव्हा त्या मानाने कमी होता. एप्रिल २००६ ची ही गोष्ट, आम्ही शेगांवहून दर्शन घेऊन निघालो. परतवाडा-भैसदेहीच्या मध्ये घाट आहे. एकीकडे खोल दरी आहे. आमच्या मारूती ८०० मधे मी आणि हे आम्ही दोघं होतो. गाडी वेगाने चालली होती. वाटेत रस्त्यातच एक दगड होता तो चुकवण्याच्या प्रयत्नात ह्यांचा कारवरील ताबा सुटला आणि कार दरीच्या बाजूला जाऊ लागली. समोर खोल दरी होती. आम्हाला आमचा मृत्यू दिसू लागला. मी जोरात गजानन बाबा धावा, गजानन बाबा वाचवा, असं ओरडले आणि नशीबाने ब्रेक लागले. पण त्याहीपेक्षा अचानक थांबावी अशी गचका देऊन गाडी थांबली. दोन बाजूंनी आम्ही दोघं खाली उतरलो. मोजून दीडफुटावर खोल दरी होती चांगलीच खोल, तिथे गेलो असतो तर

कदाचित कुणालाही काहीही मिळालं नसतं. काळ आला होता पण गजानन बाबांनी वेळ येऊ दिली नाही.

आम्ही दोघांनीही मृत्यू पाहिला होता. आमची दोघांचीही नजर त्या दरी खोऱ्यात आम्हाला वाचवणारा कोण? याचा शोध घेत होती. तिथल्या झाडाझुडपात, पानाफुलात, तिथे वाहत असलेल्या वाऱ्यात गजानन माऊलीचं अस्तित्व शोधत असतानाच आम्ही नमस्कारासाठी हात जोडले आणि आमच्या तोंडून उत्स्फूर्त शब्द बाहेर पडले, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. कमला आत्माराम हनवते, ठाणे – ९६५३२६७९१३.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! माझ्या माहेरीच माझ्या आईने, माझी ओळख माझ्या गजानन महाराजांशी करून दिली त्यामुळे शाळेत होते. तेव्हापासूनच गजानन विजय ग्रंथाची दशमी, एकादशी, द्वादशी. अशी त्रिदिवसीय पारायणं अनेक वेळा महाराजांनी माझ्याकडून करवून घेतली. मी माझे गजानन महाराज, असं म्हटलं, तेव्हा मला जाणीव आहे की असे हजारो भक्त आहेत की जे महाराजांकडे माझे महाराज म्हणून पाहतात आणि त्यांना महाराज आपल्या सोबत आहेत अशी जाणीव सातत्याने होत असते, तशीच जाणीव मलाही होत असते. महाराजही एकाच वेळी अनेकांच्या प्रार्थनेला ओ देत असतात, प्रतिसाद देत असतात. ह्या प्रतिसादाचे पडसाद अनेक भाविकांपर्यंत पोहोचतात मग त्या भाविकांच्या मनातील महाराजांच्या सोबतीची जाणीव अधिकाधिक दृढ होत जाते.

असो, मी सौ. निलीमा महेश आमोणकर, सध्या पणजी गोवा येथे वास्तव्यास असते. माझं माहेर पुण्याला, तिथून शेगांवची पालखी जायची. त्यामुळे आईचं गजानन विजय ग्रंथाचं वाचन आणि पालखीत गजानन महाराजांचं दर्शन, या दोन्ही गोष्टींमुळे महाराजांची भक्ती मनात रुळली. पुढे इ. स. १९८९ च्या १ जानेवारीला माझं लग्न झालं. पण अपत्यप्राप्तीचा योग मात्र नशिबात विलंबानेच होता. इ. स. २००८ ला म्हणजे लग्नानंतर तब्बल एकोणीस वर्षांनंतर आम्हा दोघांसाठी डॉक्टरांनी गुड न्यूज कन्फर्म केली. गुड न्यूजचं तर ठीक झालं पण अडचणी अजून बाकी होत्या. दिवस भरत आले होते. एक दिवस डॉक्टरांनी परीक्षण केल्यानंतर त्यांचा चेहरा गंभीर झाला. ते म्हणाले मॅडम एक प्रॉब्लेम वाटतोय, जुळी अपत्य आहेत आणि त्यातील एकाच्या बाबतीत थोडी काळजी वाटतेय. शक्य आहे की त्यात काही शारीरिक व्यंगही असू शकेल. आपण चांगल्यात चांगली व्यवस्था करू या, तुम्ही थोडं आधी हॉस्पिटलला अ□डमिट व्हा. बाकी गॅरंटी कशाचीच देता येत नाही.

आम्हा दोघांवर किती प्रचंड मानसिक दडपण आलं असेल याची कल्पनाच केलेली बरी. अशा वेळी एकच आधार होता तो म्हणजे गजानन महाराज मी गजानन विजय ग्रंथ सोबत घेऊन पुणे येथे रुबी हॉल मधे अ□डमिट झाले. मी दवाखान्यातच गजानन विजयची पारायणं सुरू केली. महाराजांना म्हटलं महाराज, मुलगा वा मुलगी यानी काही फरक पडणार नाही आहे, पण जे काही होईल ते बालक सुखरुप आणि योग्य होऊ द्या. एक दिवस पारायण करताना मी फारच भावुक झाले. रडायला येऊ लागलं आणि मी महाराजांना म्हटलं, आता तुम्हीच रक्षणकर्ते! एका अपत्याची शाश्वती तर डॉक्टरांनी दिली आहे दुसऱ्या विषयी त्यांना चिंता आहे. पण मी तर म्हणते, दोन्हीचं रक्षण करणारे तुम्हीच आहात. दुसरं अपत्यही व्यवस्थित जन्माला येऊ द्या. मी त्याच्या वजनाइतकी चांदी शेगांवला तुमच्या चरणी अर्पण करीन. ११ ऑगस्ट, २००८ रोजी डॉक्टरांनी सिझीरियन करण्याचं ठरवलं, कृपासिंधू गजानन महाराज हाकेला धावून आले आणि दोन मुली, दोन्हीही सुदृढ अवस्थेत महाराजांनी माझ्या पदरात घातल्या. डॉक्टरांनी आश्चर्यासह आमचं अभिनंदन केलं आणि महाराजांनी आमच्याकडून २०११ च्या डिसेंबरमधे चांदी समर्पणाचा माझा नवस पूर्ण करून घेतला.

माझ्या दोन मुली, निती आणि नेहा. दोघीही माझ्या लाडक्या. दोघींनाही माझा लळा. कधी कधी लहान मुलं त्यांच्या नकळत भविष्याची जाणीव आपल्याला करून देतात की काय असं वाटतं. त्याचं असं झालं, एकदा मी अंथरुणावर पहुडले होते. माझ्या बाजूला निती होती. तिने माझ्या पोटावरून हात फिरवला अन् मला विचारलं, आई तुझ्या पोटात काय आहे गं? मी दुर्लक्ष केलं. पुन्हा काही दिवसांनी तिनं हात फिरवून तोच प्रश्न केला पण लहान आहे म्हणून मी लक्ष दिलं नाही. काही दिवस मधे गेलेत, माझ्या पोटात उजव्या बाजूला दुखायला लागलं. काही दिवसांनी ते दुखणं बरंच वाढलं. माझे मोठे दीर डॉ. दिलीप आमोणकर गोव्याला सर्जन आहेत. त्यांच्या सांगण्यावरून स्कॅनिंग करून घेतलं आणि पोटात लिव्हरला लागून ट्यूमर असल्याचं निदान झालं. पणजी येथे डॉक्टरांचं म्हणणं होतं की छोटं ऑपरेशन लेझरनी करावं लागेल, पण माझे दीर सिनीयर डॉक्टर, त्यांना यात फार मोठी रिस्क वाटत होती. त्यांनी ठरविलं की गुडगाव-हरियाणा येथे मेदांता हॉस्पिटल आहे ते लिव्हरसाठी नंबर एकचं हॉस्पिटल, आहे तिथे ऑपरेशन करायचं. कदाचित हे जीवावरचं दुखणं आहे हे त्यांच्या लक्षात आलं होतं.

इ. स. २०१६ च्या सप्टेंबर महिन्यात वीस तारखेला आम्ही दिल्ली येथे जाण्यासाठी गोवा विमानतळावर पोहोचलो. मुली घरीच राहणार होत्या, तिथे मला निरोप देताना जेमतेम आठ वर्षाच्या दोन्ही मुलींनी माझ्या कमरेला विळखा घालून माझ्याकडे पाहून मला प्रश्न केला. आई तू परत येणार नं? तेव्हा तिथे असलेल्या प्रत्येकानीच मान बाजूला वळवून आपले अश्रू दुसऱ्याला दिसू नयेत याची काळजी घेतली.

आम्ही गुडगावला मेदांता हॉस्पिटलला पोहोचलो, तेव्हा तपासणी नंतर तिथल्या डॉक्टरांचं वाक्य ऐकून सर्वांच्याच पायाखालची जमीन सरकली, त्यांच्या मते चांगला मोठा ट्यूमर लिव्हरला लागूनच आहे त्यामुळे ओपन सर्जरी करणं आवश्यक आहे. छातीपासून बेंबीपर्यंत ओपन सर्जरी! आठ ते दहा तास हे ऑपरेशन चालेल. २४ सप्टेंबरला आपण हे ऑपरेशन करू. मी पूर्ण हलून गेले, पण पर्याय नव्हता. गजानन महाराजांची पोथी घेतली आणि दवाखान्यात भरती झाले. मिस्टरांच्या मित्राची बायको मारीया म्हणून माझ्या सोबत होती. २४ सप्टेंबरला पहाटे तीन वाजता मला उठवण्यात आलं. आंघोळ झाली,पहाटे पाच वाजता ऑपरेशन थिएटरमधे नेण्यात आलं. आठ दहा तास ऑपरेशन होऊन दुपारी तीन वाजता मला बाहेर आणण्यात आलं. एखादा पूर्ण वाढलेला मोठा लाल कांदा जसा दिसतो तसा ट्यूमर, लिव्हरचा काही भाग कापून बाहेर काढण्यात आला. मी दुसरे दिवशी दुपारी बारा वाजता शुद्धीवर आले.

पण, मला आता उलट्या सुरू झाल्या अन् त्या काही केल्या थांबेनात. चार दिवस उलट्या होत होत्या. स्कॅनिंग मधे आतड्याला गाठ पडल्यासारखं दिसलं. डॉक्टर म्हणाले, हे पुन्हा री ओपन करावं लागणार. आता हे माझ्या सहनशक्तीच्या बाहेर होतं. मी मिस्टरांना म्हटलं, तुम्हाला जे करायचं ते करा, पण मला एकदा गजानन महाराजांचं दर्शन घ्यायचं आहे. ते म्हणाले की, तू बरी झाली की जाऊ, पण मला शाश्वती वाटत नव्हती

अशात सकाळी डॉक्टर आले. त्यांनी माझ्या नाका तोंडात नळ्या घातल्या म्हणाले, रात्री ऑपरेशन करू. मला मृत्यूचा आभास होऊ लागला. मला लक्षात आलं की आता महाराजांचं दर्शन होणे नाही. मी आतून कळवळून महाराजांना विनवत होते. मला गजानन अष्टकातील दासगणूंच्या ओळी आठवल्या क्षणात जल आणिले नसून थेंब त्या वापीला। क्षणात गमनाप्रती करिसी इच्छिलेल्या स्थला। क्षणात स्वरूपे किती विविध धारिसी धीवरा। करी पदनता वरी बहू दया न रोषा धरा॥ साधारण अकरा

साडेअकरा ची वेळ असावी. मिस्टर खोलीत आले, त्यांनी सहज टी. व्ही. ऑन केला. माझी नजर तिकडे गेली, मी हातानेच त्यांना टी. व्ही. राहू द्या म्हणून खुणावले, गजानन महाराजांचा सिनेमा सुरू झाला होता. महाराजांनी मला क्षणात दर्शन दिलं होतं. दूर गुडगावला त्या दवाखान्यात मी रडत रडत तो सिनेमा पाहिला. माझी प्रार्थना न बोलताच त्या दिवशी एका वेगळ्या पातळीवर पोहोचली होती. बाजूला मारीया उभी होती. तिला एवढंच समजलं होतं की महाराज माझं श्रद्धा स्थान आहे. तिनं भावपूर्ण प्रार्थना करत पोथी माझ्या अंगावर फिरवणं सुरू केलं. संपूर्ण सिनेमा पाहताना डोळ्यातून भक्तिधारा वाहत होत्या. सिनेमा संपला. मलाच लक्षात नाही आलं, माझ्या उलट्या थांबल्या होत्या. संध्याकाळी डॉक्टर आले. त्यांनी तपासलं, आनंदानी नळ्या बाहेर काढल्या. माझ्या आतड्याची स्थिती ठीक झाली होती. आश्चर्य घडलं होतं. त्या रात्रीचं ऑपरेशन रद्द झालं होतं. आठ दिवसांनी त्या रात्री मी निवांत झोपी गेले. दुसरे दिवशी मी पूर्ण ठीक झाले होते. त्या दिवशी मी खायला मागितलं.

पहिला घास हातात घेतला अन बाजूला असलेल्या मारीयाकडे पाहिलं, तीही आनंदाने माझ्याकडे पहात होती. तिनं माझ्या भावना जवळून अनुभवल्या होत्या, महाराजांच्या स्मरणार्थ हात कपाळावर गेला आणि मारीयाकडे पाहून म्हटलं, मारीया, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. निलीमा महेश आमोणकर, पणजी, गोवा – ९८२२३०४८३३.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## ४१ – संकटाते टाळिती, अगांतुक असल्यास ते – सौ. मानसी योगेश वाळूंजकर, डोंबिवली (पूर्व).

जय गजानन! मी सौ. मानसी योगेश वाळूंजकर. पूर्वाश्रमीची मेधा करंबेलकर, मला गजानन महाराजांचं प्रेम माझ्या आईकडून मिळालं. मध्यंतरी मला गजानन महाराजांनी एका फार मोठ्या संभाव्य अपघातातून वाचवलं, त्या विषयी मी तुम्हाला सांगणारच आहे पण त्या पूर्वी माझ्या आईच्या ध्यानीमनी नसताना महाराजांनी त्यांची ओळख तिला कशी करून दिली ते सांगावंसं वाटतं.

माझी आई अगदी दोनच वर्षांची असताना तिचे वडील गेले. हा १९५० च्या आसपासचा काळ. माझ्या विधवा आजीला तिच्या तीन मुलींसह त्या काळात घरातून बाहेर काढण्यात आलं पण आजी कर्तृत्ववान होती. रत्नागिरी जिल्ह्यातील देवरूख येथे आजीने तेव्हा होस्टेलवर मेट्रन म्हणून काम केले आणि तिच्या तीनही मुलींना स्वतःच्या पायावर उभे केले. आजीचं नेहमी सांगणं असायचं, स्वकर्तृत्वावर विश्वास ठेवा, एक अनामिक शक्ती तुम्हाला मदत करते. पुढे मुली मोठ्या झाल्या, १९७०-७१ च्या सुमारास आईची मोठी बहीण अचानक वारली. आजीने आकाशाकडे पाहून प्रश्न केला. भगवंता, तुला ही तरूण मुलगी दिसली? बस्स आणि आजी कार्यरत झाली, तिला तर उभं राहणं भागच होतं.

पुढे मुली मोठ्या झाल्या, आजीने दोन्ही मुलींची लग्न लावलीत. लग्नानंतर माझे आई बाबा आजीला घेऊन डोंबिवलीला रहायला आलेत. माझा जन्म १९७८ चा, माझ्या जन्मा आधी दोन महिने आईला स्वप्न पडलं. स्वप्नात निळसर रंगाचा वेष परिधान करून एक गृहस्थ, ज्यांना आईनं याआधी कधीच पाहिलं नव्हतं. आईच्या समोर उभे झाले आणि आईला व आजीला म्हणाले, मोठी मुलगी हवी आहे नं? मिळेल, मिळेल .

या स्वप्नानंतर काही दिवसांनी आमच्या शेजारच्या एक काकू, त्यांचं नाव शृंगारपुरे, आईकडे एक पोथी घेऊन आल्या. आईच्या हातात ती पोथी देऊन म्हणाल्या ही पोथी वाचा, सर्व सुरळीत पार पडेल. ती पोथी होती श्रीगजानन विजय ग्रंथ. आई ती पोथी प्रथमच पहात होती. आईने उत्सुकते. पोटी सहज पानं पलटविली, चित्र पाहिलीत आणि आईला अर्थबोध झाला की तिच्या स्वप्नात गजानन महाराज येऊन गेले. आईचं वाचन सुरू झालं, सर्व सुरळीत पार पडलं माझा जन्म झाला काही दिवसांनी महाराज आईला स्वप्नात येऊन विचारून गेले, काय? मिळाली मोठी मुलगी? आईनं दुसऱ्याच दिवशी शेजारच्या काकूंना म्हटलं आमचं जमेल तेव्हा आम्ही शेगांवला निश्चितच जाणार पण तुमचं जाणं आधी झालं तर माझ्यासाठी गजानन विजय ग्रंथ घेऊन या. अशा रितीने तेव्हा पासून गजानन महाराज, गजानन विजय आणि आमचा सहप्रवास सुरू झाला. पुढे आई मोठ्या प्रमाणावर महाराजांचा प्रकट दिनही करु लागली आणि वेळोवेळी महाराजांचे अनुभवपण येऊ लागले.

आज सर्वत्र स्मार्ट फोनची संख्या भरपूर वाढली आहे. मध्यंतरी जेव्हा व्हाट्सअ□पची लोकप्रियता खूप वाढीस लागली तेव्हा गजानन महाराजांच्या काही भक्तांनी त्याचा वापर गजानन विजय ग्रंथाच्या साखळी पारायणासाठी सुरेख रितीने करून घेतला. यात एकवीस वाचकांचा ग्रुप करून दर गुरुवारी प्रत्येकाने एक, याप्रमाणे संपूर्ण एकवीस अध्यायाचं पारायण करण्यात येतं. आपला अध्याय वाचून झाला की तसं प्रत्येकाने ग्रुप प्रमुखाला कळवायचं. कुणाला काही कारणाने जर वाचन शक्य न झाले तर त्या अध्यायाची सोय प्रमुखाने करून घ्यायची. प्रत्येकाने पुढल्या गुरुवारी पुढचा अध्याय या क्रमाने वाचत जायचं. आज विविध भागात असे शेकडो ग्रुप दर गुरुवारी पारायण करून ही सेवा महाराजांच्या चरणी अर्पण करतात.

हे सर्व इथे सांगायचं कारण म्हणजे इ. स. २०१७ च्या आषाढ महिन्यात मी अशा एका पारायण ग्रुपमधे सहभागी झाले. दर गुरुवारी ह्या ग्रुपसाठी म्हणून एक अध्याय वाचण्यास प्रारंभ झाला. अध्याय वाचण्याच्या संदर्भात मी एक ठरविलं होतं की, शक्यतो अध्याय संध्याकाळी पाच सव्वापाचच्या सुमारास वाचायचा आणि वाचन करीत असताना मधे शक्यतो कुणाशी बोलायचं नाही, आपली जागा सोडायची नाही. आमचं घर पहिल्या मजल्यावर, समोरची खोली आकाराने थोडी मोठी जिथे आम्ही टी. व्ही. ठेवला आहे आणि जिथे मी पोथी वाचन करते ती खोली साधारण आठ बाय दहा फुटाची आहे. खोलीत भिंतीला लागून छोटसं देवघर, देवघरावर दोन मोठे फोटो आहेत, एक गोंदवलेकर महाराजांचा आणि एक गजानन महाराजांचा. देवघरासमोर बसलं तर मागे भिंतीला लागून आपल्या पाठीशी एक छोटं डायनिंग टेबल, त्या मागे छोट्या जागेत एक जास्तीचं सिलिंडर, त्या मागे आडवा किचन ओटा, मॉड्युलर टाईप किचन असल्याने कप्प्यात दारामागे चालू सिलिंडर. जास्तीचं सिलिंडर आणि चालू सिलिंडरचं दार या मधल्या जागेत प्लॅस्टिकमधे भाजी, कांदा, लसूण इत्यादी.

मला आठवतं तो मार्गशीर्ष महिना होता म्हणजे आता. माझे आषाढ ते मार्गशीर्ष असे पाच सहा महिने दर गुरुवारच्या पोथी वाचनाचे होत आले होते. माझ्या संध्याकाळच्या नियमित वेळेत माझं वाचन सुरू होतं, अन्य वेळेत मला शक्य नव्हतंच असं नाही पण मी आपली ती एक वेळ ठरविली होती. १४ डिसेंबर २०१७, मार्गशीर्षातील शेवटचा गुरुवार. मार्गशीर्षातील गुरुवारी महालक्ष्मीची पूजा करण्याचा अनेक ठिकाणी प्रघात आहे. मीही त्या दिवशी देवघराशेजारी चौरंगावर लाल मखमली वस्त्र आच्छादून त्यावर महालक्ष्मीचा फोटो ठेवला होता. बाजूला समई शांतपणे तेवत होती. त्या गुरुवारी माझ्यावर सहावा अध्याय वाचण्याची जबाबदारी होती.

दुपारी एक दीडची वेळ होती. मी आणि सासरे आम्ही दोघं बाहेर टी. व्ही. पहात होतो आणि मला आतून सूचना झाली की उठा आणि पोथी वाचायला घ्या. प्रथम मी त्याकडे लक्ष दिलं नाही, पण मग मला आतून अस्वस्थ वाटून एक सारखी सूचना होऊ लागली, पोथी वाच! मग मात्र मी उठले, दुपारी पावणे दोनला प्रथमच मी पोथी वाचायला सुरुवात केली. मंगलाचरण झालं आणि टायरमधून हवा बाहेर यावी तसा आवाज कानावर आला, मी चमकून मागे गॅस शेगडीकडे बघितलं पण बटणं बंद होती मी पुन्हा वाचू लागले. सहाव्या अध्यायातील त्या ओव्या.

आगट्या पेटल्या एकसरां। अजमासे हो दहा बारा। तेणे डोंब झाला खरा। गगनोदरी धुमाचा ॥, आगीची सूचना पुन्हा तोच आवाज कानाला भासला आणि डोक्यात लख्ख प्रकाश पडला. गॅस सिलिंडर लीक असावं. कधी नव्हे ते तडक उठले. मागे टेबलला वळसा घालून पुढे झाले, सिलिंडरच्या कप्प्याचं दार उघडलं, सिलिंडर मधून गॅस बाहेर येत होता. ताबडतोब नॉब बंद केलं. मग लक्षात आलं की समई शांत करायला हवी. पुन्हा टेबलच्या बाजूने समईच्या दिशेने यायला निघाले तो टेबल खालून

वायुगतीने आणि वायुमार्गाने बाहेर आलेला गॅस समईपर्यंत पोहोचला आणि तेवढ्या भागात एकच भडका उडाला, वाटेतील कांदे, लसूण, प्लॅस्टिक आदी जळून काळं झालं. मी टेबलच्या या बाजूला असल्याने माझ्या नजरेसमोर ते घडलं पण मी बाजूला सुरक्षित होते.

नशिबानं जास्तीचं सिलिंडर रिकामं होतं त्याची ऑर्डर अजून द्यायची होती, महाराजांनी मला पोथी वाचायला घ्या, अशी बुद्धी दिली म्हणून ठीक अन्यथा गॅस काही फार वेळ कोंडून थोडीच राहणार होता आणि समई तर तिथे होतीच. त्या दिवशी योगाने आलेला सहावा अध्याय, मला उठून गॅस पहाण्याची झालेली प्रेरणा, नाहीतर समई आणि गॅस यामध्ये मी होतेच की! या सर्वावर मात करणारा एक विचार म्हणजे चालू सिलिंडरचा केवढा मोठा स्फोट त्या दिवशी होऊ शकला असता.

पण आता ते सर्व टळलं होतं. मार्गशीर्षातील त्या शेवटच्या गुरुवारी महालक्ष्मी आई तर मला पावलीच आणि सद्गुरू श्री गजानन महाराज रक्षणाकरीता मार्गदर्शक ठरले. गजानन महाराजांचं आपल्याकडे लक्ष आहे या पेक्षा अन्य कुठली भावना माझ्यासाठी श्रेष्ठ ठरणार होती? मी मनातून महाराजांचे आभार मानले आणि एकच म्हटलं. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. मानसी योगेश वाळूंजकर, डोंबिवली (पूर्व) – ९८२०५६९०५०.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! आपण गजानन महाराजांचे अनुभव ऐकतो, वाचतो, अनुभवतो. आपण बरेचदा त्या घटनांमधे चमत्काराचा शोध घेतो. पण या सर्वावर मी विचार करते, तेव्हा मला नेहमी वाटतं की एखादी गोष्ट सुरळीतपणे पार पडणं, एखाद्या कामात कुणी अचानक सहाय्यभूत ठरणं, कुणाकडून वेळेवर मोलाचा सल्ला मिळणं, कुणी अचानक मदतीला धावून येणं, हे सर्व त्याच्याच योजनेतून होत असतं. तोच त्याचा अनुभव असतो.

मी मॅट्रीकला असतानाची, म्हणजे साधारण १९७८-७९ ची गोष्ट आहे. तेव्हा परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या टक्केवारीची वेडी शर्यत सुरू व्हायची होती. पहिल्या झटक्यात मॅट्रीक पास हीच फार मोठी गोष्ट होती. पण तेही कठीण होतं. आमच्या कुटुंबात आत्ते, मामे, मावस, चुलत अशी बरीच भावंडं होती. त्यांच्या पैकी कुणीही मॅट्रीकला पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झाला नव्हता आणि आता माझी वेळ होती. घरची आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थिती फारशी चांगली नव्हती. आई चौथी शिकलेली, शिकवणीचं खुळ तेव्हा नव्हतं आणि असतं तरी घरी पैसा नव्हता. त्यातून माझं इंग्लिश आणि गणित बेताचच होतं. म्हणजे मी पण पहिल्या प्रयत्नात निघणं जरा कठीणच होतं.

आई तेव्हा गजानन विजय ग्रंथाचं नियमित वाचन करीत असे. त्यामुळे पोथीतील कथांमुळे आणि चित्रांमुळे महाराज ऐकून माहीत होते. परीक्षा अगदीच जवळ आली होती आणि एकेरात्री महाराज स्वप्नात आले, मी त्यांना नमस्कार केला, ते मला म्हणाले, काळजी करू नकोस, मी आहे ना? घाबरतेस कशाला? सर्व ठीक होईल, अडचणी दूर होतील. दुसरे दिवशी दुपारी मी ते स्वप्न आईला सांगतच होते तो माझी खास मैत्रीण जयश्री सावंत माझ्याकडे आली, मला म्हणाली, साधना माझा मावसभाऊ गणित खूप छान शिकवतो, तो आपल्याला शिकवायला तयार आहे आणि पास होण्यासाठी आवश्यक ते इंग्लिशही शिकवेल. झालं! ज्या विषयांची भिती होती त्यांचीच सोय झाली. आता प्रश्न होता वेळेचा, म्हणजे फार वेळ शिल्लक नव्हता, तर तीही अडचण दूर झाली. कारण तितक्यातच शिक्षकांच्या राज्यव्यापी संपाची घोषणा झाली, त्याचा परिणाम म्हणून परीक्षा पुढे ढकलण्यात येऊन आवश्यक तो वेळही उपलब्ध झाला आणि आम्हा सर्व भावंडांमधे मी पहिली ठरले की जिने पहिल्याच प्रयत्नात मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण केली. मी मॅट्रीक पास होणं हा माझ्यासाठी महाराजांचा फार मोठा अनुभव होता. त्यामुळे मनात त्यांच्याविषयी श्रध्दा दृढ झाली नसती तरच नवल.

पुढे १९८६ ला माझं लग्न झालं आणि लग्नानंतर आमच्या ओमकार चा जन्म झाला. माझ्या मनातील श्रध्देपोटी मी महाराजांना बोलले की आम्ही दोघं मुलाला घेऊन शेगांवला दर्शनासाठी येऊ. मी त्याबद्दल मोहन म्हणजे माझ्या मिस्टरांना सांगितलं. त्यांनी महाराजांचं नाव ऐकलं होतं, परंतु त्यांना फारशी माहिती नव्हती, अनुभव नव्हता. त्यांचा देवावर विश्वास पण बुवाबाजीवर नाही. त्यामुळे मनात थोडी शंका घेऊनच ते माझ्या नवसासाठी म्हणून शेगांवला यायला तयार झाले. मला आपलं नेहमी वाटतं की कुणी साशंक मनाने शेगांवला जात असेल तर महाराजांचं ब्रीद वाक्य आहे, अरे तू शेगांवला ये तर खरं, बाकी पुढे पाहू!

तो १९९० चा मे महिना होता. आम्ही प्रथम मुंबईहून जळगावला माझ्या मावशीकडे पोहोचलो व दुसरे दिवशी जळगावहून शेगांवला जाण्याचं ठरविलं. तेव्हा जळगावला थांबत असलेल्या गाड्या अगदी अल्प होत्या. एखादी गाडी सुटली की दुसऱ्या दिवसावर बेत ढकलण्याची वेळ असायची. शेगांवहून २.३० ला परतीची गाडी होती. आम्ही दोघं मुलासह शेगांवला पोहोचलो. स्टेशनवर घोषणा झाली की २.३० ची गाडी भरपूर लेट असून ती संध्याकाळी पाचपर्यंत सुटेल. म्हणजेच आम्हाला दर्शनासाठी भरपूर वेळ उपलब्ध होता. आमचं शेगांव दर्शन छान झालं. मिस्टरांनाही प्रसन्न वाटलं. गाडी लेट असली तरी कधी कधी ती वेळेच्या आधी पण येऊ शकते. या विचाराने आम्ही स्टेशनची वाट धरली. आम्ही पुलावर होतो तोच समोरून एक गबाळ वेषातील खेडवळ माणूस धावत आमच्याकडे आला. आम्हाला म्हणाला, तुम्हाला जळगावला जायचे आहे ना? चला लवकर ती पहा खाली जळगावची गाडी उभी आहे. ती सुटेलच, आता चला घाई करा. ते ऐकून आम्ही पळत सुटलो, गाडीत कसाबसा प्रवेश मिळाला आणि गाडी सुटली. गाडी सुटली आणि आम्ही भानावर आलो. कोण होता तो? त्याला कसं माहित आम्हाला जळगावला जायचे आहे? मुळात आपण तर मुंबईचे, बरं आपण तर कुठे बोललोही नाही. आपल्या दोघांशिवाय हे कुणालाच माहिती नाही. पण आता या प्रश्नांना तसा काहीच अर्थ नव्हता. गाडीच्या वेगासोबत प्रश्न बाजूला जाऊन त्यांची जागा श्रध्देने केव्हाच काबीज केली होती.

असो. तर अशी मी एक महाराजांची श्रध्दाळू भक्त राधिका आचरेकर, मुंबईला चेंबूर येथे रहाते. २००६ ची एक घटना सांगते आणि तुमची रजा घेते. तेव्हा माझे दोन भाऊ नंदू आणि राविन नवी मुंबई वाशीच्या पलीकडे जुईनगर येथे रहात होते. सोबत आई होती. चेंबूर-जुईनगर हे अंतर जवळपास वीस कि. मी. त्या दिवशी आषाढी एकादशी होती. नंदू ने सेकंडहॅन्ड मारुती व्हॅन घेतली होती. त्या दिवशी संध्याकाळी नंदू, त्याची बायको दर्शना, मुलगा सोहम आणि राविन, त्याची बायको तनुजा आणि त्यांचा चार महिन्याचा मुलगा देवम असे सगळे सानपाड्याला खरेदी उरकून माझ्याकडे आले. आई घरीच होती, राविनला अंगात ताप होता. ते रात्री माझ्याकडे ८ वाजता आले आणि फराळ उरकून व आईसाठी फराळाचं घेऊन रात्री उशिरा माझ्याकडून परतीसाठी निघाले, परतीचा प्रवास जास्तीत जास्त पाऊण तासाचा पण रात्रीचे बारा वाजत आले तरीही पोहोचल्याचा फोन आला नाही. मी इकडे अस्वस्थ झाले. बाराच्या सुमारास राविनचा फोन आला, ताई वाशी टोल नाक्याजवळ आमची गाडी बंद पडली आहे. नंदू आणि वहिनी मेकॅनिकला शोधायला गेले आहेत. लहान मुले, स्त्रिया, अपरात्रीची वेळ. मी बेचैन झाले. पुन्हा थोड्या वेळाने फोन आला. मेकॅनिक कुठे मिळत नाही आहे आणि गाडी सुरू होत नाही आहे, आम्ही जिथे फोन ठेवतो तिथेच गजानन महाराजांची मूर्ती आहे. मी महाराजांना म्हटलं महाराज तुम्हीच यातून काही मार्ग काढू शकता. माझ्या हातात तुम्हाला म्हणणं हाच मार्ग आहे. काही तरी मदत त्यांना मिळू दे. मी प्रार्थना करून अस्वस्थपणे आत बाहेर फिरत होते मधेच मूर्ती समोर बसून पुन्हा प्रार्थना करीत होते.

साधारण अर्ध्या तासाने फोन आला, ताई आम्ही घरी पोहोचलो. मी विचारलं गाडी सुरू झाली का? त्यावर रविननं सांगितलं, अगं नाही विरुद्ध दिशेने एक मारूती सर्व्हिस व्हॅन आली. त्यांच्याकडूनही गाडी सुरू झाली नाही, मग त्यांनी टो करून आम्हाला घरी सोडलं. मी त्यांना विचारलं तुम्ही आमच्यापर्यंत कसे पोहोचलात? तर

त्यांनी सांगितलं, आम्हाला वर्कशॉपला एक फोन आला की अमुक ठिकाणी गाडी बंद पडली आहे, त्यात लहान मुले आणि स्त्रिया आहेत. तुम्ही जाऊन मदत करा. आम्ही त्यांना विचारलं की तुम्ही कोण? त्यावर त्यांनी सांगितलं मी बस मधील एक प्रवासी आहे गाडीच्या बाजूने आमची बस गेल्यामुळे माझ्या हे लक्षात आलं. तुम्ही कृपया त्यांना मदत करा. फोन ठेवला आणि लगेच आम्ही निघालो.

सगळे घरी सुखरूप पोहचले होते. वेळेवर मदत मिळायला कुणीतरी निमित्त ठरला होता. कुणीतरी अचानक सहाय्यभूत ठरणं हा त्याच्याच योजनेचा भाग. त्या रात्री पहिले अस्वस्थपणाने झोप येत नव्हती आणि नंतर गजानन महाराजांच्या स्मरणात झोप हरवली होती. गादीवर पडून जप मात्र सुरू होता. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. राधिका मोहन आचरेकर, चेंबूर, मुंबई – ९८६९२६८२३७.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! गजानन विजय ग्रंथात एकोणीसाव्या अध्यायात, नागपूरातील ज्या सीताबर्डीत महाराज आल्याचा उल्लेख आहे त्याच सीताबर्डीत आणि महाराज ज्या भागात होते साधारण त्याच भागात माझ्या वडिलांनी ८ जुलै १९२५ रोजी, त्यांच्या मोठ्या भावाला मदतीला घेऊन एक पुस्तक विक्रीचे दुकान काढले. वडिलांच्या मेहनतीमुळे दुकान खूप चालले, नावारुपाला आले. मात्र पुढे माझे काका आणि काकू दोघांचेही निधन झाले. वडिलांनी भावाच्या मुलांप्रती असलेली जबाबदारी स्वीकारून दोन मुलांना दुकानात भागीदार म्हणून घेतले. मात्र पुढे कितीही टाळण्याचा प्रयत्न केला तरी कौटुंबिक कलह उद्भवलाच आणि वडिलांनाच दुकानातून दूर सारण्याचा प्रयत्न होऊन वडील हताश झाले. १९२५ ते १९६२ तब्बल सदतीस वर्षे ज्या दुकानासाठी रक्त आटवलं ते दुकान सोडून देऊन वडील घरी बसले आणि मानसिक आघातामुळे पार मोडून गेले.

आज माझं वय ७५ च्या पुढे आहे. पण तेव्हा मी तरूण होतो. मी खूप समजावून पाहिलं, त्यांना म्हटलं, बाबा बंदूक लढत नसते तर त्या बंदूकीमागे असणारा सैनिक लढत असतो. आपण नवीन दुकान काढू, पण एक ना दोन, ऐकायलाच तयार नव्हते. माणसाला अशा वेळी श्रध्दा खूप बळ देते पण त्यांचा संत, देव, मूर्तीपूजा यावर अजिबात विश्वास नव्हता. ते कधी मंदिरात जायचे नाही की घरी देवपूजाही करायचे नाही.

माझी आई मात्र १९५० पासूनच गजानन महाराजांची भक्त होती. जमेल तसं पारायण करणं आणि त्या काळी शेगांवहून प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी भक्तांना मनीऑर्डर फॉर्म येत असे, त्यातून अकरा रुपये शेगांवला पाठविणे व तिथून आलेला प्रसाद श्रध्देने घेऊन आम्हालाही ती देत असे. आईच्या नातेवाईकांमधेही गजाननमहाराजांविषयी श्रध्दा होती. मला आठवतं, तेव्हा इंदोरहून आईचे काही नातेवाईक शेगांवला जाण्यासाठी म्हणून नागपूरला आले होते. त्यांनी वडिलांना खूप आग्रह केला. म्हणाले, अहो प्रवासासाठी म्हणून तरी आमच्या बरोबर शेगांवला चला, तेवढंच तुमच्या मनाला बरं वाटेल. कसेबसे ते तयार झाले, सर्व लोक शेगांवला गेले. दोन दिवस तिथे राहिले. परत येताना वडील चक्क फ्रेम केलेला महाराजांचा फोटो आणि श्रध्दा घेऊनच परतले. काय चमत्कार झाला कुणास ठाऊक, अक्षरशः पंधराव्या अध्यायातील त्या ओव्या खऱ्या ठरल्या, पशूचिमेला मावळला । तोच पूर्वेकडे आला । विचार सुर्य त्याचा भला । श्रीधरा सुखी करण्यास ॥ एक संता वाचून । विचाराचे परिवर्तन । कोणी न करु शके आन । सत्य एक त्यांनाच कळे ॥

वडिलांनी जुन्या दुकानावरील हक्क सोडून दिला आणि ताराबाई बुटींकडे दुकानाचा गाळा आरक्षित केला. महाराजांच्या फोटो समोर दुकानाच्या नावाच्या अनेक चिठ्ठ्या टाकून त्यातील एक मला उचलण्यास सांगितली आणि मी उचललेल्या चिठ्ठीत नाव होतं सेन्ट्रल बुक स्टॉल, तो फोटो कुलस्वामिनीच्या फोटो सोबत आजही आमच्या दुकानात आहे. दुकान सुरू झालं, मी शेगांवला जाऊन गजानन महाराजांना वृत्तांत कथन केला आणि दुकानाकडे व माझ्याकडे लक्ष देण्याची प्रार्थना करून आलो. त्यांच्या कृपेने दुकान इतकं भरभराटीला आलं की आजही नागपूर आणि पुस्तक असा विषय निघाला की जाणकारांच्या तोंडून सेन्ट्रल बुक स्टॉल नावाचा उल्लेख होतो. दुकानाच्या वाटचालीत महाराजांचा आशीर्वाद सतत माझ्यासोबत होता माझी पण शेगांव वारी आणि वाचन अशी सेवा होत होती. वडील गेल्यावरही दुकानाची वाटचाल माझ्याकडून त्यांनी योग्य रितीने करवून घेतली.

माणसाच्या आयुष्यात सगळे दिवस सारखेच येतील हे संभवत नाही. मात्र संकटाच्या काळात भगवंताचं अधिष्ठान टिकून राहिलं तर माणूस खंबीरपणे उभा राहू शकतो. इ. स. १९९५ चा फेब्रुवारी महिना होता. दुपारची वेळ होती. एक माणूस दुकानात आला, गर्दी असली तरी आपलं येणाऱ्या जाणाऱ्याकडे लक्ष असतंच. धोतर, पांढरा झब्बा, उंच, भेदक दृष्टी. असा तो माणूस माझ्याकडे एकटक पहात होता, त्याची नजर मला अस्वस्थ करीत होती. थोडी गर्दी कमी झाल्यावर मी त्याला विचारलं, आपल्याला काय हवं आहे? तो म्हणाला, मला तुमच्यासाठी एक पूजा बांधणं आवश्यक वाटतंय, मला एकावन्न रूपये द्या. जास्त उहापोह न करता मी त्याच्या हातावर पैसे ठेवले आणि तो निघून गेला. ती गोष्ट माझ्या विस्मरणात गेली.

सुमारे आठ दिवसांनी गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास तोच माणूस पुन्हा दुकानात आला. त्याच भेदक दृष्टीने माझ्याकडे पहात होता. दुकानात आतल्या बाजूला थोडं निवांतपणे बोलता येतं, मला खुणेनी तो आत घेऊन गेला. गंभीर आवाजात म्हणाला, तुमच्या जीवनात अत्यंत गंभीर आणि दारूण प्रसंग घडणार आहे. तुमच्यावर जीव जाईल इतकं मोठं संकट येणार आहे. हे संकट मी टाळू शकत नाही, त्याची तीव्रता थोडी कमी करू शकतो. त्यानी एक लाल कापडात घट्ट आवळलेली पुरचुंडी मला देऊन सांगितलं की सदैव जवळ बाळगा, संकट गेल्यावर या पुरचुंडीला नर्मदेत सोडून द्या. नर्मदा आणि महाराज हा संबंध मनात येऊन महाराजांचं नाव घेऊन मी ती पुरचुंडी पॅन्टच्या चोर कप्प्यात ठेवणं सुरू केलं.

२५ एप्रिल १९९५ ला काही कामासाठी मला इंदोरला जाण्याचा योग आला. तिथून ३० एप्रिल रोजी सकाळी सात वाजता सरकारी बसने भोपाळला जायचं होतं. मी तिकिट घेतानाच एक गृहस्थ भेटले, म्हणाले, मलाही भोपाळला जायचं आहे. आम्हाला ड्रायव्हरच्या मागच्या लाईनीत बसच्या मधोमध दोन जागा मिळाल्या. मी खिडकी जवळ बसलो. आमचा प्रवास सुरू झाला.

सिहोरच्या आधी एका वळणावर आमची बस आणि लोखंडी सळाकी असलेला एक ट्रक यांची जबरदस्त टक्कर झाली, वेगामुळे खिडक्या कापून सळाकी आत शिरल्या. माझ्या समोरील व्यक्तीचं शीर कापले जाऊन धडा वेगळं होऊन माझ्या मांडीवर येऊन पडलं, माझा उजवा हात खिडकीत होता तो कापल्या जाऊन माझ्या डाव्या हातात आला, माझ्या मागील सीट वरील माणसाचं शीर वेगळं होऊन मागे जाऊन पडलं. किंकाळयांनी वातावरण हादरून गेलं. सर्वत्र रक्ताचा सडा पडला.

आम्हाला दुसऱ्या बसने प्रथम सिहोरच्या हॉस्पिटलमधे आणि तिथे सोयी नसल्याने नंतर अ□म्ब्युलन्सने भोपाळच्या हमीदीया हॉस्पिटलमधे नेण्यात आलं. तो अनोळखी माणूस पूर्णवेळ सावलीसारखा माझ्यासोबत होता. त्याच्या हातात माझी बॅग होती कारण माझ्या हातात माझा हात होता. त्याही स्थितीत माझं महाराजांचं स्मरण सुरू होतं. प्रचंड रक्तस्त्राव होऊनही मी बेशुद्ध झालो नाही, ही महाराजांचीच कृपा. त्या माणसाला मी घरचा आणि दुकानातील नंबर देऊन वृत्त कळविण्याची

विनंती केली. नागपूरहून भोपाळला निरोप पोहोचल्यावर भोपाळचे नातेवाईक आल्यानंतरच त्या माणसाने स्वतःचे नाव गाव काहीही ओळख न देता माझी बॅग त्यांच्याकडे सोपवून निरोप घेतला.

वेळेत उपचार न मिळाल्याने माझा हात तसाच राहिला. बाकी उपचार पूर्ण होऊन मी एकहाती नागपूरकडे निघालो येताना हुशंगाबाद येथे ती लाल पुरचुंडी नर्मदेत सोडून दिली. घडून गेलेल्या त्या प्रसंगात मी जर बेशुद्ध झालो असतो तर मी बेवारसच ठरण्याची शक्यता होती. पण महाराज सतत सोबत होते. मी जे दृश्य पाहिले ते पाहून धडधाकट माणूसही शुध्द हरपेल, अशी स्थिती होती. मांडीवरील शीर पाहून क्षणभर वाटलं मीच गेलो की काय? प्रचंड रक्त जाऊनही मला शुद्धीवर ठेवणारं कोण होतं?

आज ती घटना घडून वीस बावीस वर्षे होऊन गेलीत, पण आठवणीनं आजही थरकाप होतो. महाराजांसमोर गुडघे टेकवून मी नमस्कार करतो तेव्हा माझा एकच डावा हात नमस्कारासाठी समोर येतो, तेव्हा महाराजांना मनात म्हणतो, माझा उजवा हात तुम्ही व्हा आणि माझ्याकडून नमस्कार करवून घ्या आणि सतत नामस्मरणाची बुद्धी देऊन माझ्याकडून तुमचं नाव ओठावर येऊ द्या. श्री गजानन ! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. उल्हास ( बाबू ) मुजुमदार, नागपूर.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! मी आज गजानन महाराजांविषयी अनुभव सांगायचं ठरविलं खरं,पण खरं सांगायचं तर मला माझ्या वयाच्या ३२ व्या वर्षापर्यंत, गजानन महाराज कोण? कोठले? त्यांची समाधी शेगांवला आहे, ते शेगांवचे गजानन महाराज आहेत या बद्दल काही काहीच माहिती नव्हती. एवढेच काय मी तर त्यांचं नावही ऐकलं नव्हतं. या भक्तीच्या वाटेवर प्रत्येकजण कुठल्या ना कुठल्या देवाचा भक्त असतो, त्यावर त्याची नितांत श्रद्धा असते, त्याप्रमाणे मी पण श्री गुरुदेव दत्तांची भक्त होते. त्यांच्यावर माझी नितांत श्रद्धा होती. सांगलीला रहात असल्याने वरचेवर नृसिंहवाडीला जाणे होत होते. पण माझी श्रध्दा गजानन महाराजांच्या दिशेने वळविण्याचा योग भगवंतानेच घडवून आणला.

त्याचं असं झालं, माझे दीर हे पंढरपूरला बँकेत नोकरीस होते. ते विठ्ठल भक्त! ते नियमित विठ्ठलाच्या दर्शनाला जात पालखीला जात. अन् एक दिवस त्यांना पालखीत ठेवलेली गजानन महाराजांची पोथी प्रसाद म्हणून मिळाली. ते अविवाहित असल्यामुळे त्यांनी ती पोथी माझ्याकडे आणून दिली, अन् सांगितलं, वहिनी हे गजानन महाराज खूप मोठे संत आहेत. त्यांची प्रचिती ताबडतोब येते.

मी पोथी हातात घेऊन कितीवेळ तशीच स्तब्ध बसून राहिले. त्यातील फोटो वगैरे बघितले आणि देवघरात पोथी ठेवून दिली. पण रात्री झोपताना मात्र सतत हा विचार होता की, आता हे महाराज कोण? कुठले? मी तर दत्तगुरूंना मानते. त्यांना सोडून या महाराजांना? त्याच विचारात रात्री झोपी गेले. अन् काय नवल! मला पहाटे स्वप्न पडले. मी नरसोबा वाडीला गेले आहे. दर्शनाला गेले. प्रदक्षिणा घालताना माझी नजर शिखरावर गेली, तेथे पहाते तो शेगांवचे गजानन महाराज!

मला खूप आनंद झाला. पोथी घरात आल्या आल्या महाराजांची प्रचिती आली. दत्त आणि मी एकच! हाच संदेश त्यांनी मला दिला असे मला वाटले. सर्व देव नमस्कार: केशवं प्रतिगच्छति. या उक्तीची प्रचिती आली. लगेचच मी पारायणाला बसले, मग काय गजानन विजय ग्रंथाची ख्याती आपण सर्व जाणताच. एवढी त्यात गुंग होऊन गेले, मला भानच उरले नाही. मी दशमी, एकादशी, द्वादशी अशी पारायणं करण्याचा सपाटा लावला. तीन मुलींच्या पाठीवर मला मुलगा व्हावा ही माझी इच्छा त्यांच्या कृपेने पूर्ण झाली. मुलाला दर्शनासाठी आणीन हा माझा नवस पूर्ण करण्याकरिता, आम्ही शेगांवला ऐन सिझनमध्ये रिझर्व्हेशन न करताच निघालो. मनात शेगांवला जायचे एवढेच काय ते होते. गाड्यांना तुफान गर्दी! माझ्या मैत्रिणीचे वडील म्हणालेसुध्दा, कोठे चाललीस? म्हटलं शेगांवला! रिझर्व्हेशन केलंस का? म्हटलं, नाही. मग तुम्ही एवढे पाच सहा लोक कसं जाणार एवढ्या गर्दीत. माझ्या तोंडून सहज निघालं. महाराज नेतील की! अन् ते अक्षरशः खरं झालं. एवढ्या गर्दीत आम्ही घाईघाईत एका रिझर्व्हेशनच्या डब्यात शिरलो. तिथे एक संपूर्ण मोठा बाक रिकामा होता. मी पटकन म्हटलं, अहो हे बघा महाराजांनी आपल्यासाठी जागा ठेवलीय. आम्ही सर्व त्या जागी विराजमान झालो. मी गजानन महाराजांचे मनोमन आभार मानले. पुढे टी. सी. डब्यात चढला. पुन्हा परीक्षा. मी महाराजांचा धावा सुरू केला. पण तो आमच्याकडे न येताच निघून गेला. मला आनंदानं रडू कोसळलं. ऐन सिझनमध्ये बिना रिझर्व्हेशनचे आम्ही रिझर्व्हेशनचे सुख अनुभवत दुसरे दिवशी शेगांवला पोहोचलो.

मंदिरात आलो तर भक्त निवास हाऊसफुल्ल. सर्वत्र तोबा गर्दी. लोक मंदिराच्या प्रांगणात बसून होते. तो १९८० चा काळ, तेव्हा आजच्या इतक्या भक्त निवासाच्या सोई व्हायच्या होत्या. मी ह्यांना म्हटलं, तुम्ही लॉज बघून या, हे तिकडे गेले. मी मुलांना घेऊन सामानाजवळ महाराजांच्या स्मरणात बसून होते. सांगायची गंमत म्हणजे नवस फेडण्याच्या विचारात जसा रेल्वे गर्दीचा विचार डोक्यात आला नाही. तसा दशमी, एकादशीचा विचार आला नाही. एकादशीला शेगांवला नेहमीच गर्दी असते. प्रचंड गर्दीमुळे यांची चिडचिड होत होती आणि मनातल्या मनात धास्तावून मी महाराजांचा धावा करीत होते. इतक्यात एक पंधरा सोळा वर्षांचा मुलगा एवढ्या गर्दीतून माझ्याकडे आला नि म्हणाला, तुम्हाला खोली पाहिजे नं? तो अकस्मात कसा आला, मलाच खोली विषयी कसं काय विचारतो आहे? काहीच न उमगून यंत्रवत हात समोर केला. त्यानं माझ्याकडे एक किल्ली दिली व सांगितले ४५ नंबरची खोली आहे, आणि ताडकन निघून गेला. मी अवाक् होऊन बघतच राहिले. इतक्यात हे आले नि तावातावाने ओरडले, तुला महाराजांनी दशमी एकादशीलाच बोलावले होते का?

मी काहीच न बोलता त्यांच्याकडे किल्ली दिली आणि सांगितलं ४५ नंबरची खोली आहे. आता अवाक् व्हायची वेळ यांची होती. आम्ही सर्व तिथे गेलो, ४५ नंबरची खोली आमच्यासाठी उपलब्ध होती. कॉमन संडास बाथरूम असलेली, जुन्या पद्धतीची ती खोली होती, पण आमची सोय झाली होती. मी जाहीर केलं, दर्शन झाल्याशिवाय खाणेपिणे काही नाही. खूप लोक आले होते. रांगेत उभे राहून दर्शन घेतलं, तेव्हा समाधान झालं.

त्या संध्याकाळी शेगांवला महाराजांची पालखी निघणार होती. ती माझ्या साठी एक पर्वणीच होती. माझ्या आग्रहाखातर आम्ही सर्व पालखी सोबत चालू लागलो, पालखी देऊळात परत येत असताना बाजूला असलेल्या एका मंदिराच्या शिखराकडे माझी नजर गेली आणि मी आतून मोहरून उठले. ज्या दिवशी प्रथमच माझ्या हातात गजानन विजय ग्रंथ आला होता त्या रात्री मला स्वप्नात नरसोबाच्या वाडीला मंदिराच्या शिखरावर शेगांवच्या गजानन महाराजांनी दर्शन दिलं होतं, आज मला शेगांवला गजानन महाराजांचं दर्शन होत होतं. माझ्या तोंडून एकदम शब्द बाहेर पडले, गजानन महाराज! त्याबरोबर सर्वांचीच नजर तिकडे वळली आणि सर्वांनीच भक्तिभावाने हात जोडले .

त्या शेगांव वारीत आमचं दर्शन खूपच छान झालं. आज मी गजानन महाराजांशी जुळल्या गेल्यामुळे अत्यंत समाधानी आहे आणि या समाधानाचं श्रेय विठ्ठलाच्या वारीत पालखीतून मिळालेल्या त्या पोथीचं आहे, याची मला मनोमन जाणीव आहे. अर्थात ती पोथी माझ्यापर्यंत पोहोचविण्याची योजना ज्या गजानन महाराजांची आहे त्यांना माझं सदैव वंदन आहे. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. प्रिया मोहन कुलकर्णी, सांगली – ८९७५७२८५८९.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! मी अरूण कृष्णराव देशपांडे, माझं लग्न झालं. माझी पत्नी सौ. संध्या तिच्या माहेराहून सोबत गजानन महाराजांची भक्ती घेऊन आली. गजानन महाराजांविषयी काही तिने सांगितलं तर काही मी जवळून अनुभवलं, पण मी मात्र भक्तीगंगेच्या काठावरच उभं राहणं पसंत केलं. तिच्या लहान भावाच्या मेडिकल प्रवेशाच्या वेळी तिनं महाराजांना साकडं घातलं की, तो डॉक्टर होताच मी त्याला दर्शनासाठी घेऊन येईन आणि मरेपर्यंत तुमच्या पोथीचं वाचन करीन. त्याप्रमाणे तो आज नांदेड येथे एक नामांकित हृदयरोग तज्ञ म्हणून आहे.

आमचा लहान मुलगा मयूर सातव्या वर्गात असताना मेंदूज्वराने आजारी झाला. ४,५ डॉक्टर सतत प्रयत्न करीत होते पण काही केल्या ताप काही उतरत नव्हता, मी घाबरलो पण हिने धीर सोडला नाही. महाराजांच्या फोटोला पाहून ती बोलली देवा माझा दिवा वाचव, तो बरा होताच त्याला घेऊन मी तुझ्या दरबारात दिवा लावीन. रात्री दोन वाजता त्याचा ताप उतरला, धोका टळला होता. रात्री दोनपर्यंत ती अखंड नामस्मरण करीत होती.

अशा अनेक लहान मोठ्या प्रसंगातून तिची श्रध्दा वाढतच होती पण मी मात्र अजूनही कोरडाच होतो. इ. स १९८५ ची गोष्ट, तेव्हा मी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात, वरिष्ठ लिपिक पदावर कार्यरत होतो. त्यावेळी औरंगाबाद गृहनिर्माण मंडळात (म्हाडा कॉलनी) चार खोल्यांचा एक गाळा मी मोठ्या हिंमतीने बुक केला. पण काम सुरू होताच काही अंतर्गत वादामुळे त्यावर न्यायालयाची स्थगिती आली. परिणामी ते काम रेंगाळलं, अशात ऑक्टोबर १९८८ साली माझी बदली आंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात झाली.

आर्थिक स्थिती ठीक नसेल तर सर्वसामान्य माणसासाठी अर्थकारण एक तारेवरची कसरत असते. आमच्या घरी दोन मुलं, दोन मुली, मुलीच्या लग्नासाठी मी कसाबसा पैसा जोडीत होतो. तो जून १९९१ साली गृहनिर्माण मंडळ, औरंगाबाद यांचेकडून अचानक पत्र आलं की गाळा हवा असल्यास तात्काळ रुपये साठ हजार भरून गाळा ताब्यात घ्या. त्या काळात माझा भावठाणकर म्हणून एक मित्र माझ्या पाठीशी उभा राहिला, त्याने धीर दिला, म्हणाला, गाळ्यासाठी पैसे भर, मुलीचं लग्न ठरलंच तर मी सहाय्य करीन. मी पैसे भरून गाळा ताब्यात घेतला.

या गाळ्याचा मासिक हप्ता १५०० रुपये होता, तो माझ्या पगारातून भरणं मला शक्य नव्हतं, तेव्हा डोक्यात एक विचार आला की काही दिवस घर किरायानं द्यावं आणि एकाच्या मध्यस्थीनं दंडारे नामक लाईटचं काम करणाऱ्या एका व्यक्तीला घर किरायानं दिलं. त्याला घर काय भाड्यानं दिलं तिथेच दुर्दैवं आड आलं. त्याने दोन तीन महिने किराया दिला पण नंतर पैसे देणं तर बंदच केलं उलट तो गाळा स्वतःच्या नावावर करून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. ही बाब माझ्या कानावर येताच मी शासकीय कर्ज काढून एक रकमी १ लाख ८० हजार रुपये भरले व न्यायालयात खटला दाखल केला.

शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये म्हणतात, पण इलाज नव्हता. एकीकडे कोर्टाच्या तारखांवर तारखा, त्याच काळात म्हणजे ५ फेब्रुवारी १९९२ ला मोठ्या मुलीचं लग्न, त्यासाठी कर्ज, घराचा हप्ता, त्यातच मातोश्रीला झालेला जीवघेणा कर्करोग. भरीस भर नांदेड येथे बदली, देव माझी कठोर परीक्षाच पहात होता. कधी कधी तर नांदेड -औरंगाबाद तिकिटासाठी पैसे नसत. अशी पाच वर्षे गेलीत. अत्यंत हलाखीत आम्ही दिवस काढीत होतो. ही मला धीर देत होती. म्हणायची, महाराजांच्या चरणी नवस बोला. ते नक्कीच आपल्याला यातून मार्ग दाखवतील. त्यांना म्हणा काम झाल्यावर शेगांवला एक दिवसाची प्रासादिक पंगत देऊ. मी तिच्यावर चिडून म्हणायचो, माझं काम झाल्याशिवाय मी महाराजांच्या दरबारात पाऊल सुद्धा ठेवणार नाही.

६ मार्च १९९६ ला कोर्टात तारीख होती म्हणून मी औरंगाबादला जाऊन आलो पण घर मिळण्याचं काहीच चिन्ह नव्हतं, मी हताश झालो. अशात ९ मार्च १९९६ रोजी हिचा भाचा सचिन मान्नीकर याचं नागपूरला लग्न होतं. मुलाचं मॅट्रीकचं वर्ष असल्यामुळे मी आणि लहान मुलगी वैदेही आम्ही नागपूरला जावं असं ठरलं. मला आठवतं ७ मार्चला पहाटे मुलगा अभ्यास करतो आहे की नाही ते पहावं म्हणून उठलो आणि पुन्हा झोपलो. साडे चारला माझा डोळा लागला आणि त्या पहाटे मला स्वप्न पडलं. मी आणि मुलगी वैदेही स्टेशनवर बाकावर बसलो आहोत. पांढऱ्या शुभ्र वेषातील गजानन महाराजांसारखे दिसणारे एक गृहस्थ काठी टेकत माझ्याकडे आले आणि मला विचारलं कुठे निघालेत? म्हटलं नागपूरला! अच्छा, विदर्भातच जाता आहात, एक काम करा शेगांवला जाऊन महाराजांचं दर्शन घ्या. मी त्यांना माझा निर्धार सांगणार, त्यापूर्वीच ते म्हणाले, तुझं काम तर झालं आहे! जा शेगांवला जा! मला लगेच जाग आली, मी लगेच घरच्यांना जागं केलं आणि शेगांवला जाण्याचा निर्णय जाहीर केला. पत्नी म्हणाली, तुम्ही ठीक आहात नं? कालच औरंगाबादहून आलात आज हे काय? पण माझा निर्धार पक्का होता.

७ मार्च १९९६ ला रात्री नांदेडहून निघून ८ मार्चला आम्ही शेगांवला पोहोचलो दर्शन घेऊन कार्यालयात गेलो, तिथे आदरणीय शिवशंकरभाऊ पाटील होते. त्यांना सर्व हकीकत कथन केली आणि पंगत वाढण्याचा खर्च विचारला तो खर्च दहा हजार रुपये होता पण तेव्हा माझ्याजवळ सहाच हजार रुपये होते. पण भाऊंनी परिस्थिती समजून घेतली, मला म्हणाले, ठीक आहे, बाकी पैसे तुम्ही नंतर पाठवा. आमची माणसं स्वयंपाक करतील तुम्ही सर्वांनी पंगत वाढण्यात सहभाग घ्या. त्याप्रमाणे तेव्हाच्या पद्धतीने आम्ही पंगत वाढल्यावर, आमची वेगळी पंगत वाढून आमचं छान आदरातिथ्य केले, मला सोवळं, हिला साडी, चांदीच्या पादुका दिल्या. सर्वांचा निरोप घेऊन आम्ही रात्री नागपूरला पोहोचलो.

लग्न घरी माझे मोठे मेव्हणे जे म्हाडाचे मोठे अधिकारी होते ते आले होते, त्यांनी विचारल्यावरून मी त्यांना शेगांवहून आल्याचे वृत्त कथन केले, ते मला म्हणाले. काय हे? अहो या काळात स्वप्नावर विश्वास ठेवून तुम्ही नवस फेडून आले? असं म्हणून तिथे जमलेले सर्वच आमची चेष्टा करु लागले. मी मात्र निमूटपणे ऐकून मनात महाराजांचं स्मरण करीत निवांत राहिलो.

९ मार्च १९९६ रोजी विवाह आटोपून रात्रीच्या बसने आम्ही नागपूरहून नांदेड साठी निघालो. सकाळी ऑफिसमधे उपस्थित झालो. दुपारी लंच टाईमला घरी येऊन

जेवून ऑफिसला परतलो. तो सर्व सहकारी मित्रांनी एकदम भोवती गराडा घातला आणि ते मला पार्टी मागू लागले. म्हटले, कशाबद्दल तर म्हणाले, पहिले पैसे हातावर ठेवा मग सांगतो. मी पैसे देताच माझ्या हातावर त्यांनी तार ठेवली. ती पहाताच मला आश्चर्याचा धक्काच बसला. रातोरात दंडारेनी घर रिकामं करून तिथून पलायन केलं होतं, तार होती घराचा ताबा घेण्यास ताबडतोब या. ही गोष्ट १० मार्चची, मी ११ मार्च १९९६ रोजी माझ्या घराचा ताबा घेतला.

पाच दिवसात महाराजांनी इकडची गोष्ट तिकडे केली होती. स्वप्नात आलेले गजानन महाराजच होते, यासाठी कुणाच्या साक्षी पुराव्याची गरज उरली नव्हती. आतापर्यंत कोरडा असलेला मी भक्तीगंगेत चिंब भिजून गेलो होतो, ज्याला त्याला हातावर पेढा देऊन एकच म्हणत होतो, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. अरुण कृष्णराव देशपांडे, औरंगाबाद – ९८२२५०३२८९.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! ८-९-१९१० रोजी ऋषीपंचमीच्या पावन मुहूर्तावर , समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराजांनी श्री क्षेत्र शेगांव येथे समाधी घेतली. शेगांवचे मंदीर आम्हा सर्व भक्तांसाठी एक श्रध्दास्थान आहे. मंदीर बांधीत असतानाचे काही अनुभव ह. भ. प. संतकवी दासगणू महाराजांनी गजानन विजय ग्रंथात कथन केले आहेत. आज महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर मिळून महाराजांची शेकडो मंदिरं आहेत आणि जवळपास प्रत्येक मंदिर बांधीत असताना, काही ना काही अनुभव भक्तांना आला आहे.

जसे, उदा. अमरावती जिल्ह्यातील डोमक येथे नुकतेच २०१७ साली संत गजानन महाराज सेवा समिती डोमक तर्फे महाराजांचे मंदिर बांधीत असताना गावातील लोकांना वाटलं, बांधकामात आपण सेवार्थ श्रमदान करावं आणि चारशे ते पाचशे तरूणांनी स्लॅबच्या दिवशी कुणी दोन, कुणी चार घमेली कॉंक्रीट टाकलं. ते पाहून तेथील मिस्त्री आणि सेंटरींगवाला म्हणाले आज आम्हीही निःशुल्क सेवा देणार. ही गोष्ट मंदिराच्या इतिहासात नमूद करण्यासारखी ठरली. तर मुद्दा असा आहे की, इ. स. २००५ च्या सुमारास अहमदाबाद येथे गजानन महाराजांचे मंदिर बांधीत असताना आम्हाला आलेले काही अनुभव प्रातिनिधिक स्वरूपाचे म्हणून आम्ही सांगू इच्छितो. पण आम्हाला खात्री आहे की तुम्ही कुठेही मंदिर बांधा महाराज तुम्हाला अनुभव समृद्ध करणारच.

तर झालं असं की, १९९१ ला अहमदाबाद येथे प्रकट दिनाचा कार्यक्रम एका ठिकाणी व्यक्तीगत स्वरूपात सुरू, झाला, नंतर १९९४ ते २००४ आम्ही सामुहिक कार्यक्रम केला आणि सर्वांच्या मनात आलं की आपण गजानन महाराजांचं मंदिर बांधावं, त्याप्रमाणे अहमदाबाद येथील चांदखेडा जवळ, त्रागड येथे मंदिरासाठी जागा घेण्यात आली. अक्षय तृतीयेच्या दिवशी अहमदाबाद मधील स्वामी नारायण सांप्रदायाचे संत पुरुषोत्तमदास यांच्या हस्ते भूमीपूजन करण्याचं ठरलं.

भूमीपूजनाच्या आदल्या दिवशी इतका जोरदार पाऊस पडला की, त्या जागेत जवळपास कमरेइतकं पाणी जमा झालं. आता या तलावात भूमीपूजन व्हावं कसं? कार्यकर्त्यांनी महाराजांना प्रार्थना करून श्रमदानाची शक्ती मागितली. मैदानातच एकीकडे मातीचा बंधारा टाकून त्या पलीकडे पाणी फेकणं सुरू केलं, कार्यकर्त्यांनी सात आठशे बादल्या पाण्याचा उपसा केला, पूर्ण पाणी काढून टाकलं, पाऊस थांबला, ऊन आलं. दुसरे दिवशी तिथे भूमीपूजनाचा कार्यक्रम झाला तेव्हा काल इथे तळं होतं, हे सांगूनही खोटं वाटलं असतं. महाराजांनी परीक्षा घेतली खरी पण पाठीशी असल्याचा प्रत्ययही दिला. आता भूमीपूजन तर झालं पण विरोधाभासातील गंमत बघा, त्या दिवशी तिथून पाणी बाहेर फेकले आणि आता बांधकामासाठी पाण्याची गरज होती. त्या साठी ग्रामपंचायतीत अर्ज केला, तेथील अधिकाऱ्याने अर्ज तर स्वीकारला नाहीच उलट मी तुम्हाला त्या जागेवर मंदीर बांधू देणार नाही, असं धमकावून आम्हाला बाहेरचा रस्ता दाखविला .

आम्ही टॅंकरने पाणी आणवून पायथ्यापर्यंत बांधकाम केले. आम्ही असं ठरविलं होतं की, गजानन महाराजांच्या या मंदिरात श्रीदत्त, स्वामी समर्थ, साईबाबा, मारूती, गणपती, महादेवाची पिंडी या सर्वांची स्थापना करावी. हे सर्व काम सुरळीत व्हावे म्हणून गजानन युवा वर्गातील एक सदस्य सहपरिवार गजानन महाराजांचा आशीर्वाद घेऊन अष्टविनायकाच्या यात्रेला गेला. त्याने प्रत्येक ठिकाणी गणपती समोर मंदीराच्या कामात येणाऱ्या अडथळयांच्या विषयी माहिती दिली आणि तेथील पुजाऱ्याकडून एक श्रीफळ मागून घेतले. परत आल्यावर आम्ही संभाव्य मंदीराच्या आठ दिशांना ती आठ श्रीफळं जमीनीत पुरली आणि महाराजांचा आशीर्वाद घेऊन बांधकाम सुरू केले. काहीच दिवसात आम्हाला कळले की आम्हाला परवानगी नाकारणारा अधिकारी बदलून कुठे दूर गेला आहे आणि नवीन अधिकारी आम्हाला परवानगी देण्यास उत्सुक आहे. मंदीराचं बांधकाम वेगानं सुरू झालं आणि एक दिवस काही मजूर अचानक घाबरून उठले, एक आठ फुटी नाग तिथून सळसळ करीत जाताना त्यांनी पाहिला, काही दिवसांनी पुन्हा तेच झालं. नंतर तो मधे मधे दिसत राहिला, बांधकाम करणाऱ्यामधे त्याची दहशत निर्माण झाली, तो चर्चेचा विषय झाला. मग आम्ही सर्वांनी महाराजांना प्रार्थना केली, महाराज निश्चिंतपणे काम होऊ द्या. त्या प्रार्थनेनंतर नाग पुन्हा आला नाही, पण या गोष्टीला केवळ योगायोग म्हणता येणार नाही कारण मंदीरावर ज्या दिवशी कळसारोहण झालं त्या दिवशी नागराजांनी पुन्हा दर्शन दिलं, किंबहुना त्यांनी कळसाकडे पाहिलं आणि ते निघून गेले.

मंदिराचं काम होत असतानाच आम्ही जयपूरला सर्व मूर्त्यांसाठी आमची मागणी नोंदविली होती. त्याप्रमाणे मूर्ती तयार झाल्याचा निरोप आल्यावर आम्ही गाडी करून जयपूरला गेलो. गाडीचा ड्राइव्हर म्हणाला, साहेब येताना ऑक्ट्राय आणि चेकिंगसाठी आपल्याला थांबावं लागेल, कमीत कमी तीन तास आपले तिथे जातील म्हटलं, ठीक आहे. आम्ही जयपूरला पोहोचलो, त्या सुंदर मूर्ती पाहून आम्ही भावविभोर झालो. मूर्तींसह आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. आश्चर्य म्हणजे त्या दिवशी आम्हाला कुठेही कुणीही थांबविलं नाही. तो ड्राइव्हर म्हणाला सहाब पिछले दस बीस सालसे गाडी चला रहा हूँ. ऐसा कभी नही हुआ. त्याच्या या बोलण्यावर आम्ही नुसतेच हसलो आणि मागे गाडीत असलेल्या सर्व देवतांना नमस्कार केला.

आता मंदीर दर्शनासाठी खुले झाले. आम्ही अभिषेकासाठी म्हणून देवतांच्या लहान पंचधातूच्या मूर्ती तयार करवून घेतल्या, मात्र काहीच दिवसात मंदिरात चोर येऊन त्या पंचधातूच्या मूर्ती चोरीला गेल्या. आम्ही पोलिसात तक्रार केली पण काही फायदा झाला नाही. मग आम्ही गजानन महाराजांना प्रार्थना केली. महाराज चोरांनी त्या मूर्ती विकल्या तर हरकत नाही, त्यांचं भलं होवो पण त्या मूर्ती खंडित होऊ नयेत. बाकी तुम्ही समर्थ आहात. या गोष्टीला तीन वर्षे झालीत आणि एका ऋषीपंचमीच्या दिवशी मंदिरात नामस्मरणाचा कार्यक्रम सुरू असतानाच शेजारच्या मंदिरातील एक माणूस आम्हाला बोलवायला आला आपके चिलीमवाले बाबाकी मूरत हमारे मंदीरमे कोई रखके गया है. आम्ही ताबडतोब त्या मंदिरात पोहोचलो. चोरीला गेलेल्या सर्व मूर्त्या तो चोर तिथे ठेवून गेला होता. महाराजांनी आमची प्रार्थना ऐकली होती.

तर एकंदरीत आम्ही गजानन महाराजांचे मंदीर बांधीत असताना आम्हाला आलेला हा अनुभव आहे आणि सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे तो प्रातिनिधिक आहे. बाकी कुठे पैशाची समस्या, कुठे जागेची समस्या, कधी बांधकाम साहित्याची समस्या, कुठे मूर्तीविषयक बाब, एक ना अनेक सर्वच बाबतीत महाराज कुठल्या ना कुठल्या रुपाने सहाय्य करीतच असतात, मार्ग दाखवितच असतात. आपलं काम इतकंच की त्यांच्यासमोर भावपूर्ण अंतःकरणाने उभे रहा आणि मनापासून म्हणा. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ वंदना शैलेश देशकर, अहमदाबाद (सदुरूधाम गजानन महाराज मंदीर) – ८८६६४४३८८६.

शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! मी सौ. आरती कोकर्डेकर, वडोदकर १९९७ ला माझं लग्न झालं. १९९८ ला मोठी मुलगी सायलीचा जन्म झाला. यांची खाजगी नोकरी, पगार फारसा असा नव्हताच. पण २००४ साली बॉससशी तात्विक वादविवाद होऊन तीही नोकरी सुटली आणि आमच्या परीक्षेचा काळ सुरू झाला. आपल्या मूळ गावी परतावं म्हणून नाशिकहून आम्ही नागपूरला परतलो.

पूर्वी हिंदी सिनेमात हिरो नोकरीसाठी वणवण फिरतो हे पाहिलं होतं. पण प्रत्यक्ष जीवनात नवऱ्यावर ती वेळ आली तेव्हा देव आठवू लागले. मला एका खाजगी शाळेत अत्यंत तुटपुंज्या पगारावर नोकरी मिळाली, शिवाय दोन चार लहान मुलांना शिकवून ते पैसे जोडून केवळ दोन घास पोटात ढकलण्याची सोय झाली. पण आपण बायकोच्या भरवशावर जगतोय या कल्पनेतून नवऱ्याचं मानसिक खच्चीकरण होऊन नको ते विचार त्याच्या डोक्यात घर करू लागले. स्वाभिमानी वृत्तीमुळे कुणाला काही मागण्याचा प्रश्नच नव्हता,उलट भावाबहिणींनी आपुलकीनं विचारलं, तरी दयेची भीक या कल्पनेनी जीव नकोसा व्हायचा. एकदा दूध आणायलाही पैसे नव्हते, मग आम्ही काळाच चहा पित होतो. तेव्हा मुलं म्हणाली, आई आम्हालाही काळा चहा चालेल. त्या संध्याकाळी धरमपेठ येथील गजानन महाराज मंदिरात जाऊन महाराजांसमोर बसून मी खूप रडले, मग मी रोज मंदिरात जाऊन महाराजांशी बोलू लागले, कधी रडायची, कधी बोलायची, कधी चिडायची. निदान लहान मुलांची तरी कीव करा, असं म्हणायची.

२००६ मधे यांना नोकरी मिळाली, वाटलं आता ठीक होईल. पण २००८ ला ती कंपनी बंद पडली, पुन्हा बेकारी. पण आता कदाचित महाराजांना दुसऱ्या आघाडीवर माझी परीक्षा पहायची होती. लहान दीरांनी ऑफिसमधे ह्यांच्या विषयी बोलून ठेवले होते, त्याचा फायदा होऊन ह्यांना औरंगाबाद येथे नोकरी मिळाली आणि आम्ही सर्व औरंगाबादला आलो. ह्यांची नोकरी सुरू झाली. डिसेंबर २००९ सायलीची तब्येत बिघडली म्हणून तिला जवळच्या डॉक्टरांना दाखविलं. त्यांना वेगळा संशय येऊन त्यांनी डॉ. पारगावकर यांच्याकडे पाठविलं, तिथे तिचं पूर्ण चेकअप केल्यावर तिच्या हृदयाला छिद्र असल्याचं लक्षात येऊन त्यांनी औरंगाबाद मधील कमलनयन येथील डॉ. आनंद देवधर यांच्याकडे जाण्याचा सल्ला दिला. डॉक्टरांनी रिपोर्ट पाहून २३ डिसेंबरला अ□डमिट होऊन २४ डिसेंबरला ऑपरेशन करावं लागेल, अन्यथा मुलगी हातची जाईल, असं सांगितलं. २३ तारखेपर्यंत दीड लाख रुपयांची सोय करावी लागेल हेही सांगायला डॉक्टर विसरले नाहीत. त्या अनोळखी गावात परिस्थिती कठीण झाली पण आमचे घरमालक राव म्हणून होते ते म्हणाले आम्ही पाठीशी आहोत, ह्यांच्या ऑफिसमधे मेडिक्लेमची सोय होती परंतू लगेच पैसा मिळेल, ह्याची शक्यता कमीच होती. हे सकाळी महाराजांसमोर बसले, म्हणाले. ही स्थिती निर्माण करणारा तूच आहेस तर मार्ग काढणाराही तूच आहेस. मेडिक्लेमच्या ऑफिसातून फोन आला ७५% रक्कम मिळू शकेल.

२४ डिसेंबरला डॉक्टर म्हणाले, ५०-५० चान्सेस आहेत. दहा वर्षांच्या सायलीला, ऑपरेशन थिएटरमधे नेताना कल्पनाही नव्हती की तिला किती दिव्यातून जायचं आहे. तिचा निष्पाप चेहरा दाराआड गेला आणि आम्ही उर फुटून रडायला लागलो. ५,६ तास ऑपरेशन चाललं. मला एकदा सायली आणि एकदा गजानन महाराज आलटून पालटून दिसत होते. डॉक्टरांनी बाहेर येऊन ऑपरेशन यशस्वी झाल्याचं सांगितलं तेव्हा आम्ही दोघांनीही महाराजांचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्या पायावर डोकं ठेवलं. प्रथम ४२ तास अतिदक्षतेचे आणि नंतर दोन वर्ष काळजी घ्यावी लागेल, असा सल्ला दिला.

कधी कधी मनाला वाटतं महाराजांनी आपल्याला विद्यार्थी म्हणून स्वीकारले आहे की काय. कारण वेगवेगळ्या प्रकारे सारखी आमची परीक्षा सुरू असते, अर्थात पास होण्यासाठी मार्गही तेच दाखवितात म्हणा. त्यांनी आर्थिक परीक्षेत पास केलं. आम्ही २०१० मधे गाडी घेतली, २०१२ मधे स्वतःचा फ्लॅट घेतला. आमच्या तिरुपती पार्क येथील सोसायटीत काही वर्षांपूर्वी २०१६ मधे एक विचित्र अपघात झाला. सोसायटीत सिन्टेक्सच्या २००० लिटरच्या जुन्या टाक्या विक्रीस काढल्या. सर्व टाक्या चौथ्या मजल्यावरील गच्चीवर होत्या. पाच सहा लोक दोरीच्या सहाय्याने टाक्या खाली उतरविण्याचे काम करीत होते. खाली मुलं खेळत होती म्हणून मिस्टर मुलांना बाजूला करण्यासाठी खाली गेले होते, फ्लॅटमधील लोक गॅलरीतून हे सर्व पहात होते. दोरीच्या सहाय्याने एक एक टाकी खाली घेण्याचं काम होत होतं आणि अचानक दोर तुटला, ती एवढी मोठी टाकी वरून खाली यायला निघाली, सगळ्यांच्या लक्षात आलं की ही टाकी आता माझ्या मिस्टरांच्या अंगावर पडणार, भितीमुळे सर्व ओरडू लागले, मी जोरात गजानन महाराज धावा, महाराज धावा, असं जीवाच्या आकांताने ओरडत खाली धावले. टाकी कशावर तरी आपटल्याचा जोराचा आवाज कानावर आला, हे पालथे गेटजवळ पडले होते. पाहून काळजात धस्स् झाले. टाकीचे दोन तुकडे झाले होते. पण महाराजांच्या कृपेने हे सुरक्षित होते. आता माझ्या सोबत फ्लॅट मधील सर्वच लोक खाली जमा झाले होते. झालं असं की, टाकी लोखंडी गेटवर पडून तिचे दोन तुकडे झाले, ह्यांना स्पर्श करून एक तुकडा बाजूला पडला. ह्यांना थोडासा धक्का बसल्यासारखं झालं, ह्यांना उठवून आम्ही उभं केलं, आम्ही फ्लॅटमधे २०१४ पासून गजानन महाराज प्रकट दिन साजरा करत होतो अर्थात गजानन महाराज हेच दैवत हे सर्व जाणून होते. मी जोरात ओरडले गजानन महाराज की उपस्थितांनी प्रतिसाद दिला, जय! त्या दिवसापासून उपस्थित सर्वांचीच महाराजांवर श्रध्दा दृढ होऊन आम्ही अधिक उत्साहाने प्रकट दिन साजरा करण्यास प्रारंभ केला.

आता महाराजांच्या आशीर्वादाने सर्व व्यवस्थित सुरू आहे. नाही म्हणायला कंपनीत थोडा पगाराच्या अनियमिततेचा प्रश्न् आहे, पण महाराज ठीक करतीलच असा विश्वास आहे. बाकी मधे मधे महाराज काही आनंदाचे क्षण देत असतात, ते क्षण जीवन जगण्याचा उत्साह वाढवित असतात.

२०१७ च्या प्रकट दिनाला आम्हाला वृध्दी असल्यामुळे केवळ कुणाकडून नैवेद्य दाखवून महाप्रसाद व्हावा असा निर्णय ठरला. पारायण सध्या करू नये असं काही पोक्तांनी सांगितलं. प्रकट दिन आहे आणि महाराजांसमोर पारायण नाही या कल्पनेने मी अस्वस्थ झाले. मी महाराजांसमोर उभी झाले, त्यांना म्हटलं, महाराज मी प्रसंगी तुमच्याशी भांडले, तुम्हाला कधी दोन शब्द बोलले पण ती परिस्थितीच तशी होती. मी इतकी कठोर नाही हो!तुमच्या समोर प्रकट दिनाला गजानन विजय ग्रंथ पारायण नाही, ही कल्पनाच मला बेचैन करते आहे. आता तुम्ही बघा काय ते, काही मार्ग काढता आला तर उत्तम! प्रार्थना करून मी झोपी गेले.

प्रकट दिनाला सकाळी मला एक फोन आला,तो नागपूरच्या श्री अभय अंजीकर यांचा होता. आरती, आम्ही औरंगाबादला आलो आहोत, आज प्रकट दिन आहे. मी सोबत गजानन विजय ग्रंथ आणला आहे. मला एक शांत जागा हवी आहे, जिथे मी पारायण करू शकेन. ते ऐकून अक्षरशः माझ्या डोळ्यातून घळघळ पाणी वाहू लागलं. घराचा पत्ता नीट समजावून मी फोन खाली ठेवला. प्रकट दिनाला घरी पारायण होणार होतं. दोन हातांनी दोन्ही डोळे पुसले आणि मनातल्या मनात महाराजांचे आभार मानून हात जोडून म्हटले. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. आरती कोकर्डेकर वडोदकर, औरंगाबाद – ९३२६७७७०८०.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

## ४८ – सद्गुरू वाचूनी सापडेना सोय – श्री. धनंजय कुलकर्णी, लातूर.

जय गजानन! मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यात औसा तालुक्यातील होळी हे एक माझं लहानसं गाव! माझं नाव धनंजय कुलकर्णी. आताशा गेल्या काही दिवसात जीवनात आर्थिक स्थैर्य येऊ पहात आहे, अन्यथा आतापर्यंत जीवन हलाखीच्या परिस्थितीतच व्यतीत केलं, असं म्हणायला हरकत नाही. आपण वाचक सर्व सूज्ञ आहात, त्यामुळे एखाद्या ऑटो चालकाची आर्थिक स्थिती काय असावी हे मी आपणास सांगण्याची गरज नाही. त्यातून वेळोवेळी अडचणींची शर्यत असेल तर विचारूच नका. असो, आता आपला विषय. गजानन महाराजांविषयी मला आलेले अनुभव. गजानन विजय ग्रंथात चौदाव्या अध्यायात बंडूतात्या कफल्लक होतो, सर्व पैसा संपून जातो, तेव्हा महाराज त्याला प्रेरणा देऊन, स्वतःकडे वळवून, तो त्यांना ओळखत नसतो तरी त्याचं भलं करतात. माझ्याही बाबतीत तसंच काहीसं झालं.

माझं लग्न १९८३ साली झालं, तेव्हा मी बँकेत पिग्मी एजंट होतो. पण काही एजंटनी मिळून घोटाळा केल्यामुळे बँकेने ती योजना बंद केली आणि मी ऑटो चालवू लागलो. एकीकडे उत्पन्न कमी तर दुसरीकडे घरात तीन मुली, एक मुलगा असं मोठं कुटुंब. १९९५ च्या नोव्हेंबर मधील ही गोष्ट आहे. माझी लहान मुलगी, आरती तेव्हा चार वर्षांची होती. तिला चालताना उजवा पाय टेकवणं त्रासदायक होतं आहे असं लक्षात आलं, वेदनेमुळे ती रडायला लागली. कुणी म्हणाले कुरूप आहे, कुणी म्हणालं पायात काटा किंवा काही गेलं असेल. ते दुखणं खूपच वाढलं म्हणून मग आम्ही तिला आंबाजोगाई रोड वरील डॉ. व्यंकट येलाले,सर्जन ह्यांच्याकडे घेऊन गेलो. त्यांनी तपासून सांगितलं की, ऑपरेशन करणं गरजेचं आहे. तीन हजार रुपये खर्च अपेक्षित आहे, दोन तीन दिवसात ऑपरेशन केलं तरी चालेल पण फार जास्त उशीर करायला नको. माझ्या डोक्यात तिच्या तब्येतीसोबतच पैसा कुठून आणायचा हा प्रश्न उभा झाला. मी कसंतरी करून याला माग त्याला माग करून पैसे जमा केले.

मधल्या काळात माझ्या परिचित सौ. शकुंतला व्यंकटराव यादव यांच्याशी अचानक भेट झाली, त्यांना मी आरतीच्या ऑपरेशन विषयी सांगितलं. त्या मला म्हणाल्या, एक काम कर,तू आरतीला घेऊन शेगांवला श्री गजानन महाराजांच्या दर्शनासाठी जाऊन ये, महाराजांना तब्येती विषयीसांगून ये. मी म्हटलं, अहो वहिनी मी शेगांवला जाईन तर ऑपरेशनसाठी पैसे कुठून आणीन? यावर त्यांनी धीर देत म्हटलं, तू जाऊन तर ये, तिथे वाजवी तेवढाच खर्च कर. परत आल्यावर ऑपरेशनसाठी कमी पडले तर मी सहाय्य करीन.

मी सहकुटुंब रात्रीच्या बसने शेगांवला निघालो. महाराजांचं शांतपणे दर्शन झालं. त्यांना प्रार्थना केली, रात्री बाजूला सभामंडपात एक रुपया प्रति गादी प्रमाणे दोन गाद्या घेऊन त्यावर झोपलो. मुलांना डोळा लागला, आम्ही चिंतेमुळे स्वस्थ झोपू शकत नव्हतो. मध्यरात्रीच्या सुमारास आरती, आई पाय दुखतो आहे म्हणून रडू लागली. ही तिच्या पायावर हात फिरवून करतील हं बेटा गजानन बाबा ठीक, असा धीर देत होती, पहाटे केव्हा तरी डोळा लागला. अगदी उजाडतच होतं तर आम्हाला जाग आली, हिचं लक्ष सहज आरतीच्या पायाकडे गेलं, दुखऱ्या जागेतून काही बाहेर आल्यासारखं दिसत होतं. चार गव्हाएवढे फ्लेक्झिबल वायरचे तुकडे असावेत असे तुकडे बाहेर आलेले दिसत होते. ते आम्ही बाजूला करून पाय स्वच्छ पुसला,पायाचं दुखणं थांबलं होतं. आरती उभी राहू शकत होती. ती म्हणाली, आई गजानन बाबांनी माझा पाय ठीक केला. लातूरला परतल्यावर डॉक्टरांना दाखविलं. त्यांनी सांगितलं ऑपरेशनची गरज टळली आहे. शकुंतला वहिनींच्या कानावर हे सर्व घातलं,त्यांनी गजानन विजय पोथी देऊन पारायण करायला सांगितलं आणि माझ्या जीवनात भक्तीचा उदय झाला.

मी त्या काळात १०० रुपये रोज प्रमाणे ऑटो किरायाने घेऊन चालवित असे, म्हणजे तीन हजार रुपये महिना तो खर्च व्हायचा, अशात मग उधार किराणा, कापड, अशी देणी डोक्यावर वाढत होती, लोकांचं देणं आहे, ही कल्पना जीव नकोसा करीत होती. आमच्या गावाकडे मला वडिलोपार्जित चार एकर जमीन मिळाली होती. मनात विचार आला की ती जमीन विकून लोकांचं देणं द्यावं आणि स्वतःचा ऑटो आणि एखादा फ्लॅट घ्यावा. त्या जमिनीचा दर तेव्हा सव्वा लाख रुपये एकर होता पण लोकांना माझी आर्थिक स्थिती आणि माझी पडती बाजू माहिती असल्यामुळे ते किंमत पाडून सौदा करीत होते,त्यामुळे माझं भरपूर नुकसान होत होतं. काय करावं? या विचारात असतानाच आपण हे गजानन महाराजांना सांगून पहावं असा विचार मनात आला, मी महाराजांसमोर उभा झालो, त्यांना कबूल केलं की जर योग्य किंमत प्राप्त झाली तर मी गजानन विजय ग्रंथाचं पारायण करून शेगांवला रुपये अकरा हजार अन्नदानासाठी देईन. खरं सांगतो, दुसरे दिवशी सकाळी मी अक्षरशः झोपेत असतानाच एक पांडुरंग जाधव म्हणून गृहस्थ घरी आले आणि माझ्यासमोर बाजार भावाप्रमाणे मी तुमची जमीन घेण्यास तयार असल्याचा प्रस्ताव मांडला. मी शेगांवला अकरा हजार रुपये दिले तेव्हा मला मिळालेल्या चांदीच्या प्रासादिक पादुका आजही मी जेव्हा पाहतो तेव्हा महाराजांविषयी असलेल्या श्रध्देत निश्चितपणे वाढ होते.

आता अजून एक गोष्ट इ. स. २००० सालची. ३० ऑगस्ट २००० ला पहाटे चार वाजता मला बायकोने उठवलं. म्हणाली, अहो माझं डोकं डाव्या बाजूला खूप दुखतंय आणि हे सांगत असतानाच डोक्याशी धरलेला तिचा हात खाली पडला, ती बेशुद्ध झाली. मी ताबडतोब तिला उचलून ऑटोमधून आमच्या डॉक्टरांकडे घेऊन गेलो,पण ते म्हणाले, यांना ताबडतोब कृष्णा हॉस्पिटल मधे डॉ. सौ. उज्वला कुलकर्णी यांच्याकडे घेऊन जा, मी लगेच त्या दवाखान्यात दाखल झालो. प्राथमिक तपासणीत पॅरेलेसिसचा अंदाज करून ब्रेन हॅमरेज आहे की काय ते पहावं लागेल. सकाळी एम आर आय करून घेऊ, तीन हजार रुपये लागतील. असं सांगितलं. आता सकाळ होईपर्यंत शांत बसायचं होतं, हिला बेडवर ठेवलं होतं. मी दवाखान्याच्या पायरीवर बसून तब्येत आणि पैशांची चिंता करत दोन गुडघ्यांमधे दोन हाताच्या कोपरात डोकं ठेवून बसलो. मला डोळा लागला आणि स्वप्नात गजानन महाराज आले. म्हणाले, चिंता करू नकोस, तुझ्या बायकोला काहीही होणार नाही, तिला पॅरेलेसिस नाही आणि ब्रेन हॅमरेजही नाही.

सकाळ झाली, मी माझे किराणा दुकानदार जवाहर बाहेती यांना भेटलो. त्यांनी एम आर आय साठी तीन हजार रुपये देऊ केले. सकाळी लवकरच विवेकानंद हॉस्पिटल मधे एम. आर. आय. करून त्याप्रमाणे डॉक्टरांनी उपचार सुरू केले. दुपारी बाराचा सुमार असेल, मी अस्वस्थपणे दवाखान्याच्या बाहेर चकरा मारीत असताना मला पोस्टमनने आवाज दिला, धनंजय कुलकर्णी आपणच का? शेगांवहून आपल्यासाठी अंगारा व प्रसाद आला आहे. मी यंत्रवत तो घेतला आणि तो पोस्टमन तिथून गेल्यावर मला लक्षात आलं मी तर शेगांवला पैसेच पाठविले नव्हते. मग हा अंगारा कसा? दुसरं असं की पोस्टमन घरी येईल हे समजू शकतं, मी दवाखान्यात आहे हे

त्याला कसं समजणार. मी ती पुडी कपाळाशी टेकली आणि माझी पावलं खोलीकडे वळली. हिला अंगारा लावला अन् साखरेचा कण हळूच जिभेवर ठेवला.

काही तासात ही शुद्धीवर आली. फारच लवकर प्रगती होते आहे, हे पाहून डॉक्टरांनी समाधान व्यक्त केलं. सात दिवसात ही पूर्ण ठीक झाली. हिला पॅरेलेसिस नव्हता, ते ब्रेन हॅमरेज नव्हतं. सात दिवसांचं संपूर्ण बिल लाखाहून थोडं जास्त झालं. त्यावेळी ऑटोतून शाळेत जाणाऱ्या मुलांच्या पालकांनी मदतीचा हात पुढे केला. त्यांच्या रुपाने महाराज पावले. पुढे हळूहळू सर्वांच्या ऋणातून मुक्त झालो. आज तीनही मुलींची लग्न झाली आहेत, मुलाचं लग्न झालं आहे आणि महाराजांच्या कृपेने गाडी रुळावर आहे. अशी ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. धनंजय कुलकर्णी, लातूर -९९२२४१३६१८.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! मी एक आयुर्वेदिक डॉक्टर आहे. १९७६ ला पुणे येथून आयुर्वेदातील पदवी प्राप्त केली. लग्नाचा योग लगेच जुळून आल्याने १९७७ ला नागपूरातील करूणा समर्थ हिचे सोबत माझा विवाह झाला. तेव्हा करूणाची नोकरी नागपूरला सेन्ट्रल टेलिग्राम ऑफिसला होती. मला कुठेतरी दवाखाना सुरू करायचा, तर नागपूरलाच करू, या विचाराने आम्ही नागपूरला स्थायिक झालो.

गजानन महाराजांविषयीचं प्रेम मला माझ्या वडिलांकडून आलं आणि त्यात वाढ होण्याचं कारण असं झालं की १९८५ च्या सुमारास मला कळलं की, रामदासपेठ भागात श्री आबा अष्टेकर म्हणून आहेत. त्यांच्याकडे गुरुवारी सत्संग असतो. मी तिथे जाऊ लागलो. त्यामुळे मला गजानन महाराजांच्या काही भक्तांची संगतही प्राप्त होऊ शकली, सोबत महाराजांविषयी प्रेमही वाढीस लागलं. त्या सर्वाचा चांगला परिणाम होऊन मी गांधीनगर येथील फ्लॅट मधे एका आटोपशीर खोलीत जयपूरहून एक साधारण दीड फूट उंचीची महाराजांची संगमरवरी मूर्ती आणून तिची स्थापना केली आणि रोज सकाळी मी छान साग्रसंगीत पूजा करण्याचा आनंद घेऊ लागलो. गजानन विजय ग्रंथाचं नित्य पारायण होऊ लागलं.

आपल्याला माहिती आहे की दहाव्या अध्यायात लक्ष्मण घुडेचा एक प्रसंग आहे. त्यात त्याच्या पोटदुखीवर महाराज प्रसाद म्हणून त्याच्या पत्नीकडे आंबा फेकतात आणि तो आंबा ती त्याला खाऊ घालते, त्या वेळच्या ओव्या आहेत, हे वैद्यांनी जई ऐकले । तई त्या वाटले वाईट । अहो बाई तुम्ही काय । केलेत हे हाय हाय ॥ आंबा हेच कुपथ्य होय । या पोटातील रोगाला । माधव निदानी हेच कथिले । सुश्रुतांनीही वर्णिले ॥ निघंटाने कथन केले । शारंगधर म्हणे ऐसेच । ऐसे वैद्य बोलले । परी झाले अघटित ॥ लक्ष्मणाचे पोट सत्य । रेच होऊन अकस्मात । मऊ होऊन गेले हो । शौच्या वाटे व्याधी गेली ॥ हळूहळू शक्ती आली । निसर्गाच्या बाहेरी वैद्यशास्त्र काही न करी । तेथे उपयोगी पडते खरी । कृपा देव संतांची ॥

निघंटु म्हणजे औषधांवरील पुस्तक. वरील ओव्यात आलेली जी नावे आहेत ते उच्च कोटीचे आयुर्वेद जाणकार आहेत, त्यात सांगितलेली माहिती सत्यच आहे पण त्याही पलीकडे देव संतांची कृपा कधी कधी चमत्कारिक परिणाम घडवून आणते. हे सर्व मी इथे सांगण्याचं कारण मलाही असाच काहीसा अनुभव आला.

ब्लड प्रेशर हा शब्द आता आपल्यासाठी काही नवीन नाही. डॉक्टरांनी ब्लड प्रेशर मोजले की ते म्हणतात नॉर्मल आहे, अगदी १२०/८० छान!. वाढत्या वयात हेच १४०/९० असलं तरी नॉर्मल समजल्या जातं. त्याच्यापेक्षा अति वाढलं तर हाय ब्लड प्रेशर आणि कमी झालं तर लो ब्लड प्रेशर. तब्येतीला दोन्ही घातकच! अजून एक, वरच्या प्रेशरला सिस्टॉलिक म्हणतात आणि खालचा आकडा डायस्टॉलिक म्हटल्या जातो. आता या पार्श्वभूमीवर मी अनुभवलेली इ. स. २००१ ची घटना सांगतो.

३१ डिसेंबर २००१ ला आम्ही काही भक्त मंडळींनी एकत्र येऊन संध्याकाळी सत्संग करून छान भजनादी कार्यक्रम केला आणि प्रसाद ग्रहण करून जो तो आपल्या घरी परतला. १ जानेवारीचा दिवस, सकाळी मी लवकर उठलो खरा, पण पोटात काहीसं अस्वस्थ वाटायला लागलं मी नित्याप्रमाणे पूजा करायला मूर्ती समोर आलो पण आतून काही वेगळी जाणीव होऊ लागली आणि जोरदार उलट्या आणि जुलाब सुरू झाले. पार गळून गेलो महाराजांना कसेबसे हात जोडले, पुन्हा बाथरूममध्ये जाऊ लागलो आणि नशीब असं की दार लावायचं सुचलच नाही. मी धाडकन तिथेच कोसळलो. कसाबसा घरी असलेल्या मुलाला आणि बायकोला आवाज दिला. त्यांनी मोठ्या मुश्किलीने मला अंथरुणावर आणून ठेवलं आणि माझी एक मानलेली बहिण, जी व्यवसायाने नर्स आहे, तिला ताबडतोब येण्यासाठी निरोप दिला. तिने येता क्षणीच प्रथम माझी पल्स (नाडी) पाहिली आणि डोळ्यात पाणी आणून म्हणाली ताबडतोब डॉक्टरांना बोलवायला हवं. सौ. ने ताबडतोब माझे मित्र आहेत नांदेडकर म्हणून त्यांच्या डॉक्टर मुलाला अनिरुद्धला फोन केला. तो त्याच्या अजून एका डॉक्टर मित्रालाच घेऊन लगेच आला. त्याच्या डॉक्टर मित्राने सर्व प्रथम ब्लड प्रेशर तपासलं आणि तो हादरलाच, त्याचा स्वतःवर विश्वास बसत नव्हता कारण तेव्हा माझं ब्लड प्रेशर सिस्टॉलिक म्हणजे वरचं प्रेशर फक्त ४० होतं. मग खात्री करण्यासाठी अनिरुद्धनेही तपासलं. त्यालाही परिस्थिती लक्षात आली. अनिरुद्धने प्रसिद्ध डॉक्टर निखिल बालंखे यांना फोन लावला, तेव्हा ते कुणाचीतरी अ□ंजिओग्राफीच करीत होते. म्हणाले ताबडतोब घेऊन या. मधल्या काळात त्यांनी त्यांच्या डॉक्टर पत्नीला सर्व सांगून मला अ□डमिट करण्याची सोय केली. डॉ. अनिरुद्ध गाडीत एक सारखं मागे माझ्या पत्नीला,करूणाला विचारून कदाचित,मी अजून आहे नं याची खात्री करून घेत होता.

मला तपासून डॉ. बालंखे म्हणाले, काहीही सांगता येत नाही. त्या दिवशी नेमकी अडचण अशी झाली की श्री. व सौ. बालंखे यांना हैदराबाद येथे कॉन्फरन्ससाठी जाणं भाग होतं. त्यामुळे मला रामदासपेठ येथील अर्नेजा हार्ट हॉस्पिटलमधे हलविणे आवश्यक ठरले. माझी तब्येत थोडी सुधारली पण धोका टळला नव्हता. मला आय सी यू मधे ठेवण्यात आलं. माझ्या अंगावर हॉस्पिटलचा ड्रेस चढविण्यात आला. माझ्या पत्नीने विशेष परवानगी घेऊन शर्टाच्या वरच्या खिशात गजानन महाराजांचा एक लहान फोटो आणि अंगारा ठेवला व मला माझ्या कानात तसं सांगितलं.

डॉक्टरांनी ब्लड प्रेशर अति कमी झाल्यामुळे हृदयाला इजा झाली आहे, म्हणजे सी. ए. डी. कॉरोनरी आर्टरी डीसीस असे निदान केले. त्या रात्री मला आय सी यू मधे स्वप्न पडलं, स्वप्नात मला न्यायला यमदूत आलेत, ते माझ्यावर झडप घालणार, तो मी खिशातील महाराजांचा फोटो त्यांना दाखविला, ते घाबरून पळून गेले असं दोन तीनदा झालं. मग मी तो फोटो नमस्कार करून खिशात ठेवून दिला. तोच पुन्हा ते आले पण यावेळी श्री गजानन महाराज त्या यमदूतांना रागावून म्हणाले, तुम्ही माझ्या अशोकला नेऊ शकत नाही. मग ते यमदूत निघून गेले. पुढे आठवड्याभरातच मी पूर्ण बरा होऊन डॉक्टरांनी आयुष्यभर घ्या म्हणून सांगितलेल्या गोळ्या थोड्या सोबत घेऊन घरी परतलो. मात्र त्या गोळ्या घेऊन मला डोकेदुखीचा त्रास सतावू लागला, म्हणून मी डॉक्टर बालंखेंना फोन केलो ते म्हणाले, एकदा अ□ंजिओग्राफी करून घ्या.

एकविरा हॉस्पीटल मधे प्रख्यात हृदयरोग तज्ञ डॉक्टर अजीज खान यांनी अ□ंजिओग्राफी केली. ती सुरू असतानाच त्यांनी माझं अभिनंदन केलं. म्हणाले, डॉक्टर आपके हार्टको कुछ भी नहीं हुआ है. अगले बीस साल तक वह फिट रह सकता है! कॉन्ग्रॅच्युलेशन्स! डॉक्टर बालंखेनी तो रिपोर्ट पाहून माझी सर्व औषधं बंद केली

आणि मी पूर्ण ठीक झालो. वरचं ब्लड प्रेशर फक्त चाळीस असताना कुणी चांगल्या पद्धतीने जिवंत राहील ही कल्पनाच चमत्कारिक वाटते. पण आपण पारायणात नेहमीच वाचतो नं की निसर्गाच्या बाहेरी, वैद्यशास्त्र काही न करी,तेथे उपयोगी पडते खरी, कृपा देवसंतांची. या शिवाय मी तरी काय वेगळं म्हणू शकतो? हां एवढं मात्र म्हणतो की संकटकाळी महाराजांनी अशीच कृपा सर्व भक्तांवर ठेवावी आणि भक्तांनीही त्यांचं नित्य स्मरण करीत त्यांचं नाव घ्यावं, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

डॉ. अशोक ब्राह्मणकर, पुणे / नागपूर – ८१४९८४३०८८.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! गजानन विजय ग्रंथाच्या चौथ्या अध्यायात महाराजांच्या चिलीमीसाठी विस्तव मागण्याकरीता लहान मुले जानकीराम सोनाराकडे जातात. जानकीराम अक्षय तृतीयेचा सण म्हणून विस्तव देण्यास नकार देतो. तेव्हा मुलं त्याला म्हणतात, गजानन महाराज देवांचेही देव जाण. हा उल्लेख जेव्हा माझ्या नजरेखालून जातो, तेव्हा मला माझ्या आजीची (आईची आई) प्रकर्षाने आठवण येते, कारण आजीचा एक फंडा होता, ती म्हणायची देव म्हणजे गजानन महाराज! तिची एक फिलॉसॉफी होती. तिच्यासमोर जर कुणी म्हटलं की गजानन महाराजांनी मला अमुक दिलं तमुक नाही दिलं, तर ते तिला आवडायचं नाही. ती म्हणायची महाराजांनी मला काय दिलं? हाच हिशोब. पण मी महाराजांना काय दिलं? त्याचं काय? मी त्यांची उपासना करतो का? मी दर्शनाला गेलो? मी मनापासून पारायण केलं? मी नामस्मरण करतो का? मुळात महाराजांनी भक्तीमार्ग सोपा असं म्हटलं. परंतु तो साधण्यास कठीण आहे, असंही सांगितलं आहे. त्यासाठी आवश्यक असणारं आचरण महाराजांनी सांगितलं, ते आपलं असावं. आपण त्या मार्गाने चालण्याचा प्रयत्न करावा. बाकी सर्व गोष्टी त्यांच्यावर सोडून द्याव्यात. असं तिचं म्हणणं असायचं,असो. आजीच्या त्या गोष्टी उत्तमच होत्या. मला त्या किती जमणार आहे देव जाणे,पण एक मात्र झालं. आजीमुळे गजानन महाराजांची भक्ती मात्र जीवनात स्थिरावली. इतकच नाही तर महाराज योग्य वेळी भक्ताची काळजी घेतात असा अनुभवही आला. दोन अनुभव सांगण्याचा प्रयत्न करतो. एक २००१ चा आहे तर दुसरा २००५ चा आहे. प्रथम २००५ चा अनुभव सांगतो नंतर २००१ चा.

गजानन विजय ग्रंथाचं पारायण हा माझ्या जीवनातील अविभाज्य भाग झाला. मी पोथीत म्हटलेल्या विशिष्ट दिवसांना पारायण करून आनंद प्राप्त करू लागलो. गुरूपुष्य योगावर पारायण हाही नेहमीचा भाग झाला. एकदा नेमकी गुरु पुष्य योगावरच यवतमाळ येथे कंपनीने मिटींग ठेवली, आम्ही गेस्ट हाऊसमधे उतरलो होतो. मिटींग सकाळी ९.३० वाजता होती. तो ऑगस्ट सप्टेंबर मधील काळ होता, मला निश्चित तारीख आठवत नाही, पण त्या दिवशी गुरुपुष्यामृत योग होता. मला पारायणासाठी चार तास लागतात. अर्थात मिटींगच्या आधी पारायण पूर्ण करायचं तर पहाटे लवकर उठणं आवश्यक होते. माझी खोली पहिल्या मजल्यावर होती. मी संध्याकाळी गेस्ट हाऊस वर असलेल्या माणसाला बोलावून सांगितलं मला उद्या पहाटे साडेचारला उठवशील. तो म्हणाला ठीक आहे साहेब. त्याला विचारलं, तुझं नाव? तो म्हणाला, गजानन! निजण्यापूर्वी महाराजांना प्रार्थना करताना म्हटलं, त्या गजाननाला सांगितलं आहे उद्या लवकर उठवायला. मिटींगच्या आधी पारायण होईल तर बरे! गुरुवारी पहाटे बरोबर साडेचारच्या सुमारास मला कुणीतरी आवाज दिला, उठा! माझी झोप चाळवली, पुन्हा आवाज आला. उठा पारायणला बसायचंय ना? मला जाग आली, मी उठून बाथरूमला गेलो. चेहऱ्यावर पाण्याचा हबका मारून फ्रेश होऊन बाहेर येऊन पाहिलं, दार आतून जर बंद आहे तर मला आवाज दिला कुणी? कारण दार वाजवून तर मला कुणी उठवलं नाही! मी आंघोळ करून पूर्ण तयार झालो, तुळस अथवा फूल मिळालं तर पहावं म्हणून दार उघडून जिन्याने उतरतच होतो तर गजानन घाई घाईने डोळे चोळत वर येत होता. मला म्हणाला, साहेब माफ करा, मला जागच आली नाही. मी त्याच्याकडे पाहून फक्त स्मितहास्य केलं. मी त्याला फुलं आणण्यासाठी पाठविलं. महाराजांनी माझा फुलं आणण्याचा वेळ वाचविला होता. त्या दिवशीच्या पारायणात एका वेगळ्याच पातळीवरील एकाग्रता साधली होती.

ऑक्टोबर २००१ ची घटना, दिवाळसण होता. त्या दिवशी आईला ऑफिस होते. ती पी. डब्लू. डी. मधे नोकरीला होती. तिला आणायला दुपारी एकच्या सुमारास सिव्हील लाईन्स भागाकडे चाललो होतो. बोले पेट्रोल पंपाजवळ मी शांतपणे स्कूटरने सरळ जात होतो. पुढे दोन दारूडे सायकल वेडीवाकडी कशीतरी चालवित जात होते. त्यातील एक माझ्या स्कूटरवर धडकला, त्या धक्क्याने दोघेही खाली पडले. वास्तविक मी सरळ निघून गेलो असतो तर चालले असते. पण मी त्यांना काही लागले तर नाही ना हे पाहण्यासाठी उतरलो. त्यांना काहीही झालं नव्हतं, पण जमलेल्या गर्दीत कुणीतरी एक दगड माझ्या डोक्याला मारला. मागे डोक्याला जखम होऊन त्यातून रक्त वाहू लागले. सर्व गर्दी पांगली. मला शर्टवर रक्त दिसू लागलं. काही बघे तिथे उभे होते, कुणी मदतीला येईना, तोच एक ऑटो रिक्षा तिथे थांबली. ऑटोमधून एक माणूस खाली उतरला. अधिकार वाणीने किल्ली मागून माझी स्कूटर बाजूला लावली, माझा दंड धरून मला ऑटोत बसण्याची सूचना केली. वेगानं ऑटो लता मंगेशकर हॉस्पिटलकडे वळविला पण तिथे ओ. पी. डी. ला डॉक्टर त्या दिवशी त्यावेळी उपलब्ध नव्हते म्हणून मूर मेमोरियल हॉस्पिटल मधे मला घेऊन गेला. तिथे मी त्याला सासरच्या लोकांचा लॅन्डलाईन नंबर दिला आणि मी बेशुद्ध झालो.

खोल जखम होती, डॉक्टरांनी जखमेला टाके घातले. काळजीचं कारण नाही म्हणाले. मी शुद्धीवर आलो. आजूबाजूला असलेल्या नातेवाईकांकडे ऑटो वाल्याची चौकशी केली. तो ते लोकं येईपर्यंत थांबला होता. त्यानी सर्व वृतांत सांगितला आणि जिस काम के लिए मै आया था वह हो गया असं म्हणून एकही पैसा न घेता सब ठीक हो जाएगा! असा आशीर्वाद देऊन चालता झाला. माझी जखम ठीक झाली, पण डोकं दुखू लागलं आणि ते काही केल्या थांबेना. गोळी घेतली की तेवढ्यापुरतं थांबून पुन्हा डोकं दुखणं सुरू. हा डॉक्टर तो डॉक्टर, कुणी म्हणे क्लॉट असेल, कुणी म्हणे स्कॅनिंग करा. सर्व झालं पण काहीच आराम नाही. औषध बदल झाला, डॉक्टर बदल झाला. अन्य उपाय झाले पण काहीही आराम नाही. मी बेजार झालो, कामात लक्ष लागेना. अशात दोन महीने गेले असतील, मधे मधे महाराजांची आठवण होतच होती. पण आता मात्र निर्धार केला. सौ ला म्हटलं चल शेगांवला जाऊन महाराजांना दाखवून येऊ, सांगून येऊ.

दुपारी शेगांवसाठी बसने निघालो. वाटेत बस फेल झाली. बऱ्याच वेळाने दुसऱ्या बसने सोय होऊन रात्री शेगांवला पोहोचायला बराच उशीर झाला. रात्र बरीच झाली होती. भक्त निवास जवळील सेवेकरी म्हणाले, खोली देता येणार नाही. मंदिरात कार्यालयात अध्यक्ष बसले आहेत त्यांची चिठ्ठी आणा. आम्ही कार्यालयात गेलो. तिथे माननीय शिवशंकरभाऊ होते. त्यांना भेटल्यावर ते म्हणाले, काही बोलू नका मी सर्व जाणतो. बाजूला बसलेल्या कुणाला तरी ते म्हणाले, चिठ्ठी लिहा मी सही करतो. भक्त निवास क्रमांक पाच मधे आम्ही विसावलो.

दुसरे दिवशी पहाटे उठून तेव्हा असलेल्या त्या लहान दारातून, पूर्व दारातून आत आणि पश्चिम दारातून बाहेर या पध्दतीने मी सहा फूट उंच माणूस दर्शनासाठी खाली उतरलो. महाराजांसमोर हात जोडले, सर्व व्यथा सांगितली म्हटलं, तुम्ही सर्व जाणताच. आज मुद्दाम या कारणाने मी आलो आहे. रक्षण करा असं सांगून पायरी चढून वर आलो आणि दारातून बाहेर पडत असताना, डोकं थाडकन दारावर आपटलं. प्रचंड झिणझिण्या उठल्या, दोन्ही हाताने डोकं धरून बाहेर पडलो. काही सेकंद डोकं खूप

दुखलं,पण ते मार लागल्यावर दुखावं तसं दुखलं आणि थांबलं. थांबलं म्हणजे असं थांबलं की आज त्या गोष्टीला पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला पण माझं डोकं दुखणं बरं झालं आहे. मोठ मोठ्यांना जिथे निदान झालं नव्हतं ते गजानन महाराजांना क्षणात समजलं होतं. किंबहुना ते आधीच सर्व जाणून होते. शेगांवहून परतल्यावर मित्रांनी विचारलं, कारे काय झालं शेगांवला? मी म्हटलं, काही नाही डोकं दुखायचं थांबलं! म्हणाले, थांबलं? कसं काय? त्यावर मी आकाशाकडे पहात दोन्ही हात वर करून उत्तर दिलं, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

श्री. समीर दामले, नागपूर – ९८३४९२६५८८.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन ! आपण जी साधना करतो, जे देवा धर्माचं करतो, ते करीत असताना त्यापासून लोकांना त्रास न होईल, सर्वांच्या वेळा व्यवस्थित पाळल्या जातील अशी काळजी घेऊन जर हे सर्व केलं, तर त्या सर्वांचं महत्व अधिकच वाढतं. मी माझ्या आईला सर्व कामे वेळेत व्हावी म्हणून,पहाटे तीन वाजता उठून गजानन विजय ग्रंथाचं पारायण करताना पाहिलं आहे. तिला महाराजांची वेडी भक्ती होती, असं म्हटलं तर त्यात फारसं वावगं होणार नाही. आम्हा सर्व भावंडांमधे माझ्या प्रकृतीच्या कारणाने तिचा माझ्यावर विशेष लोभ होता. किंबहुना माझं कसं होईल याची तिला काळजीच होती. लहानपणी अशक्तपणामुळे मी सारखी आजारी पडायची. रडकं, आजारी, अशक्त मूल आईचं असं म्हणतात. त्या म्हणण्याप्रमाणे ती गजानन महाराजांना सतत माझ्या विषयी सांगत असायची. आमचं घर नागपूरला वसंत नगरला आहे, तिथून धरमपेठ झेंडा चौकातील गजानन महाराज मंदीरात, दोन अडीच किलोमीटर अंतर ती दर गुरुवारी तिच्या एका मैत्रिणी सोबत पायी चालत जायची. उन्हाळा, हिवाळा, पावसाळा हा क्रम तिने कधी चुकवला नाही. ती महाराजांना नेहमी म्हणायची, महाराज या निशीकडे लक्ष द्या! (निशी म्हणजे मनिषा नावाचा प्रेमोच्चार) तिचं चांगलं होऊ द्या. चांगलं स्थळ मिळू द्या. तिच्या ह्या प्रार्थनेचा मला दुहेरी फायदा मिळाला. एकतर गजानन महाराजांविषयी माझ्या मनात भक्ती निर्माण झाली आणि दुसरं म्हणजे महाराजांनी माझ्याकडे कृपादृष्टीनं पाहिलं.

६ मार्च १९८८ ला माझा साखरपुडा झाला आणि ५ जून १९८८ ही लग्नाची तारीख ठरली. आमच्या आई-नानांनी ठरविलं की आपण शेगांवला प्रत्यक्ष जाऊन महाराजांना आमंत्रण करायचं. तेव्हा आजच्या इतक्या गाड्या किंवा खाजगी बसेस नव्हत्या, मोजक्या बसेस असायच्या. तसेही वडील म्हणजे माझे नाना एस. टी. त नोकरीला होते म्हणून आम्ही एस. टी. बसने शेगांवला जाण्याचं ठरविलं. निघण्यापूर्वी आईनं महाराजांना प्रार्थना केली. महाराज तुमच्या कृपेनं निशीचं लग्न ठरलं आहे. प्रत्यक्ष पत्रिका घेऊन शेगांवला येतो आहे. तिच्या लहानपणापासून तिची काळजी तुमच्याकडे सोपविली आहे. तिच्याकडे लक्ष असू द्या.

आम्ही बसने प्रवासाला निघालो, ते सुट्यांचे दिवस होते त्यामुळे बसमध्ये बसायला जागा मिळणं मुश्किल, खूप गर्दी होती. पण लोक उतरत जातात, जागा होत जाते, या आशेने आम्ही बसमधे चढलो, बस सुरू झाली. मी सर्वात समोर होते. आम्ही सर्व उभे होतो. आता मलाही महाराजांचं प्रेम लागलं होतं. मी मनात म्हटलं, महाराज लग्नाचं सांगायला शेगांवला येतो आहोत पण इथे तर कोण गर्दी आहे. संपूर्ण प्रवासात कसं होईल? हा मनात विचार आला तोच एका ठिकाणी एक माणूस उतरून जागा झाली. तिथे बसलेले गृहस्थ मला म्हणाले, इथे बस. मी आईकडे पाहिलं, आईने नजरेनेच मला संमती दिली. त्याप्रमाणे मी बसले. त्यांनी माझी चौकशी केली. मी त्यांना लग्न ठरल्यानिमित्त शेगांवला जात असल्याचं सांगितलं. त्यांनी विचारलं तुमचं, कुणी ओळखीचं आहे का शेगांवला? मी म्हटलं नाही आम्ही मंदिरात जागा पाहू. महाराज करतील काही सोय! त्यावर ते मला म्हणाले, हे बघ, माझं नाव वासनिक आहे, मी तुम्हाला एक चिठ्ठी देतो. ती तू शेगांव मंदिरात कार्यालयात दे म्हणजे तुमची सर्व व्यवस्थित सोय होईल.

त्यानंतर ते बहुधा अकोला असावं तिथे बसमधून उतरले,जाताना मला शुभेच्छा देऊन चिठ्ठी देण्याची आठवण दिली. आम्ही दुपारी शेगांवला पोहोचलो, चिठ्ठी द्यावी की न द्यावी अशा संभ्रमात वडील होते. मग म्हणाले महाराजांची इच्छा! देऊन तर पाहू. वडिलांनी कार्यालयात ती चिठ्ठी दाखवली आणि काय विचारता असा बडेजाव सुरू झाला. त्यांनी विचारलं कुणाचं लग्न ठरलं आहे? आई म्हणाली निशीचं, म्हणजे आमच्या मनिषाचं. मग काय? ते म्हणाले, तुम्ही हात पाय धुवून या, आम्ही जेवायला वाढतो. आम्ही जेवायला बसलो. मला चांदीचं ताट चांदीची वाटी. वरण, भात, साजूक तूप, पोळी, भाजी, गोड शिरा. असं साग्रसंगीत जेवायला वाढलं. एका शब्दात सांगायचं तर माझं पहिलं केळवण गजानन महाराजांनी श्री क्षेत्र शेगांव येथे घडवून आणलं . रहाण्याची उत्तम सोय केली, दुसरे दिवशी गाडीतून वाटिका दर्शन घडवून आणलं तेव्हा वाटिका नव्याने बांधण्यात आल्याने आणि आजच्यासारखं आनंद सागर वगैरे नसल्यानं वाटिका दर्शनच महत्वाचं होतं. नंतर आम्हाला गाडीतून व्यवस्थित बस स्टँडवर सोडून छान निरोप दिला. इथे एक गोष्ट नमूद करणे गरजेचं वाटतं. त्यांच्या सर्व व्यवस्थेमुळे आम्ही प्रभावित झालो पण जेव्हा दर्शनाची वेळ आली, तेव्हा वडिलांनी त्यांना विनम्रपणे सांगितलं, की दर्शन आम्ही लाईनीतूनच घेणार. आजही आपण पहातो बारीमधे दर्शनासाठी भक्त शांतपणे उभे असतात. समोर घुसण्याचा अतिरेक करीत नाहीत आणि हेच शेगांवचं वैशिष्ट्य आहे. असो. आईच्या पुण्याईने हे सर्व झाले. अविस्मरणीय अशी ती यात्रा झाली. वासनिकजींचं पहिलं नाव मला आठवत नाही पण महाराजांनी त्यांच्या माध्यमातून सर्व घडवून आणलं, हे मी आजही विसरलेली नाही.

महाराजांनी माझ्या कुटुंबाकडे वेळोवेळी कृपादृष्टीनं पाहिलं. पहात असतात. माझ्या मिस्टरांची तब्येत इ. स. २००० ला खूप बिघडली होती पण महाराजांच्या कृपेने ते विघ्न टळलं. मी तर स्वतःला महाराजांची मुलगी मानते. मध्यंतरी मी आणि मिस्टर आम्ही दोघे शेगांवला गेलो असताना मला वाटलं की त्या दिवशी पारायण करण्याच्या ऐवजी प्रदक्षिणा कराव्यात. जेवढ्या जमतील तेवढ्या करू, या विचाराने प्रदक्षिणा सुरू केल्या आणि चक्क १०८ प्रदक्षिणा पूर्ण केल्यात. आम्हाला दुपारच्या गाडीने भुसावळला जायचं होतं. आम्ही शेगांव स्टेशनवर येऊन पोहोचलो.

प्रत्येकाची शारिरीक क्षमता वेगळीअसते, कुणाला कशाने त्रास होईल कुणाला कशाने. माझे पाय त्या दिवशी खूप दुखायला लागले. इतके की रडू यायला लागलं, आम्ही बाकावर बसलो होतो. स्टेशनवर गाड्या येत होत्या-जात होत्या. काही फास्ट गाड्या थांबतही नव्हत्या. आमच्या गाडीला अजून बराच अवकाश होता. मी मिस्टरांना म्हटलं, एखादी न थांबणारी गाडी थांबली तर किती बरं होईल नं? कारण भुसावळचा प्रश्न नव्हता, तिथे प्रत्येक गाडी थांबणारच होती. मिस्टरांनी मला वेड्यात काढलं, म्हणाले काहीही वेड्यासारखं बोलू नकोस. मी महाराजांचं नाव घेऊन मुकाट बसले. इतक्यात एक गाडी येताना दिसली आणि थोडी गति कमी झाली. मी म्हटलं, अहो कुणी सांगावं ही आपल्यासाठी सोय असू शकेल, तयार रहायला काय हरकत आहे आणि खरोखरच आश्र्चर्य झालं न थांबणारी ती गाडी जेमतेम मिनिटभर शेगांवला थांबल्या सारखी झाली. फक्त आम्ही दोघेच गाडीत चढलो. जणू आमच्या साठीच महाराजांनी गाडी थांबवावी, आमचा प्रवास सुरू झाला. आम्ही वेळेच्या बरेच आधी निघालो होतो. या सगळ्या सुखद प्रकाराने पायाचं दुखणं तसंच कमी झालं. मी समजू शकते की हा योगायोग असू शकेल. पण असे ना का? खरं सांगायचं तर श्री गजानन महाराजांची भक्ती हाच उत्तम योग आहे. म्हणून महाराजांच्या चरणी माझं मागणं एकच की हे गजानन महाराजा, असेच उत्तम योगायोग सर्वच

भक्तांच्या जीवनात वारंवार घडून येवोत आणि त्यातून प्रेरित होऊन सर्व भक्त तुझा जयघोष करोत. श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. मनिषा विंचुर्णे-कोलनकर, नागपूर – ९४०४५३६७२७.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.

आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

जय गजानन! माहेरची मी सुमन पाटगावकर आणि सासरची सौ. आशा पै. इ. स. १९७२ साली आम्ही सोलापूर जिल्ह्यातील बार्शी येथे रहावयास आलो. तोपर्यंत आम्हाला गजानन महाराजांविषयी काहीही माहिती नव्हती. माझे वडील,ज्यांना मी तात्या म्हणते ते सोलापूर विभागात रेल्वेत स्टेशन मास्तर होते. त्यांची दर तीन वर्षांनी बदली होणार,तेव्हा आम्हा भावंडांचं, चौघी बहिणी एक भाऊ, शिक्षण व्यवस्थित व्हावं या उद्देशाने आई आम्हा मुलांना घेऊन बार्शी येथे स्थिरावली. बार्शीला भगवंत मंदिर नावाने प्रसिद्ध असलेल्या मंदिराच्या जवळच आमचं घर होतं. या मंदिराची आख्यायिका अशी आहे की, अंबरीश राजा आणि दुर्वास ऋषी यांच्या वादात श्री विष्णू आणि श्री लक्ष्मी इथे आले. मंदिरात श्री विष्णूंच्या मागे श्री लक्ष्मी आहे जी आपल्याला आरशात दिसते. या भगवंत मंदिरात श्री गजानन महाराजांची पालखी पंढरपूरहून परतीच्या प्रवासात थांबते. आणि या मुक्कामात संध्याकाळी मंदिरात वारकरी भजन, किर्तन ऐकण्याचा योग आम्हा सर्वांना येऊन आम्हाला गजानन महाराजांविषयी माहिती मिळाली. त्यातून गजानन महाराजांविषयी आकर्षण निर्माण झालं.

१९७८ ला शेगांवला महाराजांचा प्रगट दिन शताब्दी सोहळा होता. (१८७८-१९७८) तेव्हा आई आणि तात्या शेगांवला जाऊन आले व अतिशय प्रभावित झाले. त्यातून आम्ही सर्वांनी श्री गजानन विजय ग्रंथाचं पारायण केव्हा सुरू केलं ते कळलंच नाही. तेव्हा आम्हाला कोणताही छोटा मोठा प्रश्न आला, परीक्षा आली, कुणी आजारी झालं की लगेच आम्ही महाराजांना पारायण मागून घ्यायचो आणि त्यातून बाहेर पडलो की लगेच पारायण पूर्ण करायचो. अर्थातच महाराजांच्या आशीर्वादाने परीक्षा पास होत शिक्षण पूर्ण झालं आणि १९८० साली मला मुंबई येथे सारस्वत बँकेत नोकरी लागली. बार्शी पासून मुंबईला जायला रेल्वेने बारा तास लागतात, तो प्रवास पूर्ण करून मी कांदिवली येथील शाखेत रुजू झाले. आमच्याच बॅन्केत मला महाराजांच्या कृपेने जीवनाचा जोडीदार मिळाला आणि मी सौ. आशा पै म्हणून बँकेच्या बॅन्केच्या गोरेगाव शाखेत कॅशियर म्हणून काम पाहू लागले.

मात्र ही सर्व प्रगती होत असताना प्रामाणिकपणे सांगायचं तर विजय ग्रंथाचं पारायण दुर्लक्षित झालं. माझ्याजवळ महाराजांची पोथीच नव्हती. सासरचे लोक महाराजांविषयी अनभिज्ञ होते. अर्थात मनात महाराजांचा वास होता, आहे आणि राहील. त्यामुळे प्रातःस्मरणात आणि संध्याकाळी, रात्री नमस्कार महाराजांनाच होत होता.

इ. स. १९८३ च्या डिसेंबर महिन्यातील गोष्ट, कॅश काउंटरवर असल्यामुळे आली गेली कॅश पहाण्याची जबाबदारी होती. एक दिवस काम करीत असताना एका सातशे रुपयाच्या चेकचे पेमेन्ट मी चुकीने एक हजार सातशे रुपये केले. स्वाभाविकच आहे की संध्याकाळी कॅश टॅली करीत असताना मला एक हजार रुपये कमी आहेत असे लक्षात आले. पस्तीस वर्षापूर्वीचा तो काळ. आमच्या दृष्टीने हजार रुपये फार मोठी रक्कम होती. मनावर दडपण आलं, त्यातून मी दुसऱ्यांदा प्रेग्नंट होते, घरी सासू सासरे होते. मी गजानन महाराजांचा धावा सुरू केला. सर्व व्हाउचर्स, चेक्स वगैरे पाहिल्यावर लक्षात आलं की एका पार्टीला सातशे ऐवजी एक हजार सातशे रुपये दिले आहेत कारण चेकच्या मागे पेमेन्ट केलेल्या नोटा नमूद होत्या. डिनॉमिनेशन्स लिहीले होते. अर्थात आता त्या पार्टीनं हे मान्य करण्यावर सगळं अवलंबून होतं. त्या पार्टीकडे जाणं आवश्यक होतं, आम्ही निघालो मला सहकाऱ्यांनी सहाय्य केलं. मी महाराजांचा धावा करीत होते. महाराजांना म्हटलं, महाराज माझं चुकलं, पारायणात खंड पडायला नको होता. माझ्याजवळ पोथी नाही पण ही माझीच चुक नाही का? मी पोथी मिळविण्याचा प्रयत्न करीन. लवकरात लवकर माझ्याकडून पारायण करून घ्या. समोरच्या पार्टीला सद्बुध्दी द्या.

आम्ही त्या पार्टीकडे जाऊन पोहोचलो. महाराजांचे आभार! त्यांनी मला थोडफार ऐकवलं पण हजार रुपये देऊ केलेत. त्या आनंदात मी घरी पोहोचले. मिस्टर बँकेतच असल्याने त्यांना झालेली घटना सांगितली पण बाकी उगाच चर्चा नको म्हणून आम्ही दोघंही शांत राहिलो. मिस्टरांना मी गजानन विजय ग्रंथाविषयी तेव्हा कानावर घातलं. गजानन महाराज या विषयावरही मी तेव्हा त्यांच्याशी बोलले. त्यांनीही ऐकून घेऊन, ठीक आहे. तुला ग्रंथ मिळेल तेव्हा लगेच पारायण कर, असं म्हणून धीर दिला आणि कमी पडलेली कॅश, गजानन महाराज, श्री गजानन विजय, या सगळ्याचा विचार करीत असतानाच केव्हातरी रात्री उशिरा माझा डोळा लागला.

दुसरे दिवशी सकाळी सात साडेसातचा सुमार असेल, दाराची कडी वाजली म्हणून मी दरवाजा उघडला. पाहते तो दारात तात्या उभे. तात्या बार्शीहून मुंबईला आले? काहीच न कळवता? सणवार नाही काही कळवलं नाही हे अचानक आले? मी आश्चर्ययुक्त आनंदाने त्यांच्याकडे पाहू लागले. तात्या तुम्ही? मी विचारलं. त्यावर त्यांनी मला आश्चर्याचा जबरदस्त धक्का दिला. मला विचारलं, तू कॅशवर आहेस का? तुला काही प्रॉब्लेम आला का? मी थक्क होऊन पाहतच राहिले. १९८३ साली मोबाईल तर जाऊच द्या, साधे फोन देखिल फार तुरळक ठिकाणी होते. कालचीच ही घटना. आम्ही कुणाशी बोललो नाही. बार्शीहून मुंबईला यायला स्टेशन ते घर सगळा हिशेब करता चौदा तास लागणार. सगळ्या त्या बुचकळ्यात टाकणाऱ्या गोष्टी, त्यातून थोडी सावरले अन् तात्यांना आत या म्हणून आतल्या खोलीत बसायला पाट दिला. पायावर पाणी घेऊन तात्या येऊन बसले आणि मला सांगू लागले. दरम्यान आम्ही सर्वच तिथे जमा झालो. तात्यांनी पिशवी उघडली,पिशवीतून गजानन विजय ग्रंथ बाहेर काढला म्हणाले, हे घ्या आणि गजानन विजय ग्रंथ दोन्ही हातांनी माझ्यासमोर धरला. मी आणि मिस्टर समोर झालो, मिस्टरांनी चमकून माझ्याकडे पाहिलं, तात्या बोलू लागले.

अगं यंदाच्या आषाढीला जेव्हा वारी परतीच्या प्रवासात बार्शीला आली तेव्हा तुझ्या आईला वाटलं आपल्या सुमेकडे, आशाकडे गजानन विजय ग्रंथ नाही तेव्हा जर पालखीत तो मिळाला तर पहावा म्हणून आई पालखी दर्शनाला गेली आणि ग्रंथ आहे का विचारणा केली. तिथल्या लोकांनी ग्रंथ नाहीत म्हणून सांगितलं. ऐकून आईचा चेहरा पडला. इतक्यात एक सेवेकरी गृहस्थ तेथे आले, आईला म्हणाले, थांबा, त्यांनी कुठूनशी एक पोथी आईला आणून दिली, तो हा ग्रंथ! आता मी आज इथे कसा? हे विचारशील तर त्याचं असं झालं की कालच पहाटे एक गृहस्थ तुझ्या आईच्या स्वप्नात आले, तिला म्हणाले आशाला कॅशमधे प्रॉब्लेम आहे. तिला पोथी हवी आहे लगेच तिला पोथी पोहोचव.

तात्यांनी दोन्ही हातात धरून ठेवलेली ती पोथी मी डबडबलेल्या डोळ्यांनी दोन्ही हातात घेऊन नमस्कारार्थ कपाळाला लावली आणि मिस्टरांकडे पाहिलं,त्यांचेही डोळे भरून आले होते. ते पाहून मात्र माझा बांध फुटला,मला जोरात हुंदका आला. मला असं रडायला का आलं याचं कारण तिथे उपस्थित असलेल्यांपैकी फक्त मिस्टरच जाणू शकत होते आणि माझे तात्या. त्या दिवसापासून मिस्टरही महाराजांचे भक्त झाले आणि पुढे क्रमाने आमचं सर्व कुटुंब गजानन महाराजांच्या भक्तीत रंगून गेलं. आजही मुलगा, मुलगी, जावई, सून, नातवंड गजानन महाराजांच्या भक्तीत आहेत हे पाहून मन समाधानानी भरून येतं आणि हे समाधान अधिकच वाढीस लागतं जेव्हा केव्हा, जिथे कुठे शब्द कानावर येतात, श्री गजानन! जय गजानन! श्री गजानन! जय गजानन!

सौ. आशा पै, गोरेगाव, मुंबई – ९८१९३४८४४.
शब्दांकन : जयंत वेलणकर – ९४२२१०८०६९.
आपल्या जवळ गजानन महाराजांविषयी काही अनुभव असल्यास स्वागत आहे.

उपासना करीत असतांना समोर महाराजांचा फोटो ठेवावा अथवा महाराज समोर आहेत अशी कल्पना करावी.

१ – सोबत अनुक्रमणिका दिली आहे त्याच क्रमाने उपासना करावी. प्रथम अनंत कोटी ब्रह्मांड नायक. नामघोष करून उपासनेस आरंभ करावा.

२ – ओंकार करीत असतांना अथवा अन्य नाम घेतांना शांतपणे उच्चार करून विशिष्ट संख्या पूर्ण करावी (जसे ११,२१,१०८ वगैरे). घाईने नाम न घेता शांतपणे भक्तीभावपूर्ण नाम घ्यावे.

३ – प्रत्येक दोन नाममंत्रामध्ये अथवा पुढील क्रमांकावर जातांना मध्ये शांतपणे 'समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय' असा घोष शांतपणे करून पुढील नाममंत्र अथवा भजन सुरू करावे.

४ – ५ मिनिटांचे मौन साधत असतांना महाराजांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करावा आणि महाराजांच्या सर्व उपासकांसाठी आणि विश्व कल्याणासाठी प्रार्थना करावी.

५ – ही संपूर्ण उपासना व्यक्तिगत पातळीवर केल्यास २५ ते ३० मिनिटात पूर्ण होते आणि कुठेही सहज करता येते.

**सामुहिक उपासना**

सामुहिक उपासनेतून एक भक्तीमय वातावरण निर्माण होते. काही विशिष्ट दिवशी, जसे गुरूवार, एकादशी, ऋषीपंचमी, प्रकटदिन, गुरूपौर्णिमा, अशा दिवशी सामुहिकपणे ही उपासना करता येईल.

१ जानेवारी २०१५ रोजी गुरूवार आणि एकादशी अशा शुभमुहूर्तावर महाराजांच्या प्रेरणेने नागपूरात अशी सामुहिक उपासना सुरू झाली आणि नियमाने दर एकादशीला उपासना होत असते.

कुणाच्या घरी अथवा गजानन महाराजांच्या मंदिरात एकत्र जमून (पेनड्राईव्ह मध्ये उपासना घेता येते) साऊंड सिस्टीमच्या माध्यमातून एकत्रितपणे साधारण ५५ मिनिटात ही उपासना पूर्ण होते. पेनड्राईव्हच्या माध्यमाने अशी उपासना आज विविध ठिकाणी सुरू झाली आहे. उपासनेत दोन नियम कृपया कटाक्षाने पाळावे – एकतर उपासनेत कुणीही कुठलाही निधी/पैसा देणार नाही आणि प्रसाद केवळ साखर अथवा पेढे हाच राहील. म्हणजे त्यामुळे भ्रष्टाचार आणि खाणेपिणे या गोष्टीपासून दूर राहून भक्तीपूर्ण उपासना होऊ शकेल. अर्थात मंदिरासाठी हा नियम असण्याचे कारण नाही.

अनंत कोटी ब्रह्मांड नायक, महाराजाधिराज, योगीराज, परब्रह्म, सच्चिदानंद, भक्त प्रतिपालक, शेगाव निवासी समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय।

१ – ॐ (११ वेळा)

२ – ॐ श्री गजानन महाराज की जय। (१०८ वेळा)

३ – गण गण गणात बोते। (१०८ वेळा)

४ – श्री गजानन – जय गजानन। (२१ वेळा)

५ – श्री गजानन बावन्नी

६ – श्री गजानन अष्टक

७ – अभंग – गण गण गणात बोते

८ – ५ मिनिटांचे मौन

। समर्थ सद्गुरु श्री गजानन महाराज की जय।

**आरती श्रीगजानन महाराज**

शेवट – अनंत कोटी.... श्री गजानन महाराज की जय।

॥ अनंत कोटी ब्रह्मांड नायक महाराजाधिराज योगीराज ॥ परब्रह्म सच्चिदानंद, भक्त प्रतिपालक, शेगाव निवासी समर्थ सद्गुरू, श्री गजानन महाराज की जय ॥

हा घोष करून उपासना पूर्ण करावी.

॥ समर्थ सद्गुरू श्रीगजानन महाराज की जय॥

उपासकांना नामजप मोजणे सोपे व्हावे म्हणून मुद्दाम क्रमांक टाकले आहेत

जयघोष करून शांत पणे ११ वेळा ओंकार म्हणून उपासनेला सुरूवात करावी

१) ॐ २) ॐ ३) ॐ ४) ॐ ५) ॐ ६) ॐ ७) ॐ ८) ॐ ९) ॐ १०) ॐ ११) ॐ

१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

१० – ॐ श्री गजानन महाराज की जय।

११ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

१२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

१३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

१४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

१५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

१६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

१७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

१८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

१९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२० – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

२९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३० – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

३९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४० – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
४९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५० – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
५९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६० – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
६९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७० – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
७९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

८० – ॐ श्री गजानन महाराज की जय।
८१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
८२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
८३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
८४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
८५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
८६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
८७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
८८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
८९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९० – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
९९ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
१०० – ॐ श्री गजानन महाराज की जय।
१०१ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
१०२ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
१०३ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
१०४ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
१०५ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
१०६ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
१०७ – ॐ श्री गजानन महाराज की जय।
१०८ – ॐ श्री गजानन महाराज की जय।

॥ समर्थ सद्गुरू श्रीगजानन महाराज की जय ॥

१ – गण गण गणात बोते।
२ – गण गण गणात बोते।
३ – गण गण गणात बोते।
४ – गण गण गणात बोते।
५ – गण गण गणात बोते।
६ – गण गण गणात बोते।
७ – गण गण गणात बोते।
८ – गण गण गणात बोते।
९ – गण गण गणात बोते।
१० – गण गण गणात बोते।
११ – गण गण गणात बोते।

१२ – गण गण गणात बोते।
१३ – गण गण गणात बोते।
१४ – गण गण गणात बोते।
१५ – गण गण गणात बोते।
१६ – गण गण गणात बोते।
१७ – गण गण गणात बोते।
१८ – गण गण गणात बोते।
१९ – गण गण गणात बोते।
२० – गण गण गणात बोते।
२१ – गण गण गणात बोते।
२२ – गण गण गणात बोते।
२३ – गण गण गणात बोते।
२४ – गण गण गणात बोते।
२५ – गण गण गणात बोते।
२६ – गण गण गणात बोते।
२७ – गण गण गणात बोते।
२८ – गण गण गणात बोते।
२९ – गण गण गणात बोते।
३० – गण गण गणात बोते।
३१ – गण गण गणात बोते।
३२ – गण गण गणात बोते।
३३ – गण गण गणात बोते।
३४ – गण गण गणात बोते।
३५ – गण गण गणात बोते।
३६ – गण गण गणात बोते।
३७ – गण गण गणात बोते।
३८ – गण गण गणात बोते।
३९ – गण गण गणात बोते।
४० – गण गण गणात बोते।
४१ – गण गण गणात बोते।
४२ – गण गण गणात बोते।
४३ – गण गण गणात बोते।
४४ – गण गण गणात बोते।
४५ – गण गण गणात बोते।
४६ – गण गण गणात बोते।
४७ – गण गण गणात बोते।
४८ – गण गण गणात बोते।
४९ – गण गण गणात बोते।
५० – गण गण गणात बोते।
५१ – गण गण गणात बोते।
५२ – गण गण गणात बोते।

५३ – गण गण गणात बोते।
५४ – गण गण गणात बोते।
५५ – गण गण गणात बोते।
५६ – गण गण गणात बोते।
५७ – गण गण गणात बोते।
५८ – गण गण गणात बोते।
५९ – गण गण गणात बोते।
६० – गण गण गणात बोते।
६१ – गण गण गणात बोते।
६२ – गण गण गणात बोते।
६३ – गण गण गणात बोते।
६४ – गण गण गणात बोते।
६५ – गण गण गणात बोते।
६६ – गण गण गणात बोते।
६७ – गण गण गणात बोते।
६८ – गण गण गणात बोते।
६९ – गण गण गणात बोते।
७० – गण गण गणात बोते।
७१ – गण गण गणात बोते।
७२ – गण गण गणात बोते।
७३ – गण गण गणात बोते।
७४ – गण गण गणात बोते।
७५ – गण गण गणात बोते।
७६ – गण गण गणात बोते।
७७ – गण गण गणात बोते।
७८ – गण गण गणात बोते।
७९ – गण गण गणात बोते।
८० – गण गण गणात बोते।
८१ – गण गण गणात बोते।
८२ – गण गण गणात बोते।
८३ – गण गण गणात बोते।
८४ – गण गण गणात बोते।
८५ – गण गण गणात बोते।
८६ – गण गण गणात बोते।
८७ – गण गण गणात बोते।
८८ – गण गण गणात बोते।
८९ – गण गण गणात बोते।
९० – गण गण गणात बोते।
९१ – गण गण गणात बोते।
९२ – गण गण गणात बोते।
९३ – गण गण गणात बोते।

९४ – गण गण गणात बोते ।

९५ – गण गण गणात बोते ।

९६ – गण गण गणात बोते ।

९७ – गण गण गणात बोते ।

९८ – गण गण गणात बोते ।

९९ – गण गण गणात बोते ।

१०० – गण गण गणात बोते ।

१०१ – गण गण गणात बोते ।

१०२ – गण गण गणात बोते ।

१०३ – गण गण गणात बोते ।

१०४ – गण गण गणात बोते ।

१०५ – गण गण गणात बोते ।

१०६ – गण गण गणात बोते ।

१०७ – गण गण गणात बोते ।

१०८ – गण गण गणात बोते ।

॥ समर्थ सद्गुरू श्रीगजानन महाराज की जय ॥

१ – श्री गजानन ! जय गजानन!

२ – श्री गजानन ! जय गजानन!

३ – श्री गजानन ! जय गजानन!

४ – श्री गजानन ! जय गजानन!

५ – श्री गजानन ! जय गजानन!

६ – श्री गजानन ! जय गजानन!

७ – श्री गजानन ! जय गजानन!

८ – श्री गजानन ! जय गजानन!

९ – श्री गजानन ! जय गजानन!

१० – श्री गजानन ! जय गजानन!

११ – श्री गजानन ! जय गजानन!

१२ – श्री गजानन ! जय गजानन!

१३ – श्री गजानन ! जय गजानन!

१४ – श्री गजानन ! जय गजानन!

१५ – श्री गजानन ! जय गजानन!

१६ – श्री गजानन ! जय गजानन!

१७ – श्री गजानन ! जय गजानन!

१८ – श्री गजानन ! जय गजानन!

१९ – श्री गजानन ! जय गजानन!

२० – श्री गजानन ! जय गजानन!

२१ – श्री गजानन ! जय गजानन!

॥ समर्थ सद्गुरू श्रीगजानन महाराज की जय ॥

जय जय सद्गुरु गजानना ।
रक्षक तुची भक्तजना ॥१॥
निर्गुण तू परमात्मा तू ।
सगुण रूपात गजानन तू ॥।२॥
सदेह तू परि विदेह तू ।
देह असूनि देहातीत तू ॥३॥
माघ वद्य सप्तमी दिनी ।
शेगावांत प्रगटोनी ॥४॥
उष्ट्या पत्रावळी निमित्त ।
विदेहत्व तव हो प्रगट ॥५॥
बंकटलालावरी तुझी ।
कृपा जाहली ती साची ॥६॥
गोसाव्याच्या नवसासाठी ।
गांजा घेसी लावूनि ओठी ॥७॥
तव पद्तीर्थे वाचविला ।
जानराव तो भक्तभला ॥८॥
जानकीरामा चिंचवणे ।
नासवुनी स्वरूपी आणणे ॥९॥
मुकिन चंदुचे कानवले ।
खाऊनी कृतार्थ त्या केले ॥१०॥
विहिरीमाजी जलविहीना ।
केले देवा जलभरणा ॥११॥
मधमाश्यांचे डंख तुवा ।
सहन सुखे केले देवा ॥१२॥
त्यांचे काटे योगबले ।
काढूनि सहजी दाखविले ॥१३॥
कुस्ती हरिशी खेळोनी ।
शक्ती दर्शन घडवोनी ॥१४॥
वेद म्हणूनी दाखविला ।
चकित द्रविड ब्राह्मण झाला ॥१५॥
जळत्या पलंगावरती ।
ब्रह्मगिरीला ये प्रचिती ॥१६॥
टाकळीकर हरिदासाचा ।
अश्व शांत केला साचा ॥१७॥
बाळकृष्ण बाळापूरचा ।
समर्थ भक्तचि जो होता ॥१८॥
रामदासरूपे त्याला ।
दर्शन देवुनि तोषविला ॥१९॥
सुकलालाची गोमाता ।
द्वाड बहू होती ताता ॥२०॥
कृपा तुझी होतांच क्षणी ।

शांत जाहली ती जननी ॥२१॥
घुडे लक्ष्मण शेगांवी ।
येता व्याधी तूं निरवी ॥२२॥
दांभिकता परि ती त्याची ।
तू न चालवूनि घे साची ॥२३॥
भास्कर पाटील तव भक्त ।
उद्धरिलासी तू त्वरित ॥२४॥
आज्ञा तव शिरसावंद्य ।
काकहि मानति तुज वंद्य ॥२५॥
विहिरीमाजी रक्षियला ।
देवा तू गणु जवऱ्याला ॥२६॥
पितांबराकरवी लीला ।
वठला आंबा पल्लविला ॥२७॥
सुबुद्धी देशी जोश्याला ।
माफ करी तो दंडाला ॥२८॥
सवडद येथील गंगाभारती ।
थुंकूनि वारिली रक्तपिती ॥२९॥
पुंडलिकाचे गंडातर ।
निष्ठा जाणुनि केले दूर ॥३०॥
ओंकारेश्वरी फुटली नौका ।
तारी नर्मदा क्षणात एका ॥३१॥
माधवनाथा समवेत ।
केले भोजन अदृष्ट ॥३२॥
लोकमान्य त्या टिळकांना ।
प्रसाद तूची पाठविला ॥३३॥
कवर सुताची कांदा भाकर ।
भक्षिलीस त्वा प्रेमाखातर ॥३४॥
नग्न बैसुनी गाडीत ।
लीला दाविली विपरीत ॥३५॥
बायजे चित्ती तव भक्ती ।
पुंडलिकावर विरक्त प्रिती ॥३६॥
बापुना मनी विठ्ठल भक्ती ।
स्वये होशि तू विठ्ठल मूर्ती ॥३७॥
कवठ्याच्या त्या वारकऱ्याला ।
मरीपासून वाचविला ॥३८॥
वासुदेव यति तुज भेटे ।
प्रेमाची ती खूण पटे ॥३९॥
उद्धट झाला हवालदार ।
भस्मिभूत झाले घरदार ॥४०॥
देहांताच्या नंतरही ।
कितीजणा अनुभव येई ॥४१॥

पडत्या मजुरा झेलियले ।
बघती जन आश्चर्य भले ॥४२॥
अंगावरती खांब पडे ।
स्त्री वाचे आश्चर्य घडे ॥४३॥
गजाननाच्या अद्भूत लीला ।
अनुभव येती आज मितीला ॥४४॥
शरण जाऊनी गजानना ।
दुःख तयाते करी कथना ॥४५॥
कृपा करी तो भक्तांसी ।
धावुनी येतो वेगेसी ॥४६॥
गजाननाची बावन्नी ।
नित्य असावी ध्यानीमनी ॥४७॥
बावन्न गुरूवारी नेमे ।
करा पाठ बहु भक्तीने ॥४८॥
विघ्ने सारी पळती दूर ।
सर्व सुखाचा येई पूर ॥४९॥
चिंता साऱ्या दूर करी ।
संकटातुनी पार करी ॥५०॥
सदाचार रत सद्भक्ता ।
फळ लाभे बघता बघता ॥५१॥
सुरेश बोले जय बोला ।
गजाननाची जय बोला ॥५२॥
जय बोला हो जय बोला ।
गजाननाची जय बोला।

जय बोला हो जय बोला । गजाननाची जय बोला । समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय ॥

## ॥ श्री गजानन महाराजाष्टक ॥

गजानन गुणागरा परम मंगला पावना ।
अशीच अवघे हरी दुरित तेवि दुर्वासना ।
नसे त्रिभुवनामध्ये तुजविणे आम्हा आसरा ।
करी पदनतावरीं बहु दया न रोषा धरा ॥१॥

निरालसपणे नसे घडली अल्प सेवा करी ।
तुझी पतितपावना भटकलो वृथा भूवरी ।
विसंबत न गाय ती आपुलिया कधी वासरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥२॥

आलास जगी लावण्या परतुनी सुवाटे जन ।
समर्थ गुरूराज ज्या भुषवी नाम नारायण ।
म्हणून तुज प्रार्थना सतत जोडुनिया करा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥३॥

क्षणांत जल आणिले नसुन थेंब त्या वापिला ।
क्षणात गगनाप्रती करिसी इच्छिलेल्या स्थला ।
क्षणांत स्वरूपे किती विविध धारिसी धीवरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥४॥

अगाध करणी तुझी गुरुवरा! न लोका कळे ।
तुला त्यजुन व्यर्थ ते अचरितात नाना खुळे ।
कृपा उदक मागती त्यजुनी गौतमीच्या तीरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥५॥

समर्थ स्वरूपाप्रती धरून साच बाळापुरी ।
तुम्ही प्रकट जाहला सुशील बाळकृष्णा घरी ।
हरीस्वरूप घेऊनी दिधली भेट भीमातीरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥६॥

सच्छिद्र नौकेप्रती त्वदीय पाय हे लागता ।
जलात बुडता तरी तिजसि नर्मदा दे हाता ।
अशा तुजसि वाणण्या नच समर्थ माझी गिरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥७॥

अता न बहु बोलता तव पदांबुजा वंदितो ।
पडो विसर ना कदा मदीय हेच मी मागतो ।
तुम्ही वरद आपुला कर धरा गणूच्या शिरा ।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ॥८॥

समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय।

*'गण गण गणांत बोते'' स्तोत्र (अभंग)*

'गण गण गणांत बोते' ।
हे भजन प्रिय सद्गुरुते ॥
या श्रेष्ठ गजानन गुरुते ।
तुम्ही आठवित रहा याते ॥
हे स्तोत्र नसे अमृत ते ।
मंत्राचि योग्यता याते ॥
हे संजीवनी आहे नुसते ।
व्यावहारिक अर्थ न याते ॥
मंत्राची योग्यता कळते ।
जो खराच मांत्रिक त्याते ॥
या पाठे दुःख तें हरते ।
पाठका अति सुख होते ॥
हा खचित अनुग्रह केला ।
श्रीगजाननें तुम्हांला ॥
घ्या साधुन अवघे याला ।
मनी धरून भाव-भक्तिला ॥
कल्याण निरंतर होई ।
दुःख ते मुळी नच राही ॥
असल्यास रोग तो जाई ।
वासना सर्व पुरतीलही ॥
आहे याचा अनुभव आला ।
म्हणुनियां कथित तुम्हांला ॥
तुम्ही बसून क्षेत्र शेगांवी ।
स्तोत्राची प्रचिती पहावी ॥
ही दंतकथा ना लवही ।
या गजाननाची ग्वाही ॥

समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय।

*॥ श्रीगजानन महाराज आरती ॥*

(५ मिनीटे मौन ठेवून नंतर आरती म्हणावी)

जय जय सत्चित्स्वरूपा स्वामी गणराया।
अवतरलासी भूवर जड-मुढ ताराया॥
॥ जयदेव जयदेव ॥धृ॥
निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी।
स्थिरचर व्यापुन उरले जे या जगतासी।
ते तू तत्व खरोखर निःसंशय अससी।
लीलामात्रे धरिले मानवदेहासी॥
॥ जयदेव जयदेव ॥१॥

होऊं न देसी त्याची जाणीव तूं कवणा।
करूनी "गण गण गणात बोते" या भजना।
धाता हरिहर गुरूवर तूचि सुखसदना।
जिकडे पहावे तिकडे तू दिससी नयना॥
॥ जयदेव जयदेव ॥२॥

लीला अनंत केल्या बंकटसदनास।
पेटविले त्या अग्नीवांचुनि चिलमेस।
क्षणांत आणिले जीवन निर्जल वापीस।
केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश॥
॥ जयदेव जयदेव ॥३॥

व्याधी वारून केले कैका संपन्न।
करविले भक्तालागी विठ्ठल-दर्शन।
भवसिंधू हा तरण्या नौका तव चरण।
स्वामी दासगणूचे मान्य करा कवन॥
॥ जयदेव जयदेव ॥४॥

॥ अनंत कोटी ब्रह्मांड नायक महाराजाधिराज योगीराज ॥ परब्रह्म सच्चिदानंद, भक्त प्रतिपालक, शेगाव निवासी समर्थ सद्गुरू, श्री गजानन महाराज की जय ॥